भूतावर भ्रमण

लेखक

यशवंत नरसिंह केळकर

१९४०

किमत ३ रुपये.

~~किंमत ३॥ रुपये~~

प्रकाशक : **य. न. केळकर,** डेक्कन जिमखाना, **पुणें ४**

मुद्रक : **धोंडो वासुदेव विद्वांस,** 'केसरी' प्रेस, ५६८ नारायण पेठ, **पुणें २**

अनुक्रमणिका

प्रास्ताविक दोन शब्द

मी वेळोवेळीं लिहिलेल्या इतिहासविषयक लेखांपैकीं कांहीं निवडक लेख या संग्रहात समाविष्ट केले आहेत. सदर लेख परिश्रमपूर्वक लिहिलेले असल्यामुळें ते पुस्तकरूपानें एकत्र संग्रहीत केलेले असावे असें मला साहजिकच वाटलें. म्हणून हौसेने हा उद्योग केला. लेख नियत-कालिकांत प्रसिद्ध होतो तेव्हांच तो ताजा; फुलाप्रमाणेंच तो दुसऱ्या दिवशीं शिळा होतो असा सामान्यतः समज. यामुळें हें पुनर्मुद्रण म्हणजे फिरून निर्माल्य हुंगावयास देण्यासारखें होय असें कोणी म्हणेल. तथापि फुलाफुलांत फरक असतो त्याप्रमाणें विषयाविषयांतहि तो असतो. ताजेपणीं पारिजातकाच्या फुलांइतकें सुवासिक काय आहे ? पण चारदोन तासांतच तीं निर्गंध होऊन जातात. उलट बकुळीचीं फुलें अशीं अस-तात कीं, तीं निर्माल्य होऊन गेलीं तरी पुढें अनेक दिवसपर्यंत त्यांचा मधुर सुवास जशाचा तसा टिकून राहतो. प्रचलित, चालू, हंगामी विषय आणि इतिहासासारखे अन्य महत्त्वाचे विषय यांच्या तुलनेस तोच न्याय लावल्यास फारशी चूक होईलसें वाटत नाहीं. मराठी इतिहासाच्या प्रचंड बकुलवृक्षाच्या एका छोट्या शाखेनें माझ्या छोट्या अंगणांत प्रवेश करून तेथें जी सुमवृष्टि केली तिचा हा सुगंधी निर्माल्य वाचकांना मजप्रमाणेंच आल्हाददायक वाटेल अशी आशा आहे.

पुणें
१।१२।४०

य. न. केळकर

भूतावर भ्रमण

* तोतयाचें बंड

मराठी नाट्यसृष्टींत 'तोतयाचें बंड' या नाटकाचें स्थान फारच उच्च दर्जाचें आहे. आजपर्यंत त्यावर वेळोवेळीं अनेक टीका होऊन सर्वानुमतें त्याला उच्च स्थान मिळालेलें आहे. या सर्व टीकांत श्री. कोल्हट-कर यांची टीका अतिशय विस्तृत व महत्त्वाची आहे. त्यांनी कलेच्या दृष्टीनें आपल्या मतें बारीक छाननी केलेली आहे. परंतु या ऐतिहासिक नाटकाची इतिहासाच्या कसोटीवर घासून कोणीं चिकित्सा केलेली नाहीं. प्रस्तुत परीक्षणांत मुख्यतः उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रांच्या कसोटीवर घासून सदर नाटकाचा अभ्यास केला आहे. श्री. कोल्हटकरांचे समग्र

* रत्नाकर, जून १९३२.

लेख सध्या एकत्र छापण्यांत येत आहेत, तेव्हां अनायासें त्यांतील तोतयाचे बंडावरील टीकेबरोबरच हा टीकालेखहि वाचनांत आल्यास या नाटकाच्या अभ्यासकांस बराच फायदा होईल अशी खात्री वाटते. असो.

तोतयाच्या बंडासंबंधीं ऐतिहासिक कागदपत्र छापलेले आहेत, ते मुख्यतः श्री. खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत. त्याखेरीज पारसनिसांच्या इतिहाससंग्रहांतहि दोनचार पत्रें छापलेलीं आहेत. वाडांच्या पेशवाडायरींमध्यें कांही विश्वसनीय उतारे उद्धृत केले आहेत व यांखेरीज खुद्द नाटककर्त्यांनें भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३४ च्या वार्षिक अहवालांत फार महत्त्वाचीं अशीं ३९ पत्रें छापलेलीं आहेत. त्यांचा अभ्यास करून त्यांवरून नाटकांतील कथानकाचा काल व त्यांतील प्रवेशांचें कालांतर ठरविण्याचा प्रथम प्रयत्न करूं.

कथाप्रसंगांची कालनिश्चिति

कथानकास तोतयाच्या बंधमुक्ततेपासून सुरुवात होते. भा. इ. सं. मं. च्या शके १८३४ च्या वार्षिक अहवालांतील नारो बाबाजी फडके यानें नाना फडणविसास लिहिलेल्या पत्रांत तोतयाच्या बंधमुक्ततेची नक्की मिति दिलेली आहे. तो लिहितो. " सेवेसी नारो बाबाजी फडके, कृ. सा. न. वि. वि. तागायत छ. ७ सफर प्रातःकाल पावेतों मुक्काम रत्नागिरी वर्तमान यथास्थित असे विशेष. ज्या कार्यास स्वामींनीं येथें पाठविलें त्यास येथील मामलेदारानें फाल्गुन शु. १० स. बेडी तोडून सर्व सरंजाम श्रीमंतांप्रमाणें करून दिल्हा. " मोडकजंत्रीवरून या मितीची मुकाबल्याची इंग्रजी तारीख २८-२-१७७६ ही येते. आतां या तारखेपासून नाटकांतील कथानकाचा बनाव कोणकोणत्या कालांतराने घडला हें पहावयाचें.

पहिला प्रवेश तोतयाच्या मुक्ततेचाच आहे, तेव्हां त्याची तारीख २८-२-१७७६ हीच होय. दुसऱ्या प्रवेशाची तारीखहि तीच असली

पाहिजे. कारण त्यांत तोतयाच्या बंधमुक्ततेच्या आनंदाप्रीत्यर्थ झालेल्या तोफांच्या सरबत्तीचा उल्लेख आहे. या प्रवेशांत पिकटंभट चिकटंभटास म्हणतो, " अरे, कधींकाळीं कशास ? आज, अगदी आज या खुद्द रत्नागिरीस भाऊसाहेबांचा अवतार अवतरला. तुला रोज शिंकेचा शकून पटतो आणि आज तोफांचाहि पटत नाहीं ? " यानंतर तिसऱ्या प्रवेशांतील प्रसंग पुण्यास पेशव्यांच्या शनवार वाड्यांत घडलेला आहे. त्यांत बाजी हुजऱ्या रत्नागिरीहून येऊन तोतयाच्या मुक्ततेसंबंधींचें पत्र पार्वतीबाईस देतो. बाजी हुजऱ्या कितीहि तांतडीनें पुण्यास आला असला तरी त्या काळच्या प्रवासाच्या अडचणी लक्षांत घेतां निदान तीन दिवस तरी त्याला लागले असावेत, हें लक्षांत घेतलें म्हणजे या प्रवेशाचा काल २ मार्च १७७६ असा ठरतो. [या प्रवेशांत बगंभटाच्या तोंडीं कालदर्शक उल्लेख आला आहे तो असा. " आज एकादशीच आहे, फराळसुद्धां करावयाची अडचण नाहीं. मी स्नानसंध्या आणि एकादष्णि उरकून घेतों कीं निघतोंच. " यावरून मात्र जंत्रींतील कोष्टकानुरूप तोतयाची सुटका २६ किंवा २७ फेब्रुवारी १७७६ रोजीं झाली असें धरावें लागेल.]

चवथा प्रवेश रत्नागिरीस घडलेला आहे. त्यांत रामचंद्र नाईक पुण्यास येण्यास निघणार आहे. त्यावरून त्या प्रवेशाचा काळ तोतयाच्या मुक्ततेनंतर ७–८ दिवसांनीं धरला पाहिजे. म्हणजे तो ७ मार्च १७७६ येतो. एकूण पहिल्या अंकांतील हकीगत ७–८ दिवसांत घडलेली आहे.

यानंतर दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत पार्वतीबाईकडून रत्नागिरीस तोतयाकडे जावयास निघालेला बगंभट विठाईस भेटावयास आलेला आहे. तो तिला सांगतो कीं, " आमची स्वारी उद्यां रत्नागिरीला चालली. " बगंभटाच्या जाण्याचा बेत ३ मार्चला सकाळीं ठरला व तो त्याच रात्रीं विठीची भेट घ्यावयास आला. यावरून ३ मार्च १७७६ ची

रात्र हाच या प्रवेशाचा काल ठरतो. यानंतरच्या दुसऱ्या प्रवेशांत खुशालराव व बाजीराव यांचा संवाद आहे. त्यांत विठाईस हैबतराव दिसल्याच्या हकीगतीचा उल्लेख येतो. " काल रात्रीं हैबतराव पुण्यास आला व विठीला दिसला, " असें खुशालराव म्हणतो. म्हणून या प्रवेशाचा काल उघडच ४ मार्चची दुपार किंवा संध्याकाळ असा ठरतो. यानंतरचा तिसरा प्रवेश नाना फडणीस व हरिपंत यांच्या खलबताचा आहे. त्यांच्या भाषणांत तोतयाच्या पारिपत्याकरितां बोरघाटाकडे सरकारच्या फौजा रवाना झाल्याचा उल्लेख आहे. तसेंच राजमाची तोतयानें काबीज केल्याचा व सिंहगडावर लाल बावटा उभारण्याची तयारी झाल्याचा उल्लेख येतो. १७७६ च्या ऑक्टोबर महिन्यांत बोरघाटाकडे फौजा रवाना झाल्या, असें आपणांस निश्चितपणें ऐतिहासिक कागदपत्रांवरून म्हणतां येतें. तेव्हां या प्रवेशाचा काल १७७६ च्या ऑक्टोबर महिन्यांतील असला पाहिजे. आपण स्थूल मानानें तो १ ऑक्टोबर १७७६ धरूं; म्हणजे मागल्या प्रवेशानंतर हा प्रवेश ८ महिन्यांनीं घडला असें धरावें लागतें.

यानंतर तिसऱ्या अंकास सुरुवात होते. पहिला प्रवेश पुण्याच्या वेशीवरचा आहे. त्याचा काळ ठरविणें सोपें आहे. रात्रीं वेशीजवळ आल्यानंतर हैबतराव म्हणतो, " कालचा दिवस मी कसाबसा दडून काढला व पुण्यांतून तूर्त निघून जावें म्हणून अंधारी रात्र पाहून या वेशीच्या दारापर्यंत आलों " विठीच्या घरून हैबतराव निघाला ती तारीख ३ मार्च १७७६ होय; हें अंक २ प्रवेश १ वरून सिद्ध आहे. त्याअर्थीं या प्रवेशाचा काल ५ मार्चची रात्र असा ठरतो. निव्वळ ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर या प्रवेशाचा काल १७८२ नंतर नेला पाहिजे. कारण सवाई-माधवराव रोजनिशी, भाग ३, पान ३४९ वरून पुणें शहरची कोतवाली घाशीरामाला प्रथम मिळाली ती या सालीं. तत्पूर्वीं घाशीराम पुण्याचा केव्हांहि कोतवाल असल्याचें नमुद नाहीं. आणि १७८२ हें साल या

प्रवेशाचें धरलें तर अमलेसुद्धां तोतयाचें बंड महिने होऊन ६ वर्षें लोटून स्थिरस्थावर झालेलें असणार. वास्तविक नाट्यदृष्ट्या घाशीरामाचा उल्लेख ही आम्ही मोठीशी चूक मानीत नाहीं. पण ऐतिहासिक दृष्टीची म्हणून नमूद केली इतकेंच. पुढील प्रवेश २, नाना फडणवीस व पार्वतीबाई यांच्या भेटीचा आहे. त्यांत विठाई “ परवांच्या दिवशीं रात्रीं हैबतराव आपणास दिसला, ” असें सांगते व पार्वतीबाईहि त्यासंबंधीं नानाला सांगतांना म्हणते कीं, “ माझी कुणबीण विठी तिचा नवरा हैबती निंबाळकर पुण्यांत प्रगट होऊन तिला भेटला आणि ही गोष्ट कांहीं लांबची नाहीं. नुक्ती परवां घडली. ” यावरून या प्रवेशाचा काल ५ मार्च १७७६ हा ठरतो. [परंतु त्याच प्रवेशांत नाना फडणीस बोरघाटांत लढाई लौकरच जुंपेल असें पार्वतीबाईस सांगतो व फौजा तिकडे रवाना केल्या आहेत असें म्हणतो. बोरघाटांत फौजा रवाना झाल्या त्याचा काळ ऐतिहासिक कागदपत्रांवरून ऑक्टोबर १७७६ हें निश्चित आहे. तेव्हां वास्तविक अंक २ प्रवेश ३– ज्यांत हरिपंतांचें व नानांचें तोतयाच्या पारिपत्याचें बोरघाटांत फौजा रवाना करण्यासंबंधींचें संभाषण आहे तो प्रवेश व हा प्रवेश हे एकामागून एक असावयास पाहिजे होते. याखेरीज या प्रवेशाचा काल ठरविण्याबाबत दोन गमकें सांपडतात. पहिलें गमक म्हणजे नाना फडणिसाच्या बायकोच्या क्रियाकर्मांतराचा उल्लेख व दुसरें खुद्द रामचंद्र नाइकाची कैद. प्रवेशाच्या सुरुवातीसच पार्वतीबाई नानाला म्हणते “ कुटुंबाचें क्रियाकर्मान्तर कालच संपलें ना ? ” अर्थात् नाना फडणिसाच्या कुटुंबाच्या मृत्यूनंतर तेरावा दिवस हा या प्रवेशाचा काल असावयास पाहिजे. खरे पान २६५२; पत्र नं. १८७५, यांत नाना फडणिसाच्या बायकोच्या मृत्यूसंबंधीं पत्र आहे तें असें: “ श्रीमंत राजश्री नानांचे स्त्रीस बहुत दिवस बरें वाटत नव्हतें. उपायहि बहुतच जाहले; परंतु आयुष्यमर्यादेपुढें उपाय नाहीं. दिवसेंदिवस क्षीण

होऊन श्रा. शुद्ध १४ स इन्दुवारीं देवाज्ञा झाली. पुण्यातच होती. काल प्रातःकाल दिवसास रा. नानास वर्तमान कळलें, त्याजवरून बहुतच श्रमी आहेत. अनुचित गोष्ट जाहली. आधींच दौलतीस चहूंकडे हिसके बसोन जिकडील तिकडे पेंच बसले. तोतयाचें खूळ. रा. हरिपंत तात्याकडील नालबंदीच्या ऐवजास ठिकाण नाहीं. हिसके भारी. एक दिवस सुख नाहीं. असें म्हणोन उदासच होते. त्यांत ही गोष्ट जाहली. आतां तर फारच उदास होतील." मोडक-जंत्रीवरून २९–७–१७७६ ही नानांच्या बायकोच्या मृत्यूची तारीख येते व त्यानंतर तेरावा दिवस म्ह. ११ ऑगस्ट १७७६ ही तारीख येते. तेव्हां वास्तविक हाच नक्की काल या प्रवेशाचा असावयास पाहिजे.]

आतां दुसरें गमक रामचंद्र नाइकाची कैद. पण त्यासंबंधीं मात्र निश्चित तारीख उपलब्ध नाहीं. रामचंद्र नाइकाला खरोखर कैद कोणच्या तारखेस केलें यासंबंधीं उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रांत पुरावा नमूद नाहीं. ऐतिहासिक लेखसंग्रह, पत्र नं. १८७८, वरून २२ जुलै १७७६ पर्यंत रामचंद्र नाईक मोकळा आहे. पत्र नं. १८८१ वरून २७ जुलै पर्यंतहि तो मोकळा आहे. पत्र नं. १९१० वरून मात्र तो कैद झाला आहे असें दिसतें. त्या पत्राची तारीख ३ नोव्हेंबर १७७६ ही आहे. अर्थात् रामचंद्र नाइकाला १ ऑगस्टनंतर केव्हांतरी पकडला असला पाहिजे. सारांश, या प्रवेशाचे काल चार ठरतात! नाटककारांच्या प्रवेशाच्या अनुसंधानानें त्याचा काल १० मार्च १७७६ ठरतो. बोर-घाटांतील लढाईच्या गमकावरून १७७६ चा ऑक्टोबर–नोव्हेंबर महिना ठरतो. नानांच्या बायकोच्या मृत्यूमुळें तो ऑगस्ट १७७६ धरावा लागतो आणि रामचंद्र नाइकाच्या कैदेमुळें तो अदमासें १ ऑगस्ट मानावा लागतो!

यानंतर अंक ४ प्रवेश १ मध्यें आलेल्या कालदर्शक उल्लेखावरून

प्रवेशाचा काळ निघतो तो ६ मार्च १७७६ हा होय. कारण नाना म्हणतो, "काल पार्वतीबाईच्या भेटींत तोतया तिच्या दृष्टीस घालण्याचेंहि कबूल करून चुकलों आहें." पुढें हैबतराव आपली हकीगत नानास सांगतांना म्हणतो, "मी परवांपर्यंत पुण्यांत आलों नव्हतों एवढी गोष्ट मात्र खरी." या दोन अंतःप्रमाणावरून ६ मार्च १७७६ ही या प्रवेशाची तारीख ठरते. [या प्रवेशांत हैबतरावाचे तोंडीं असें वाक्य आहे, "बाईसाहेबांचा पुजारी व आश्रित बगंभट हा तोतयाकडे आजच पत्र घेऊन निघाला आहे." त्याचा काल, अंक २ प्रवेश १ वरून आपण ३ मार्च १७७६ ठरविला आहे आणि या प्रवेशाची तारीख तर ६ मार्च येते, म्हणून फिरून 'आजच' या शब्दाऐवजीं 'नुकताच' असा शब्दाचा पर्याय सुचवावा लागतो.]

यानंतर चवथ्या अंकांतला दुसरा प्रवेश. त्यांत हैबतरावानें बगंभटास बोरघाटांत गांठलें आहे. या प्रवेशाच्या कालनिश्चितीसंबंधानें गोंधळ आहे. अंक १ प्रवेश ३ मध्यें ३ मार्चला बगंभट रत्नागिरीस जाण्याकरितां पुण्याहून निघाल्याचें आपणांस माहित आहे. अंक ४ प्रवेश १ वरून हैबतराव बगंभटाच्या मागावर निघाल्याची तारिख ६ मार्चनंतर १–२ दिवस म्हणजे ८–३–१७७६ यावयास पाहिजे. कारण बगंभटाच्या मागोमाग हैबतराव लगेच निघाला आहे. १७७६ च्या फेब्रुवारीअखेर रत्नागिरीस तोतयाची सुटका झाली. पण त्याचें खूळ बोरघाटापर्यंत पिकण्यास ऑक्टोबरनोव्हेंबर उजाडला असें इतिहास सांगतो. तोतयाची रत्नागिरीस मुक्तता झाल्याचें कळल्याबरोबर बगंभट त्याच्या भेटीस जाणार तो रत्नागिरीकडेच हें सुसंगत आहे. पण नाटकांतील संविधानकाच्या कालानुक्रमानें पाहिलें तर तो सहाच दिवसांनंतर तोतयाला भेटण्याकरितां बोरघाटांत आलेला दिसतो. इतिहासावरून व नाटकांतील संविधानकावरूनहि या प्रवेशांतील बोरघाटाची योजना योग्य आहे. कारण तोतयाचें बंड

शेवटीं बोरघाटातच मोडलें. मग काय सहाच दिवसांत मनूच्या माशाप्रमाणें किंवा शिराळशेटाच्या राज्याप्रमाणें हें तोतयाचें बंड निर्माण झालें, वाढलें, महाराष्ट्रभर पसरलें आणि सहाच दिवसांत त्यानें सगळ्या पेशवाईभर धुमाकूळ उडवून दिला ? नाटककर्त्यानें असेंहि कोठें ध्वनित केलेलें नाहीं कीं बगंभट एकदां रत्नागिरीस गेला, परत आला व नंतर ४–५ महिन्यांनीं फिरून बोरघाटांत गेला. सारांश, ही मोठीच चूक संविधानकरचनेंत घडली आहे. आणि ती दुरुस्त करावयाची म्हटल्यास संविधानक खिळखिळें होण्याची भीति आहे. रत्नागिरी व बोरघाट या विरोधाचा परिहार करावयाचा तर बगंभट रत्नागिरीहून परत आल्याचा व फिरून चार महिन्यांनीं दागिने व पत्रें घेऊन बोरघाटाकडे निघाला अशा उल्लेखाचा प्रवेश घालावा लागेल. पण तसें करावें तर हैबतराव, विठाई व बगंभट यांच्या प्रवेशांपासून पुढील सर्व प्रवेशांचें स्वारस्य जाईल.

या पुढचा तिसरा प्रवेश पार्वतीबाई व अमलेचा. काल ठरविण्याच्या दृष्टीनें त्याचें मोठेसें महत्त्व नाहीं. तो केव्हांतरी हैबतराव बोरघाटांत गेल्याच्या सुमारास आला म्हणजे झालें. मात्र किंचित् कूस पार्वतीबाईच्या बोलण्यांत सांपडते. ती शोक करतांना म्हणते, “ पुरी खंती आली या मोठेपणाची. माझ्या जागीं यःकश्चित् एकादी भिकारीण असती तर तिनेंही आपल्या नवऱ्याला बंदीखान्यांत जाऊन भेटण्याचा हट्ट धरला असता; आणि तिचा तो हट्ट पुरलाही असता, पण माझा हट्ट पुरूं देणार कोण ? ” या पार्वतीबाईच्या उद्गारांच्या कांहीं थोडा वेळ आधीं विठीच्या व अमलेच्या संवादांत विठी अमलेला सांगते कीं, “ इथून जवळ शंभर कोसांवर आमचे धनी कैदेंत असतां त्यांच्यापर्यंत जाऊन स्वतःच्या डोळ्यांनीं खरें खोटें ही खात्री करून घ्यायला बाईसाहेबांना परवानगी मिळाली नाहीं ! कुणी विश्वासू ब्राह्मण गडी पाठविलाच तरी त्याला कित्ती पण चोरी ! ब्राह्मण गडी कसे तुरुंगांत जाणार ? आणि कशी खात्री

करून घेणार ? आणि त्यांनीं खात्री करून घेतली तरी उपयोग काय तिचा ? " म्हणजे तोतया कैदेंत असल्या वेळच्या या गोष्टी बोलतात. आणि संविधानकाच्या कालानुरोधानें पाहिलें तर या प्रवेशाचा काळ १२ किंवा १३ मार्च म्हणजे हैबतराव बोरघाटांत गेल्याच्या सुमाराचा येतो.

नंतरचा प्रवेश चवथा. अंक ४ प्रवेश २ च्या काळावरून या प्रवेशाचा काळ १५ दिवसांच्या अंतरानें म्हणजे सुमारें २८ मार्च १७७६ हा येतो. कारण हैबतराव म्हणतो ' मी या तोतयापाशीं गुप्त वेशानें येऊन राहिल्यापासून इतक्या दिवसांत आज जरा मला याच्याशीं एकांत मिळण्याचा संभव दिसतो. ' अर्थात् १५ दिवस कमींतकमी मानणें चूक नाहीं. खुद्द इतिहासाशीं मात्र पडताळा पहातां या प्रवेशाचा काळ ऑक्टोबर १७७६ च होय. फार काय, नक्की तारीखहि सांगतां येते. कारण या प्रवेशांत बोरघाटांतली शेवटची लढाई तोतया हरला आहे व त्या लढाईची हकीगत इतिहासांत नमूद आहे.

पांचवा अंक तोतयास पकडून पुण्यास आणण्यापासून सुरू होतो. कारण त्यांतील पहिल्या प्रवेशांत बाजीराव खुशालरावास म्हणतो, " तोतयाचा प्रवेश आज गांवांत झाला. " खरे, पान २७१०, पत्र नंबर १९२४ वरून ही तारीख ६ नोव्हेंबर १७७६ येते. म्हणजे या प्रवेशाची तारीख तीच होय. प्रवेश २ चाही काळ तोच होय. त्या प्रवेशावरून असें दिसतें कीं बोरघाटांतून तोतया पकडला जाण्याच्या आधीं बगंभट पुण्यास परत आला. बगंभटाला संसर्गाचीं प्रायश्चित्तें सांगण्याचा अधिकार मिळाला असें त्या प्रवेशांत आहे, त्यावरून इतिहासास धरून बोलावयाचें तर त्या प्रवेशाचा काळ डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यापर्यंत जातो. कारण तेव्हांच तोतयाची चौकशी होऊन संसर्गी लोकांस प्रायश्चित्तें देण्यास सुरुवात झाली.

यापुढील प्रवेशांच्या कालनिश्चितींत फारसा घोंटाळा नाहीं. ते डिसेंबर १७७६ त केव्हांतरी घडले आहेत.

एकंदरींत ढोबळ म्हणण्यासारखी चूक घडली आहे, ती मार्च व ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत घडलेल्या गोष्टींमधील अंतर न कळत पुसलें गेलें आहे ही होय.

किरकोळ दोष व त्यांसंबंधीं खुलासा

यानंतर ऐतिहासिक दृष्टीला दिसणाऱ्या कांहीं किरकोळ दोषांचा उल्लेख करूं. यांपैकीं कांहीं दोष पूर्वीं उल्लेखिलेले असतील व कांहीं नवीन सुचणारे आहेत. त्यांचा क्रमवार विचार करूं.

श्रीयुत कोल्हटकरांनीं असें लिहिलें आहे कीं, तोतयाच्या कैदेसंबंधीं सदरहू नाटकांत निरनिराळे उल्लेख आलेले आहेत. कधीं तो १० वर्षें कैदेंत आहे असें म्हटलें आहे. कधीं १२ म्हटलें आहे, कधीं १४-१५ ही म्हटलें आहे. वास्तविक ही चूक फारशी मोठी नसली, किंबहुना क्षुल्लकहि असली तरी १०–१२–१४–१५ पैकीं कोठला तरी एकच आंकडा सगळीकडे यावयास पाहिजे. कारण नाटकांचे प्रवेशांचे काळ कमी अधिक अंतरानें पण एकाच वर्षांतले आहेत. पण या बाबतींत इतिहासाचा आधार घेऊन नाटककर्त्याचें थोडेसें समर्थनही करतां येण्यासारखें आहे. कारण कोणीहि मनुष्य सामान्य व्यवहारांत बोलतांना इतिहास लिहावयास बसल्याप्रमाणें अगदीं बिनचूक काळाचा उल्लेख करूनच बोलतो असें नाहीं. मोघम उल्लेखच त्याचे तोंडीं येणार. इतिहासास धरून बोलावयाचें तर पार्वतीबाई तोतयाच्या कैदेचा जो उल्लेख करते तो कोणच्या काळासंबंधीं हें ठरविणें कठीण आहे. कारण १७६३ सालीं प्रथम तोतयाला खानदेशांत पकडण्यांत आलें. मल्हारराव होळकरानें त्याची चौकशी केली व त्यास पुण्यास पाठवून दिलें. पण वाटेंत तोतया पळून गेला. फिरून १७६५ सालीं खानदेशांत तोतयाचें बंड बळावलें. त्या बंडाचा बीमोड नारो कृष्ण दवें व दामोदर हरी यांनीं केला व त्यास

कैद करून कुकुरमुंड्याजवळून पुण्यास पाठवून दिलें. पेशव्यांनीं त्याला घनगडावर कैदेंत ठेविलें. फिरून तेथें दौलतगीर गोसाव्यानें फितूर केल्यामुळें त्याला सोलापूरच्या किल्ल्यावर नेलें. सोलापुराहून त्यास अहमदनगरास नेण्यांत आलें. तेथेंही मोठा फितूर झाल्यामुळें १७६६–६७ त त्याला दौलताबादेस कैदेंत ठेवण्यांत आलें. तेथल्या किल्लेदाराशीं त्याचें सूत जंमलें या संशयावरून त्याची रवानगी पुरंदरास करण्यांत आली. त्यानंतर ऑक्टोबर १७७५ चे सुमारास तोतया मिरजेस आणून ठेविला होता, तो रत्नागिरीस पाठविल्याचा उल्लेख आहे. तेव्हां तोतयाला पकडण्याच्या दोन वेळा तरी उघड दिसतात. एक १७६२ व दुसरी १७६५. शिवाय पार्वतीबाईच्या भाषणांत तोतयास प्रथम औरंगाबादेस कैद केल्याचा उल्लेख आलेला आहे, त्याला प्रस्तुत लेखकास इतिहासांत कोठें आधार सांपडला नाहीं. नाटककर्त्यानें नाटक लिहिते वेळीं नाटकांतलि विशिष्ट गोष्टींचे काळ ऐतिहासिक साधनांवरून टिपून नोंदी केलेलें टांचण लेखकानें पाहिलेलें आहे. त्यांत "१७६६ तोतया पकडून औरंगाबादेस कैद" असें म्हटलें आहे. सारांश, मूळ अस्सल ऐतिहासिक पत्रावरूनहि जर तोतयाच्या कैदेचा निश्चित काळ ठरत नाहीं, तर नाटकांतल्या पार्वतीबाईनें तोतयाच्या कैदेच्या काळाचा मोघम उल्लेख केला तर बिघडलें कोठें?

दुसरा असाच आरोप रामचंद्र नाइकासंबंधींहि घेतां येण्यासारखा आहे. नाटकांत कोठें त्याला रत्नागिरीचा किल्लेदार म्हटलें आहे, तर कोठें रत्नागिरीचा मामलेदार म्हटलें आहे. वास्तविक तो किल्लेदार नसून मामलेदारच होता; पण वरच्यासारखीच ही चूक क्षुल्लक होय. यापेक्षां ऐतिहासिक वस्तुस्थितीशीं खरोखर विलग अशी एक चूक रामचंद्र नाइकाच्या बाबतींत घडली आहे. पहिल्या प्रवेशांत खुद्द रामचंद्र नाईक आपल्या हातानें तोतयाच्या बेड्या काढतो असें दाखविलें आहे. वास्तविक रामचंद्र नाईक परांजपे त्या वेळीं म्हणजे तोतयाच्या मुक्ततेच्या वेळीं

रत्नागिरीसच नव्हता. रामचंद्र नाइकाच्या फुर्शीमुळें किल्लेदारानें तोतयाची बेडी काढली येवढी गोष्ट खरी आहे. अर्थात् याला चूक न म्हणता नाटककारानें केलेला फेरफारच म्हणणें योग्य होय.

हैबतरावाचें पात्र नाटककर्त्यानें मोठें उमदें रंगविलें आहे. तो मोठा विवेकी, धोरणी, शूर व हुशार मनुष्य आहे यांत शंकाच नाहीं. परंतु त्याच्या तोंडीं घातलेले कांहीं उद्गार एखाद्या विद्वान् शास्त्रीपंडिताला शोभण्यासारखे आहेत तें मात्र कसेंसेंच वाटतें. कांहीं झालें तरी हैबतराव हा एक लढवय्या मराठा शिलेदार. इतिहासाला धरून बोलावयाचें तर सामान्यतः तो बहुश्रुत असला तरी मोडी पत्रव्यवहार करण्यापलीकडे त्याची गति नसणार. पण नाटकांत त्याच्या तोंडचे शब्द एकाद्या 'पंडिताला' शोभण्यासारखे आहेत.

अंक ४ प्रवेश २ मध्यें बगंभटाचा वेश घेतांना तो म्हणतो, "ब्राह्मण जर क्षत्रिय कर्म करतात तर क्षत्रियाला ब्राह्मणाचें कर्म करण्याला कां हरकत असावी बुवा ?" हे उद्गार मार्मिक व समयोचित असले तरी ते हैबतरावाच्या तोंडीं शोभणार नाहींत, एवढाच आमचा आक्षेप. अंक ४ प्रवेश ४ मध्यें हैबतराव म्हणतो, "एका सोमयागांत माझ्याकडे ऋत्विजपणा यावयाचा होता, पण सोमयागांतलें हौत्र ऋग्वेदानं करावं कां यजुर्वेदानं करावं असा वाद माजल्यामुळं शौर्य दाखविण्याचा माझ्यावरचा तो प्रसंग टळला." वरील वाक्यें आज एखाद्या M. A., LL. B. झालेल्या भास्करराव जाधवांनीं उच्चारलीं तर तीं कदाचित् विचित्र वाटणार नाहींत. पण कडक, कर्मठ, धार्मिक भावनांच्या पेशवाईतल्या काळांत हैबतरावाला याज्ञिकींतल्या खाचाखोंचा काय कळणार ? वास्तविक सुखनिधान हा तोतया परदेशी कनोजा ब्राह्मण होता. तेव्हां त्याला फसविण्याकरिता घेतलेल्या ब्राह्मणाच्या सोंगांत कांहीं चुकाहि झाल्या असल्या तरी त्या सहज

खपल्या जात्या. याज्ञिकींतल्या खाचाखोंचांचे दाखले देण्याइतकें हुबेहूब शंभर नंबरी ब्राह्मणाचें सोंग सजावयास पाहिजे होतें असें नाहीं. हैबत-रावाच्या तोंडच्या वरील वाक्यासंबंधीं खुद्द नाटककर्त्याला विचारतां त्याने केलेला खुलासा मौजेचा आहे. हें नाटक लिहिलें तेव्हा कर्ता केसरीचा संपादक होता व त्या वेळीं हाच वाद वर्तमानपत्रांतून जोरानें चालू होता. तेव्हा त्या वादाला अनुलक्षून गम्मत म्हणून हें वाक्य हैबतरावाच्या तोंडीं नाटककर्त्यानें घातलें !

यानंतर चूक दाखवावयाची आहे ती बिठी कुणबिणीसंबंधीं. खरोखरी ती चूक नव्हेच परंतु निव्वळ इतिहाससंशोधकालाच ती दिसते म्हणून तिचा उल्लेख करतों. नाटकांत सर्वत्र बिठीला ' कुणबीण ' म्हटलें आहे. कुणबीण या शब्दाला सध्यांहून अगदीं वेगळा असा विशिष्ट अर्थ त्या वेळीं होता. एखाद्या विवाहित स्त्रीनें व्यभिचार केला तर जात किंवा सरकार तिच्या नवऱ्याशीं तिचा घटस्फोट करून देई. नंतर ती स्त्री ' कुणबीण ' या सदरांत जमा होई. कुणबीण म्हणजे केवळ गुलाम. जमाखर्चांत त्यांची जमा गुरांढोरांच्या व घोड्यांच्या पागेच्या सदरांत होई. त्यांची खरेदीविक्रीही होई. अशा तऱ्हेनें पतित झालेल्या स्त्रीचा नवरा कुणबीण म्हणून वाटल्यास दुसऱ्या कोणास किंमत घेऊन तिला विकी. सारांश, एखादी स्त्री कुणबीण या सदरांत गेली म्हणजे नवऱ्याला तिचें सोयर सुतक कांहींच रहात नसे. ही स्थिति लक्षांत घेतली असतां हैबतरावाला बिठीवर नवरेपणाचा हक्क तरी काय उरतो व बिठीला तरी त्याची भीति कां वाटावी ? तिचा खरा नवरा जरी प्रगट झाला असला तरी स्वतःच्या पापकर्मामुळें ती आगाऊच ' कुणबीण ' झालेली आहे. बरें, नाटकांत तर ती वरकरणी हैबतरावाच्या नांवाकरितां सौभाग्यचिन्हें धारण करीत आहे असेंच सर्वत्र दाखविलें आहे. हा सर्व घोंटाळा कुण-बीण या शब्दाच्या व्याख्येचा प्रश्न उपस्थित केल्यामुळें होतो. त्या अर्थी

विठीला पार्वतीबाईची कुणबीण न म्हणतां सेवा करणारी साधी खासे चाकरीची स्त्री दाखविली असती म्हणजे काम झालें असतें. पेशवाईनंतर कुणबिणींची गुलामगिरी कायद्यानें बंद झाली, त्याला आज शेंसवाशें वर्षें होऊन गेलीं. तेव्हां या नाटकांतील कुणबीण या शब्दामुळें किंचित् धक्का बसला जातो तो फक्त इतिहाससंशोधक असेल त्यालाच बसणार हें साहजिक आहे. शिवाय आज कुणबीण हा शब्द ज्या अर्थानें रूढ आहे, त्याच अर्थानें नाटककर्त्यानें तो वापरला आहे व वाचकांनींही तसाच समजून घेतला आहे. तेव्हां नाटकदृष्ट्या ती मुळींच चूक होऊं शकत नाहीं.

अंक ३ मधील पहिल्या सुंदर प्रवेशांत भाऊसाहेबांचा पोवाडा दिलेला आहे. तो वास्तविक एकच पोवाडा नव्हे. दोन निरनिराळ्या पोवाड्यांतील त्रोटक भाग नाटककर्त्यानें सोईकरितां निवडलेले दिसतात. त्यांपैकीं एका पोवाड्यांतील "सज्जन म्हणती भाऊ बुडाले मोठा घात झाला अमुचा; दुर्जन म्हणती बरवें झालें काच मिटला जगाचा." या चरणाचा फारच मार्मिक उपयोग नाटककर्त्यानें करून घेतला आहे. तोतया खरा भाऊसाहेब असून कारभाऱ्यांनीं मुद्दाम लटका ठरविला अशी जी गप्प कारभाऱ्यांच्या हितशत्रूंनीं उठविली होती व जिचा सर्व पुण्यांत प्रसार होऊन कारभाऱ्यांच्याविषयीं टीका सुरू होती तिच्या समर्थनार्थ नाटककर्त्यानें या चरणाचा उपयोग केलेला आहे. आमचें म्हणणें एवढेंच कीं, त्याच पोवाड्याचा आणखी एक चरण उद्धृत करून नाटककर्त्याला भाऊसाहेब जिवंत आहेत या समजाला आणखी भर देता आली असती. रामा सटवाच्या पोवाड्यांत चौदाव्या चरणांत खालील चरण आहेत:— "कशिगत झाली गड्यांनो भाऊला; जनकोजी शिंद्याला; लोक पुसती एकुणेराला, आम्ही नाहीं पाहिला" वगैरे.

या नाटकावरील विस्तृत टीकेंत श्री. कोल्हटकरांनीं एक फार मह-

त्याचा आक्षेप काढला आहे तो हा कीं, " इतिहासावरून नानांची जी कल्पना मनांत उभी रहाते, तिच्याहून त्यांचें अगदीं भिन्न चित्र प्रस्तुत नाटकांत दिसून येतें." इतका भिन्न अभिप्राय कोल्हटकरांसारख्या रसिकाचा पडावा, हें एक आश्चर्यच आहे. कारण आमचें तर असें स्पष्ट मत आहे कीं, इतिहासाला धरून नानांचें चित्र रेखाटण्यांत नाटककारानें फारच यश मिळविलें आहे. ज्या इतिहासाचा अहवाल देऊन श्री. कोल्हटकर हें विधान करतात तो त्यांचा इतिहास चारदोन ऐकीव आख्यायिकांतच संपुष्टांत आला असला पाहिजे ! ज्या पार्वतीबाईचें चित्र अप्रतिम रंगविल्याबद्दल श्री. कोल्हटकर विशेष स्तुति करतात तिच्याबद्दल खुद्द ऐतिहासिक साधनांत फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. पार्वतीबाई त्या वेळीं पेशव्यांच्या घराण्यांतली सर्वांत वडील स्त्री, अत्यंत पतिनिष्ठ साध्वी आणि अत्यंत प्रेमळ व सात्विक होती हें स्पष्ट करणाऱ्या तुरळक पत्रांखेरीज तिच्या स्वभावासंबंधीं, वर्तनासंबंधीं कोठें ऐतिहासिक कागदपत्रांत उल्लेख नाहींत. तेवढ्या सामग्रीवरून तयार केलेलें पार्वतीबाईचें चित्र अप्रतिम असल्याबद्दल श्री. कोल्हटकर लिहितात; पण त्याच्या शेंकडोंपट अस्सल साधनांच्या कसोटीला उतरणारें नानांचें चित्र वठलें असतां तें मात्र अनैतिहासिक आहे असा अभिप्राय श्री. कोल्हटकर व्यक्त करतात हें फारच आश्चर्यजनक आहे. त्या काळच्या इतिहासाशीं त्यांनीं मुळींच परिचय करून घेतलेला नाहीं, हेंच त्याचें कारण होय. ऐतिहासिक कागदपत्रांचा पडताळा पाहणाऱ्या इतिहास संशोधकांची दृष्टि सोडली तरी अगदी सामान्य वाचकांनाही नानांचें उदात्त चारित्र्य प्रतीत व्हावें असेंच नानांचें चित्र वठलें आहे असें आम्हांस वाटतें.त्यांचा सतत-उद्योगीपणा, कामाचा प्रचंड व्याप व उरक, त्यांची परमेश्वरनिष्ठा, त्यांची रसिकता, त्यांचें परोपकारित्व व न्यायीपणा, वत्सलता, बुद्धिमत्ता, कर्तव्यनिष्ठा आणि कर्तव्य व भक्ति यांचा लढा आल्यानंतर मनांतून वाईट वाटत असतांनाही जड अंतःकरणाने पण कर्तव्याकडेच पावलें टाकण्याची

प्रवृत्ति हे सर्व गुण नानांच्या पात्रांत यथास्थित अवतरले आहेत असें आम्हांस वाटतें. श्री. कोल्हटकरांचा नानांवर एवढा राग झाला आहे त्याचें मुख्य कारण पार्वतीबाईशीं त्यांचें वर्तन कठोर, दांभिक ' दिसतें ' एवढ्यामुळेंच होय. पण " अबलेच्या दुःखाची पर्वा कठोर राजनीतिनें केली नाहीं" या खरेशास्त्र्यांच्या मार्मिक अभिप्रायांत नानांच्या वर्तनाचें समर्थन व कोल्हटकरांच्या आक्षेपांचें सर्व निरसन आहे असें आम्हांस वाटतें.

श्री. कोल्हटकरांनीं दुसऱ्या ठिकाणीं नाना फडणिसाच्या एका वाक्यावर आक्षेप घेतला आहे, तो असा—अमलेच्या अर्जासंबंधीं विचार करतांना नाना फडणीस म्हणतो, "प्रेमामुळें आणि विरहदुःखामुळें मोठे मोठे धीर, वीर, नायक रानावनांतून भटकत वृक्षवेलींना आणि वन्य पशुपक्षांना विचारीत फिरल्याचें वर्णन मीं काव्यांतून वाचलें आहे." श्री. कोल्हटकरांचा आक्षेप असा कीं, 'नाना फडणीस एवढा रसिक केव्हांपासून झाला ? तो एक राजकारण-जड, रूक्ष, नीरस, मुत्सद्दी होता. तो कधींही हंसत नसे, अशा त्याच्यासंबंधीं आख्यायिका. तेव्हां हें वाक्य त्याच्या तोंडीं घालण्यांत रूढ समजतींना धक्का बसल्यासारखें होतें व म्हणूनच नाट्यविषयासंबंधानें हे उद्गार अनैतिहासिक आहेत.'

पण ही समजूत चूक आहे. मनुष्य गंभीर असला म्हणजे तो रसिक नसतोच असा अर्थ कसा निघेल ? नाना फडणीस फार गंभीर वृत्तीचा मनुष्य होता हें सर्वांनाच मान्य आहे. पण तो रसिकही होता याविषयीं बिलकुल दुमत नाहीं. उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रांतून दिसणारा नाना फडणिसाचा बागांचा व चित्रांचा विलक्षण शोक पाहिला म्हणजे त्याच्या रसिकपणाबद्दल कोणास शंका राहूं नये. त्या वेळच्या शिक्षणक्रमाप्रमाणें पाहतां पंचमहाकाव्यांपैकीं एखादें काव्य व शाकुन्तल विक्रमोर्वशीयापैकीं एखादें नाटक तो पढला नसेल हें आम्हांस संभवनीय वाटत नाहीं. यासंबंधींचा एक पुरावा खरे शास्त्र्यांच्या

ऐतिहासिक लेखसंग्रहांत पान ३६६४ वर दिलेला आहे. तेथल्या टीपेंत खरेशास्त्री लिहितात, "सवाई माधवरावांच्या लहानपणीं त्यांच्या वाचनाकरितां नाना फडणीस यांनीं बापूजी गोविंद गोखले नांवाच्या व्युत्पन्न कारकुनाकडून भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें बखरी लिहविल्या होत्या व भागवताच्या बखरींत घालण्याकरितां त्या ग्रंथांतले श्लोक निवडून त्यांची याद स्वतः तयार केली होती. ती ही याद होय. ही सर्व याद नानांच्या स्वदस्तुरची आहे. हे श्लोक उत्कृष्ट आहेत, हे सांगणें नकोच. हे श्लोक नानांच्या नित्य पाठांतले असावेत असें वाटतें." पण याहीपेक्षां निर्णायक पुरावा म्हणजे खुद्द नानांनीं आपलें लिहिलेलें सुंदर आत्मचरित्र होय. त्यांतील प्रौढ भाषा व मथुरादि क्षेत्रांचें सुंदर वर्णन, पानपतच्या कत्तलीची डोळ्यापुढें हुबेहुब मूर्ति उभी करणारी भयानक व उदास हकीकत व भावनांचा गाढपणा वगैरे पाहतां नानांच्या रसिकपणाबद्दल कोणासही शंका राहूं नये. निरनिराळ्या अर्जदारांनीं, नानाला उद्देशून लिहिलेल्या काव्यात्मक श्लेषप्रचुर कवितांचे नमुने नानांच्या चरित्रांत व इतिहाससंग्रहांत आलेले आहेत. त्या सूचक कवितांचें मर्म जाणण्याची पात्रता नानांस असल्याशिवाय त्या लिहिल्या गेल्या असें तरी कां मानावें ? पण क्षणभर तो अरसिक होता, असेंही धरून चाललें तरी तो फार धार्मिक होता, ही गोष्ट तरी सर्वमान्य आहे. कथाकीर्तन-पुराणश्रवण वगैरेंचा त्याला फार नाद होता. विक्रमोर्वशीय नाटकांतील पुरूरव्यानें आपल्या प्रियेची वार्ता स्थिरचरांना कवटाळून विचारल्याची वार्ता त्याला नव्हती असें मानलें तरी रामायणांतील रामानें सीताविरहांत केलेलें तसलेंच वर्तन किंवा कृष्ण मथुरेला गेल्यानंतर गोपींनीं शोकानें केलेल्या भागवतांतील तसल्याच विरहचेष्टा नानांस परिचयाच्या नसतील हें असंभवनीय आहे. सारांश, श्री. कोल्हटकरांनीं म्हटल्याप्रमाणें नानांच्या तोंडचें वाक्य अस्थानीं व अयोग्य न वाटतां ऐतिहासिक व यथार्थच आहे असें आम्हांस वाटतें.

असो. येथवर किरकोळ चुकांचा आढावा घेतला. त्यांतल्या कांहीं चुका खऱ्या आहेत, कांहीं खऱ्या नाहींत. कांहीं इतिहासदृष्ट्याचि चुका ठरतात; कांहीं नाटकदृष्ट्या चुका न ठरतां फेरफार ठरतात. आमच्या मतें विशेष ढोबळ चूक झाली आहे ती पूर्वी दाखविल्याप्रमाणें १७७६चा एप्रिल व ऑक्टोबर नोव्हेंबर या कालांतील अंतर पुसण्यापुरतीच होय.

नाटक-दृष्ट्या विचार केला तर कांहीं चुका तशाच राहूं देणें श्रेयस्कर होय. पार्वतीबाई व नाना फडणीस यांचा जो अपूर्व व अद्वितीय प्रवेश ग्रंथकर्त्यानें लिहिला तो त्या प्रवेशाच्या सुरवातीसच झालेल्या एका चुकीवर अधिष्ठित आहे! नाना फडणीस व पार्वतीबाई यांनीं एकमेकांना कुंठित करणारे जे अचूक हल्ले परस्परांवर केले आहेत, त्यांचा सर्व उगम पार्वतीबाईच्या एका बोटभर वाक्यांतून झाला आहे. पार्वतीबाई नानांच्या बायकोच्या मृत्यूसंबंधीं चौकशी करते आणि एक ओझरतें वाक्य बोलतें कीं, " तुमचं धोरण संभाळून त्यांतल्या त्यांत त्या माझ्याशीं मोठ्या मोकळ्या मनानं वागत. " त्यावर नाना म्हणतो, " या बोलण्यांत किती नाजूक खोंच आहे हें ज्याचं त्यालाच कळणार. " आणि येथपासून अगदीं नकळत, गाडीचा सांधा बदलून भलत्याच लाइनीवर गाडी जावी त्याप्रमाणें पुढचा प्रकार झाला आहे. ग्रंथकर्त्यानें पार्वतीबाईच्या तोंडचे वाक्य लिहून टांक थांबविला त्या वेळीं जर दैवयोगानें नाना फडणिसांच्या बायकोच्या मृत्यूची खरी तारीख त्याच्या लक्षांत येती, तर खरोखरीच आम्हांस वाटतें कीं हा असा सुंदर प्रवेश त्याचे हातून खचित निर्माण होता ना! भवितव्यतेची ही अघटित घटनाच म्हणावयाची. ही व असल्या दुसऱ्या चुका तशाच ठेवल्या पाहिजेत. त्यांनीं नाटकाचें सौंदर्यवर्धनच केलें आहे. सँडोच्या अत्यंत प्रमाणसुंदर सुश्लिष्ट शरीराबद्दल अनेक चित्रकारांनीं व शिल्पकारांनीं छाननी केली आहे. कोणकोणच्या विशिष्ट स्नायूंमुळें किंवा उठावदार स्नायूंच्या समवायानें त्याच्या शरिराला इतकें प्रेक्षणीय स्वरूप

प्राप्त झालें याचीं प्रत्येकानें आपआपल्या परीनें कारणें दिलीं आहेत. त्यांपैकीं एकानें व्यक्त केलेला अभिप्राय मोठा विस्मयकारक आहे. त्यानें असें म्हटलें आहे, " सँडोचा प्रत्येक स्नायु यथास्थित व पूर्ण पोसलेला आहे हें तर खरेंच; परंतु त्याच्या पायांची लांबी किंचित् आंखूड आहे हेंच वास्तविक त्याचें शरीर इतकें उठावदार असण्याचें कारण होय. " वर दर्शविलेल्या चुकांसंबंधानें आम्हास तसेंच म्हणावेंसें वाटतें.

एका तोतयाशीं दुसऱ्या तोतयाची गांठ घालून देऊन नाटककर्त्यानें फारच कुशलता दाखविली आहे. हैबतरावानें बगंभटाचा वेष घेऊन त्याचा तोतया बनणें व भाऊसाहेबाच्या तोतयाशीं गांठ घेऊन त्याला खोटा पाडणें ही कल्पना जितकी मौजेची वाटते, तितकीच ती नाटककाराची उज्ज्वल प्रतिभा दर्शविते. Imagination किंवा प्रतिभा हिचें वर्णन करतांना एका ग्रंथकारानें असें म्हटलें आहे, कीं " एखादी गोष्ट अकल्पित अशी भासावी परंतु ती अशी घडविलेली असावी कीं, अगदीं सामान्य मनुष्यानेंही ती स्वाभाविक व सोपी आहे, असें आवेशानें सांगावें. " त्याच उज्ज्वल प्रतिभेनें ही बगंभटाच्या तोतयाची व भाऊसाहेबांच्या तोतयाची गांठ घातली आहे. " वा ! एकूण आतां दोन तोतयांची एकत्र गांठ पडणार तर ! भाऊसाहेबांचा तोतया आणि बगंभटाचाहि तोतयाच ! ! " हे हैबतरावाच्या तोंडचे शब्द कानावर पडेपर्यंत वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनांत ती कल्पना यत्किंचितहि उदित झालेली नसते. आणि हे शब्द कानांवर पडतांच त्यांची प्रतिभाशाखा अभावितपणें कल्पनापुष्पांनीं फुलून जाते व पुढील खुद्द बगंभटाचा व तोतयाचा प्रवेश पाहून तर आपल्या कल्पना एकूण एक, नगास नग बरोबर उतरल्या अशा आत्मप्रत्ययदर्शक समाधानाची टाळीच देण्याकरितां ते हात उचलतात. हीच नाटककाराच्या प्रतिभेची साक्ष !

या विधानाला अभावितपणें पुष्टी देणारा एक अत्यंत सबळ पुरावा

खुद्द अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांतच अलीकडे सापडलेला आहे. जी गोष्ट आज नाटककारानें कल्पनेच्या बळावर सहज घडलेली अशी दाखविली, ती गोष्ट तशीच खुद्द तोतयाच्या बंडाच्या बाबतींत पुण्यास पेशवाईत घडल्याचें नवीनच निदर्शनास येत आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पेशवे-दप्तर, भाग १९ मध्यें तोतयासंबंधीं कांहीं पत्रव्यवहार छापला आहे. त्यांत सुखनिधान तोतयाची प्रथम थोरल्या माधवरावाचे कारकीर्दीत चौकशी झाली, त्या वेळच्या हकीगतीचें एक पत्र आहे. त्यांत त्या भाऊसाहेबांच्या तोतयाची व तशाच निघालेल्या दुसऱ्या जनकोजी शिंद्याच्या तोतयाची गांठ घालून त्या दोघांचा खोटेपणा सिद्ध केल्याची हकीगत आहे. तें पत्र असें:—

" ...रा. भाऊसाहेब खरे आहेत म्हणून आनुबाई घोरपडी भाऊसाहेबांची आत, म्हणत होती. त्यावरून तोतयासी किल्यावरून आणून अनुबाईचे घरींच ठेविला. त्याजला सांगितलें कीं, तुम्ही वलखा. त्यावरून पंधरा दिवस त्यांचे घरांत ठेवून त्यांनीं चौकशी बहुत केली. क्रित्रीम प्रकार त्यांचे ध्यानास आला. तोतया बोलला कीं, जनकोजीस आणा तो सांगेल. त्यावरून जनकोजी नामें तोतया होता तो आणिला. दोघे येक जागा करून पुसिले. तेव्हां सर्व खोटा प्रकार सर्वांच्या ध्यानांत आला. दोघेही खरे नव्हेत. तेव्हां अनुबाईनें तोतयाभाऊस बाहेर काहाडून दिल्हा कीं हा लटका. भाऊसाहेब नव्हे! मग श्रीमंतीं दुसरे दिवशीं प्रातःकालापासून त्रितीय प्रहर परियेंत बुधवार पेठेच्या हवदापाशीं उभा केला. कारण कीं, सर्वत्र लोकांनीं खराखोटा मनास आणावा, म्हणून उभा केला होता. सर्वजनानें खोटा केला. "

हें पत्र आज १९२१ सालीं प्रथमच प्रसिद्ध होत आहे आणि हें नाटक १९ वर्षांपूर्वीं ग्रंथकर्त्यानें लिहिलें! आणि आज प्रथम कळली

म्हणून नवी दिसणारी पण खरी घडलेली गोष्ट ग्रंथकर्त्यानें १९ वर्षांपूर्वीं केवळ कल्पनाबळावर तशीच मांडावी हें केवढें आश्चर्य ? या पत्रांत वर्णि-लेल्या काळाचीं इतर अनेक पत्रें माधवरावाच्या कारकीर्दींत छापलीं आहेत. परंतु त्यांतही कोठें भाऊसाहेबांच्या तोतयाची व जनकोजीच्या तोतयाची मुलाखत झाल्याच्या उल्लेखाचें एकही पत्र नमूद नाहीं, हें आम्हीं मुद्दाम काळजीपूर्वक तपासून पाहिले आहे.

इतिहाससंशोधकाची छिद्रान्वेषी दृष्टि चालवून प्रस्तुत नाटकांतील विषयाची चिकित्सा—म्हणजे चिरफाड—केलेली आहे. इतिहाससंशोधकाची दृष्टि वेगळी आणि काव्य, नाटक लिहिणाऱ्या कवींची आणि त्यांच्या कृतींची चिकित्सा करणाऱ्या रसिकांची दृष्टि वेगळी. इतिहाससंशोधकांना एखाद्या दिवसाची चूक झाली तरी मोठा गहजब झालासा वाटतो. कारण अगदीं जशा अनुक्रमानें गोष्टी पूर्वी घडल्या त्या थेट तशाच काला-नुक्रमानें एकामागून एक मांडण्याचा त्यांचा हेतु असतो; आणि यामुळेंच शिवजन्मतिथीसारखे वाद निर्माण होतात. इतिहास या शब्दाची फोड केली असतां इति+ह+आस म्हणजे असें असें घडलें असा जो अर्थ उन्नीत होतो, त्यावरूनच संशोधकांची दृष्टि कशी असावी हें उघड होतें. याच्या उलट कवींची किंवा रसिकांची दृष्टि निराळी असते. त्यांना निर-निराळ्या विघटनांचें किंवा निरनिराळ्या मनोव्यापारांचें सुरस चित्र काढावयाचें असतें. यामुळें कालानुक्रमांत चटकन् लक्षांत येण्यासारखी ढोबळ चूक न घडली आणि रूढ इतिहासप्रसिद्ध व्यक्तींबद्दल दृढमूल झालेल्या वाचकांच्या भावनांना त्यानें धक्का न दिला म्हणजे त्यांचें काम झालें. हेंच नाटक घेतलें तर इतिहासकार, तोतया कैदेंतून मुक्त झाला त्या दिवसाचा शोध कसोशीनें करील किंवा रामचंद्र नाईक परांजप्याला पुण्यास कैद केला का पुरंदरास कैद केला याचा छडा लावण्याचा प्रयत्न करील किंवा तोतयाच्या व पेशव्यांच्या सैन्यांच्या झालेल्या निरनिराळ्या

ठिकाणांच्या झुंजांचा भूगोलदृष्ट्या कालानुक्रम लावण्याकरितां धडपडेल; किंवा तोतयाला सामील झालेल्या एकूणएक इसमांची तो नांवनिशी काढील व अशा रीतीनें त्यासंबंधींचे जास्तींत जास्त तपशील कालानुक्रमानें घडले तसे एकापुढें एक मांडून दाखवील. याच्या उलट या नाटकांत नाटककर्त्याला अमला, पार्वतीबाई व नाना फडणीस यांच्या संबंधांत निर्माण झालेल्या बिनतोड विधिघटनांचें व त्यामुळें गुंतलेल्या परस्परांच्या मनोव्यापारांचें चित्र निर्माण करावयाचें आहे. अर्थात् इतिहाससंशोधकांना भयंकर वाटणाऱ्या चुका त्याला माफ आहेत. प्रस्तुत नाटक घेतलें तर घाशीरामाकडे बोट दाखवून इतिहाससंशोधक म्हणेल कीं, " अरे, ही केवढी चूक ! सहा वर्षांनंतरची गोष्ट आगाऊ आलीच कशी ? " पण त्याचा परिहार एवढाच कीं, सामान्य सूज्ञ वाचकालाही घाशीरामाचा उल्लेख तोतयाच्या बंडांत येण्यानें कांहीं चुकल्याचा भासही होत नाहीं. तोतयाचें बंड पुण्यांत कसें बोकाळलें होतें, जिकडेतिकडे घरोघर तोतयाचीच चर्चा चालू असून खोट्यानाट्या बाजार-आंवया कशा उठत असत व त्यांचें साह्य फितुरी लोकांना घेतां येऊन तोतयाला अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष मदत कशी होत असे व त्याकरितांच सरकारला आवश्यक म्हणून बंडाचा निकाल होईपर्यंत भाऊसाहेबांचे पोवाडे म्हणण्याला बंदी घालणें कसें आवश्यक झालें असेल, त्यामुळें रिकामटेकड्या लोकांना नाना फडणीसादि कारभाऱ्यांवर निंदेचे आणि शिव्यांचे शेणसडे उडविणें कसें सुलभ झालें असेल व त्यामुळें हैबतरावासारख्या नानांच्या अभिमान्यांच्या मनांतही गैरसमज आणि विषाद कसा सहज उत्पन्न झाला असेल, या गोष्टींचें तत्कालीन संभवनीय समाजचित्र नाटककर्त्याला रेखाटावयाचें होतें. नाना फडणीसाच्या हुकमाची अम्मलबजावणी कडकपणें करणारा कोणीतरी अधिकारी दाखवावयास पाहिजे होता. तेव्हां साहजिकच सुप्रसिद्ध घाशीराम कोतवालाची आठवण त्याला व्हावी यांत

काहीं वावगें नाहीं. मग त्यात थोडा कालविपर्यास झाला तरी हरकत नाहीं. रघुवंशांत सहाव्या सर्गामध्यें—इन्दुमतीच्या स्वयंवरांत कृष्णाचा उल्लेख आला आहे ती इतिहासदृष्ट्या मोठीच चूक होय; पण काव्यदृष्ट्या चूक हें नावही तिला प्राप्त होऊं शकत नाहीं. याच्या उलट 'कीचकवध' या पौराणिक नाटकांत राजापुरी ठोक्याच्या तांब्याचा उल्लेख आला तर तो मात्र एकदम विरस करील! राजशेखरानें काव्यमीमांसा या ग्रंथात "कवीनें भूगोलाच्या चुका करूं नयेत, इतिहासाच्या केल्या तरी चालतील." असें म्हटलें आहे, त्यांतील मर्म उघड आहे व तीच दृष्टि या नाटकासंबंधानेंही खरी आहे. तशी एकही चूक या नाटकांत झालेली नाहीं.

रसिकांच्या व इतिहासकारांच्या दृष्टीनें या नाटकाची किंमत काय याचा एक अत्यंत मजेदार पुरावा कै. खरेशास्त्री यांच्या अभिप्रायांत सांपडतो. स्वतः शास्त्रीबुवांचा जन्म ऐतिहासिक कागदपत्रें निवडण्यांत गेला. पत्रांच्या तारखा ठरवून कालानुक्रमानें तीं लावून त्यांवरून इतिहास लिहिण्याचें काम त्यांनीं केलें. किंबहुना तोतयाच्या बंडाची सुसंगत हकीगत त्यांनींच प्रथम ऐतिहासिक लेखसंग्रहांत लिहिली. पण शास्त्रीबुवा हे जितके अव्वल दर्जाचे इतिहाससंशोधक होते, तितकेच कवि व नाटककार होते; आणि त्या रसिक दृष्टीनेंच आपल्या अधिकारयोगांत तोतयाची हकीकत लिहितांना त्यांनीं लिहिलें आहे : "संसारांत अनेकांवर अनेक चमत्कारिक प्रसंग येतात पण यापेक्षां (पार्वतीबाईसंबंधीं) करुणास्पद प्रसंग सांपडणें अशक्य आहे. अबलेच्या दुःखाची पर्वा निष्ठुर राजनीतीनें धरली नाहीं." सारांश, पहिल्या प्रतीचे इतिहाससंशोधक व उच्च दर्जाचे कवि या दोन्ही गोष्टी शास्त्रीबुवांचे ठिकाणीं एकत्र वास करीत असल्यामुळें त्यांच्या अभिप्रायास फार महत्त्व आहे. आमच्या माहितीप्रमाणें शास्त्रीबुवांच्या हातांत हें नाटक पडल्यावर त्यांनीं तें अगदीं शेवटचा प्रवेश संपेपर्यंत रंगून एकाच बैठकीस

वाचून टाकलें व पुढें नाटककर्त्यांची व त्यांची भेट झाली असतां त्यांनीं असा स्पष्ट अभिप्राय दिला कीं, हें नाटक इतिहासाला पूर्णपणें धरून आहे. त्यांनीं त्या वेळीं दोनच चुका दाखविल्या. पहिली चूक अशी कीं, चिकटंभटाच्या तोंडीं पाटाच्या पाण्याचा उल्लेख आहे. त्यांचें म्हणणें रत्नागिरीस पाटाचें पाणीच नाहीं! दुसरी चूक अशी–रामचंद्र नाईक, त्याच्या कैदेच्या प्रवेशांत, नाना फडणीस व पार्वतीबाई यांना उद्देशून—" आपणा उभयतां श्रीमंतांमध्यें मीं बोलावें असें नाहीं." असें म्हणतो, तें बरोबर नाहीं. पेशवे कुटुंबांतील पार्वतीबाई हजर असतां रामचंद्र नाईक नाना फडणिसास श्रीमंत हें विशेषण लावणें शक्य नव्हे. एवढ्या दोनच चुका त्यांनीं दाखविल्या. आम्ही मुद्दाम खटपट करून ज्या ऐतिहासिक चुका वर दाखविल्या त्या त्यांनीं प्रयत्न केला असतां तर त्यांना दाखविणें सहज शक्य होतें; पण त्यांच्या त्या लक्षांत आल्या नाहींत किंवा त्यांनीं त्या दाखविल्या नाहींत याचा अर्थच असा कीं, त्यांनीं निव्वळ इतिहास व ऐतिहासिक नाटक यांतील इतिहासाचें प्रमाण किती असावें याचा बरोबर मेळ मनाशीं घातला होता.

* मराठे लष्करांतील घोडदळ

गोरक्षणाचे स्वयंसेवक एक गोमातेचा पोवाडा म्हणतात. त्यांत म्हटलें आहे कीं, सध्या गाईचा इतका मोठ्या प्रमाणावर संहार होत आहे कीं, कांहीं वर्षांनीं गाय हा प्राणी कसा असतो तें चितांतच दाखविण्याची आपल्या मुलांबाळांना पाळी येईल; आणि कोणी कोणी याबद्दल एक गमतीची गोष्टही सांगतात. मुंबईच्या शाळेंतल्या एका मुलाला दिपोटीनें विचारलें कीं, बाळ, आपल्याला दूध कोण देतें बरें ? मुलानें चट्कन् उत्तर दिलें कीं, भय्या ! बरोबरच आहे. मुंबईच्या त्या गजबजलेल्या बकाल वस्तींत, त्या ट्रामगाड्यांच्या, बसेसच्या, मोटारींच्या, व्हिक्टोरियांच्या गल्लतींत आणि मुंग्यांसारख्या कालवलेल्या असंख्य लोकवस्तींत गाय किंवा म्हैस क्वचितच दिसावयाची. दुधाचा

---

* रत्नाकर, जानेवारी, १९३२

रतीब ठरल्या वेळीं येतो आणि तो भय्या आणून घालतो येवढें मात्र त्या मुलाला ठाऊक ! असो. विनोदाचा आणि अतिशयोक्तीचा भाग सोडला तर जी गोष्ट गाईच्या बाबतींत घडली, तीच घोड्यांच्या बाबतींतही घडलेली आहे. लवकुशाप्रमाणें 'घोडा घोडा म्हणतात तो कसा आहे तें पाहूं, चल' असें म्हणण्याची आज पाळी आलेली नाहीं हें खरें; परंतु कोणीं सांगावें ? या भौतिक सुधारणेच्या युगांत, यांत्रिक शोधांच्या चढाओढींत घोड्याचीही जरूरी पुढें राहणार नाहीं आणि ती जातच हळुहळु नष्ट होईल ! ही स्थिति चांगली कीं वाईट, इष्ट का अनिष्ट हें येथें सांगावयाचें नाहीं; तर काय स्थिति आहे ती सांगितली. आणि ही स्थिति इतिहासवाचकाच्या कां लक्षांत येते, तर पूर्वस्थिति त्याला ढळढळीत दिसते म्हणून.

खरोखरच मराठेशाहीचा किंवा पेशवाईचा काळ असा होता, कीं या सबंध महाराष्ट्रातील कुठल्याही गांवांत किंवा खेड्यांत घोडें नाहीं असें घर नव्हतें आणि घोड्यावर बसतां येत नाहीं असें माणूस नव्हतें. प्रवासाला घोडें, ओझ्याला घोडें, लग्नाला घोडें, मुलाला घोडें, पोरापासून थोरांपर्यंत फार काय बायकांनाही बसायला किंवा प्रवासाला घोडेच आणि लढायांत तर घोडेच घोडे ! सारांश मराठशाहींतलें महाराष्ट्राचें राष्ट्रीय वाहन घोडाच होता असें यथार्थतेनें म्हणतां येईल. रायगडासारखा दुर्गम डोंगरी किल्ला, पण तेथेंही बाजारपेठेचीं जोतीं पुरुषभर उंच कां ? तर शिलेदारांना किंवा राउतांना घोड्यावर बसल्या बसल्या माल खरेदी करितां यावा म्हणून !

पण नुसती कल्पना करण्यापेक्षां आज आपल्या भाषेकडे नजर फेंकली तरीही त्यावरून त्या वेळचा घोड्यांचा पसारा ढळढळीत दिसेल. घोड्यावरून रूढ झालेल्या म्हणी किंवा वाक्प्रचार मराठींत इतके विपुल आहेत कीं, कळत वा नकळत आपण त्यांचा हरघडीं आजच्या बोली-

चालींत उपयोग करीत असतो; आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, घोड्यावरून आलेल्या वाक्प्रचारांची किंवा म्हणींची संख्या दुसऱ्या कोणत्याहि पशूवरून तयार झालेल्या म्हणींपेक्षां किंवा वाक्प्रचारांपेक्षां अधिक भरेल. 'त्यानें तुझें काय घोडें मारलें ?' 'येथेंच घोडे पेंड खातें' 'गंगेस घोडे न्हालें', 'आपलेंच घोडें दामटलें', 'त्याचें घोडें थकलें', 'अरे जरा तुझा घोडा उभा कर; घाई करूं नकोस', 'हे घोड्यावर चढले, आतां कुठले शुद्धीवर यायला?' 'नालाकरितां घोडा गेला', 'बुढ्ढी घोडी लाल लगाम', 'घोडामैदान जवळच आहे', 'लंगडं तें लंगडं आणि गांवदरीं चरेना', 'तोबऱ्याला पुढें,लगामाला मागें', 'तुम्ही आम्ही एक आणि कंठाळीला मेख', 'शामभटाची तट्टाणी, हरदासी तट्टू', घोडनवरा 'घोडनवरी', घोडमुंजा', 'रडतराऊत घोड्यावर बसला', 'कागदी घोडे नाचविणें', 'तो माणूस केवळ पडमूत नाहीं, बरा कर्तृत्ववान् आहे', 'चौपाई येणें', 'ताज्या घोड्यावरची गोमाशी', 'भाड्याचें घोडें आणि तरवडाचा फोंक', 'आपलें झालें थोडें आणि व्याह्यानें धाडलें घोडें', 'वराती मागून घोडें', वगैरे कितीतरी वाक्प्रचार आज आपल्या तोंडांत आहेत. कोश वगैरे घेऊन मुद्दामच बसलें तर आणखीही अनेक वाक्प्रचार काढून दाखवितां येतील. आणि पाहावयास गेलें तर सध्यांच्या काळांत मात्र लग्नाच्या वेळेखेरीज घोड्याचा आणि आपला साक्षात् असा कधीं संबंधही येत नाहीं !

अर्थात् या म्हणी भाषेंत शिरण्याचें कारण म्हणजे ऐतिहासिक काळांत मराठ्यांचा आणि घोड्यांचा असलेला परम निकट सहवास होय ऐवढेंच असलें पाहिजे. एका इंग्रज प्रवाशाने महाराष्ट्र म्हणजे घोड्यांचा देश असें वर्णन केलें आहे, त्यांतलेंही बीज वरील वस्तुस्थितींतच आहे यांत शंका नाहीं; आणि त्याचेंही मुख्य कारण म्हणजे लष्करी पेशा हें होय. शिवाजीपासून पेशवाईअखेरपर्यंतचा काळ लढायांनीं, मोहिमांनीं

आणि मुलुखगिऱ्यांनीं गजबजलेला होता. दरवर्षीं नवी मोहिम, नवी मुलुखगिरी नाहीं असें कधीं घडलें नाहीं. वर्षाचे बारा महिने. त्यांतले संबंध आठ महिने लष्करच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांत हमखास जावयाचे. पाऊसकाळ लागला म्हणजे नाइलाजानें मराठी लष्करांना देशीं परत यावें लागे. नाहीं तर तेही चार महिने त्यांनीं बाहेरच काढले असते. शिवाजीमहाराजांच्या पहिल्या पराईत त्यांच्या स्वाऱ्याशिकाऱ्या मावळांतल्या खोऱ्यांतून आणि सह्याद्रीच्या पहाडांतूनच झाल्या; परंतु पुढें पुढें मावळांतल्या खोऱ्यांतून खेळल्यानंतर त्यांच्या मुलुखगिऱ्यांच्या नद्या लांब देशावरही पसरूं लागल्या. आज विजापुराकडे, उद्यां बागलाणांत, परवां कोंकणांत, तेरवां खानदेशांत अशा लांबलांबच्या मोहिमा सुरू झाल्या. राज्याभिषेकानंतर तर त्यांच्या लष्करांनी चंदीचंदावरापर्यंत पल्ला गांठला. त्यानंतर पेशवाईत तर मुलुखगिऱ्यांना नुसता ऊत आलेला होता. शिवाजीच्या मानानें मराठी साम्राज्याच्या सीमा पेशवाईत जितक्या वाढल्या तितक्या प्रमाणांत मराठ्यांचा व्याप वाढला, फौजा वाढल्या, कलह वाढले आणि मोहिमाही वाढल्या. एकाच वेळीं निरनिराळ्या चार ठिकाणीं लढाया सुरू राहाव्या असेंही कित्येक वेळां घडलेलें आहे. पेशव्यांच्या फौजांनीं पायमल्ली केली नाहीं असा प्रदेश हिंदुस्थानांत क्वचितच राहिला असेल. खालीं दक्षिणेंत पट्टणच्या तटापर्यंत त्या घुसल्या, त्याप्रमाणें उत्तरेस अटकेच्या पाण्यानेंही त्यांनीं आपले तळ ढाळलेले आहेत. ' अटक कर्नाटकांत भवले ' हे शाहिराचे शब्द यथार्थ आहेत. बंगल्यांतील मराठ्यांच्या घोड्यांच्या टापांचा प्रतिध्वनि आजही तेथल्या आया आपल्या मुलांना थोपटतांना उमटत आहे ! गुजराथ आणि राजपुतान्यांत तर मराठ्यांचें कायमचें युद्धक्षेत्रच झालें होतें. सारांश, ' चोहों सागरिचें स्नान सैन्य समवेत जे करणारे' असें जें प्रभाकरानें वर्णन केलें आहे तें खरोखरच वस्तुस्थितीला तंतोतंत धरून आहे यांत शंका नाहीं.

अशा लाखोलाख फौजांचें पोट चालवणें आणि हिंदुस्थानभर हुतूतूहमामा घालणें हें सगळें एका घोड्याच्या जिवावर ! वावटळीसारख्या लांब लांब भराऱ्या मारायला आणि लढायांच्या कष्टमेहनतीला एक घोडाच पुरा पडण्यासारखा असल्यामुळें सैन्य म्हणजे घोडदळ असाच अर्थ तेव्हां होऊन बसला होता. सध्यां आपण फौज हा शब्द सर्वसामान्य लष्करवाचक वापरतो; परंतु पेशवाईत फक्त घोडदळ येवढाच त्याचा निश्चित अर्थ होत असे. हिंदुस्थानवर दरवर्षी उत्तरेकडून तात्रांच्या धाडी येत त्याही मुख्यतः घोडदळाच्या बळावरच. त्या प्रांतांत घोड्यांची निपज मोठ्या प्रमाणावर होत असे आणि लढायांना सर्वतोपरी उपयोगी असें तें जनावर असल्यामुळें मुसलमानांनीं घोडदळावरच आपलें वर्चस्व स्थापलें; आणि तेथून पेशवाईअखेरपर्यंत घोडदळाचें माहात्म्य कायम टिकलें. शिवकालीन रामचंद्रपंत आमात्य आपल्या ' आज्ञापत्रांत ' लिहितो, " जसें ज्यास अश्वबल तसी त्याची बुद्धिप्रथा आहे. तद्वतच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. " म्हणजे जसें समुद्र जिंकावयास तरांडें पाहिजे तसें भूमि जिंकायला घोडेंच पाहिजे असें सिद्धांत–पूर्णच त्यानें लिहिलें आहे. आणि रामचंद्रपंतासारख्या प्रमुख मुत्सद्द्याच्या शब्दांत त्याच्या अनुभवाचें सर्व सारच सांठविलेलें आहे यांत शंका नाहीं. जी गोष्ट शिवशाहींतली तीच पेशवाईतली. बोरघाटांत सन १७८२ सालीं मराठे इंग्रजांचें तुंबळ युद्ध झालें. त्या वेळीं शिस्तीनें बुरूज बांधून एककट्टा होऊन लढणाऱ्या इंग्रजांच्या कवाइती कंपूवर मराठे स्वारांचा काट चालेनासा झाला. त्या वेळीं परशुरामभाऊंनीं एका पत्रांत आश्चर्यानें असे उद्गार काढलेले नमूद आहेत कीं, ' काय करावें ? पायच्या लोकांची सलाबत स्वारावर ! असा काळ ! ' शेंकडों स्वाऱ्याशिकाऱ्या जातीनें आणि सरदारीनें केलेल्या एका सेनापतीचे हे उद्गार आहेत. त्यावरूनही घोडदळावरील मराठ्यांचा विश्वासच दिसून येतो. ही पेश-

वाईच्या उत्तरार्धांतली स्थिति झाली आणि पेशवाई संपल्यानंतर एका शाहिरानें पवाडा केला आहे त्यांत पेशव्यांच्या सद्दीचें सार मुख्य अकड-कडव्यांतच गाइलें आहे तें असें “ ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ! जबर सद्दि कैकांनिं पाहिली शत्रु ठेविले नाहीं. ”

सारांश, घोड्यामुळें घोडेस्वाराला मोठा दर्जाच प्राप्त झाला होता. ‘ भले लोक ’ याचा अर्थ पेशवाईत शिलेदार असाच होत असे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. डी रोमनें श्रीरंगपट्टणच्या स्वारींतला आपला अनुभव लिहून ठेवला आहे त्यांत तो म्हणतो कीं, ‘ मराठे पायदळाला तुच्छ लेखतात; त्यांचें सर्व लक्ष घोड्यांतच गुंतलेलें असतें. पायदळाच्या तळांतून ते मोठ्या गुर्मीनें त्यांना तुच्छ लेखीत घोडे उडवीत जातात ’. ‘ हे आतां घोड्यावर चढले, आतां कुठले शुद्धीवर यायला ? ’ अशी जी म्हण प्रचलित आहे त्यांतही असाच अर्थ आहे कीं, ‘ हा शिलेदार झाला, मोठा मान मिळाला, आतां कशाला खालीं पाहतो ? ’ आणि त्यावरूनही सर्वसामान्य समाज शिलेदाराकडे कसा आदरानें पाही तें दिसतें.

मराठी शाहिरांनीं आपल्या तेजस्वी वाणीनें हजारों ठिकाणीं मराठी लष्कराचीं वर्णनें गाइलीं आहेत. त्यांच्या लावण्यापोवाड्यांतून मनमुराद वर्णन फक्त शिलेदारांचेंच केलेलें सांपडेल. एखाद्या प्याद्याजवाद्याला किंवा हशमपायदळाला लावणीचा नायक कल्पिलें आहे असें कोठेंही आढळून येणार नाहीं. शिलेदारच लावणीचा नायक असावयाचा आणि शिलेदा-रांचें वर्णन त्याच्या घोड्याखेरीज कधींच पुरें व्हायचे नाहीं. आणि ज्याच्यामुळें त्याला महत्त्व चढे त्या घोड्याचें वर्णन नसावें असें तरी कोण म्हणेल ?

भला घोडा अस्सल काबुलचा
लाल बोर टाकम तुरकी
जडाव जिन वर स्वार होउनिया शिंदेशाई
बांधुन फिरकी
किंवा
अस्सल जरदी घोडीं भिवरेथडी
वर बसली चांदणी
शिरिं किनखापी कलगी मोराची
मिना करुन फिरविला
उंच मखमाली-नक्षी कलाबतु
चारजाम ठेविला
किंवा
हजार दो चवशा किंमतीचा अबलख
तेजी खडक
नैन फेंकला तीर जसा निट हत्तीस
मारिल धडक
पाइं पैंजण घोड्याचे थै थै नाहीं जरा
भर अडक
जडावजिन रेखला कसुन वर शिपाई
बसला सडक
किंवा
जरद्या घोड्यावर स्वार शिपाई सरदार
तो छेलछबेला
मस्तकीं फुलाचा तुरा झुरा इष्कि रंगेला
किंवा

शामकर्ण वारु सजऊन प्यारा। जिन शोभतो वर भरगची सारा। सडकेला कलगीवर जडल्या तारा। शूर शिपाइ लक्षामधिं मोहरा। करुन पाच पोषाक मारि लहरा

किंवा

पंचकल्याणि घोडा अबलख। जिनावर कलाबतु लखलख। बाई सूर्यपान कलगिचें ग नाजुक झुक वर अंबिर बसले। छुं छनननननन पायांत झांजर बोले॥

घोडदळांच्या जोरावर लांबलांब मजली मारतां येत. अशा लांब–लांब मजली मारण्यांत मराठ्यांचा हात तेव्हां कोणींही धरला नाहीं. एक हैदर मात्र अपवाद असे. मोगल रियासतींत अकबरानें गुजराथवर स्वारी केली तेव्हां मात्र मोठमोठ्या मजला मारल्याचें दिसतें. इ० सन १७८१ मध्यें हैदर १०० मैल अडीच दिवसांत गेल्याचें नमूद आहे. सन १७९० मध्यें टिपूच्या सर्व सैन्यानें दोन दिवसांत ६३ मैल लांबीचा पल्ला गांठला; सन १८०१ मध्यें जॉर्ज टॉमस ऊर्फ जहाज फिरंगी याचा पराभव झाला व तो पळाला. त्या वेळीं मुळींच दम न घेतां २४ तासांत तो १२० मैल अंतर तोडून गेल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. (Memoirs of George Thomas, 217.) पण मराठ्यांना कुणींच पुरा पडला नाहीं. शिवाजी सैतान आहे असें सर्वांस वाटत असल्याचें इंग्रज लिहीत तें शिवाजीच्या गतिचापल्याचेंच फळ होय. लांब लांब मजली मारून मायावी राक्षसाप्रमाणें तो भलत्याच ठिकाणीं अचानक प्रकट होई. शिवाजीनंतर राजारामाच्या कारकीर्दींत धनाजी–संताजींचें नांव सर्वश्रुतच आहे. त्यानंतर पेशवाईत पहिला बाजीराव, गोपाळराव पटवर्धन व राघोबादादा इत्यादि अनेक नांवें प्रसिद्ध आहेत. सन १७३७ च्या एप्रिलांत बाजीराव दिल्ली-वर अनाचक जाऊन आदळला. त्या वेळच्या एका पत्रांत या लांब–लांब मजलींचे बरेच उल्लेख आहेत. बाजीराव म्हणतो, “आम्हीं त्याजसीं

गांठ न घातली. साता कोसावर उजवे बाजूस आमचें हातें त्यास टाकून लांब–लांब मजली वीसवीस कोसांच्या करून दोन मजलींनीं छ. ७ जिल्हेजीं दिल्लीस बारापुला व कालिकेचें देऊळ उजवें हातें टाकून जाऊन, कुशबंदी नजीक शहर येथें मुकाम केला.” त्याच पत्रांत सादतखान व महंमद बंगस यांनीं ३२ कोस व २५ कोस अशा भारी मजला एकेका दिवसांत मारल्याचें तो लिहितो. दुसऱ्या उदाहरणांत बेहेरे यांनीं एका अहोरात्रींत ४० कोसांची दौड मारल्याचें (खरे, पान ४०१० वर) नमूद आहे. त्याचप्रमाणें खरे, प्रस्ता० खंड २०६ वर सन १७७० मधील कर्नाटकांतील स्वारींत, पटवर्धन, रास्ते व मुरारराव घोरपडे यांनीं एका दिवसांत २५ कोसांची मजल करून शत्रूस गांठल्याची हकीकत आहे. हे २५ कोस कर्नाटकांतले आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तेथला कोस तीन किंवा त्याहीपेक्षां अधिक मैलांचा धरतात. या संबंधांत ‘A narrative of the opertions of Captain Little's detachment’ या पुस्तकाचा कर्ता लेफ्टनंट एडवर्ड मूर यानें १७९४ सालीं लिहिलेल्या पुस्तकांत स्वतःचा अनुभव लिहिला आहे तो असा— तो म्हणतो, “पुण्यापासून कृष्णेपर्यंतच्या मुलखांत १॥ मैलाचा कोस धरतात. क्वचित् अधिक, क्वचित् कमी मैलांचाही धरतात; परंतु कृष्णेपासून तुंगभद्रेपर्यंत तो तीन किंवा त्याहीपेक्षां अधिक मैलांचा धरतात; आणि तेथून श्रीरंगपट्टणापर्यंत तर कोसांची लांबी फारच वाढते! उदाहरणार्थ, आम्हीं एक दिवसांत एक मजल मारली तर ती सारी चार कोसांची झाली; पण तिचे मैल मोजले तों ते सुमारें २० भरले!” (पान ५०६). म्हणजे या हिशेबानें गोपाळराव वगैरेंनीं निदान ७५ मैल अंतर एका दिवसांत तोडलें हें उघड दिसून येईल. असो.

लढाऊ मराठ्याचें घोडा हें सर्वस्व असल्यामुळें तें जनावर तयार आणि ताजें ठेवण्यांत त्याचेकडून यत्किंचितही कसूर होत नसे. शेतकरी

आपल्या मुलांबाळांपेक्षांही आपल्या बैलावर अधिक प्रेम करतो त्याचप्रमाणें प्रत्येक मराठा शिलेदारालाही स्वतःच्या घोड्याचें प्रेम वाटत असे.

आज आपल्याला भातावर तूप आणि भाकरीला लोणी मिळण्याची पंचाईत आहे; पण तेव्हां हे पदार्थ घोड्यांना तयार करण्याकरितां मुबलक चारले जात असत. पागेसंबंधींचे जे शेंकडों रतीबझाडे पाहण्यांत आहेत, त्यांत घोड्यांना आणि शिंगरांना ओल्या गवताबरोबर तूप देण्याची वहिवाट दिसते. मोठ्या घोड्याला अर्धाशेर व शिंगरांना पावशेर असा शिरस्ता दिसतो. शिंगरांना लोणी चारीत. शिंगरें चांगलीं तयार करण्याकरितां त्यांना दूध व खिरी पाजीत असत. कणीक, गूळ, अफू, हळद, मीठ, राई, काळी जिरें, धणे, कसनी सेवया वगैरे पदार्थ घातलेले मसाल्यांचे रतीब त्यांना नेहमीं देत असत.

पण अशा भरपूर आणि पुष्टिदायक खुराकावर तयार झालेल्या घोड्यांना कित्येक वेळां लढायांत जखडबंदी झाल्यानंतर अगदीं उपास जात. दाणावैरण बंद झाल्यावर त्यांच्या नाशिबीं घरावरचा कैंबळ, लव्हाळे आणि झाडाच्या सालीं सुद्धां खाण्याचा प्रसंग येत असे. घोडा हें जनावर जितकें उमदें आणि ताकदवान् तितकेंच नाजूकही पण असतें. त्याची दाण्यापाण्याची आणि मालिस्तीची वेळच्या वेळीं योग्य निगा झाली तर त्याच्यासारखें भरपूर काम देणारें, इमानी व शहाणें जनावर नाहीं; पण त्याच्या निगेंत थोडीफार कमतरता पडली तरी तें अगदीं खराब व निकामी होतें. याकरितां साहजिकच शिलेदार त्याच्याकडे स्वतः-पेक्षांही अधिक लक्ष देई. प्रत्येक शिलेदार दरघोड्यागणिक एकादा स्वतंत्र महार पोरगा बरोबर बाळगीत असे. निवळ घोड्याच्या चाकरी-करितांच तो बरोबर घेतलेला असे. पागांच्या तैनातजाबत्यांत तर मोतदार, खासदार, महारपोर्ग्यांच्या नेमणुका नियमानेंच केलेल्या

असत. नालबंद, जिनगर, शाळोत्री म्हणजे घोडयांचे वैद्य या आसामी-प्रमाणेंच वरील लोकांचीही नेमणूक त्यांत असे; पण स्वतंत्रपणें लढाईवर जाणाऱ्या एकेकटया शिलेदारालाही वरच्यासारखी सोय करावी लागे.

मराठयांचीं घोडीं भिमथडी, नीरथडी, माणदेश, वऱ्हाड वगैरे प्रांतांत निपजलेलीं असत; आणि तीं अत्यंत काटक, बळकट व हुशार असत. घोडयांच्या निरनिराळ्या अनेक जाती असत व निरनिराळे राऊत तीं वापरीत. पण मराठयांची आवडती म्हणून जी दक्षिणी घोडयांची जात ती वर दिलेल्या प्रांतांत पैदा होत असे. सन १८०९ सालीं ब्राउटननें शिंद्याच्या लष्करांतील या घोडयांसंबंधीं एके ठिकाणीं वर्णन केलें आहे तें असें—तो म्हणतो "अशा सणासमारंभाचे वेळीं शिंदे आपले रिसाले घेऊन बाहेर पडतात तेव्हां नामी नामी दखनी घोडीं पाहावयास मिळतात. असलीं घोडीं फक्त दक्षिणेंतच निपजतात आणि त्यांच्यावर मराठ्यांचा जीव फारच असतो. ठेंगण्या दक्षिणी घोडया व अरबी घोडे यांच्यापासून ही अवलाद काढतात. हीं घोडीं इमारतीनें लहान असतात. १४ मुठीसुद्धां उंचीस भरतात न भरतात. आणि त्यांतलीं भारी किंमतवान् घोडीं तर त्यापेक्षांही कमी भरतात. ती पाठाळ नसतात तर सडपातळ असतात. त्यांच्या पोटाचा घेर व मानेचा घेर फार कमी असतो. तोंडाचा व कपाळाचा घाट मोठा देखणा असतो आणि सडपातळ पण अशीं देखणीं असतात कीं सागतां सोय नाहीं. त्यांच्यासारखीं शहाणीं, चलाख घोडीं तींच ! कष्टमेहनतीला तर त्यांच्या तोडीस सबंध हिंदुस्थानांत दुसरें कुठलेंच घोडें पडत नाहीं म्हणतात. तीनतीन चारचार हजार अशा भारी भारी त्याच्या किंमती हमेश येतात. अशा घोड्यांवर मराठे जीव कीं प्राण करतात आणि सवड सांपडतांच गव्हाच्या पोळ्या, खिरी, साखर, लोणी अशासारखा भारी खुराक त्यांना देतात."

आधींच घोड्यासारखें शहाणें जनावर आणि त्याच्या पाठीवर वाढलेले बाळाभ्यासी मराठे शिलेदार यामुळें परस्परांचें हृद्गत परस्परांना तेव्हांच कळत असे. उत्तम चाबुकस्वार ठेवून निरनिराळ्या चालींवर घोडीं फेर धरून शिकविण्याची व त्यांचेकडून कसरत करून घेण्याची वहिवाट फार असे. मागच्या दोन खुरांवर तोल घेऊन शिडाप्रमाणें किंवा बिजागिरीवर फिरणाऱ्या दाराप्रमाणें डावीउजवीकडे गिरक्या घेणें, टापांचा यत्किंचित् आवाज होऊं न देतां चालणें, शर्यतींतल्याप्रमाणें खांचा कुदणें, भिंताडें उडणें, इत्यादि अनेक गोष्टी घोड्यांना शिकविलेल्या असत. भरधांव दौडत असतां खुणेच्या शब्दाबरोबर हृदयाचे ठोके बंद पडावेत त्याप्रमाणें एकदम गाडल्यासारखें खडें व्हावें, किंवा कांहीं खूण केली असतां तुफान उडावें वगैरे कलांत घोडा शिकविण्यांत मराठी शिलेदारांचा हातखंडा असे. यासंबंधीं अनेक आख्यायिका आणि उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांतून आढळतात. पाश्चात्य प्रवाशांनीं आणि लेखकांनींही यासंबंधीं, खूप वेळां उल्लेख केलेला आहे. ॲबे डुबॉइनें एक स्वतःचा अनुभव दिला आहे. तो म्हणतो, " ओळखीचा शब्द ऐकून एकदम खडें उभें राहावें असें मराठे आपल्या घोड्यांना शिकवितात. शिलेदार उतरल्यावर बांधल्यासारखा त्याचा घोडा उभा राहतो. नुकतीच परवां प्रत्यक्ष पाहिलेली गोष्ट सांगतों; एक बेरड माग चुकवीत धांवत आला आणि एक घोडें मोकळे आहे असें पाहून त्यावर चढला आणि तें त्यानें उडवलें. इतक्यांत मालकानें पाहून एकदम हळी दिली. त्याबरोबर घोडें दण्कन् जिथल्या तिथें खडें झालें. वाटेल तें केलें तरी हालेना. तेव्हां त्या चोराला उडी टाकून पळून जावें लागलें."

एल्फिन्स्टन म्हणतो, " हे लढाऊ लोक जरी स्वभावतः आळशी असतात तरी ते मोठे चपळ व उत्कृष्ट घोडेस्वार असतात. घोड्यावर बसून भाला मारण्याच्या सफाईविषयीं मराठे लोकांची प्रख्याति आहे.

त्यांच्या घोड्याचा पावला आंखूड असतो, जेरबंद तंग असतो आणि लगाम बारीक परंतु फार तीक्ष्ण असते. त्यांचा पुठ्ठा जोरदार असतो. भरधांव जात असतां अगदीं थोड्या जाग्यांत त्यास बाजूवर उलटावयास व एकदम उडी मारावयास शिकवितात; तेणेंकरून समोर लढणाऱ्या शत्रूस मारण्याचें अवसान सांपडण्यापूर्वीं त्यास त्यावर जाऊन पडतां येतें."
— मंडलीककृत हिंदुस्थानचा इतिहास, पान १२८.

"घोड्याची निगा घेण्यांत आणि त्यांना शिकवून तरबेज करण्यांत उभ्या जगांत मराठ्यांची सर कोणाला येईलसें वाटत नाहीं," अशी साक्ष एडवर्ड मूरनें स्वानुभवाची म्हणून मुद्दाम सांगितली आहे. त्याचें मराठी स्वारांचें व घोड्यांचें वर्णन वाचनीय आहे. तो म्हणतो :

"मराठ्यांची फौज उसळली म्हणजे तिच्याकडे पाहात राहावेंसें वाटतें. घोड्यांची निगा घेण्यांत आणि त्यांना उत्तम शिक्षण देण्यांत सबंध जगांत त्यांच्या तोडीला कोणी उतरेलसें वाटत नाहीं. अर्थात् व्यक्तिशः प्रत्येक शिलेदारापुरतेंच हें विधान आहे. कवाइती पलटणांप्रमाणें त्यांच्या घोडदळांत शिस्त किंवा कवाईत मात्र यत्किंचित् आढळावयाची नाहीं.

"मराठे स्वार घोड्यावर बसले म्हणजे त्यांचे गुडघे घोड्याच्या पाठीबरोबर वर येतात. ते टांचा आंवळून दाबून धरतात किंवा घोड्याची आयाळ पकडतात किंवा खोगिर पकडून धरून बसतात. आमच्या युरोपियन दृष्टीला तें कसेसेंच दिसतें. इतक्या बंदोबस्तानें बसल्यावर जमिनीवर यायचे प्रसंग थोडें असें कोणास वाटेल; पण तसेंही कांहीं आम्हीं पाहिले आहेत.

"मराठे स्वार खोगिरांचा फार क्वचित् उपयोग करतांना आढळले. जी खोगिरांची पद्धत आहे ती मोगलांपासून त्यांनीं घेतली आहे. हें खोगीर पुढले

बाजूस बगळ्याच्या मानेसारखें उंच करून वळविलेलें असतें. स्वारींतल्या कोतवालघोड्यावर मात्र तीं खोगरें नेहमीं दिसतात; पण सामान्यतः मराठा स्वार चारजम्याचाच उपयोग करतो. चारजमा म्हणजे आंत कापूस किंवा केंस भरून शिवलेला दुलईसारखा असतो. तो घोड्यावर घातला म्हणजे घोडें लागत नाहीं. प्रथम घोड्यावर हा चारजमा घालून तो बळकट बांधतात व त्यावरून रिकीबी सोडतात. त्या फार आंखूड असतात. नंतर त्या चारजम्यावर स्वाराचे कपडे, बाडबिस्तरा घालून तो पट्यानें आवळून टाकतात आणि नंतर त्या सर्वांवरून फिरून एक नक्षीदार आणि भपकेबाज असा चारजमा सोडतात.

"घोडें कितीही खत्रूड किंवा हलकें असलें तरी मराठा शिलेदार त्याला लेंडी आणि जेरबंद घातल्याशिवाय कधीं राहावयाचा नाहीं. त्यांतल्या त्यांत जे संपन्न असतात ते आपापल्या दुमच्या ऐटबाज करण्याकरितां फार जपतात. कोणाची नक्षीदार असते तर कोणाची रेशमाच्या गोंड्यांनीं फुललेली असते, तर कुणी त्यावर चांदीच्या मुदी, चांगल्या कोंबडीच्या अंड्यायेवढ्या, मोठाल्या बसवतो. त्यांची दुमची आपल्यासारखी खोगिराला मधोमध जोडलेली नसते तर तिचे दोन सर किंवा पदर असतात, आणि ते खोगिराच्या मागल्या दोन टोकांना जोडलेले असतात. गरीब शिलेदार या दुमचीलाच घोड्याचा तोबराहि लटकावून देतो. घोड्याबरोबरच त्याची आघाडी पिछाडीही प्रत्येक स्वाराबरोबर असते. मराठे आपल्या घोड्यांना पायबंद देतात तो २० फूट लांब देतात. क्वचित् तीस तीस फूटही लांब देतात. असा ताण दिल्यानें घोडें निजत नाहीं अशी त्यांची समजूत आहे. मराठे स्वारानें घोडें विकलें तरी तो पायबंद विकीत नाहीं कारण तें अशुभ समजतात. मराठे आपल्या घोड्यांचीं शरीरें नेहमीं झुलीनें झांकून ठेवतात व घोड्यांना अंधाऱ्या देतात कारण झूल घातल्यानें घोड्याचा तजेला

कायम राहतो व अंधारी लावल्यानें घोडया वगैरे पाहून तो अस्थिर होत नाहीं. त्यांच्या घोड्यांचे लगाम बहुधा एकेरी किंवा एकलडी असतात; आणि एकाच ओठाळीचे असतात; पण घोडें चावरें असेल तर मात्र चांगला कांटेरी लगामही ते देतात.

" त्यांच्या घोडयांचा मुख्य अलंकार म्हणजे गळ्यांतल्या पुतळ्यांच्या किंवा पदकांच्या माळा. त्यायोगें घोडा फार खुलून दिसतो. घोडयांच्या आयाळांचे पेड विणून त्यांतून रंगबिरंगी रेशमी फिती किंवा गोंडे लावण्यांत येतात. एकाद्या पोतवालीच्या पोतदांडीवरील रंगबिरंगी सरांप्रमाणें आयाळांच्या विणलेल्या चोयट्या मानेच्या बाजूंस लोंबत असतात. त्या दोहों बाजूंच्या पेडांना सडका म्हणजे गंगावनेंही लावलेलीं असतात. हीं गंगावनें म्हणजे वनगायांचे पुच्छगुच्छ होत.

" मराठे घोडा खच्ची करतात पण तो अनावर झाला तरच. एरवीं कधीं नाहीं. अबलक किंवा कबरा किंवा नानारंगी घोडा असला तर तो चांगला उमदा आणि बळकट समजला जातो. काळ्याच्या खालोखाल तोच उत्तम समजतात. पांढरा घोडा मात्र अशुभ समजतात; पण त्याचें शेंपूट आणि आयाळ काळी असली तर तोहि धकतो. "

घोड्यांच्या जाती

मोगलाईत अकबरापासून औरंगजेबाचे कारकीर्दीअखेर घोडयांच्या मुख्यतः आठ जाती प्रसिद्ध असत व त्यांचा सैन्यांत भरणा करीत. त्या अशा— १ अरबी, २ पर्शिअन, ३ मुजन्नस, ४ तुरकी, ५ याबू, ६ ताजी, ७ जंगला, ८ इराकी. राजव्यवहारकोशावरून शिवकालीं खालीलप्रमाणें घोडयांच्या जाती होत्या असें दिसतें— १ रहवाल, २ इराखी, ३ अरबी, ४ कच्छी, ५ मुजन्नस, ६ जहरी, ७ ताजी, ८ टाकण, ९ तुरकी. ताजी आणि जंगला या दोन एतद्देशीय जाती

असून त्यांची निपज हिंदुस्थानांतच होते असें आयर्विन म्हणतो. ताजी हा जंगल्योपक्षां अधिक भारी समजत. याबू म्हणजे सध्या आपण ज्याला काबुली घोडा म्हणतो तो होय. तो इमारतीनें दांडगा, पुष्ट, धिमा व किंचित् मंद असतो. तुर्की घोड्यांची निपज बुखाऱ्याकडे होई; आणि मेसापोटेमियांत इराकी घोडीं निपजत. राजव्यवहार-कोशावरून सिंधांतल्याला रहवाल, यवन-प्रदेशांतल्याला इराखी, इराणांतल्याला अरबी, जवनांतल्याला कच्छी, विजातीयाला मुजन्नस, बाल्हीकांतल्याला जहरी, मद्रदेशांतल्याला ताजी, अशा संज्ञा होत्या असें दिसतें.

घोड्यांच्या जन्मस्थानांवरून जशा त्यांच्या जाती धरीत त्याप्रमाणें त्यांच्या वर्णावरून, लक्षणांवरून पुन्हा निरनिराळ्या जाती पाडीत. त्यांच्या रंगांच्या २० ठोकळ जाती करून त्यांपैकीं विशिष्ट आठ जातींच्या फिरून पोटजाती पाडलेल्या असत. जसे कुमाइत आणि तेल्या कुमाइत, बोर आणि तेल्या बोर, बोर आणि निळा बोर वगैरे. मिळून एकंदर ५८ प्रकार त्यांच्या रंगांचे धरीत. त्याचप्रमाणें त्यांच्या लक्षणादिकांचेही फिरून ५२ प्रकार धरीत असत.

अरबी, तुर्की, ताजी वगैरे प्रकार त्यांच्या जातींवरून आणि अबलक, पंचकल्याण, निळा, बोर, वगैरे त्यांच्या वर्णावरून किंवा लक्षणादिकांवरून पडत. एकंदर प्रकार आढळतात ते असे. निळा, गोमाशी, बोर, तेलीबोर, चितोडा, चालक, पंचकल्याण, जरदा, सारंगा, ताजी, नेवरा टाकम, तुर्की, अरबी, कुमाइत, कोतल, नर, कोतवाल, शामकर्ण, लाल, खडक, बोरकैरा, निळा, डागिल, रहवाल, सभल, जललवण, सारंगा, सारिखा बोरधटी, अब्रायेमनी, भदा सिरखंडा, बोर सुरसंगा.

शिलेदारांच्या चेहरेपट्ट्यांत त्यांचें आणि त्यांच्या घोड्यांचें बारकाईनें वर्णन केलेलें असतें; शिलेदाराबरोबर त्याच्या घोड्याचा वर्ण, खोडी, जात,

चिन्हें, किंमत वगैरे सर्व टिपण्याकरितां वरील गोष्टींचा उपयोग होई हें सांगणें नकोच. घोड्यांत वळू घोडे व पसू घोड्या असत. चांगल्या अवलादीच्या घोड्यांची पैदास करण्याकरितां असे घोडे व घोड्या पागेंत स्वतंत्र-पणें बाळगिलेल्या असत. वळू घोड्यांना अपेट अशीही दुसरी एक संज्ञा असे. घोड्यांत, घोडे, घोड्या, शिंगरें व यारद्या असे फरक करीत. यारीद हें एक वचन व यारद्या हें अनेक वचन. बसण्याखेरीज ओझीं वगैरे वाहण्याच्या किंवा खटारे वगैरे ओढण्याच्या अवांतर कामीं या यारद्यांचा उपयोग करीत असत. सध्यां लष्करांत तोफांच्या किंवा सामानाच्या गाड्या ओढण्या-कडे बहुधा खेचरांचा उपयोग करतात; परंतु आश्चर्याची गोष्ट अशी दिसते कीं, ऐतिहासिक कागदपत्रांतून घोड्यांबरोबर खेचरांचा कधींही उल्लेख येत नाहीं. पागांचे, तोफखान्यांचे तैनात-जाबते, झाडे वगैरे सर्व तऱ्हेचे युद्धविषयक अनेक ऐतिहासिक कागदपत्र वाचनांत आले आहेत; परंतु त्यांत फक्त एकदांच 'खचरे' असा शब्द आलेला आढळला. तो संदर्भावरून 'खेचरा' बद्दलच असावा असें दिसतें. परंतु तेवढ्या एकमेवाद्वितीय उल्लेखावरूनच त्या वेळीं खेचरांचा सैन्यांत उपयोग करीत नव्हते असें वाटतें. त्या वेळीं तोफा ओढण्याचें कष्टाचें काम बैलांच्या माळांनींच व क्वचित् हत्तींकडून करण्यांत येत असे. मग तेव्हां खेचरांची निपज करण्याची वहिवाटच नव्हती कीं काय सांगतां येत नाहीं.

हेडे, चारण, लमाण, कारवान, सौदागर, गोसावी हेच लोक बहुधा घोडे, उंट, बैल वगैरेंची विक्री करीत. घोड्यांच्या किंमती वीस रुपयांच्या तट्टापासून तों दहा हजार रुपयांच्या तुर्की घोड्यापर्यंतही आढळतात. शंभरपासून दोनशेंपर्यंतच्या किंमतीचा घोडा सामान्य असे. तीनशेंपासून सातआठशेंपर्यंतचीं घोडीं मदभरण्याचीं म्हणजे मध्यम प्रतीचीं व त्यापुढील किंमतीचीं उत्तम असत. सामान्यतः शिलेदारांची घोडीं

४००।५०० पर्यंतचीं असत. एकांड्यांचीं किंवा पागेच्या सरदारांचीं ८००।१००० पर्यंतचीं असत. मोठमोठ्या सरदारांचीं मात्र फारच भारी किंमतवान असत. असे उत्तम निवडक घोडे कोठें आढळल्यास सरदार लोक हरतऱ्हेनें आणि वेळीं अन्याय करून सुद्धां ते मिळवीत. असेंच एक घोडें कसेंही करून हाताखालीं घालावें अशी एका पत्रांत पहिल्या बाजीरावानें चिमाजीला आज्ञा केली आहे. बापू गोखल्याचें व विठ्ठलराव नरसिंह विंचूरकर यांचें मार्तंड नांवाच्या घोड्याबद्दलचें भांडण व शेवटीं मार्तंड घोडा आपण साफ देत नाहीं असें सांगितल्या-वर बापू गोखल्यानें तो बाळोजी कुंजराकडून चोरून पळविल्याची हकी-कत विंचूरकर घराण्याच्या इतिहासांत नमूद केलेली आहे !

डाग चेहरे

घोड्यांना डाग देण्याची पद्धत सर्वप्रसिद्ध आहे. घोडें आपलेंच आहे कां शत्रूचें पाडून आणून पागेस लावलेलें आहे, सरकारांतून पास होऊन पागेंत जमा धरलें गेलें आहे, कीं तसेंच घुसडलें गेलें आहे, वगैरे गोष्टी कळण्याकरितां डागाची किंवा कांहीं खुणेची जरूर असते व त्यामुळेंच या पद्धती अमलांत आल्या. ऋग्वेदकालापासून, बैलांच्या किंवा जनावरांच्या कानांवर ५ व ८ या आकड्यांचे डाग खुणेकरितां देण्याची किंवा त्यांचे कान कातरून नक्षीदार करण्याची पद्धत आपणांस माहीत होती असें राजवाडे यांनीं राधामाधव–विलासचंपूंत उल्लेखिलें आहे. इतकें मागें जाण्याचें आपणांस कारण नाहीं. मराठशाहीपुरतेंच आपणांस पहावयाचें आहे आणि तसें पहात असतां घोडें डागण्याची कला मराठ्यांनीं मोगलांपासूनच उचलली पण फारच अल्प प्रमाणांत अमलांत आणली असें दिसून येतें.

घोड्यांना डाग देण्याची युक्ति इ० सन १३१२–१३१३ मध्यें

अल्लाउद्दीन खिलजी यानें प्रथम सुरू केली. पुढें सन १५४१–४२ मध्यें ती शेरशहानें फिरून अमलांत आणली. त्याच्यानंतर अकबरानें विशेष सक्तीनें तिची बजावणी केली. पंचहजारी किंवा त्याहून मातबर मनसबदार असत त्यांना मात्र घोड्यांच्या 'दागचेहऱ्याची' माफी असे. पातशाहाचा हुकूम होईल तेंव्हां खडी गणती देऊन आपलें घोडें–माणूस त्यांनीं दाखविलें म्हणजे झालें. अकबराच्या कारकीर्दींत घोडे डागण्याचें एक स्वतंत्र खातेंच असे. सुरुवातीस कांहीं वर्षें कांहीं विशिष्ट चिन्हांच्या शिक्यानें घोडे डागीत असत, परंतु पुढें त्या चिन्हाऐवजीं आंख म्हणजे आंकडा डागूं लागले. ऐनेअकबरींत डागांचीं चिन्हेंही दिलीं आहेत. औरंगजेबाच्या कारकीर्दींत डागांचे सुमारें अठरा प्रकार आढळतात. एकदां सरकारी शिक्का झाल्या-नंतर फिरून जो तो सरदार आपआपल्या पथकांतील घोड्याला पुन्हां आपला स्वतःचा म्हणून स्वतंत्र डाग देत असे तो निराळाच.

डाग देण्याची ही पद्धत शिवशाहींत किंवा पेशवाईत सर्रास सुरू होती असें दिसत नाहीं. पागांचे व पथकांचे तैनातजाबते, गोटगणत्या, चेहरेपट्या, हजिऱ्या, वराता, कीर्दी, नांवनिशीवार पत्रकें, आवर्जे वगैरे पागांसंबंधींच्या कागदांत घोड्यांच्या डागासंबंधीं कोठें उल्लेख आढळले नाहींत. स्वार-शिलेदारांच्या चेहरेपट्यांत शिलेदाराबरोबरच त्याच्या घोड्याची चेहरेपट्टीही पासपोर्टांतल्याप्रमाणें अत्यंत बारकाव्यानें टिप-लेली असते. त्यांत घोड्याच्या खोडी, रूप, रंग, जात, चिन्हें, लक्षणें सर्व कांहीं नमूद असतें. उदाहरणार्थ—

हाजिरी स्वार-शिलेदार मे॥ कृष्णराव वामन नि॥ बापूजी गणेश सुरुसीत असर मयातेन व अलफ माहे जमादिलावल ऊर्फ चैत्रमास छा॥ ७ जमादिलाखर.

४०१ रु. देवराव बिन बळवंतराव सूर्यवंशी व॥ कागवाद उमर २५. घोडा जरदा समन. मागील व पुढील

डावे पाय नेवरे व पुढील उजव्या ख्यालदार बेड उमर ४ किंमत ४००.

३२१ रु. जोत्याजी बिन यशवंतराव माठकर वा॥ नानवी उमर ४०. घोडी तेलीबोर पंचकल्याण, उजट वर डोमजे मगंल (?) उमर ६ किंमत २००.

३५१ रु. माहादाजी बि॥ सजणाजी शिंदे वा॥ गोरेगांव उमर ३०. घोडी निली गोमासी, दाट, गल्यास डाग गोप्याचे व चांदणीचा डाग उमर ७ निशाणदार किंमत २००.

परंतु अशा चेहरेपट्ट्यांतून डागाचा उल्लेख मुळींच येत नाहीं येवढें खरें. त्यासंबंधानें स्वतंत्रपणें पांचचार उल्लेख सांपडतात. पण त्या अपवादांवरून मागलें विधानच बळकट होतें. अर्थात् तेवढें दोनचार अपवाद दाखविले म्हणजे झालें. ते असे—(१) सभासदाच्या बखरींत शिवाजीमहाराजांनीं सुरतेस लूट केली त्या वर्णनांत पुढील वाक्यें आहेत. "चार हजार घोडीं आणिलीं तीं पागा केली. पागेस खूण चौकटीचा डाग घोड्याचे उजवे टिरीवर देऊन, अशी ओळखण करून (ठेवली)" यांतिल ओळखण करून ठेवली या शब्दांवरून शत्रूकडून पाडून आणलेलीं हें ओळखण्याकरितां असाच अर्थ दिसतो. अर्थात् सर्रास घोडे डागण्याची शिवकालीं पद्धत नसावी असेंच अनुमान निघतें.

(२) दुसरा उल्लेख शाहूच्या खास स्वारीच्या घोड्यासंबंधीं. शाहूनें बाजीरावाजवळ एका उत्तम घोड्याची मागणी केली म्हणून त्यानें एक फर्मास चांगला पाहून सातार्‍यास पाठवून दिला. परंतु फेरवून पाहतां त्यांत कांहीं खोडी शाहूला आढळल्या, सबब तो परत करण्याचें ठरलें. त्यासंबंधीं पत्रांत असे शब्द आहेत "स्वामींनीं पागेच्या हवालदारास सांगितलें कीं तूर्त डाग न करणें"

(३) राजवाडे ७ : ५४ मध्यें " दागचेहरे करून रोजमरे कितेकांचे जारी झाले " असें एक वाक्य आहे. तेथें शिलेदारांची चेहरेपट्टी इतकाच अर्थ दिसतो. मुसलमानी परंपरेनें चालत आलेला शब्द वापरला इतकेंच दिसतें. तेवढ्यावरून डाग देण्याची पद्धति होती असें म्हणवत नाहीं.

(४) चौथा उल्लेख उंटासंबंधीं आहे. घोड्यासंबंधीं नाहीं. पण डागाचा निर्देश असल्यामुळें अुतरून घेतलेला आहे. तो असा " सिवाजी विठ्ठल यांस पत्र जे सरकारचीं उंटें चुकोन तुमचे तालुक्यांत गेलीं आहेत त्याची चौकसी करून दहांचे आखांचीं असतील तें पाठविणें "

(५) श्रीम्हालसाकांत

राजश्री बलवंतराव चिमणाजी थत्ते गोसावियासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रे॥ येशवंतराव होलकर दंडवत सुरू तिस्सा मयातैन व अलफ तुम्हीं पुण्याहून धारेस जाण्याकरितां मंडलेश्वरी मुकाम करून राहिला होता त्यास खानदेशप्रांतीं दादनखां वगैरे बंडाची गर्दी जाल्यामुळें सरकारची घोडीं अफरातफरी जाली यास्तव सरकारांत कोणी गैरवांका समजाविलें कीं यांजपासी बंडापैकीं घोडा आहे म्हणोन त्यावरून तुम्हांस मंडलेश्वरीहून महेश्वरचे मुकामीं हुजूर आणोन तुमचा येक घोडा जर्दा रास १ रघुजी बेलकर नि॥ सरकार याचे पार्गेत देऊन डाग देविला. पुढें चौकशी करून पाहतां बंडाचा वगैरे कांहीं एक लांझ्या नाहीं याजकरितां सदरहू घोडा रास १ तुमचा तुम्हांस देऊन हें पत्र सादर केले असे तरी तुम्हीं देसी परदेसी घोड्यासुद्धां गेल्यास डागाविसी वगैरे कांहींएक उपद्रव लागणार नाहीं जाणिजे छ. १५ शौवाल बहुत काय लिहिणें मोर्तबसुद (यशवंतरावाचा शिका.)

वरील पांचचार उल्लेखांवरून शिवशाहींत व पेशवाईंत खुणेकारितां म्हणून डाग देण्याची पद्धति माहिती होती व तिचा

क्वचित् उपयोगही केला जाई असें दिसतें; परंतु तिचा सर्रास उपयोग केला जात नसे हेंही उघड दिसतें. स्वारशिलेदारांच्या व घोड्यांच्या टीपवार चेहरेपट्ट्यांत डागांचा उल्लेख नसतो हें त्याचें प्रत्यक्षप्रमाण आहेच. खेरीज दुसरेंही एक मोठें परंतु अप्रत्यक्ष प्रमाण आहे. तें असें—पेशव्यांच्या व त्यांच्या सरदारांच्या, सरदारांच्या व पथक्यांच्या व पाग्यांच्या नेहमीं आपसांत कुरबुरी चालत. सरंजाम किंवा तैनात खाऊन तुम्हीं फौजांत घोडें-माणूस धडधडीत, चांगले आढ-ळाचे ठेवीत नाहीं, नुसती खोगीरभरती करतां असें वरिष्ठांनीं कनिष्ठ पाग्यापथक्यांस म्हणावें आणि अचानक त्यांच्या खडेगणत्या घ्याव्या असें नेहमीं घडे. खरेशास्त्र्यांनीं याचें एके ठिकाणीं यथार्थ वर्णन केलें आहे. ते म्हणतात— " दक्षिणेंतल्या पुष्कळ पथकांत व होळकरांच्या फौजेंत निकृष्ट प्रतीच्या स्वारांचा भरणा फार झाला असल्याचा बोभाटा झाला होता. सरकारचे लांचखाऊ कारकून असल्याही स्वारांची गणती घेत ! त्या गणतीचें वर्णन कोणीं थट्टेखोरानें असें केलें आहे कीं, घोड्याचे चार आणि माणसाचे दोन असे सहा पाय दिसलें कीं, घाला त्याचें घोडेस्वारांत नांव ! गणतीच्या कारकुनाची मूठ दाबली म्हणजे घोडें दहा रुपयांचें असो कीं वीस रुपयांचें असो, स्वार म्हणवणारा लष्करचा भडभुंजा असो कीं भिस्ती असो, तें कशाला तो पाहतो आहे ! घोडें म्हणजे घोडें आणि स्वार म्हणजे स्वार ! ! " हें वर्णन थट्टेचें असलें तरी खऱ्या वस्तुस्थितीहून फारसें भिन्न नव्हतें. निराळें स्वतंत्र खातें उघडून दक्ष अधिकाऱ्याकडून चांगले घोडेंच तेवढें पास करून डागल्याखेरीज फौजेंत भरती करावयाचें नाहीं अशी पद्धत अमलांत असती तर या भानगडी वारंवार उपस्थित झाल्या नसत्या.

* सिंहगड

येत्या माघ वद्य ९ स म्हणजे ४ फेब्रुवारीस सिंहगडावर तानाजीची पुण्यातिथि विशेष उत्साहानें साजरी होणार आहे. तानाजीप्रमाणें दुसऱ्याही अनेक ऐतिहासिक व्यक्तींचा व प्रसंगांचा संबंध सिंहगडाशीं पोचत असल्यामुळें त्याला ऐतिहासिक क्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. निसर्गसौंदर्याच्या व हवापाण्याच्या दृष्टीनेंही तो फार प्रसिद्ध असल्या-मुळें देशी विदेशी सर्वच हौशी प्रवाशी त्याचें दर्शन घेतल्याखेरीज बहुधा राहात नाहींत. अशा या स्थळाची एकत्र, संकलित माहिती कोठें उपलब्ध असलेली पाहण्यांत नाहीं. ती अडचण दूर करतां आली तर पाहावी अशा हेतूने उपलब्ध बहुतेक सर्व साधनें व अप्रसिद्ध अशींही

---

* केसरी, २९ जानेवारी व २ फेब्रुवारी, १९३७.

कांहीं साधनें चाळून त्यावरून पुढील सिंहगडाच्या इतिहासाचे सिंहावलोकन केलें आहे.

कोंडाणा नांव कां ?

सिंहगडचें पठार अर्थातच सह्याद्रीइतकें जुनें असणार व पुरातन काळीं त्या त्या राजवटींतील राजांनीं त्याचा उपयोगही किल्ल्यासारखा करून घेतला असेलच. तथापि आपणास त्याची येथें जरूरी नाहीं. जुन्या काळाचे विहंगमावलोकन करीत येत असतां १३४० साल महत्त्वाचें वाटतें. तेवढें लक्षांत ठेवलें म्हणजे झालें. कारण त्या सालीं महमद तघलखानें सिंहगडाला वेढा देऊन तो नागनाईक कोळ्याच्याकडून जिंकला असा उल्लेख सांपडतो.

सिंहगडाचें जुनें नांव कोंढाणा किंवा कोंडाणा असें होतें. त्यासंबंधीं अशी दंतकथा सांगतात कीं, एक वेळ दुर्गादेवीसारखा भयंकर दुष्काळ पडला असतां किल्लेदारानें अन्नान्न होऊन कोंडा घेऊन त्याच्या बदल्यांत हा गड दिला, म्हणून त्याचें नांव ' कोंडाणा ' पडलें ! गडाखालीं कोंडणपूर नांवाचें प्रसिद्ध गांव आहे व तेथेंच आसपास शिवापूर, शिवरें, केळवडें, खेड या गांवीं कोंडे आडनांवाचें इतिहासप्रसिद्ध देशमूख घराणेंही नांदत आहे. अर्थात् त्याचा व कोंढाण्याचा परस्पर कांहीं तरी संबंध असला पाहिजे अशींही कोणी उपपत्ती लावतात. पण तूर्त आपणास त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

शहाजी व शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीपासूनच कोंडाण्याला खरें महत्त्व आलें म्हणून तेथूनच त्याचा त्रोटक अहवाल पाहूं. पुरंदरें दप्तर भा. ३ मध्यें खेडेबारें येथील देशपांड्यांचा जो एक अप्रतीम व शिवाजी आणि दादोजी कोंडदेव यांच्या खासगी चरित्रावर अपूर्व प्रकाश पाडणारा समकालीन करीणा छापला आहे त्यांत सिंहगडासंबंधीं

दोन महत्त्वाचे उल्लेख सांपडतात. त्यांपैकीं एक शहाजीकालीन आहे व दुसरा शिवाजीच्या कारकीर्दीपैकीं आहे. शहाजीकालीन उल्लेखांतील माहिती सर्वस्वी नवी म्हणून विशेषच महत्त्वाची आहे. तींत असें म्हटलें आहे, "कैसे म्हणाल तर कोंढाणा निजामशहापासून घेतला, सिदी आंबर धरिला ते वेळेस पनास साठीं हजार व्हनाचे वित, पातशहाचा खजिना वरी होता. तो लुटून आणविला. माहुलीस महाराज (शहाजी) निजामशाही दिवाण घेऊन गेले होते. ते वेळेस मोगल व इदलशाही नामजादी माहोलीखाली वेढा बैसला होता. त्यास सामान खजाना विज्यापुरी होऊन (विजापुराहून) डोणजाचे खिं[डीं]तून जात होता तोही लुटिलियावरी मुधाजी मायघा निजामशाही तो पळून खेडेबारियास याच्या घरास लक्ष व्हनाचे वित घेऊन आला तो आपलीया घरांत याणी गुप्तरुपे ठेविला होता. यैसीयास पुरंधरास रा [जा रा] ऊ ईदलशाही वेढा आला. तो मुधाजीस धरावयास जपो लागला" वगैरे. हा प्रसंग सन १६३५ सालीं घडला.

शिवकाल

सिंहगड व पुरंदर हे पुणें प्रांताच्या नाक्यावर असल्यामुळें त्यांना फार महत्त्व होतें. शहाजीसाठीं शिवाजीला सिंहगड, अदिलशहास देऊन टाकण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं शिवाजीस फार वैषम्य वाटलें. शिवभारतांत या प्रकरणीं सोनोपंताशीं शिवाजीचा जो संवाद झालेला दिला आहे तो वाचण्यासारखा आहे. उपरिनिर्दिष्ट देशपांडेकरीण्यांत या प्रसंगासंबंधीं जी हकीकत दिली आहे त्यावरून शहाजीप्रकरणीं शिवाजीला नुसता सिंहगड व पुरंदरच नव्हे तर शिरवळ व खेडेबारे हाहि प्रांत सोडावा लागला ही अधिक माहिती मिळते. तसेंच या वेळेपर्यंत (सन १६४९) शिवाजी खेडास घरवाडा बांधून राहात होता. पण

तहामुळें तें सोडावे लागलें म्हणून तो पुण्यास जाऊन लालमहाल बांधून राहिला हीहि महत्त्वाची नवी हकीकत आहे. मुळांतली वाक्यें अशीं. " फतेखान विजापूरकराची नामजादी राजियावरी आली. ते वेळेस किले कोंडाणा व सिरवळ खेडेबारे देऊन सल्ला केला. राजेश्री पुणियास गेले तेथे आबाजी महादेव हे कारभारी झाले. "

१६६३ सालीं शाहिस्तेखानाची 'शास्ती' करण्याची तयारी सिंहगडावर बसूनच शिवाजीने केली. त्यानंतर जसवंतसिंगाने सिंहगडास वेढा घातला होता. पण ६ महिने वेढा बसूनही त्याला तो जिंकता आला नाहीं व हजारों लोक गमावून तो परत गेला. त्याच सालीं सिंहगडावर मोठा फितूर झाला. फितुराचा सुगावा लागतांच शिवाजीने तांतडीने मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार यांना पत्र लिहिलें, तें वाचनीय आहे. त्यांत तो लिहितो, " कोंकणांत नामदारखानावर जाण्याचा तह केला होता; पण सिंहगडावरून समाचार आला कीं, गडावर कांहीं फितवा आहे. म्हणून कोंकणांत जाण्याचा तह राहिला. तरी लष्करी लोकानिशीं व खासखेली हशमानिसी कागद देखतांच स्वार होऊन सिंहगडास जावें, व तेथें रहावें. " या पत्रावरून महाराज सिंहगडास किती जपत होते, त्याकरितां त्यांनीं आपली स्वारीही कशी तहकूब केली तें कळतें. यानंतर शिवकालीन मोठा प्रसंग म्हणजे तानाजीचा. तो विख्यातच आहे. तानाजीने ४ फेब्रुवारी १६७० रोजीं स्वतःची प्राणाहुति देऊन सिंहगड महाराजास परत मिळवून दिला.

शिवाजी महाराजांचें देहावसान रायगडावर झालें, त्याप्रमाणें राजाराम महाराजांचें देहावसान एकाद्या डोंगरी किल्ल्यावरच व्हावें असा योग होता. स्वाऱ्या शिकाऱ्यांच्या दगदगीनें क्षीण होऊन विसावा घ्यावा म्हणून राजाराम महाराज सन १७०० सालीं सिंहगडावर येऊन राहिले; पण

तेथें त्यांना ज्वर येऊं लागला व त्यांतच फाल्गुन वद्य ९ स म्हणजे २ मार्च १७०० रोजीं त्यांचा अंत झाला. त्यांचें उत्तरकार्य संपादतांना रामचंद्र पंतांनीं त्यांच्या दहनभूमीवर छत्री बांधली अशी माहिती सरदेसायांनीं नव्या राजाराम चरित्रांत लिहिली आहे.

यानंतर १७०२ सालीं सिंहगडाला औरंगजेबाचा वेढा बसला होता त्यावेळीं पेशव्यांच्या पहिल्या पराक्रमी पुरुषानें म्हणजे बाळाजी विश्वनाथानें जीव धोक्यात घालून मोठ्या जवामर्दीनें किल्ल्यास कुमक पोचविली. तो त्यावेळीं पुणें परगण्याचा सुभेदार होता. ३० ऑगस्ट १७०२ रोजीं त्यानें अंबाजीपंत पुरंदऱ्यास लिहिलेलें एक महत्वाचें पत्र उपलब्ध झालें आहे. त्यांत तो म्हणतो, " कृष्ण मृत्तिकेची (बंदुकीच्या दारूची) बहुत जरूर आहे. तरी भगीरथ प्रयत्न करून अडीच मण दारू मेळवून हरइलाजें घेऊन येणें. जिवावरचा खेळ करणें (आहे.) आजचें उद्यावर कार्यास नये. " औरंगजेब स्वतःच वेढा देऊन बसला होता, तो उठेना. पण किल्लाही पडेना. शेवटीं गोमाजी विश्वनाथ पुरंदऱ्यामार्फत पन्नास हजार रुपये किल्लेदारास चारून बादशहानें आपलें निशाण एकदाचें सिंहगडावर चढविलें ! नंतर आठ दिवसांनीं खासा बादशहा किल्ल्यावर गेला व असला बाका बुलंद जागा हातीं आलेला पाहून धन्य वाटून त्यानें किल्ल्याचें नांव ' बक्षिंदाबक्ष ' म्हणजे ईश्वरीप्रसाद असें मुसलमानी ठेविलें. पण हा ईश्वरीप्रसाद मुसलमानांना पचला नाहीं. कारण पुढें लगेच १७०५ च्या जुलैमध्यें मराठ्यांनीं सिंहगड परत माळा लावून काबीज केला !

पेशवेकाल

यानंतर मात्र पुढे हा किल्ला मोगलांच्या ताब्यांत कधींही गेला नाहीं. छत्रपतींनीं तो सचिवांच्या वहिवाटीस देऊन ठेवला. १७५० सालीं

ताराबाईनें पेशव्यांविरुद्ध कारस्थान उभारलें, तें मोठेंच प्रकरण माजलें. आपल्या नवऱ्याच्या वार्षिक पुण्यतिथीच्या उत्सवास सिंहगडास जावयाचें निमित्त करून ताराबाईनें सचिवास फितविलें. सिंहगड सचिवांच्या ताब्यांत होता. अर्थात् इतका पुण्यानजिकचा किल्ला शत्रूच्या किंवा गैर-इतबारी लोकांच्या ताब्यांत राहूं देणें धोक्याचें आहे असें पाहून महाप्रयासानें पण चिकाटीनें नानासाहेब पेशव्यानें तो सोडून देण्यास सचिवास भाग पाडलें. त्याच्या मोबदल्यांत दुसरे दोन किल्ले देऊन त्यानें सचिवाची समजूत काढली. या वेळेपासून पुढें पेशवाई जाईपर्यंत सिंहगड पेशव्यांच्या अखत्यारींत राहिला. फक्त १७७६ सालींच काय तो थोडे दिवस तो तोतयानें बळकावला होता.

हा जागा पुण्यासमीप, दुर्गम व संगीन असा असल्यामुळें पेशव्यांना त्याचा नाना तऱ्हांनीं उपयोग झाला. किल्ला ताब्यांत आल्यावर नानासाहेबानें त्याची डागडुजी व कांहीं नवी बांधणीही केली. कल्याण दरवाज्यानजीक तटांत नानासाहेब पेशव्याच्या नांवाचा एक शिलालेख आहे. अर्थात् वरील बांधणीचें काम झाल्यावेळींच तो बसविण्यांत आला असला पाहिजे. धामधुमीच्या प्रसंगीं पेशव्यांच्या कुटुंबांतील मंडळी बंदोबस्ताचें ठिकाण म्हणून सिंहगडासच रवाना करण्यांत येत असत. नानासाहेबानंतर थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत निजामाची पुण्यावर स्वारी झाली. त्या वेळीं पुणें लुटलें गेले तेव्हां गोपिकाबाई नारायणरावास घेऊन सिंहगडावरच राहण्यास गेली होती. कागदपत्रांचे रुमाल वगैरे सर्व संपत्तीही सिंहगडीं चढविण्यां आली होती. या स्वारींत निजामाच्या फौजेनें पुणें शहर सबंध जाळून सिंहगडाच्या माच्या जाऊन लुटल्या. याच मुक्कामीं " मातोश्रींनी (गोपिकाबाईनें) कृष्णाजी हरी साठे यांची कन्या सौ. गंगाबाई नवरी निश्चय करून श्रीमंत नारायणरावसाहेब यांचें लग्न केलें." सवाई माधवरावाचा जन्म पुरंदरावर झाला हें बहुतेकांस माहीत असतें.

पण संभाजी महाराजांचाही जन्म पूर्वी त्याच किल्ल्यावर झाला ही गोष्ट मात्र संशोधकांखेरीज बाकी बहुतेकांना अज्ञातच असते. तशीच अवस्था याही उदाहरणांत दृष्टीस पडते.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पुण्याजवळ शिंदे होळकरांचें तुंबळ युद्ध होऊन शिंद्याचा पराभव झाला. तेव्हां बाजीराव पळून आश्रयास सिंहगडावरच दोनचार दिवस राहिला होता. त्यानंतर पुढें १५ वर्षांनी गंगाधर शास्त्र्याच्या खुनामुळें जी घालमेल झाली त्यांत पुण्याचा रेसिडेंट एल्फिस्टनसाहेब याने बाजीरावाला पेचांत पकडलें व सिंहगड व इतर दोन किल्ले त्रिंबकजीला पकडून देईपर्यंत ओलीस मागितले. त्याप्रमाणें ९ मे रोजीं इंग्रजांनी सिंहगडचा कबजा घेतला. पण पुढें ऑगस्टांत इंग्रजांनीं हा किल्ला फिरून पेशव्याच्या हवालीं केला. तथापि किल्ल्याचा नाश अगदीं समीपच येऊन ठेपला होता. कारण पुढें थोड्याच दिवसांत खडकीच्या लढाईनंतर इंग्रजांनी तो जिंकून घेतला. १४ फेब्रुवारी १८१८ रोजीं जनरल प्रिझलर नीरेच्या पुलावरून आला व त्यानें सिंहगडला वेढा दिला. २१ तारखेस त्यानें तोफांच्या बातेऱ्या उभारल्या व जोराचा मार किल्ल्यावर सुरू केला. किल्ल्यावर गोसावी व अरब मिळून १२०० शिबंदी होती, पण त्यांना दम पुरेनासा झाला. एक मार्चपर्यंत १४१७ शेल्स व २३०० नऊ शेरी तोफांचे गोळे इंग्रजांनी मारल्याचें नमूद आहे. दोन मार्च रोजीं किल्लेकऱ्यानी कौल घेतला व अखेर ते किल्ला सोडून निघून गेले.

किल्ल्यावर इंग्रजांना ४२ तोफा २५ जेजाला व पुष्कळ दारूगोळाहि मिळाला. पण पैशाची दागदागिन्यांची व जडजवाहिराची लूट झाली तिला सीमा नव्हती. पन्नास लक्ष रुपयांची लूट (Prize money) झाली असें इंग्रज अधिकाऱ्यांनीच लिहून ठेवलें आहे! पेशव्यांचें सर्व जडजवाहीर याच किल्ल्यावर ठेवीत असत. अर्थात् किल्ल्याची तरतूद

पेशवे सरकारांतून फारच नामी असे. आणि त्याचमुळें लढाईचा हंगामा सुरू झाल्याबरोबर बहुतेक श्रीमान लोकांनी आपापला वित्तविषय किल्ल्यावर व किल्ल्याच्या माचीस नेऊन ठेविला होता. तो सारा ऐताच इंग्रजांच्या हातीं पडला. " सावकार वाणी उदमी । बैसले होऊनि निर्मळ । द्रव्याच्या शोकें करून । कितिकांला भरला चळ ।" अशी शाहिरांनीं वर्णन केलेली स्थिती मूर्तिमंत अवतीर्ण झाली. पुढें अनेक दिवसपर्यंत तर इंग्रज सोजिरांना, लुटींत मारलेले हिऱ्यामोत्यांचे जडजवाहीर वाटेल त्या किमतीला फुंकून टाकण्याचा एक उद्योगच होऊन बसला होता !

पांच लक्षांची मूर्ति

किल्ल्यावर तटाच्या भिंतींत इंग्रजांना एक सोन्याची बहुमोल गणपतीची मूर्ति लपविलेली सांपडली. तिचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. ती सुमारें पाच लाख रुपये किंमतीची होती म्हणतात व दीड लाखापर्यंत तर सावकारांनीं तिला मागणीही घातली होती. पेशवे दप्तराच्या बाविसाव्या भागांत १७६६ च्या डिसेंबरांत चंदावरकर तुळजोजी राजे भोसले यांजकडून थोरल्या माधवरावाला एक सुवर्णाची गणपतीची मूर्ति भेट म्हणून आल्याची नोंद आहे. कदाचित् तीच ही वर सांगितलेली मूर्ति असण्याचा संभव आहे. पेशव्यांच्या पर्वतीवरील देवांत सोन्याची गणपतीची मूर्ति होती हें प्रसिद्धच आहे. पण पेशवाईनंतरहि, परवा चोरीस जाईपर्यंत ती पर्वतीस होती. त्यावरून सिंहगडास यावेळीं इंग्रजांना सांपडलेली मूर्ति ती नसावी. आता कदाचित् ती मूर्ति पर्वतीवरचीच, इतर धामधुमीच्या प्रसंगाप्रमाणें सिंहगडावर नेऊन ठेविली, तीच इंग्रजांना सांपडली व तीच पुढें त्यांनीं पुन्हां पर्वतीवर ठेवण्यास दिली असें कांहीं असल्यास न कळे. या बाबत हे सर्व तर्कच आहेत.

सिंहगडच्या या शेवटच्या लढाईसंबंधीं आणखी दोन गोष्टींचा उल्लेख

करणें जरूर आहे. पहिली गोष्ट म्हणजे इतिहास संशोधकांखेरीज बाकी बहुतेक सर्वत्रांना अपरिचित असलेल्या बाजीरावाच्या एका परदेशी बायको संबंधीची ! लाला मणीराम नांवाच्या एका परदेशाच्या मुलीशीं बाजीरावानें कट्यारीबरोबर लग्न लाविलें होतें. तिचें नांव राधाबाई. तिला बाजीरावापासून तीन मुलगेही झाले होते. या लेकवळ्यांकरितां बाजीराव तिला दरमहा शंभर रुपये भोजनखर्च व अवांतर सर्व खर्च देत असे. लढाईच्या वेळीं ही बाई आपली चीजवस्त घेऊन सिंहगडच्या माचीस गेली असतां तिचा सर्व विषय लुटला गेला ! असें पेशवे दप्तर भाग ४१ मधील २५२ नंबरच्या पत्रावरून दिसून येतें.

दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे दौलतराव घोरपडे या इंग्रजांच्या सैन्यांतलि मराठा सरदाराची ! या गृहस्थाने २४-१-१८३१ रोजीं कंपनी सरकारला जी यादी लिहून पाठविली तींत स्वतःच्या शिपाई-गिरीचें सर्व वृत्तच दिलें आहे. तींत तो स्पष्टपणें लिहितो—" पेशवे सरकार यानी रसद गल्ला वगैरे मदत सिंहगडास पाठविली होती. ते समयीं किल्ला इंग्रेजी फौजेशीं लढत होता. आल्पिष्टणसाहेब यांनी मेजर मक्लोटसाहेब यास व मजला हुकूम दिल्हा कीं, तुम्ही आपला रिसाला घेऊन जाऊन रसद चालली आहे ती लुट्न फडशा करून टाकणें. त्या हुकुमाप्रमाणें आम्ही जाऊन लढाई करोन रसद झाड्न लुट्न फडशा करून टाकली व किल्लाही लढाई करून घेतला ! ! "

किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यावर पुढें त्यांनीं कांहीं दिवस राजकीय कैदी तेथें ठेवण्याचा उपक्रम केला. खडकीच्या लढाईच्या आधी तळेगांव मुक्कामीं वाघण साहेबाचा खून मराठ्यांकडील लोकांनी केला होता. त्या खुनाच्या आरोपावरून बाबाजीपंत गोखले नांवाच्या इसमाला एल्फिन्स्टनने या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें. तेथें तो १८३५ सालीं वारला.

इंग्रजी अमदानी

इंग्रज अंमलांत किल्ल्यांना उत्तरोत्तर कांहींच महत्त्व राहिले नाहीं. पुरंदराप्रमाणें इंग्रजांनी तेथें आपल्या गोऱ्या सोजिरांची वसाहत केली. ती बरेच दिवस टिकून होती. आणि त्याच अवधींत किल्ल्यावरील इमारती वगैरे, राहण्याच्या सोयीकरितां मोडून तोडून टाकण्यांत आल्या असल्या पाहिजेत. तसें मानण्यास सबळ कारणेंही आहेत. उदाहरणार्थ, पुरंदरावरच तसा प्रकार घडला होता. पे. दप्तर भा. ३१ मध्यें १७६ नंबराला एक पत्र छापलें आहे. पत्र २४ मे १८३४ रोजीं पुरंदरे वगैरे पांच जणांनी इंग्रज सरकारास लिहिलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे, "या किल्ल्या च्या बाले किल्ल्यावर मारुती स्वयंभू प्राचीनचा आहे. त्यास सरकारची नेमणूकहि आहे. हाली चालती. यैसे असोन हाली साहेब लोक पुण्याहून राहावयास किल्ल्यावर आले आहेत. त्यांनीं अंबरखाने फोडून राहावयास जागा केल्या आहेत. त्यास, एक अंबरखाना मारुतीजवळ आहे. तो फोडून जागा करितात. याजकरितां नायेब जेमादार गोपाळराव जाधव यास बोलावून नेऊन सांगितलें कीं, मारुती येथून काढून टाकावा. नंतर जमादार याणी उत्तर केलें कीं, मारुतीस नेमणूक सरकारी आहे आणि पूना पुजारी करितात. त्यास, हे त्यास पुसावे. त्याणी सांगितलें कीं पुजारी पाठऊन देणे. नंतर जमादार याणी आम्हास त्याजकडे पाठऊन दिल्हे. आमचे व त्याचे बहुत प्रकारें बोलणे जाले; परंतु मानीत नाहींत. आग्रह करून देव काढू म्हणतात." याचप्रमाणें सिंहगड पडत झडत नष्टांश होत गेला असला पाहिजे. इंग्रज सोजिरांची व इतर सिव्हिलियन लोकांची हवा खाण्याची जागा असेंच पुढें त्याला स्वरूप येत गेलें, व आजहि तें थोडें निराळ्या स्वरूपांत कायम आहे.

पारतंत्र्याच्या या काळांत सिंहगडावर राष्ट्रीय महत्त्वाची अशी कोणती गोष्ट शक्य असणार ? तथापि महाराष्ट्र सुदैवी आहे. कारण या

काळांतही महाराष्ट्रीयांनीं सिंहगडाच्या दर्शनास जावें अशी एक गोष्ट तेथें आहे. ती म्हटली म्हणजे तेथील टिळकांचें निवासस्थान होय. 'सिंहगडासारख्या उत्तुंग व पवित्र ऐतिहासिक गडावरच टिळकांनीं बंगला बांधावा ही कल्पनाच किती भव्य आहे ? सरकारानें किल्ल्याच्या आवारांतल्या जागा केव्हां कोणास विकल्या वगैरे कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. पण १८८९ सालीं क्राफर्ड प्रकरणांतील कांहीं मामलेदार मंडळींसह टिळक सिंहगडावर गेले होते; त्या वेळीं तेथील भव्य सृष्टिसौंदर्य, उत्कृष्ट हवापाणी, ऐतिहासिक पार्श्वभूमि व पुण्याची समीपता इत्यादि गोष्टींमुळे त्यांनीं तेथेच घर बांधावयाचें ठरविलें व पुढें नंदाराम नाईक यांजकडून जागा खरेदी घेऊन सुमारें सात हजार रुपये खर्च करून त्यांनीं आपला बंगला बांधला अशी माहिती कळते. कै. ना. गोखल्यांच्या मृत्यूची बातमी टिळकांना सिंहगडावर कळली व ती कळतांच ते तांतडीनें पुण्यास येऊन स्मशानयात्रेंत सामील झाले, ही गोष्ट अद्याप पुष्कळांच्या स्मरणात ताजी असेल. आठ सालीं टिळकांना अटक झाल्यावर त्यांच्या पुण्यांतील वाड्याची झडती झाली त्याप्रमाणें गडावरील त्यांच्या या बंगल्याचीहि झडती घेण्यांत आली होती हीहि गोष्ट उल्लेखनीय आहे. सिंहगडावर वास्तव्य करीत असतां एका मुक्कामांत टिळकांनी एक घोरपड मिळवून तानाजीचा प्रयोग करून पाहण्याची खटपट कशी केली होती त्याची विश्वसनीय हकीकत सदाशिवराव बापटांनीं आपल्या ' आठवणींत ' दिली आहे ती सर्वांस ठाऊक असेलच !

अडीअडचणीच्यावेळीं कुटुंब कबिले ठेवण्यासाठीं या गडाचा उपयोग पेशवे करीत हें वर एकेठिकाणीं सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें राजकीय कैदी, जडजवाहीर, तहनाम्याचे कागद वगैरे बंदोबस्तानें ठेवण्याकरतांहि सिंहगडाचा उपयोग होत असे. महत्त्वाचे राजकीय कैदी सिंहगडावर ठेवल्याचे अनेक दाखले सांपडतात.

गडावरचे राजकीय कैदी

" सखाराम भगवंत राजकारणांत केवळ विधि " अशी शाहिरांनी ज्याची स्तुती गायिली आहे तो पेशवाईतील ' चाणक्य ' सखारामबापू याला या किल्ल्याची हवा पाहण्याचा योग आला होता. नानाफडणविसाने व महादजी शिंद्यानें बापूवर मात करून त्याच्या फितुराचा पत्त्यामुद्या-सुद्धां शोध लाविल्यावर त्याला कैद करून प्रथम या सिंहगडावरच नजर कैदेंत ठेविलें होतें. तें साल १७७९ होय. अर्थात् सखाराम बापू हा फारच मातबर राजकीय कैदी असल्यामुळें गतिस्वातंत्र्य रोधण्याखेरीज दुसरा कसलाच त्रास त्याला कारभाऱ्यांनी दिला नाहीं. किंबहुना घरच्या-सारखी त्याची इतमामाची व्यवस्था केली होती; ' दोन नोकर, नित्य-दानास रोजीं दहा रुपये, व्यतिपाताचे दिवशीं सव्वादोन तोळे सोन्याच्या २८ पुतळ्या दानधर्मास, उत्तम जेवण, शाकभाजी, विड्याची पानें, फार काय, दुधाकरिता गाई म्हशी, आचारी, पाणके, कामाठी, हलालखोर वगैरे सर्व सोयी करून देण्यांत आल्या होत्या ' असें गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या कानेटकरांच्या सखारामबापूचरित्रांत जें विधान केलें आहे तें पूर्णपणें खरें आहे असें पेशवा रोजनिशींतील नोंदीवरूनही दिसून येतें.

दुसऱ्या नामांकित कैद्यांत सखाराम हरी गुप्ते याचा भाऊ बाबूराव हरी व प्रसिद्ध मुत्सद्दी गोविंदराव काळे यांचीं नांवें आढळतात. बाबूराव हरीला १७७६ सालीं सिंहगडी पाठविण्यांत आलें. त्याबाबत पेशवे रोजकीर्दींत ४ आक्टोबरची नोंद सांपडते ती अशीः— " पक्क्या बंदो-बस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेवणें. चौकींस जीं माणसें ठेवाल तीं वरचेवर बदलीत जाणें. जेवणाची आबाळ न करणें. धोतरें, शेलापागोटें लागेल तें लिहून पाठविणें. ज्या कोठडींत ठेवाल तेथें कोणाचा प्रवेश होऊ न देणें. बेडी नेहमी असो देत जाणें. सारांश गोष्ट, फितुरी आहे

यांचा विश्वास न धरिता पक्क्या बंदोबस्तानें ठेवणें म्हणोन सनद एक सखो मल्हार याचे नांवे. " बाबूराव हा आपल्या भावाप्रमाणेंच मर्द, मनसुबेबाज व पक्का खेळ्या असल्यामुळें राघोबाच्या या एकनिष्ठ साहाय्य-काला कारभाऱ्यांनी अशा बंदोबस्तांत ठेवावें हें रास्तच आहे.

गोविंदराव काळ्यांना १७९८–९९ सालीं कारागृहवास घडला. नारायणराव पेशव्याचा खून करणारा सुमेरसिंग गारदी याचा मुलगा बाळाराम याला येथेंच कांहीं दिवस १७७७ सालीं कैदेंत ठेविलें होतें अशी माहिती सांपडते. सदाशिव रघुनाथ गद्रे याला तर दु. बाजीरावाने १६ वर्षे सिंहगडावर कैदेंत ठेवले होतें. याखेरीज इतर अपराधावरून शिक्षा झालेले अनेक कैदी सिंहगडावर वेळोवेळीं ठेवण्यांत येत असत. किंबहुना निर-निराळे गड हे त्या काळचे दुर्लंघ्य जेलखानेच समजले जात.

पेशव्यांचा जामदारखाना, जवाहिरखाना व तहनाम्यांचे महत्त्वाचे कागद सर्व सिंहगडावर ठेवण्यांत येत असत अशाविषयीं पुढील नोंदी पहा. पेशवे रोजनिशींत सलास सित्तैन सालीं साबान महिन्यांत (सन १७६२ सालीं) पुण्यांतील धामधुमीमुळें जामदारखाना सिंहगडीं रवाना केल्याची नोंद आहे. १०–८–१७६३ सालची म्हणजे अर्बा सित्तैन २९ मोहर-मची एक नोंद आहे. तींत गडावरील जवाहिरखान्याच्या मोजदादीस तीन कारकून पाठविल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या रोजनिशींत २८ जमादिलावल तिस्सा तिस्सैन मया व अलफ या तारखेस " किल्ले सिंह-गड जवाहिरखान्याबरोबर तहनाम्यांच्या कागदांचा पेटारा ठेविला आहे तो आणावयास बळवंतराव कृष्ण यांजकडील २५ स्वार पाठविले " अशी नोंद सांपडते.

किल्ल्याचा बंदोबस्त

समान सित्तन म्हणजे १७६७–६८ सालचा सिंहगडचा नेमणूक-

बेहडा उपलब्ध आहे. त्यावरून पुढील माहिती कळते–कायम शिपाई ३४८, भरतीचे नामजादी शिपाई ३०५, मोईनदार कारकून ४१ व कुरणे, तासकरी, दिवट्ये, गस्त्ये, किल्ल्यावर ठेवलेले कैदी, पुण्याहून आलेले आसामी वगैरे मिळून एकंदर ५९४ लोक गडावर होते. त्यांना ३८९२८ रु. पगार म्हणून खर्ची पडला.

बहुतेक सर्व अधिकाऱ्यांना तैनातीस पोरगे असत. हवालदाराला ६०९, सुभेदाराला ४५०, सबनिसाला ४३३ व ४ दप्तरदारांखेरीज बाकी सर्वांना २०० याप्रमाणें सालीना मोईन म्हणजे पगार होता. किल्ल्यावरील देवस्थानांकरितां व अनुष्ठानांकरितां १२५ रुपये, शाकारणीकरितां १२५ रुपये खर्च धरला आहे. तसेंच किल्ल्यावर इमारतींच्या कामास कायमचे लोक असत त्यांत सुतार, गवंडी, लोहार, बेलदार इत्यादिकांच्या नेमणुका दिसतात.

किल्ल्यावरील देवळें व इमारती

१७८९–९० सालचा किल्ल्याचा जो नेमणुकजाबता उपलब्ध आहे त्यावरून किल्ल्यावर कोणचीं देवस्थानें होतीं हें कळतें. हीं देवस्थानें किंवा देवळें म्हणजे एक श्रीअमृतेश्वर भैरव, दुसरें श्रीकोंडणेश्वर महादेव व तिसरें श्रीनरसिंह हीं होत. यांखेरीज किल्ल्यावरील बारकीं देवळें म्हणजे श्रीगणपती, हनुमंत, कल्याण दरवाजाजवळची श्रीमळाई, रामकड्याची श्रीभवानी, कुरणांतली धारजाई, खांदकड्याचा म्हसोबा वगैरे. खांदकडा हें विशिष्ट तऱ्हेच्या अवघड कड्याचें सामान्य नांव दिसतें. कारण पुरंदर किल्ल्याच्या जमाखर्चांतही तेथल्या खांदकडयाच्या बुरजाचा व दरवाजाचा उल्लेख सांपडतो. (भा. इ. मं. त्रैमासिक, वर्ष ९ अंक १ पहा.)

या सर्व देवळांपैकीं अमृतेश्वराचें देऊळ फार महत्त्वाचें व प्रसिद्ध होतें. इतर देवळासंबंधीं ती केव्हां बांधलीं वगैरे कांहीं माहिती कळत

नाहीं. अमृतेश्वरासंबंधी मात्र तशी थोडीशी सोय आहे. पुरंदरे दप्तर भा. ३ मध्यें अत्रे पुरंदरे यांच्या पुरातन वादासंबंधी खुद्द त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यांनीं लिहून ठेविलेली एक यादी छापली आहे. तीवरून या अमृतेश्वराच्या जागृत देवस्थानाचा तत्कालीन पद्धतीप्रमाणें न्यायनिवाड्याकरितां कसा उपयोग करून घेण्यांत येत असे तें समजतें. तसेंच यादींतील अंतर्गत पुराव्यावरून शंकराजी नारायण सचिवाच्या काळाच्याहि पूर्वीपासून हें देऊळ तेथें असलें पाहिजे असें दिसतें. यादींत पुढील माहिती आहे.

" शाहू महाराज नव्हते राज्यावर आले, बाळाजी विश्वनाथ याकडे पेशवाई नव्हती तेव्हां; राजाराम, ताराबाई व पूर्वी औरंगजेब पातशहा तुळापुरावर आले होते तेव्हां व शंकराजी नारायण सचीव होते तेव्हां आत्रे यास खोटें केलें. तपशील. सिंहगडी संकराजी नारायेण सचिव होते तेव्हां भिवाजी कासी व बापू भास्कर यांचा आपल्या आपल्यांत कजिया लागला. मग सिहगडास गांवकरी यासी संकराजी नारायेण याणी नेऊन दोघा अत्र्यांची पुरसीस करून अमृत्या देव आहे, त्याचे देवलांत घातलें आणि म्हणाले तुमचा कोण आहे तो हातीं धरून काढा. याप्रमाणें संकराजीपंतांनीं गांवकरीयांसी आज्ञा अत्र्याविसी केली. मग गांवकरी व पांढर यांनीं दोघां अत्र्यांस टाकून पुरंदरे हरभट यासी काढलें कीं हा आमचा वतनदार. " (पृ.८७.)

दर रविवारीं शेरणी, व श्रावणमासीं मासाभिषेक अमृतेश्वरास होत असे. तेथें चैत्रांत व आषाढांत जत्राहि भरत. कोंडणेश्वर महादेवाच्या देवळांत श्रावणमासीं अनुष्ठान होई. नरसिंहाच्या देवळांत आषाढमासीं समाराधना व श्रावण महिन्यांत अभिषेक होई. रामकड्याची भवानी, कल्याण दरवाजाची मळाई वगैरे ठिकाणीं दसऱ्यास बकरीं बळी दिलीं जात.

किल्ल्यावर एक रामदासी मठ होता हीहि महत्त्वाची गोष्ट आहे. त्यांतील देवापुढच्या नंदादीपाबद्दल दरमहा ॥६॥।- तेल दिलें जाई. किल्ल्यावरील देवांखेरीज आसपासच्या गांवचे देव होते त्यांनाहि किल्ल्यावरूनच खर्च पोंचे. असे देव म्हटले म्हणजे नसरापूरचा नेरसेश्वर, पाषाणचा सोमेश्वर, डोणज्याचा द्रोणेश्वरमहादेव व कोंढणपूरची भवानी देवी. नेरसेश्वरीं माघ-मासीं भागीरथी येते अशी समजूत होती म्हणून तेथील उदक जंगमाने दरसाल किल्ल्यावर घेऊन जावें असा शिरस्ता होता.

वीज पडली

रोशनाई खर्च या कलमाखाली आलेल्या नोंदीवरून किल्ल्यावर इमारती कोणच्या होत्या तें कळतें. त्या अशा—१ राजमंदिर, २ वाडा सरकार, जवाहिरखाना, ३ राजवाडा सदरेजवळील, ४ वाडा निसबत अंमलदार चौकी पहाऱ्याबद्दल, ५ वाडा पुणें, ६ बाले किल्ला, ७ कोठी दारू-खाना व अंबरखाना, ८ कल्याण दरवाजे दोन व ९ डोणज दरवाजे तीन.

१७७१ सालीं किल्ल्यावर वीज पडून तेथला दारुखाना उडाला व तट इमारतीचेंही फार नुकसान झालें. दारुखाना उडाला त्या वेळीं तेथले कारखाननीस बापूजी कमाजी कुटुंब कबिल्यासुद्धां व घरादारासुद्धां उडून गेलें अशी नोंद पेशवा रोजनिशींत आहे. १७७२ चा किल्ल्यासंबंधींचा जो अजमास पेशवे दप्तरांत छापला आहे त्यांतील एका नोंदीवरून वीज पडल्यामुळें कोणच्या इमारती नादुरुस्त झाल्या व त्यांच्या दुरुस्तीकरितां किती खर्च पडला तें कळून येतें. नोंद अशी—

८७०० इमारत खर्च किल्ले मजकुरीं वीज पडोन दारुखाना उडाला त्यामुळें जागा जागा तटबंदी वगैरे इमारत जाया झाली ते वगैरे नीट करणें तपसील कामें. (१) नारसिंहाचें देऊळ (२) गणपतीचें देऊळ (३) इस्तादकोठीचें घर (४) डोणज दरवाजाची डागडुजी व दरवाजावरील

बंगला व दोन अलंगा (५) दारूखाना (६) अंबरखाना (७) सदरे पुढील बंगला (८) थोरली सदर जाया झाली ते (९) तटानजीकच्या दोन अलंगा (१०) डोणज दरवाज्यानजीकची तटबंदी जाया जाली ती (११) टाक्यांचीं तोंडें फुटलीं तीं (१२) भातखळ्याची कोठी.

पेशवे दप्तरांत छापलेल्या चारी तपशीलवार जमाखर्ची कागदांत देवस्थानांपैकीं राजाराम महाराजांच्या समाधीचा उल्लेख नाहीं, याचें कारण तिची सर्व व्यवस्था स्वतंत्रपणें छत्रपतींकडून होत असे. तानाजीची समाधी कोणीच केव्हां बांधली नव्हती म्हणून तिचाहि समावेश देवस्थानांत कोठेंहि सांपडत नाहीं.

राजाराम छत्री

सध्या गडावर शिल्लक राहिलेल्या पूज्य ऐतिहासिक स्थळांत एकच गोष्ट दर्शनीय आहे. ती म्हणजे राजाराम महाराजांची समाधि. राजाराम साहेब वारल्यावर त्यांचें उत्तरकार्य जिवाजी राजे भोसळे वावीकर यांचेकडून रामचंद्रपंत अमात्यांनीं करविलें; कारण मृत्यूसमयीं महाराजांच्या बायका व दोन मुलें कोणीच सिंहगडावर नव्हती. शिवाजी महाराज यांच्या देव्हाऱ्यांत नित्यपूजेचा एक बाण होता. ते तो कधींही विसंबत नसत. तोच बाण राजारामं छत्रपति स्वतःजवळ बाळगूं लागले होते. त्यांच्या मृत्यूनंतर दहन विधीच्या जागीं त्याच बाणाची स्थापना करून त्यावर रामचंद्र पंताने छत्री बांधून सरकारांतून खर्चाचा तनखा ठरवून दिला अशी माहिती सरदेसायांच्या नव्या राजारामचरित्रांत दिली आहे.

अन्य अप्रसिद्ध साधनांत आम्हांस या छत्रीसंबंधी नवीन अधिक माहिती शोध करतां मिळाली ती अशी—राजाराममहाराजांच्या या वृंदावनाची पूजा करण्याबद्दल मोरेश्वर भट बिन नीळकंठभट पलुस्कर नामक

ऋग्वेदी ब्राह्मणाची योजना ताराबाईनें केली व त्या कामाकरितां आगळंबे गांवांत त्याला वंशपरंपरा दोनशें रुपये तैनात दिली. आगळंबे हा गांव पुणें परगण्यांत तर्फ हवेलींत मोडत असे. हा गांव पायगुड्यांच्या पाटिलकीचा. साराच गांव वृंदावनाकडे लावून देण्यांत आला होता. त्याची देखरेख आनंदराव विश्वनाथ लेले व कमाविस बाबुराव रामचंद्र शिरगोपीकर ऊर्फ सदावर्ती यांजकडे सोपविण्यांत आली होती. सरदेसायांच्या हकीकतींत बाणाच्या स्थापनेचा जो मजकूर आहे तो थोडासा चुकला आहे. कारण त्या बाणाची स्थापना रामचंद्रपंतानें केली नाहीं. ताराबाईनें केली.

वृंदावनांत एकंदर देव तीन. १ भवानी, १ बाण व १ श्रीबाण. यांपैकीं श्रीबाण हा फार मोठा असून तेजस्वी आहे. त्याला चंद्रकांत मण्याप्रमाणें पाझर फुटतो, म्हणजे तो बाण हातांत धरला असतां हात ओला होतो अशी दंतकथा सांगतात. याच दंतकथेचें प्रत्यंतर पहाण्याकरितां म्हणून असो किंवा अन्य कांहीं कारणामुळें असो हा अपूर्व बाण गडावरून पेशव्यांनी कांहीं दिवस पुण्यास नेला होता येवढी गोष्ट मात्र खरी आहे. वाडकृत पेशव्याची रोजनिशी व्हॉल्यूम १ पान ३५ वर जनार्दन आप्पाजीच्या कीर्दीपैकीं तिस्सा आर्बैन मया व अलफ ३ रबिलाखर म्हणजे १२–३–१७४९ तारखेच्या कीर्दींत पुढील नोंद आढळते. " श्रीमंत महाराज कैलासवासी राजारामसाहेब यांची समाधि सिंहगडीं आहे. तिजवरील बाण पूर्वी सरकारांत आणला होता तो हल्लीं तुम्हाकडे पाठविला आहे. तरी पूर्ववतप्रमाणें बाण समाधीवर ठेवणें म्हणोन नारो महादेव याचे नांवें सनद १ "

वृंदावनाची व्यवस्था पेशवाई अखेरपर्यंत व्यवस्थित चालू होती यांत शंका नाहीं. पेशवाईनंतर मात्र बरेच दिवसपर्यंत आबाळ झाली असावीसें दिसतें. त्यानंतर १८५१ सालीं फिरून छत्रीच्या संस्थानाची

नीट व्यवस्था लाऊन देण्यांत आली. त्याच्या कलमबंदीचा एक महत्वाचा कागद पुणें भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दप्तरीं आहे. त्याची सुरुवात अशी आहे. " यादी संस्थान कैलासवासी राजाराम महाराज यांचें वृंदावन किल्ले सिंहगड येथें आहे. त्या वृंदावनांत महाराजांच्या पादुका व श्रीबाण आहे. तेथील पुजारी वगैरे कामदार याणी नित्यकृत्य वगैरे वहिवाट करावयाची त्याविशी बंदोबस्ताची कलमें सुहुर सन इहिद्दे खमसैन मयातेन व अलफ सन १२६० ता. १ मे सन १८५१ इसवी." एकंदर पंधरा कलमें आहेत. त्यांत पुजाऱ्यांनी कोणच्या क्रमाने कशी पूजा करावी, देवाच्या अभिषेकाचें पाणी ज्या टाक्याचें न्यावयाचें त्याची स्वच्छता कशी राखावी, देवाच्या फुलांकरितां केलेल्या बगीच्यावरील माळ्याने काय दक्षता घ्यावी, उत्सवाच्या वेळीं मंडपाची व्यवस्था कोणी कशी करावी वगैरे फार तपशीलवार व बारकाव्याची माहिती मिळते. ती सर्व येथें उतरून घेण्याचें कारण नाहीं. पुजाऱ्यासंबंधीं इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, दोन पुजारी वृंदावनाकडे नेमले होते. एक पूर्वापार चालत आलेला पलुस्कर व दुसरा ढमढेरा या नांवाचा. यांपैकीं ढमढेरा ब्राह्मण नसावा. गुरव असावा असें वाटतें. कारण नवव्या कलमांत ढमढेरे पुजारी व ब्राह्मण पुजारी असा भेद केलेला आहे.

तानाजीसंबंधीं नवी माहिती

अगदीं इतिहास न जाणणारा खेडवळ मराठा घेतला तरी सुद्धां त्याला तानाजीनें घोरपड लावून किल्ला जिंकला ही हकीकत कर्णोपकर्णी तरी माहीत असते. तथापि त्या प्रसंगासंबंधी किंवा तानाजीच्या इतर चरित्रासंबंधीं समकालीन विश्वसनीय कागदपत्राचें एकहि चिठोरें मिळूं शकत नाहीं. त्याच्यासंबंधी जे उल्लेख सांपडतात ते म्हटले म्हणजे जेधे शकावली, शिवापूरकर शकावली व मराठी दप्तर रुमाल १ मध्यें छापलेल्या शेडगांवकर बखरींतला उतारा हे होत. जेधे शकावलीं-

तील नोंदं अवघी दोन ओळींची आहे. पण ती अर्थात् विश्वसनीय होय. ती अशी — " माघ वॊ॥ ९ नवमी सुक्रवार कोंढाणा घेतला. उदेभान किल्लेदार मारिला. तानाजी मालुसरा राजश्रीकडील हशामाचा सुभेदार पडिला. " शिवापूरकर शकावलींतील नोंद जेधे शकावलीच्यापेक्षां दुप्पट मोठी म्हणजे चार ओळींची आहे. त्यांपैकीं पहिल्या दोन ओळी म्हणजे थेट जेधेशकावलीच्या नोंदीची नक्कलच वाटते. फक्त कोंढाणा या नांवाऐवजीं मोढावर्त असें नांव घातलें आहे. मोढावर्त ही मोडी वाचनाची चूक आहे असें स्पष्ट दिसतें. मोडी वाचनांत को बद्दल मो वाचणें शक्य आहे. तसेंच वर्त हा शब्द नक्कलकारानें "णा" या मोडी अक्षराचें चुकीचें वाचन करून तसा उतरून घेतला असला पाहिजे. पुढील दोन ओळींत तानाजी मालुसऱ्याबरोबर जेध्याकडील लोक निवड करून देण्यांत आले होते अशी थोडी अधिक माहिती आहे. पण या माहितीला समकालीन म्हणून मानल्या जाणाऱ्या पोवाड्यांत प्रत्यंतर मिळत नाहीं. कारण ११व्या चौकांत तानाजीने सिंहगडाच्या कामगिरीकरितां जे जिवास जीव देणारे लढवय्ये लोक मुद्दाम बोलाविले त्यांत दसपटीचे मोकाशी (बडोद्याच्या जनरल नानासाहेब शिंद्यांचे पूर्वज) उमराठ्याचे शिरके, नांदवीचे सावंत, वडघरचे नाईक, सीलमचे ठाकूर, देशमूख पालांडे इतकींच मोठीं नांवें दिलीं आहेत. समकालीन किंवा जवळ जवळ समकालीन असे महत्त्वाचे हे दोनच शकावल्यांतील आधार. तिसरा आधार म्हणजे शेडगांवकरांची बखर. ती समकालीन नाहीं. आणि तितकी विश्वसनीयहि नाहीं. समकालीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तानाजीच्या पोवाड्यावरून बखरकाराने मुख्यतः आपली माहिती सजविली असण्याचा संभव आहे. त्या हकीकतींत तानाजी, त्याचा भाऊ सूर्याजी, उदयभान रजपूत यांचीं नांवें आलीं आहेत. 'गड कड्यावरून वानरन्याये चढून तेथून माळ लाविली' असेंहि म्हटलें आहे. पण घोरपडीचा उल्लेख नाहीं.

तानाजीचा पराक्रम

ऐतिहासिक समकालीन व सर्वतोपरी विश्वसनीय साधनसामुग्रींत तानाजीची अधिक माहिती देणारें साधन म्हणजे शिवभारत होय. आज वर सिंहगड जिंकण्याखेरीज त्याची दुसरी कोणतीच कामगिरी माहीत नव्हती. ती शिवभारतानें सांगितली आहे. अफझलखानाला शिवाजी-महाराजांनी मारल्याबरोबर नगाऱ्याची इशारत करण्यांत आली. त्याबरोबर निरनिराळ्या जागीं एकएक हजार पायदळ घेऊन जे पांच मराठे हशमांचे सरदार अफझलखानाच्या सैन्यावर संकेताप्रमाणे तुटून पडले, त्यांत तानाजी मालुसरे होता असें शिवभारतकारानें म्हटलें आहे. हे पांच मराठे सरदार म्हणजे कमळोजी सोळंखे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल व रामजी पांगारकर. या वरील पांच मराठे सरदारां-बरोबरच दुसऱ्या एका नारोपंत नामक ब्राह्मण सरदाराचेंहि नांव आहे. तो तर पांच हजार पायदळाचा सरदार होता. असो.

शिवभारतकारानें २९ व्या अध्यायांत शिवाजीची दाभोळ, पाली, प्रभानवल्ली, शृंगारपूर, चिपळूण, संगमेश्वरची स्वारी वर्णिली आहे त्यांत शिवाजीबरोबर " पायदळाचा अधिपति योद्धा तानाजी मालुसरे " होता असें सांगितलें आहे. तिसाव्या अध्यायांत भारतकारानें शृंगारपूरचा राजा सूर्याजीराव याशीं झालेल्या शिवाजीच्या लढाईत तानाजीचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. संगमेश्वरास पायदळ घेऊन मुक्कामास असतां सूर्याजी-रावानें त्यांच्यावर छापा घातला त्या वेळीं नीळकंठराव याचा पुत्र पिलाजी भेदरून जाऊन पळूं लागला. तेव्हां तानाजीनेच त्याला स्वतः धिःक्कारून जबरदस्तीनें थांबविलें. मी तुझी कुमक करतो असें म्हणून त्याने पिलाजीस आपल्या देखत एका दगडास बांधून घातलें व रात्रभर शत्रूशीं लढाई केली. ही लढाई सकाळपर्यंत चालली व अखेर शृंगारपूरकर पळून गेले.

मग दुसऱ्या दिवशीं राजापुराहून परत येणाऱ्या शिवाजीस तानाजी सामोरा गेला व मग शिवाजीने त्याचा बहुमान केला.

हे आधार सोडले तर तानाजीसंबंधीं महत्त्वाची माहिती उपलब्ध करणारे गृहस्थ म्हणजे सुप्रसिद्ध ऑकवर्थ साहेब होत. त्यांनीं १८९४ सालीं पुण्याचे कलेक्टर व भोरचे पोलिटिकल एजंट पोर्चससाहेब व कुलाबा जिल्ह्याचे ॲ. कलेक्टर डयुबोलेसाहेब यांच्यामार्फत साक्षेपाने माहिती मिळविली ती महत्त्वाची आहे. ती अशी:—

" उमराठ हें लहान खेडें महाड तालुक्यांत घुसलेल्या चंद्रगड व प्रतापगड या दोन किल्ल्यांमधील सह्याद्रीच्या एका फाट्याच्या पायथ्याशीं आहे. त्या भागांत डोंगरी कोळ्यांनीं दंगा करण्यास व दरवडे घालण्यास सुरुवात केल्यामुळें त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम शिवाजीनें तानाजीवर सोपविलें. वास्तविक तो पांचगणी खालच्या गोडवली गांवचा राहणारा. त्याच्याकडे कोंडवी पेठ्याची सुभेदारी होती. सध्याच्या महाड तालुक्याचा आग्नेय दिशेचा भाग या पेठ्यांत मोडत असे. कोळ्यांच्या बंदोबस्तप्रकरणीं तानाजीबरोबरीनें येसाजी कंकाचीही नेमणूक झाली होती. तानाजीची बहीण किंवा मुलगी कोणीतरी उमराठ्यांत दिलेली होती म्हणून तानाजी उमराठ्यास जाऊन राहिला.

अशी एक आख्यायिका सांगतात कीं ज्या वाण्याउदम्यांना डोंगरी कोळ्यांकडून फार उपद्रव पोचत असे त्यांपैकीं एकाने तानाजीच्या सांगण्या-वरून त्या कोळ्यांशी एक करार केला. तो असा कीं, दरसाल कांहीं खंडणी कोळ्यांना द्यावी व दरसाल एक दिवस कोळ्यांच्या जमातींपैकीं एकाला पुरणपोळीचें जेवण घालावें व त्याच्या बदल्यांत त्या वाण्याच्या दुकानाला कोळ्यांनी उपसर्ग देऊ नये. बरेच दिवस हा उपक्रम चालला. पुढें तानाजीनें त्या वाण्याशीं खलबत करून एक दिवस सर्वच डोंगरी

कोळ्यांना झाडून जेवावयास बोलाविलें व त्यांच्या अन्नांत विष घातलें. त्या विषप्रलयानंतर फारच थोडे कोळी जगले.

ही ऑकवर्थ साहेबांनी दिलेली माहिती भयंकर वाटते म्हणून तिला कागदपत्रांचें प्रत्यंतर सांपडतें किंवा नाहीं हें पाहण्याची खटपट संशोधकांनीं करणें जरूर आहे.

तानाजीच्या वंशजांसंबंधीं ऐतिहासिक कागदपत्रांत कांहींच माहिती सांपडत नाहीं. जी काय थोडीशी माहिती मिळते ती पोवाड्यावरूनच. ती थोडक्यांत अशी—तानाजीच्या मुलाचें नांव रायबा. तानाजीच्या मृत्यूच्या १२ व्या दिवशीं रायबाचें लग्न कडाशीच्या दरेकरांच्या मुलीशीं शिवाजीने लावून दिलें. पहिली नवरी तानाजीच्या मृत्यूमुळें अपशकुनी ठरल्यामुळें रद्द करण्यांत आली. शिवाजीने रायबाला डोणजें गांव व 'मालसऱ्याचा दंड' पानसुपारीला इनाम म्हणून दिला. पूर्वी एका प्रसंगानिमित्त आम्ही स्वतः मालसऱ्याच्या दंडासंबंधी कोंकणांत चौकशी केली होती. त्याला उत्तर आलें होते तें पुढीलप्रमाणें—

"वाकी गांवच्या वरच्या डोंगरावर मालुसऱ्याचा दंड आहे. डोंगरावर दोन्ही बाजूला पाणलोट असून वरून जाण्यायेण्याला वाट आहे. त्यासच वरील नांव आहे. अगदीं जवळचा मोठा गांव वाकी व दंडावर वस्ती कोळी लोकांची. आसपास मालुसऱ्याचे वंशज आहेत."

* पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ति

दोन वर्षांखालीं पर्वतीच्या इतिहासप्रसिद्ध देवळांतून तेथल्या सोन्याच्या मूर्तीची चोरी झाली. त्या वेळीं साहजिकच मोठी खळबळ उडाली. पण त्यानंतर पुढें चोरीचा कांहींच पत्तामुद्दा न लागल्यामुळें काळाच्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून लोक ती गोष्ट जवळजवळ विसरूनही गेले होते. अलीकडे पुनः गेल्या एकदोन आठवड्यांत मूर्तीची चोरी मुद्देमालासह सांपडल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांतून प्रकट होऊं लागल्यामुळें लोकांचें स्मरण पुनरपि पल्लवित झालें आहे. पर्वतीवरील या मूर्ति सोन्याच्या असल्यामुळें त्यासंबंधीं कौतुक साहजिकच अधिक असणार; पण सुवर्णाला सुवासही सुटावा त्याप्रमाणें ऐतिहासिक महत्त्वही त्याना

* केसरी, १४ डिसेंबर, १९३४

लाभलेलें आहे. म्हणून त्याविषयीं कौतुकाइतकाच अभिमानही कोणास वाटल्यास तें योग्यच होय. भरीव सोन्याच्या मूर्ति असलेलीं देवस्थानें क्वचितच. यामुळें खुद्द पेशवाईतही या मूर्तींचा गौरव लोकांना फार वाटे. सुप्रसिद्ध रामजोशानें पुणेंवर्णनाचा पोवाडा केला. त्यांत पर्वतीचें वैशिष्ट्य वर्णन करतांना " पूजिती उमामहेश्वर जोडा । पीतवर्ण सोन्याच्या मूर्ती नव्हे या बाडा (थापा) । पहाऱ्यास शिपाई उभे पेटवुनि तोडा । " असें अभिमानानें म्हटलें आहे. म्हणजे तेव्हांच्या वैभवांत नांदत असूनही लोकांना या मूर्तींची अपूर्वाई वाटे. मग सध्याच्या आपल्या या हीन अवस्थेंत त्या कौतुकाला अभिमानाचेंहि स्वरूप आलें तर तें क्षम्यच होय. म्हणून या मूर्तींचा मनोरंजक इतिहास मुद्दाम सर्व प्रसिद्ध व अप्रसिद्ध साधनें पाहून त्यावरून पुढें देत आहों.

कांहीं दंतकथा

अशी एक दंतकथा रूढ आहे कीं नानासाहेब पेशव्यानें पर्वतीचें देऊळ बांधून शाहूमहाराजांचें स्मारक केलें ! शाहूमहाराज हे शिवाचा अवतार समजले जात असल्यामुळें त्यानें त्यांच्या नांवानें तेथें सांबाची स्थापना केली. रा. गायकवाड यांच्या जुन्या पुणेंवर्णनांत हीच आख्याइका गृहीत धरली आहे. या आख्याइकेप्रमाणेंच दुसरीहि एक आख्याइका क्वचित् लिहिलेली व सांगितलेली आढळते कीं, पर्वतीच्या देवळांत पेशव्यांनीं स्थापन केलेल्या गणपती व पार्वतीच्या सोन्याच्या मूर्ति या मूळ सातारकर छत्रपतींच्या होत्या. त्यांना त्या तंजावरकर भोसल्यांकडून मिळाल्या व पेशव्यांनीं त्या शाहूमहाराजांकडून मागून घेऊन पर्वतीवर स्थापल्या. पण या दोन्ही आख्यायिकांना कागदपत्रांचा यत्किंचितही पुरावा नाहीं. किंबहुना आहे तो सर्वस्वी विरुद्ध जाणारा आहे.

१७४९ सालीं शाहूच्या मृत्यूच्या सुमारास पर्वतीवरील देवताची

स्थापना झाल्यामुळें व नानासाहेबानें शाहूमहाराजांच्या खडावा किंवा पादुका आणून आपल्या देव्हाऱ्यांत पूजेस ठेविल्याची तिसरी एक दंतकथा भरींत भर घालणारी असल्यामुळें गैरसमज दृढ झाला आहे. पर्वतीच्या टेकडीवर देऊळ बांधण्याची कल्पना शाहूच्या मृत्यूपूर्वींच पुष्कळ वर्षें आधींपासून पेशव्यांच्या मनांत घोळत होती. यासंबंधीं निर्णायक पुराव्याची एक नोंद पेशवे दप्तरांत पर्वतीसंबंधाच्या स्वतंत्र जमाखर्चांत सांपडते. तीवरून वसई जिंकल्यानंतर १७३९ या सालांतच पेशव्यांनीं पर्वतीवर बसवावयाची रुप्याची सदाशिवाची मूर्ति कारागिराकडून घडविण्यास सुरुवात केली होती असें उघड दिसतें. नोंद अशीः—

" पर्वतीरुमाल आर्बैन घडणी "

" १ सदाशिवाची मुहूर्त तयार करण्याकरितां अन्तु सोनार व जकाप्पा सोनार हे कामावर लाविले. " मूर्त सदाशिवाची आहे व ती घडविण्यास दोन सोनार लाविले आहेत, त्याअर्थी पेशव्यांनीं पुढें १७४९ सालीं पर्वतीवर स्थापन केली ती शिवाची रुप्याची मूर्तच ही असली पाहिजे. अर्थात् पेशवे हे स्वतःच्या प्रेरणेनें व भक्तीनेंच पर्वतीवर शिवालय बांधूं इच्छित होते. शाहूचा वगैरे त्यांत कांहीं एक संबंध येत नाहीं.

बाजीरावाची बायको काशीबाई पायाच्या कांहीं एका दुखण्यानें नेहमी बरीच आजारी असे. ती तिची व्यथा पर्वतीवरील पुरातन देवतेला नवस केल्यामुळें नाहींशी झाली. म्हणून तिचा नवस फेडण्याकरितां मातृभक्त नानासाहेबानें पर्वतीची स्थापना केली अशीहि आख्याइका प्रसिद्ध आहे. काशीबाईला पायाचें कांहीं तरी दुखणें होतें ही गोष्ट खरी आहे. कारण अलीकडे छापलेल्या पेशवे दप्तराच्या भागांतून व पेशवे रोजकीर्दींतून तन्निमित्त औषधोपचारासाठीं रकमा खर्ची पडलेल्या सांपडतात. पण तिच्या नवसाकरितांच पर्वतीचें देऊळ बांधलें असा मात्र कोठें पुरावा

नाहीं; तथापि आख्यायिकाच ग्राह्य धरावयाची तर शाहूमहाराजांपेक्षां काशीबाईच्या नवसाचें कारण लावणें अधिक संभवनीय ठरेल.

तंजावरची आख्याइका

राहतां राहिली तंजावरकर भोसल्यांची आख्यायिका. वास्तविक तिला मुळांत कांहीं एक आधार नाहीं; परंतु ती तशी कां प्रसृत झाली असावी हें मात्र सांगतां येईल. पेशवे दप्तर भाग बावीसमध्यें पेशवे रोजकीर्दीतले शेकडों उतारे छापले आहेत. त्यांत थोरल्या माधवराव साहेबांच्या कारकीर्दीतील १७–१०–१७६६ या तारखेस पुढील नोंद सांपडते—

" छ. १२ जमादिलावल तुळजाजी राजे चंदावरकर यांचेकडून सुवर्णाची गणपतीची मूर्ति घेऊन माणसें आलीं. त्यांस (बक्षिस) १४० रुपये दिले. "

अर्थात् माधवराव पेशव्यांच्या नंतरच्या लोकांनीं या गोष्टीच्या आधारावर पर्वतीवरील गणपतीची सोन्याची मूर्ति तंजावरकर भोसल्यांकडून त्यांचे भाऊ शाहूमहाराज यांजकडे आली व त्यांनी ती पेशव्यांस दिली, अशी परंपरा रचणें साहजिकच आहे ! पण वास्तविक स्थिति अशी आहे कीं १७४९ सालीं ज्या वेळीं देवदेवेश्वराची स्थापना झाली, त्याच वेळीं गणपतीच्या सुवर्ण मूर्तीची स्थापना झाली होती. यासंबंधीं वाडांच्या पेशवे रोजकीर्दीत व राजवाड्यांच्या दुसऱ्या खंडांत छापलेल्या शकावलींत तपशीलवार व विश्वसनीय नोंदी आहेत.

वाडकृत पेशवा रोजनिशींत बाळाजी बाजीरावाच्या २ ऱ्या भागांत पान २१४ वर देवदेवेश्वराच्या स्थापनेची जी नोंद घेतली आहे ती अशी—
" तिस्सा आर्बैन मया व अलफ ४ जमादिलावल खर्च पोतापैकीं धर्मादाय मु॥ पर्वती येथें श्रीदेवाच्या स्थापना केल्या. (१) श्रीदेवदेवेश्वर (१) रुप्याची महादेवाची मूर्ति व सुवर्णाची मूर्ति मांडीवर १ उजवे मांडीवर

गणपति व १ डावे मांडीवर पार्वती = २. १ श्रीपाषाणाचा गणपति, १ श्रीपर्वताई भवानीची अर्चा केली एकूण चार. सदरप्रमाणें देवस्थापना करण्यास छ. २९ जमादिलाखरपासून छ ३ जमादिलावलपर्यंत खर्च ५२२२॥ रुपये व छ ४ जमादिलावल रोजीं खर्च ३७९७॥ रुपये झाला. ”

या नोंदींत वाडांच्या नकलकारानें हस्तदोषानें २९ रबिलाखरऐवजीं २९ जमादिलाखर लिहिलें तें उघडच चूक आहे. कारण जमादिलावल महिना जमादिलाखरच्या अगोदर येतो. नाहीं तर २९ जमादिलाखर रोजीं म्हणजे ६ मेला सुरू झालेलें काम २ जमादिलावलला म्हणजे १० एप्रिलला पुरें झालें असें होईल !

पर्वती संस्थानाचे एक ट्रस्टी व इतिहाससंशोधक श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांनी स्वतंत्रपणें पेशवे दप्तरांतून ज्या पर्वतीविषयक नोंदी पेशवा रोजकीर्दींतून वगैरे उतरून आणिल्या आहेत त्यांत स्थापनेची नोंद अशी— “ तिस्सा अरबैन छ. २९ रबिलाखर—६६ देवस्थापना पर्वतीस केली, श्रीगणपती व बाणाची. छ ४ जमादिलावल खर्च पोतापैकीं ३९७७॥ रुपये धर्मादाय श्रीदेवदेवेश्वरस्थापना केली त्या समयीं भोजनदक्षिणा. ”

कै० रा० ब० पारसनीस यांच्या ‘ पूना इन बायगॉन डेज ’ या पुस्तकांत पर्वतीच्या देवदेवेश्वराची माहिती ‘ ऑफिशियल ’ किंवा ‘ स्टेट रेकॉर्डस् ’ वरून म्हणजेच पेशवे दप्तरांतील पेशवारोजकीर्दीवरून दिली आहे. त्यांत ७ एप्रिलपासून होमहवनादि धार्मिक विधि व ब्राह्मणभोजनें १० एप्रिलपर्यंत चालून ११ व्या तारखेस स्थापना झाली; समाराधनांचा खर्च ४३२० रुपये आला असें म्हटलें आहे.

राजवाड्यांची चुकीची नोंद

राजवाडे खंड २ मध्यें छापलेली शकावलि ही मूळ पेशवेदप्तरांत

असलेल्या एका शकावलीचीच नक्कल आहे. परंतु ती अत्यंत अशुद्ध व निष्काळजीपणानें छापल्यामुळें तीमधील नोंदीचा उपयोग करतांना फार बारकावा व चौकशी करावी लागते, ही संशोधकांच्या परिचयाची गोष्ट आहे. देवदेवेश्वरासंबंधीं नोंद तपासतां तोच अनुभव आला. राजवाड्यांनी नोंद देतांना मुसलमानी तारखांच्या पुढें कंसांत इंग्रजी चुकीच्या तारखा देऊन घोटाळा केला. त्यांची नोंद अशी– " छ. २४ जमादिलावल (१ मे १७४९) देवदेवेश्वर पर्वती याची स्थापना झाली. पर्वताई भवानी पूर्वीचीच पाषाणाची स्थापिली. गणपति व महादेव रुप्याचा व पार्वती सोन्याची व बाण देवदेवेश्वर छ. २९ रबिलाखर (७ एप्रिल १७४९) छ. ६ जमादिलावल (६ मे १७४९) पर्यंत वैशाख मासीं स्थापना झाली. " या नोंदींत सुरुवातीस २४ जमादिलावलऐवजीं ४ जमादिलावल पाहिजे. १ मे १७४९ ऐवजीं ११ एप्रिल १७४९ पाहिजे. ६ मे १७४९ ऐवजीं १३ एप्रिल १७४९ पाहिजे. इतक्या चुका दुरुस्त केल्यावरच या नोंदीचा पडताळा इतर नोंदींशीं जुळतो. तथापि या नोंदींत गणपति व महादेव रुप्याचा म्हटलें आहे. पण ही चूकहि निष्काळजीपणाचीच दिसते. स्थापनेच्या वेळीं गणपति व पार्वती यांच्या मूर्ती सोन्याच्याच होत्या, हें इतर सर्व साधनग्रंथांवरून सिद्ध आहे.

मूर्ति केव्हां बसविल्या ?

श्री. डिकेकृत पर्वती संस्थानच्या अधिकृत वर्णनांत तर निराळीच चूक दृष्टीस पडते. त्यांनी मुसलमानी साल शक वगैरे बरोबर दिले आहेत; पण इंग्रजी तारीख मात्र १० एप्रिलऐवजी २३ एप्रिल अशी भलतीच दिली आहे.

असो. या एकंदर विवेचनावरून पर्वतीवरील देवांची स्थापना ७

एप्रिल १७४९ पासून ११ एप्रिल १७४९ पर्यंत केव्हां तरी झाली येवढें निश्चित होतें. पारसनीस समाराधनांचा खर्च ४३२० रुपये देतात. मुजुमदार ३९७७॥ रु. देतात. वाड ३७९७॥ रु. देतात. वाडांच्या नकलकाराने ३९७७॥ ऐवजीं हस्तदोषाने वा निष्काळजीपणाने ३७९७॥ रु. लिहिले असें मुजुमदारांच्या अलीकडे घेतलेल्या ताज्या टिपणावरून म्हणावें लागतें.

एकंदर तीन देवता मौल्यवान धातूच्या. त्यांचीं वजनें मूळ पेशव्यांच्या डायरींत नमूद नाहींत. एरवीं तीं वाडांनी किंवा मुजुमदारांनी उतरून घेतलींच असतीं. सर्वच साधनांनीं जीं वजनें किंवा किंमती दिल्या आहेत त्या स्वतंत्रपणें चौकशी करून दिल्या असाव्या. सदाशिवाच्या रुप्याच्या मूर्तीचें वजन फक्त गायकवाड डिके देतात. डिके ६७३४॥ तोळे म्हणतात, व गायकवाड २ मण म्हणजे ८० शेर म्हणतात. सोन्याचांदीचा शेर २४ तोळ्यांचा धरला तर २ मणांचे १९२० तोळे होतील. म्हणजे ४८१४॥ तोळ्यांचा पुनः फरक पडतो ! गणपतीच्या व पार्वतीच्या मूर्तीचें वजन पारसनीस अनुक्रमें ६८६ व १२४५ तोळे देतात. डिके आपल्या वर्णनांत अनुक्रमें ६८६॥।= व १२४५॥।० देतात. गायकवाड अनुक्रमें ९०० व ११०० देतात. यांपैकीं गायकवाडांची माहिती मोघम व बरीचशी ऐकीव गोष्टींवरून लिहिलेली असल्यामुळें ती संपूर्ण ग्राह्य नाहीं. बाकी दोघांची बरोबर आहे.

मूर्तीचें वर्णन

पार्वतीच्या व गणपतीच्या सोन्याच्या मूर्तीचें तपशीलवार वर्णन पर्वतीवर्णनांत दिलें आहे तें असें—

" पार्वतीचे मूर्तीस सर्व दागिने अंगचेच कोरले आहेत. दोन डोळ्यांत दोन माणकें असून कपाळावर कुंकवाच्या ठिकाणीं एक वाटोळें

माणिक बसविलेलें आहे. डोक्यांत राख ; असून गोंडेबोरांची वेणी घातलेली आहे. गोंडेबोरांत प्रथमतः नागाच्या फण्या काढल्या आहेत, व त्यांचेखाली सुंदर गोंडे खोदलेले आहेत. डोक्यांत चंद्र व सूर्य या दागिन्याबद्दल दोन चमकदार हिरे बसविलेले आहेत. दंडांत वेळा व वाकी काढल्या असून हातांत जवे व तोडे काढले आहेत. उजवे हातांत कमलपुष्प असून डावे हातावर महादेवाची पिंडी घेतली आहे. कमरेंत कमरपट्टा असून खाली पाटाव नेसून त्याच्या पायघोळ निऱ्या सोडल्या आहेत. पायांत वाळे व तोडे काढिले असून पायाचे प्रत्येक बोटावर एक एक अशीं अंगुलीभूषणें काढिलीं आहेत. कानांत कर्णफुलें असून त्यांत एक एक हिरा बसविलेला आहे. गळ्यांत कंठा असून माणकांचें मंगळसूत्र आहे. गणपतीचें बालस्वरूप आहे. गळ्यांत कंठी व यज्ञोपवीत खोदलें आहे. बाहूवर बाहुभूषणें व वाकी आहेत. हातांत कमलपुष्प व बोटांत अंगठी, सल्लेजोडवी असे आहेत. नाभीचे ठिकाणीं उत्तम नाग असून कटिप्रदेशीं कमरपट्टा आहे. पायघोळ पीतांबर नेसविला असून पायांत साखळ्या व घागऱ्या आहेत. गंडस्थळाचे मध्यभागीं पिंपळपान खोदलें आहे. हातापायांचीं बोटें, नखें, केस वगैरे फारच व्यक्त दाखविले आहेत. ”

१७४९ मध्यें देऊळ बांधलें

सध्याचें देवदेवेश्वराचें देऊळ, इमारत, प्राकार वगैरे सन १७४९ सालीं मूर्ति स्थापन होण्याच्या अगोदरच बांधून तयार झालीं होतीं. गायकवाडांच्या पुणें वर्णनांत या सालानंतर देवळाच्या बांधणीचें काम सुरू होऊन सहा वर्षांनी पर्ण झालें असें म्हटलें आहे. परंतु मुजुमदारांच्या संग्रहीं असलेल्या विश्वसनीय नोंदी चाळून पाहतां १७४९ सालानंतर पर्वतीच्या देवळाच्या इमारतीकरितां खर्च

झालेला आढळला नाहीं. त्या सालानंतर तसा खर्च पडला असता तर तो श्री. वाडांच्या व मुजुमदारांच्या नजरेंतून खचित चुकता ना. अर्थात् सदाशिवाची रुप्याची मूर्ति घडविण्याचें काम सुरू झालें त्यानंतर एकदोन वर्षांतच म्हणजे १७४२ किंवा ४३ सालापासून बांधकाम सुरू होऊन १७४९ सालापर्यंत पुरें झालें असावें.

सोन्याचे देव सिंहगडावर

देव पाषाणाचे असतात तोंपर्यंत त्यांना कसलीच भीति नसते. पण ते श्रीमंत झाले म्हणजे त्यांनाहि चोरांची आणि दरवडेखोराची भीति उत्पन्न होते. पर्वतीवरील सोन्याच्या या मौल्यवान मूर्तींना पेशवे फार जपत व संकटकालीं आपल्या जवाहिरखान्याबरोबर त्यांनाहि सिंहगडावर बंदोबस्ताने रवाना करीत. अर्थात् तेथेंहि पुजारी वगैरे जाऊन अर्चा वगैरे व्यवस्थित होई. १७४९ सालीं मूर्ति स्थापन झाल्या आणि त्यानंतर दोनतीन वर्षांतच त्यांना सिंहगडाची हवा कांहीं दिवस खावी लागली. १७५१–५२ चे सुमारास निजामाने पेशव्यांवर चढाई केली व तो, मुलूख उध्वस्त करीत तळेगांव–शिक्रापुरापर्यंत वाढून आला, त्या वेळीं मूर्ति सिंहगडावर पाठविल्या होत्या अशी नोंद पेशवे दप्तरांत घडणी रुमाल इसन्ने खमसेन सालाच्या ११ रज्जब तारखेस सांपडते. नोंद अशी आहे.

" २० किले सिंहीगडी देव होता. तेव्हां पूजेस ब्राह्मण ठेविला होता. इस्तकबिल छ ९ मोहरम तागाइत छ २५ रबिलाखल मुदत ३॥ एकूण " म्हणजे १७ नोव्हेंबर १७५१ पासून १ मार्च १७५२ पर्यंत या मूर्ति सिंहगडावर होत्या. यानंतर थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस मोगलानें पुणें जाळलें, पर्वतीवरचे सारे देव फोडले, त्या हकीकतीचीं समकालीन पुष्कळ पत्रें खरे ऐतिहासिक लेखसंग्रहांत व पेशवे दप्तराच्या भागांत छापलेलीं आहेत. याहि वेळीं मूर्ति सिंहगडावर गेल्याची

नोंद सांपडते. पण तेथेंही अचानक छापा जाऊन अतोनात लूट व नुक-सानी झाली. " सिंहीगडी पाचा क्रोडीची दौलत, व धन्याचीं (पेश-व्यांचीं) पुस्तकें व राज्याचे सर्व हिशेब येकदाच यवनास दान झाले ! " असे समकालीन एका मातबर माणसाचेच उद्गार आहेत. (राजवाडे खंड १४ प. नं. ३०) एवढ्या अरिष्टांतून या सोन्याच्या मूर्ति वांचल्या हें सुदैवच होय. फिरून १७६८-६९ सालीं भोसल्याच्या स्वारीचे वेळीं पर्वतीचें जवाहिर व देव सिंहगडास गेल्याचें नमूद आहे. सवाई माधवरावाचे कारकीर्दींत तळेगांवावर इंग्रज आला त्या वेळीं पुणें फुटलें तेव्हां व पुढें होळ-कराच्या दंग्यांतहि या मूर्तींना गिर्यारोहण करावें लागलें. होळकराच्या पेंढा-ऱ्यांनी पर्वतीस उपद्रव दिल्यामुळें यवनसंसर्गदोषाबद्दल फिरून अर्चा झाल्याचा उल्लेख आढळतो. अखेर १८१७ सालीं इंग्रजांशीं युद्ध करण्याचें नक्की ठरल्यानंतर बाजीरावाने १० नोव्हेंबरला पांडुरंग कृष्ण बापट या पुजाऱ्या-बरोबर मूर्ती सिंहगडावर पाठविल्या होत्या त्या इंग्रजांनी २ मार्च १८१८ रोजीं किल्ला जिंकल्यावर लुटल्या व त्यांचा अंमल स्थिर झाल्यावर त्या नंदीच्या रुप्याच्या कवचासुद्धा पर्वती संस्थानास परत दिल्या.

इतर माहिती

पर्वती संस्थानचें तपशीलवार वर्णन करण्याचा येथें हेतू नसल्या-मुळें फक्त कांहीं निवडक व महत्त्वाच्या बाबीसंबंधीं थोडक्यांत संक्षिप्त रीतीनें कांहीं माहिती नमूद करूं. ' पर्वतीच्या देवळाचे कळस सोन्याचे करण्याचें काम इदिद्दे सित्तैन मया व अलफ म्हणजे १७६०-६१ सालीं झालें व त्याला १०७९॥ तोळे सोनें लागलें' असें पंतप्रधानांच्या दुसऱ्या शकावलींत म्हटलें आहे. पारसनीस आपल्या पुस्तकांत १०२० तोळे सोने लागलें म्हणतात. माधवरावाच्या कारकीर्दीतील पुण्यावरील निजा-माच्या दंग्यात हे कळसही निजामानें कापून लुटून नेले. म्हणून १७६८

ताळीं माधवरावाने फिरून ते सोन्याचे करविले. त्यासंबंधी पेशवे दप्तर भाग २२ पान ११५ वर १६–२–१७६८ च्या बंदांत पुढील नोंद आहे.

छ. २६ रमजान

बद्दल देणें देवस्थान खर्च श्रीदेवदेवेश्वर येथें सन सीतात (१७६५–६६) सोन्याच्या मुलामेयाचे कळस करविले त्यास खर्च-बा। हिशेब रु.

१८११८१५ कळस तांब्याचा.

१८०४ यैन कलस वजन पकें ८७८८ दरसेरी रु. ५८८ प्रमाणें रु.

७८१५ नळीमधील वजन पकें ८८३॥२। दरसेरी रु. २॥ प्रमाणें रु.

१८११८१५

५३०३८१४ मुलाम्यास खा। सोनें वजन तोळे ३३२॥।·॥ दर १५८१५ प्र.

रु. ६५५ देणें मजुरी कारागीर यास

३२६ देणें वर्खवाला यास वर्खाची घडाई सोनें वजन तोळे

३२६ दर तोळ्यास १ प्रमाणें रु.

३२६ देणें मुलामगार दर तोळा १ रु. प्रमाणें रु.

३ देणें तांबटास कलस चढविते

समई आ. १२ येकून, येक रोजा रु.
७१ हऊद अभिषेकपात्राचा तांब्याचा
१ केला त्यास
६४ हऊद वजन पके ८॥५॥९ दरसेरी
रु. २॥ प्रमाणें रु.
७ मलसूत्र पितलीचे वजन पके
८८२ दरसेरी रु. ३॥ प्रमाणें.

राजवाड्यांच्या शकावलींत १३–६–१७५८ रोजीं पर्वतीस नानासाहेबांनी विष्णूची स्थापना केली असें म्हटलें आहे. मुजुमदारांच्या संग्रहांत दोन नोंदी आहेत. त्यावरून निजामाने मूर्ति उध्वस्त केल्यानंतर १२ मार्च १७६६ रोजीं फिरून माधवरावाने विष्णूची स्थापना केली असें दिसतें.

निजामाच्या दंग्यानंतर पर्वतीवरील सर्व देवतांची पुनः प्रतिष्ठापना पुढीलप्रमाणें झाली. त्यासंबंधी दोनचार नोंदी अशा–२४–८–१७६३ श्रावण व॥ बुधवार देवदेवेश्वराची स्थापना.

मुजुमदारांच्या नोंदीवरून २३–८–१७६३ रोजीं देवदेवेश्वराची शाळुंका नवी केली व २–११–१७६३ रोजीं यथाशास्त्र स्थापना झाली.

कार्तिकस्वामीचें देऊळ १७४९ सालींच बांधण्यांत आल्याची नोंद सांपडली नाही. पण त्या मूर्तीची स्थापना नानासाहेबाच्या कारकीर्दींत राघोबानें केली हें निश्चित होय. हरणाचें दूध पिणाऱ्या आणि सूर्याला ऊन पाण्याचें अर्घ्य देणाऱ्या विक्षिप्त राघोबाच्याच मनांत कार्तिक स्वामीसारख्या देवविलक्षण देवतेची मूर्ति स्थापण्याचें यावें हें साहजिकच आहे. याला फार सुंदर पुरावा पेशवे दप्तर भाग ४ आनंदीबाईची दिनचर्या यांतील पत्रांत सांपडतो. ६७ नंबरच्या पत्रांत आनंदीबाईच्या

भू. ६

तोंडचे उद्गार दिले आहेत. त्यांत गृहकलहाच्या गोष्टी सांगताना ती म्हणते, "छ २९ सवाल. पर्वतीची गोष्ट निघाली त्याजवरून (आनंदीबाई बोलली) स्वामी (राघोबा) कार्तिकाची मूर्त दुसरे जागा पर्वतावर बांधते तर नांव होतें. नांवाची गोष्ट तेव्हाच कळली असती तर करते. " या उद्गारावरून राघोबानें कार्तिकस्वामी स्थापला हें उघड दिसतें. रोजकीर्दीत प्रत्यक्ष कार्तिकाची मूर्ति स्थापल्याचा उल्लेख आढळला नाहीं. ही मूर्तिहि निजामाच्या दंग्यात भंगली म्हणून माधवरावाने २५-११-१७६४ रोजीं नाना फडणविसास नव्या मूर्ति करावयास सांगितल्या, त्यांत कार्तिकस्वामीची मूर्त आहे. (पेशवे दप्तर भाग ३२). ही मूर्त तयार झाल्यावर १४-३-१७६६ रोजीं तिची स्थापना झाली. पुढें १७८७ च्या आधीं केव्हातरी ती मूर्ति पुनः भंगली असली पाहिजे. कारण मुजुमदारांच्या दोन नोंदी अशा आहेत.

सबा समानीन

१ रजब (२०–४–१७८७) श्रीकार्तिकस्वामीची मूर्त पुण्यांत नवी तयार केली. ती पर्वतीस स्थापन करावयास नेताना वाटेनें जागा जागा फोडावयास लागले नारळ.

१२ रजब (१-५-१७८७) कार्तिक स्वामीची स्थापना केली.

पण दुर्दैवी राघोबाप्रमाणें त्याचा हा देवहि दुर्दैवी. कारण १७९१ सालीं वीज पडून देऊळ जळालें. मूर्तीस मात्र धक्का लागला नाही. पण तरीहि फिरून नवी मूर्ती स्थापली. त्यानंतर अलीकडे १८६७ सालीं पुजाऱ्याच्या हातून मूर्तीचा उजवा पंजा तुटला म्हणून १८६९ सालीं सध्याची नवी काळी मयूराधिष्ठित मूर्ति स्थापण्यांत आली.

* सरदेसायांची रियासत

[उत्तर विभाग १ व २]

मराठी रियासतीच्या उत्तर भागांतील सवाई माधवरावाच्या कारकीर्दीचे हे दोन खंड पाहून मराठी इतिहासाचे वाचक आणि अभ्यासक श्री. सरदेसाई यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतील याविषयीं संशय नाहीं. मधमाशा सतत खपून थेंब थेंब करून ठिकठिकाणीं मोहळें निर्माण करतात, परंतु लोकांना त्यांतील मधाचा व्यवहारांत उपयोग होण्याला तो मध बाटल्यांत भरणें आवश्यक असतें. एरवीं मोहळें मधानें ओथंबलेलीं असलीं व निर्मक्षिक असलीं तरीही त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. ऐतिहासिक मोहळांतून मध काढून तो संकलनरूप ग्रंथांत भरून

* केसरी, १० मे १९३०

ठेवण्याचें काम मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रांत प्रथम सरदेसायांनींच सुरू केलें. कोणत्या मोहळांतील मध चांगला व गुणकारी, कोणत्यांतला अपायकारक, कोणकोणत्या मोहळांतील मधाचें मिश्रण केलें असतां तें अपायकारक होणार नाहीं, कोणत्या तऱ्हेनें प्रक्रिया केली असतां तो मध शुद्ध म्हणतां येईल, इत्यादिकांसंबंधानें मधाच्या कारखानदाराची जी पात्रता ती रियासतकारांचे ठिकाणीं किती प्रमाणानें प्रकट झाली आहे, असा प्रश्न कोणी उपस्थित केल्यास कदाचित् मतभेद होईल; व झाला तरी आश्चर्य नाहीं हें खरें. परंतु विखुरलेली साधनसामुग्री आपल्या पद्धतीनें एकत्र व्यवस्थित मांडण्याचा असा मोठा प्रयत्न तरी सरदेसायां-खेरीज दुसऱ्या कोणी केला आहे?

तसा मोठा उत्कृष्ट उपक्रम सरदेसायांच्या आधीं कै. खरेशास्त्री यांनींच केला. खरे यांनीं साधनांचे तेरा खंड निर्माण केले. परंतु त्या प्रत्येक खंडांतील प्रत्येक पत्र मनांत पचवून त्यावरून निघणारा मथितार्थ किंवा सारांश त्यांनीं गोष्टीसारखा सुसंगत मांडला किंबहुना इतर संशोधकांपेक्षां खरे यांचें वैशिष्ट्य यांतच आहे. संशोधकानें संकलनकारहि अवश्यमेव बनलें पाहिजे. एरवीं ज्यांच्याकरितां संशोधन करावयाचें त्यांना त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं ही गोष्ट खरेशास्त्री यांनीं पूर्णपणें जाणली होती. आणि म्हणूनच खरेशास्त्र्यांनीं प्रतिप्रकरणाला जोडलेल्या प्रस्तावना त्यांच्या चिरंजिवांनीं एकत्र छापून काढतांच तो उत्तरपेशवाईचा उत्कृष्ट इतिहासच बनला. संशोध-काची पृथक्करणपद्धति आणि इतिहासकाराची एकीकरणपद्धति या दोहोंतही शास्त्रीबोवा प्रवीण असल्यामुळें एखाद्या कुशल इंजिनियराप्रमाणें हजारों तुकडे एकत्र करून ऐतिहासिक लेखसंग्रहाचें यंत्र जोडून तें त्यांनीं चालू केलें.

पण खरेशास्त्र्यांच्या संकलनांत आणि सरदेसायांच्या संकलनांत फरक आहे. खरे यांचें संकलन पटवर्धनी दप्तरानें मर्यादित होतें.

सरदेसायांच्या संकलनाला मर्यादा नाहीं. त्यांनीं भूमिकाच अशी स्वीकारली आहे कीं, एखाद्या सामान्य चिटोऱ्यापासून एखाद्या पत्रसंग्रहापर्यंत इतिहासाचें जें जें साधन उपलब्ध होईल तें तें त्यांनीं अभ्यासलें पाहिजे. खरे पटवर्धनी दप्तराच्या नदीमुखानें इतिहाससमुद्रांत शिरत होते. सरदेसाई यांना साधनग्रंथांच्या समुद्रांतच सफर करावयाची आहे. त्यांना पटवर्धनी दप्तर वाचलें पाहिजे त्याचप्रमाणें रायरीकर दप्तराचाही परामर्ष घेतला पाहिजे. ग्वालेर दप्तराचा अभ्यास केला पाहिजे, त्याचप्रमाणें महेश्वर दरबाराचीं पत्रें बारकाईनें पाहिलीं पाहिजेत. अलीबहादराचीं पत्रें तपासलीं पाहिजेत, त्याचप्रमाणें हिंगण्यांचीं पत्रेंहि अभ्यासलीं पाहिजेत. मराठी इतिहासाचीं साधनें न्याहाळलीं पाहिजेत, त्याचप्रमाणें उपलब्ध इंग्रजी साधनेंहि शोधलीं पाहिजेत. सारांश, खरे आणि सरदेसाई यांच्या भूमिकांतच असा फरक आहे. या दृष्टीनें विचार केला तर इतक्या विखुरलेल्या प्रचंड सामुग्रीचा सामान्य सांगाडा तयार करणें हेंहि काम सामान्य नाहीं फार कष्टाचे आहे. अहर्निश या एकाच उद्योगांत सरदेसायांना आपल्या आयुष्याचीं तीस वर्षें घालवावीं लागलीं आहेत यावरूनच त्या कामाची कल्पना येईल.

आणि हा व्यापही कोणी तरी करणें अगदीं आवश्यक आहे यांत संशय नाहीं. कारण या उद्योगाचा उपयोग सामान्य इतिहासवाचकाला जसा आहे तसा संशोधकालाही आहे. खरेशास्त्र्यांचा अप्रतिम प्रयत्न सोडला तर, आज २०–२५ वर्षांत इतिहासाचीं इतकीं अनेकविध साधनें उपलब्ध होऊनही अभ्यासकाखेरीज सामान्य वाचकाला त्याचा कितीसा उपयोग झाला ? शेतभर कापूस पिकला आणि पिंजला गेला. परंतु ज्याच्याकरितां तो प्रयत्न त्या महाराष्ट्रीयाला, परकीय इतिहासकारांनीं विणलेलें वस्त्र टाकून दिल्यास, या देशी इतिहासाचा हातभरही कपडा मिळाला नाहीं, तर त्याचा काय उपयोग ? राजवाड्यांनीं वीसपंचवीस

खंड भरतील येवढीं खंडोगणती अव्वल दर्जाचीं साधनें प्रसिद्ध केलीं. परंतु तीं नुसतीं सामान्य वाचक वाचणार कसा व त्यांचा उपयोग करणार कसा ? आपण प्रसिद्ध करतों त्या साधनांवरून सुसंगत इतिहास काय निघतो, हें सारांशरूपानें सांगण्याची तसदी त्यांनीं कधींच घेतली नाहीं. आणि तोच त्यांचा कित्ता इतर लहानमोठीं साधनें उपलब्ध करणाऱ्यांनीं स्वीकारला. लहान सहान टिपणें प्रसिद्ध करण्याची गोष्ट सोडून देऊं. कारण बोंडभर कापूस घेऊन त्याचें बोटभर सूत काढणें कठीण नसतें; आणि तसें केलें तरी त्याच्या त्रुटितपणामुळें सामान्य वाचकाला त्याचा तादृश उपयोगही नसतो. परंतु अलीबहाद्दराचा पत्रव्यवहार, महेश्वर दरबारचा पत्रव्यवहार, दिल्लीचा हिंगण्यांचा पत्रव्यवहार, रायरीकरांचा पत्रव्यवहार, काळ्यांचा पत्रव्यवहार अशीं मोठमोठीं दप्तरें प्रसिद्ध करणारांनीं त्यांतून निघणारा इतिहास सुसंगत व सोपा करून मांडण्याची तसदी घेतली नाहीं. राजवाड्यांनीं तुच्छताबुद्धीनें घेतली नाहीं. इतरांनीं अंधानुकरणानें घेतली नाहीं.

वास्तविक अशा दप्तरांच्या संशोधकांनींच संकलनकार बनावयास पाहिजे. परंतु ही गोष्ट होत नाहीं तर निदान श्रमविभागाच्या तत्त्वावर, एकानें साधनें उपलब्ध करावीं व शक्य तर दुसऱ्यानें त्याच्यावरून इतिहासाचा सांगाडा तयार करण्याचा प्रयत्न करावा. असें झालें तर कोठें बिघडलें ? मग त्याच्या पाठीमागें " संकलनकार " " संकलनकार " म्हणून लागण्यांत अर्थ काय ? इतकें तरी आज दुसऱ्या कोणी केलें आहे ? " अजून मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची वेळच आलेली नाहीं. साधनेंच शोधून झालीं पाहिजेत " असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांच्याही दृष्टीनें पाहिलें तरी, सरदेसायांच्यासारख्या संकलनाची आवश्यकता फार आहे असेंच दिसून येईल. आगा ना पिछा अशीं त्रुटित किंवा अर्धवट, अपरिचित नांवाचीं पत्रें सांपडल्यानंतर आंतील मजकुरावरून त्याच्या

स्थलकालमर्यादा ठरवाव्या लागतात, तेव्हां या रियासतींचा पुष्कळ उपयोग होतो, ही स्वतः संशोधकांच्या अनुभवाची गोष्ट आहे.

यासंबंधांत ‘ पुरंदरे दप्तराच्या ’ संपादकाचा अनुभव आणि अभिप्राय लक्षांत घेण्यासारखा आहे. त्यानें म्हटलें आहे कीं, ‘ विनमितीच्या पत्राच्या तारखा ठरविण्याचें सगळ्यांत बिकट व किचकट काम करतांना रियासतींचाच खरा उपयोग मला झाला. ’ सारांश, संकलनकार हा संशोधकाइतकाच आवश्यक आहे. नुसत्या ‘ संकलनकार ’ अशा अधिक्षेपात्मक अभिधानानें त्या पदवीचें महत्त्व कमी होऊं शकत नाहीं. ‘ विवेकी संकलनकार ’ किंवा ‘ अविवेकी संकलनकार ’ असें कांहीं तरी एक विशेषण त्यास जोडल्याखेरीज तारतम्यभाव यथार्थ व्यक्त होत नाहीं. आणि तसें ज्याला म्हणावयाचें असेल त्याला आपलें म्हणणें पुरावे देऊन सिद्ध करण्याला कोणतीच हरकत नाहीं. कारण सरदेसायांच्याच शब्दांत सांगावयाचें तर “ एकाच्या चुका दुसऱ्यानें दाखवावयाच्या यांतच प्रगतीचें बीज असतें. ”

संशोधक हे खाणींतून सोन्याचे कण काढणारे असें म्हटलें तर संकलनकारांना सोनारांची उपमा देतां येईल. एकाचें काम सोनेरी माती चाळून शोधून तिजवर रासायनिक प्रक्रिया करून शुद्ध सोन्याचे कण काढून त्याच्या लहान लहान चिपा बनवावयाच्या; व यानंतर सोनाराचें काम म्हटलें म्हणजे त्या चिपांना कस लावून त्यांतील तुकडे हवे ते व हवे तितके घेऊन ते आटवून त्यांचा दागिना करावयाचा. अशीं दोन नातीं वेगळीं कल्पिलीं असतां त्यांच्यांत भांडण कोठें उरतें ? पण मनुष्यें परस्परावलंबी असतांहि मी श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ असें म्हणण्याचा म्हणजे अहंकारबुद्धीचा मोह अनावर होतो व त्यांतच सर्व बिघडतें. संशोधकांनीं पुढें येणाऱ्या संकलनकारांची अपेक्षा ठेवावी, व संकलनकारांनीं संशोधकांचें ऋण प्रगट केल्याशिवाय कोणत्याही माहितीचा उपयोग करूं नये.

असें झाल्यास गीतेंत म्हटल्याप्रमाणें "परस्परांच्या संभावनेनें उभयतांचेंही श्रेय साधेल." खाणींत काम करणारांला वेगळी बुद्धि लागते. व दागिने घडविणाऱ्या सोनाराला वेगळी बुद्धि लागते; यांत विरोध किंवा श्रेष्ठकनिष्ठ भाग हटकून कसा येतो हें समजत नाहीं.

—२—

रियासतीच्या गुणासंबंधीच्या विवेचनाचें आनंददायक काम पहिल्या लेखाकांत झालेंच आहे. आता येथून दोषदर्शनाचें अप्रिय काम करावयाचें आहे. आमच्या मतें हें काम खऱ्या सहानुभूतीनें परंतु जितकें कसून होईल तितकें हवें आहे. कारण सर्वसामान्य जनतेच्या हातांत इतिहासाच्या बाबतींत तरी सरदेसायांची रियासतच साधार व आजतागायत उपलब्ध हकीकत सुलभतेनें देणारी आवृत्ति म्हणून खेळविली जाते. आणि जोंपर्यंत स्वतंत्र रीतीनें दुसरी एखादी रियासत कोणी लिहावयास घेण्याचा संभव दिसत नाहीं तोंपर्यंत ज्या त्या अभ्यासकानें स्वतःच्या विशिष्ट दृष्टीनें रियासतींत आढळून येणारे दोष, शंका, चुका वगैरे उघडपणें मांडीत राहाणें जरूर आहे.

पुनरुक्तींची परंपरा, रचनेचा विस्कळीतपणा, अवतरणांची अतिव्याप्ति किंवा आगंतुकपणा व परस्पर विरोधी विधानांचा विपुलपणा हे व अशासारखे बरेचसे दोष या खंडांतून घुसले आहेत असें आम्हांस वाटतें. थोडा संयम करून मूळ खर्डा काळजीपूर्वक वाचला असता तर त्यांतील बरेचसे दोष पाखडून टाकतां आले असते व एकंदर ग्रंथ अधिक सुटसुटीत, बांधेसूद व सुसंबद्ध झाला असता.

---

* केसरी, २७ मे १९३०

मूळ विषय आधीं स्वतः चाऊन खावा आणि पचवावा आणि नंतर तो बालसुलभ पद्धतीनें मांडावा, ही खरे यांची पद्धत. रेशमाचा किडा हिरव्या पानांचे ढीग आधाशासारखे फस्त करतो खरें, परंतु ते ता पूर्णपणें पचवतो, आणि शेवटीं त्याच मुखानें तलम रेशमाचें अखंड सूत्र स्रवूं लागतो. कोष्टी—कोळ्याच्याहि तोंडांतून धागा निघतो, आणि एका रात्रींतहि त्याचें जाळें तयार होतें. दिसावयाला त्याच्या सारखें सुंदर काय आहे ? परंतु त्याची शाश्वती किती ? नुसता जोरानें फुंकर घातला तरीहि त्याची छत्री फाटून जावयाची ! अुलट रेशमाच्या कोशावर तरवारीची तीक्ष्ण धाराहि बोथटून जाते. खरे यांची रचना त्याच प्रकारची म्हणतां येईल. त्यांची भाषा जितकी मनोहर आणि मऊ तितकीच तिच्या पोटांतील विधानेंहि चिवट असतात. त्यांच्या विवेचनांत विषयाची संगति सुटत नाही. गैरलागू किंवा स्वैर विधानें ते करीत नाहीत; आणि सर्वांत विशेष म्हणजे सगळा विषय इतका सुलभ, सोपा करून सांगतात कीं, एखादी गोष्टच ऐकत असावेसें वाचकांस वाटतें. याच्या अुलट रियासतकारांच्या लेखनपद्धतीचें वर्णन " अतिशय बहुश्रुत परंतु नवख्या विद्वानाचें व्याख्यान " असें करतां येईल. जेवढी जेवढी म्हणून माहिती असेल तेवढी कोठें तरी कोंबावयाची अशी सरदेसायांची पद्धति असल्यामुळें अशा माहितीचे अनेक प्यारे ते मध्येंच असे बसवून देतात कीं, ज्याचा विषयसूत्राशीं फारसा संबंध असत नाहीं. या पुस्तकांतील एकट्या माधवरावाच्या दहापानीं जीवनचरित्रांतीलच कांहीं उदाहरणें पाहा.

भाग १ पान ४८५ वर नगरकरांच्यासंबंधीं प्यारा दिला आहे. त्याचा सवाईमाधवरावाशीं संबंध काय ? बरें, सवाईमाधवरावाशीं सोडला परंतु गोपिकाबाईशीं तरी काय संबंध आहे ? भारतवर्षात नगरकरासंबंधींचें तसें एक पत्र सरदेसायांना सांपडलें. तें गोपिकाबाईला लिहिलें होतें. कोठेंतरी ती माहिती द्यावयाची होती. ती गोपिकाबाईचा संबंध येतांच दिली

इतकेंच. तसेंच ४९१ पानावरील पेशव्यांच्या स्त्रीपलटणीसंबंधींचा प्यारा पांहा. पारसनिसांच्या ऐतिहासिक टिपणांत माहिती सांपडली. चांगली वाटली म्हणून दिली कोठें तरी! ती माहिती इतरत्र कोठें दिली असती तर शोभून गेली असती. भाग १ पान ४९४ पहिल्या प्याऱ्यांत शनवार-वाड्यांत सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत काय सुधारणा झाल्या तें सांगि-तलें; पण त्यांतच " शके १७१३ म्हणजे जून १७९१ त नऱ्हे येथून नळ आणून सदाशिव पेठेच्या हौदांत सोडला. " ही आगंतुक माहिती दिली आहे. तीं नाना फडणविसाच्या चरित्रांत बसेल. सवाई माधवरावाच्या नाहीं. नानानें आणलेला नळ तोच शनवारवाड्यांत गेला असता तर गोष्ट वेगळी. पण तसा प्रकार नाहीं.

त्याच पानावर वरील माहितीच्या लगेच पुढं त्या वेळची एक धार्मिक बाब म्हणून शृंगेरी मठाची पटवर्धनांनीं केलेली विटंबना येथेंच सांगण्यासारखी आहे असें म्हणून एक लांबलचक गैरलागू प्यारा घुस-डला आहे. गैरलागू म्हणण्याचें कारण सवाईमाधवरावाच्या जीवनचरित्राशीं त्याचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध दिसत नाहीं. बरें ती माहिती देण्यांत हेतू काय? ब्राह्मण सरदारांनांही धर्मसंस्थांबद्दल आदर नव्हता, आणि ते शंकरचार्यांचेही मठ लुटण्यास कमी करीत नसत असें म्हणून त्यांच्या धर्मलंडपणाबद्दल त्यांना दोष देण्यासाठीं हा उतारा घेतला असला तर त्याच उताऱ्यांत परशुराम भाऊ व नाना फडणीस यांनाच त्या लुटीबद्दल वाईट वाटून लुटीचा माल परत देण्याबद्दल त्यांनीं सक्ति चालविली असा उल्लेख आहे! लुटीच्या लोभाला गुंतून ब्राह्मण धर्मक्षेत्रेंही लुटीत असें रियासतकारांना म्हणावयाचें आहे काय? तसें म्हटलें तर त्याच लोभाने मराठ्यांनींही तसले अत्याचार केलेले नमूद आहेत! पंढरपूर क्षेत्र लुटणारा रामचंद्र जाधव मराठाच होता. आणि काय-गांव टोक्याचा विध्वंस करणारा यशंवतराव होळकरही मराठाच होता.

मग कोणच्या हेतूकरितां हा प्यारा घुसडला ? आणि सवाईमाधवरावाच्या जीवनचरित्राशीं त्याचा संबंध कसा पोंचतो ? मराठी लष्कराची शिस्त या प्रकरणांत तो शोभला असता.

पण याहूनहि मौज पुढें आहे. त्याच प्याऱ्याच्या शेवटीं असा आगंतुक भाग जोडला आहे, " तारीख २ एप्रिल १७९० रोजीं जेजुरीच्या यात्रेच्या दाटीमुळें नगारखान्याचे दरवाजापाशीं रगडा होऊन पावणेतीनशें मनुष्य ठार झाले ! त्याखेरीज सवाशें जाया आहेत वगैरे. असे अपघातांचे प्रसंग त्या वेळीं सुद्धा पुष्कळ घडून येत. यावरून तत्कालीन परिस्थितीची कल्पना येईल. " आधींच आगंतुक असलेल्या प्याऱ्यांत हा आणखी एक आगंतुक भाग आला. त्या वेळीं यात्राबित्रांचा बंदोबस्त हल्लींच्या प्रमाणें सरकारकडून ठेवला जात नसे असें दर्शवून नानाफडणिसावर शिंतोडा उडवावयाचा असेल तर आज इंग्रजी राज्यांतहि कुंभमेळ्यांत अनेक लोक दगावत नाहींत काय ? पंढरपूरच्या यात्रेंत असे प्रसंग अजूनही घडतात. पण सरदेसायांना तसें म्हणावयाचें आहेसेंही दिसत नाहीं. कारण ते म्हणतात कीं, असे अपघाताचे प्रसंग त्या वेळींसुद्धां पुष्कळ घडून येत. म्हणजे अशा गोष्टी केव्हां केव्हां अपरिहार्य असतात हें त्यांना कबूल आहे. मग ही माहिती कशाकरितां दिली ? सवाई माधवरावाशीं त्याचा काय संबंध ? ही माहिती सामाजिक स्थितीवर्णनांत शोभली असती. माहिती सांपडली ती टाकवत नाहीं. तेव्हां कोठें तरी कशी तरी द्यावयाची इतकीच काळजी त्यांत दिसते.

भाग २ पान ४९० वर सवाई माधवरावाच्या शिक्षणाच्या आबाळीबद्दल सांगतांना तंजावरच्या सर्फोजीचें चरित्र उगाच सांगितलें आहे. सवाई माधवरावाला मिळालेलें शिक्षण आणि स्वार्थझ नामक 'भल्या' ख्रिस्ती मिशनऱ्यानें सर्फोजीला दिलेलें उदार शिक्षण यांच्या तुलनेपेक्षां

सर्फोजीची मिळालेली माहिती कोठें तरी सांगण्याचीच सवड रियासतकार पहात असावेसें वाटतें.

आतां ज्या शिक्षणाबद्दल सरदेसाई इतके हळहळतात त्याचें पान करून सर्फोजीनें किंवा रघुनाथ हरि नेवाळकरानें, काय पराक्रम केले ते सरदेसाई सांगतील काय ? स्वार्थझ, जेरिक व वुइल्यम जोन्स या त्रिमूर्तींनीं जें अप्रतिम शिक्षण सर्फोजीला दिलें त्याची फलनिष्पत्ति काय तर म्हणे तंजावरला एक लायब्ररी त्यानें काढली, व तो इंग्रजींत फर्डें पत्र लिहूं लागला ! रियासतकारांचा सगळा रोख कीं, साहेब लोकांजवळ काय ती फाकलेली दृष्टि, विस्तारलेलें ज्ञान आणि सगळ्या मुलखांतला चौकसपणा सांठलेला ! तेव्हां असा एखादा साहेब सवाई माधवरावास शिक्षण देण्याकरितां नानाफडणीसानें ठेवावयास पाहिजे होता; पण तसा ठेवला असता तरी फार तर सवाई माधवरावानें एखादी पूना नेटिव्ह जनरल लायब्ररी स्थापली असती. पण राजकारण शिकायला किंवा पेशवाईचा व्याप उरकायला त्याचा कितीसा उपयोग झाला असता ?

पण मजा पुढेंच आहे. कारण सरदेसाईच सांगतात कीं, पुण्याच्या रेसिडेन्सींतलि डॉ. फिंडले हा पेशव्यास कांही दिवस भूगोल व खगोल हे विषय शिकवीत होता. तसेंच ते सांगतात कीं, " मॅलेटच्या प्रोत्साहनानें तरुण पेशव्यानें शनिवारवाड्यांत एक चित्रशाळा काढली. त्याजपाशीं अनेक विद्यार्थी शिकून तयार झाले त्यांत गंगाराम तांबट पुढें फार नामांकित झाला " वगैरे. म्हणजे रियासतकारांच्या मताप्रमाणें का होईना, साहेबाचें शिक्षण सवाई माधवरावाला देण्याची सोय झाली होती तर !

पुनरुक्ति तर पुस्तकभर कालवल्यासारखीच झाली आहे असें वाटतें. त्याचीं उदाहरणें काढून दाखवीत बसणें कंटाळवाणें होईल, व परिश्रमाच्या मानानें त्यांत प्राप्तीही काही विशेष होईलसें वाटत नाहीं.

पुनरुक्तीमुळें विषयसूत्र ठायींठायीं खंडित झालेलें आहे, व कित्येक ठिकाणीं वाचकाचा समजुतीपेक्षां गोंधळच उडून जातो. एखादा गाडीवान आपलें घोडें चांगलें धांवत असतांही त्याच्या लगामाला मधून मधून हिसके देतो आणि घोड्याचें तोंड मागें खेचीत असतो, त्याच सारखी स्थिति या पुनरुक्तीमुळें वाचकांची होते. प्रस्तुत खंड फार घाईनें छापून निघाला. कारण रियासतकारांच्याच शब्दांत सांगावयाचें तर "चोखाळ साफसुफी करण्याचा त्यांना आतां बिलकुल दम निघत नाहीं." दम न निघण्याचीं म्हणून जीं कारणें रियासतकारांनीं दिली आहेत तीं सर्वस्वी खरीं आहेत व त्यांबद्दल वाचकांना रियासतकारांबद्दल सादर सहानुभूतीच वाटेल याबद्दल बिलकुल शंका नाहीं. परंतु अनुसंधान सुटणें, विषयाचा ओघ तुटणें, पुनरुक्ति होणें, पाल्हाळ वाढणें, वगैरे नाना-विध दोषांची रियासतकारांनीं जी प्रांजळ कबुली दिली आहे, त्या बाबतींत आम्ही येवढें म्हणतों कीं, वरील दोष त्यांकडे दुर्लक्ष करण्याइतके थोडे नाहींत. आणि म्हणूनच ग्रंथकारानें त्यांच्या छाटाछाटीकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवावयास पाहिजे होतें.

—३—

नाना फडणविसाची व महादजीची तुलना करतांना, रियासतकारांचा तोल सुटला आहे. महादजीचें येन केन प्रकारेण समर्थन करण्याचा मोह पडल्यामुळें अर्थात् त्याच तऱ्हेनें नाना फडणविसाचीं वास्तविक अगर खोटीं व्यंगें दाखवून नाना फडणविसाला तितक्या प्रमाणांत निंद्य ठरविण्याचा प्रयत्न सरदेसायांना करावा लागला आहे. आणि या प्रयत्नांत

* केसरी, ३१ मे १९३०

नानाच्या घरचें कुत्रेंही जिवंत ठेवावयाचें नाहीं, इतका अभिनिवेश दिसून येतो. नाना फडणवीस तर सर्वथा निंद्यच. परंतु नानाचे स्नेही किंवा साहाय्यकर्ते यांनाही तसाच कांहीं विशेषणांचा आहेर केल्याशिवाय रियासतकारांनीं सोडलें नाहीं. एवढा निःस्पृह रामशास्त्री प्रभुणे ! पण तोहि केवळ नानांच्या बाजूचा, एवढ्याकरितां त्याच्यावरही शिस्त धरण्यास त्यांनीं सोडलें नाहीं. ती युक्त कीं अयुक्त, सकारण कीं अकारण हें पुढें पाहूं. तूर्त नानाबद्दल ते काय म्हणतात तें पाहूं. त्याच्यासंबंधींचे विखुरलेले उद्गार जवळजवळ रियासतकारांच्याच शब्दांत एकत्र मांडले म्हणजे सम्यक्पणें नानांचें चित्र दिसेल तें असें.

" नाना मत्सरी होता. अधिकाराची दुर्दम हाव त्याला होती. इतकी कीं, त्यापुढें राष्ट्रघात झाला तरी त्याला त्याची पर्वा नव्हती. अधिकाराच्या या तीव्र लालसेच्या पायींच या धूर्त, खोल, अभिमानी परंतु मत्सरी आणि भित्र्या मुत्सद्द्यानें पेशव्याशीं जें वर्तन सुरू केलें त्यामुळें त्याला आत्महत्या करावी लागली. ब्राह्मणशाहीच्या खोट्या अभिमानानें काळवेळ न पाहतां त्यानें जीं कारस्थानें केलीं त्यांच्यायोगानें पेशवाई रसातळास गेली. नाना विरोधी माणसांना भरडून काढी. मनुष्यस्वभावाची पारख जशी महादजीला किंवा सखारामबापूला दिसते तशी नानाला दिसत नाहीं. नानांचा कारभार पुष्कळसा एकांगी होता. त्यानें सर्वांस पैसे उकळण्याचें धोरण ठेवलें. दुसऱ्याचें मन ओळखण्याची कला नानांस अवगत नव्हती. त्याची दृष्टि हिशेबी व्यवहाराबाहेर कधीं फाकली नाहीं. तो कारकुनांचा काळ असे, पण शिरजोर सरदारांपुढें गोगलगाय बनत असे. महादजीचा स्वभाव जसा उघडपणें बोलण्याचा होता तसा नानाचा नव्हता. एकांतांत बसून लेखणीनें व्यवहार उलगडण्याचा होता. अर्थात् गुप्त घात किंवा बॅक-बाइटिंगचा होता. त्याच्या कारकीर्दींत पुण्याचा कारभार सर्वथा कुजला. रयतेची दाद लागत नसे. मोठमोठ्या ऐतिहासिक

घराण्यांचा नाश होत चालला. कारभारांत ब्राह्मणांचा भरणा वाढून इतर जातींचा छळ होऊं लागला. उघड न्यायनिवाडा होत नसे. नानाची गांठ पडत नसे. जिकडे तिकडे हेरांचा सुळसुळाट होऊन नानाविरुद्ध ब्र काढण्याची सोय उरली नव्हती. त्याचे हस्तक बाजी मोरेश्वरासारखे किंवा घाशीरामासारखे प्रजेवर जुलूम करणारे पाजी लोक होते. स्वार्थत्याग किंवा मनाचा उदारपणा नानाच्या ठिकाणीं असता तर ब्राह्मण जात आज लोकांस वाटते तितकी हीन झाली नसती ! " इतकेंही करून कदाचित् कांहीं उणें राहिलें असेल अशा समजुतीनें रियासतकारानी नानाच्या नैतिक आचरणावरही शिंतोडे उडविले आहेत !

वरीलप्रमाणें नाना फडणविसाचें असें हुबेहूब चित्र सरदेसायांनीं रेखाटलें आहे तें कां ? तर केवळ सत्यप्रीति ! त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर " इतिहासांत चुकीचे ग्रह रूढ झाले असतील त्यांचा निरास करणें हें इतिहासज्ञांचें काम आहे म्हणून." खरोखर ज्या नानाच्या एकांगी आकुंचित दृष्टीमुळें आणि स्वार्थपरायणतेमुळें ब्राह्मण जात आज अगदीं हीन दशेस पोंचली आहे, ती जात रियासतकारांसारखें फाजील उदार दृष्टीचे इतिहासकार आतां निर्माण झाले आहेत, त्यामुळें लवकरच उच्च दशेस पोंचणार आहे हें पाहून, राष्ट्रकल्याणाचा ध्यास घेतलेल्या त्या महादजीला स्वर्गांत किती बरें वाटत असेल बरें ?

स्वतःचा आहेर स्वतःला

पण वाईट इतकेंच वाटतें कीं, तें समाधान फार वेळ टिकणार नाहीं. कारण परस्परविरोधी विधानें करण्याच्या संवयीमुळें रियासतकारांनीं नानाबद्दल ठिकठिकाणीं असे गुणवर्णनपर उद्गार काढलेले नमूद आहेत कीं, त्यांच्या दोषदर्शक वाक्याला त्यांच्याच गुणदर्शक वाक्याचा छेद सहज देऊन टाकतां येतो. कसें तें पाहा. एके ठिकाणीं ते म्हणतात

कीं, नाना विरोधी पक्षाच्या लोकांना दयामाया न दाखवितां सरसकट भरडून काढी. दुसरे ठिकाणीं तेच सांगतात कीं, कारभाराच्या करडेपणापलीकडे, मुद्दाम होऊन त्यानें अन्याय केलेला दिसत नाहीं. नानाला माणसांची पारख नव्हती आणि लोकांचें मनोधारण त्याला करतां येत नसे, या त्यांच्या विधानाला त्याच्याच शब्दांचा खालील अहेर परत करतां येईल. ते म्हणतात, "कामाचा उरक असलेला कोणताही थोर पुरुष घेतला तरी स्वतःच्या भरंवशाचे अनेक साहाय्यक त्याला बनवावे लागतात. आणि असे लोक एकेक व्यवहार इभ्रतीनें व स्वतःच्या जबाबदारीनें उरकणारे ज्या राज्यांत असतात तेंच राज्य चांगलें चालतें. अशाच तऱ्हेचे अनेक लायक इसम नाना व महादजी या दोघांच्याहीजवळ तयार झाले......कृष्णराव काळे व हरिपंत फडके हे दोन साहाय्यकर्ते मोठ्या इभ्रतीचे व पेशवाईची सेवा करणारे नानास लाभले व त्यानेंही त्यांस सांभाळलें." ज्या महादजीच्या तुलनेच्या पायी महादजीसारखी नानाला माणसांची पारख नव्हती असें सरदेसाई म्हणतात, त्याच महादजीजवळ नानानें जो आपला सदाशिव दिनकर नांवाचा वकील नेमून दिला होता त्याच्या हुशारीबद्दलचें व लायकीबद्दलचें वर्णन वाचण्यासारखें आहे. शेवटीं तर तेथें ते म्हणतात कीं, महादजीसारख्या जहांबाज पुरुषालाही सदाशिव दिनकरापुढें हात टेकावे लागत असत !

'नानाची दृष्टि हिशेबी व्यवहाराबाहेर कधीं फाकली नाहीं म्हणजे व्यापक दूरदृष्टि किंवा धोरण त्याला नव्हतें.' या त्यांच्या विधानाबरोबरच खालील उतारा वाचावा म्हणजे झालें. "जोंपर्यंत मराठे हैदराचे वैरी होते तोंपर्यंत इंग्रजांचा डाव यशस्वी झाला ही गोष्ट ओळखून पुणें दरबारानें तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील स्वतःचा सर्व प्रदेश हैदरास देऊन त्यास मोठ्या मिनतवारीनें आपल्याकडे वळविलें ही नानाच्या मुत्सद्दी धोरणाची पराकाष्ठा होय ! ...... तुंगभद्रेच्या दक्षिणचा सर्व प्रदेश

कायमचा सोडून देणें हा केवढा स्वार्थत्याग होता याची कोणासहि कल्पना होईल. उद्देश हा की सर्वस्व लुबाडणाऱ्या इंग्रजांचा कांटा एकवार सर्वस्वी नाहीसा करावा. हिंदुस्थानांतील अनेक दूरदृष्टि अकलवानांच्या अंतःकरणांत एकसमयावच्छेदेंकरून ही जी स्फूर्ति उत्पन्न झाली तिचा परिणाम नानांनी निर्माण केलेलें कारस्थान होय. याचा मूळ उगम जरी खुद्द नानाचा असला तरी त्यांत अनेक सत्ताधीश व मुत्सद्दी सामील होते. हिंदी एकीकरणाचे जितके धागे आपल्या कब्जांत ठेवणें शक्य होते तितके त्यानें सांभाळले होते. ”

स्वतःच्या अधिकाराच्या हांवेमुळें नानानें पेशव्यांच्या हक्काकडे लक्ष दिलें नाहीं, असें रियासतकारांचें म्हणणें. पण पेशव्याच्या इभ्रतीकरितां नाना किती जपत असे, याचें त्यांनीच केलेलें वर्णन पाहण्यासारखें आहे. ते म्हणतात, “ अगदी यत्किंचित् किरकोळ गोष्टींतसुद्धां आपल्या हुकमाशिवाय राज्यांत पान हलूं नये अशी नानाची ताकीद होती. एक पैसुद्धां अव्यवस्थित खर्च होऊं नये, मानपान देणेंघेणें या बाबतींत भलताच दाखला पडूं नये, मोठमोठीं कामें करतांना टापटीप व व्यवस्था यांत उणें दिसूं नये आणि पेशव्याची हुकमत सर्वत्र निर्बाध झळकावी अशी नानाची शिस्त होती. ”

जेथें विष तेथेंच उतारा

सारांश, ईश्वराच्या करणीप्रमाणें जेथें विष तेथेंच जवळपास त्याचा उतारा रियासतकारानीं निर्माण करून ठेवला आहे. फरक इतकाच कीं, ईश्वराची करणी सहेतुक असते. रियासतकारांची मात्र अहेतुक आहे! विष व उतारा यांची लांबण बरीच लांबवितां येईल, परंतु स्थलाभावामुळें तें शक्य नाहीं. नाना फडणविसाची जी स्तुति रियासतकारांनीं केली आहे, ती त्यांच्या शब्दांत मांडली म्हणजे फारसें बोलावयाचें कारण नाहीं. भाग १ पान

२८९ वर ते म्हणतात, " महादजीच्या बोलण्यांत बोलणें नसावयाचें, देखावा पुष्कळ करावयाचा व स्वतःचें अंग बचावून दुसऱ्यास गोत्यांत आणावयाचें हे महादजीचे स्वभावविशेष. उलट नाना मोठा हिशेबी, व्यवस्थित, सर्वांचीं अनुसंधानें ठेवून प्रकरणें लगोलग उलगडणारा, लेखणीचा व वचनाचा खंबीर. या योगानें शत्रुमित्रांचा त्याजवर विश्वास असे." " एकंदर सात वर्षांच्या या युद्धांत नानांनीं आपला वचक सर्वत्र यथायोग्य बसविला. त्यांतल्या त्यांत महादजीसारख्या कठीण पुरुषाकडून त्यांनीं राज्याची कामगिरी करून घेतली; रघुनाथरावासारख्या जहांबाज निगर्गद्यास शरण येण्यास भाग पाडलें; हेस्टिंग्ज, हॉर्नबी, गॉडर्डसारख्यांस चीत केलें; रघूजी आंग्रे व रघूजी भोंसले यांस मित्र बनविलें; मोरोबा, सखारामबापूंस योग्य शासन केलें; फत्तेसिंग व गोविंदराव गायकवाड यांचा आणि तुकोजी व अहिल्याबाई यांचा शक्य तितका उपयोग करून होळकरशाहीचा बचाव केला; हरिपंत फडके, कृष्णराव काळे, महादाजीपंत गुरुजी, राम शास्त्री, असल्या धवलयश साहाय्यकांचें नैतिक बळ राज्यास लाभविलें; परशुरामभाऊ, रामचंद्र गणेश, विसाजी कृष्ण, गणेश विश्वनाथ, भीमराव पानसे, वगैरेसारख्या रणशूर कल्पक योद्ध्यांकडून स्वराज्याच्या लढाया लढविल्या; नारो शिवदेव, सदाशिव दिनकर, बाबूराव वैद्य, आप्पाजीराम, बाबूराव आपटे, सेवकराम, कृष्णाजी नारायण जोशी, यांच्यासारखे किती तरी राष्ट्रहितास जपणारे शेंकडो हस्तक ठिकठिकाणीं पेरून ठेविले; भोंसल्यांची व गायकवाड यांची दौलत तारिली व भयंकर आपत्तींच्या तडाख्यांतून मराठेशाहीचा बचाव केला " वगैरे वगैरे.

चार–पांच वर्षांपूर्वी नाना असे होते आणि पुढें जादूची कांडी फिरल्याप्रमाणें त्यांचे गुण होते ते दोष झाले आणि त्यांच्या राष्ट्रहिताच्या गोष्टी राष्ट्रघातक ठरल्या, ह्या विचित्र ग्रंथाची उपपत्ति, रियासतकारांच्या

महादजीविषयीं झालेल्या बेहद्द अंधभक्तींतच सापडते, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

यापुढें नाना व महादजीची तुलना करून नानांवर जे नैतिक दुराचरणासंबंधीं हल्ले चढविले आहेत त्यांचा विचार करूं. भाग २ पान ४३३ वर रियासतकार लिहितात, " महादजीच्या अंगीं कोणताही दुराचार असल्याचा उल्लेख नाहीं. एवढेंच नव्हे तर उगाच खोटा प्रवादसुद्धां कोठें ऐकण्यांत आलेला नाहीं. .... नाना फडणविसाच्या वर्तनांत अनेक दौर्बल्यें व्यक्त झालीं आहेत. " नंतर पांचसहा ओळी टाकून पुनः ते म्हणतात, " धन, सत्ता, लौकिक व ऐश्वर्य यांच्या परमावधीस पोंचूनही अंतर्बाह्य वर्तनानें तो सर्वथा निर्मळ राहिला ही केवढी कमाई आहे ! " महादजीच्या अनेक नाटकशाळा होत्या, ही गोष्ट सरदेसायांना माहीत आहे काय ? राघव फत्तरगडवालीचें नांव तरी त्यांना स्मरतें काय ? रामशास्त्र्यांचा शिरस्तेदार मोरो हरि भावे याच्याबरोबरच तिची माहिती रियासतकारांना झाली नव्हती काय ? पण सरदेसाई म्हणतील कीं, नाटकशाळा ठेवणें हा त्या वेळीं सार्वत्रिक शिरस्ता होता, किंबहुना वैभवाचें तें एक गमक गणलें जाई. आजच्या दृष्टीनें त्या वेळच्या नीतिकल्पनांकडे पाहूं नका. तर या म्हणण्यांत महादजी अंतर्बाह्य वर्तनानें 'सर्वथा' निर्मळ राहिला, हें आपलें विधान तरी अतिशयोक्त आहे असें त्यांना सपशेल कबूल करावें लागेल. शिवाय त्यांनी एक गोष्ट लक्षांत घ्यावी कीं, जरी नाटकशाळा बाळगणें हा त्या वेळीं मोठासा नैतिक गुन्हा मानण्यांत येत नसे, तरी त्याबरोबरच त्यापासून सर्वथा अलिप्त असणाऱ्यांची किंमतही अधिक मानण्यांत येत असे. ती आजच तेवढी मानतात आणि तेव्हां मानीत नव्हते असें नाहीं. परशुरामभाऊविषयीं उल्लेख करतांना त्याच्या एकपत्नी-व्रताचा उल्लेख येई तो याचकरितां. आणि या दृष्टीनें पाहिलें तर महादजीपेक्षां नैतिक आचरणाच्या बाबतींत नाना

फडणवीसच श्रेष्ठ ठरेल. नाना फडणविसाच्या वर्तनांत अनेक दौर्बल्यें व्यक्त झालीं आहेत, असा मोघम आरोप करतांना सरदेसायांच्या डोळ्या-पुढें नाना फडणविसाचें–आत्मवृत्त असावें. बाळपणांतील त्या व्यसना-बद्दल जाणीव होतांच नानानें किती मनोनिग्रहानें व अनुतापानें त्याचें परिमार्जन केलें, हें त्याच आत्मचरित्रांत वाचावयास मिळतें. बाळपणांतील आपल्या वैषयिक पापबुद्धीचें बीभत्स वर्णन महात्मा गांधींनीं आपल्या आत्मचरित्रांत केलें तर तो मात्र त्यांचा निःस्पृहपणा आणि साधूपणा असें सरदेसाई मानतील. पण तीच गोष्ट तितक्याच अनुतापानें १००–१५० वर्षांनीं नानानें केली तर तसें म्हणावयास मात्र ते तयार नाहींत.

भोप्याची मुलगी

ज्या भोप्याच्या मुलीचें उदाहरण देऊन महादजीचें समर्थन रियासतकारांनीं केलें आहे, त्याच लग्नाची हकीकत रिसायतकार पान ४११ वर देतात ती अशी. "सन १७९२ च्या एप्रिलांत महादजी तुळजापुरास गेला असतां तेथील मंदिरांत सुमारें बारा वर्षे वयाची एक सुंदर पण गरीब स्थितींत वाढलेली व आईबाप नसलेली मुलगी त्याच्या दृष्टीस पडली. लगेच त्यानें तिच्या चुलत्यास दहा हजारांची जहागीर ठरवून दुसऱ्या दिवशीं तिच्याबरोबर लग्न लावलें. नंतर ती त्याजबरोबर असतां महादजी मरण पावला. कांहीं वर्षांनीं वांकडें पाऊल पडून अब्रू बचावण्यासाठीं दतिया येथें तिनें विषप्राशन करून जीव दिला." मनोदौर्बल्य व्यक्त होतांच त्याची खंती वाटून उपास–तापास, व्रतवैकल्यें आणि परमेश्वरपूजन करून देहदंड सोसून, मनाला आळा घालणारा नाना कोणीकडे आणि नाना फडणविसाहून दहापंधरा वर्षे अधिक असलेला, पासष्ट वय झालेला परंतु एका बारा वर्षांच्या अर्भकांकरितां उल्लू होणारा महादजी कोणीकडे? महादजी जबरदस्त सत्ताधीश असल्या-

मुळें मनांत आल्यावर त्या पोरक्या मुलीच्या चुलत्याचें मन वळविणें कठीण नव्हतें हें उघडच आहे. पण मुद्दा तो नाहीं. मुद्दा येवढाच कीं, या प्रतापी शांतनूला एक दिवसही दम निघाऊा नाहीं, इतका तो उल्लू बनला होता. या मनोदौर्बल्याचें प्रायश्चित्त पुढें कसें काय मिळालें, तें रियासतकारांनींच सांगितलें आहे. त्याचा पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं. राजेरजवाड्यांच्या कर्तृत्वाचा विचार करतांना त्यांच्या खासगी चारित्र्याचा विचार करण्याची जरूर नसते, हें आम्हास पटतें व त्या दृष्टीनें महादजीच्या खासगी चारित्र्याकडे आम्ही बारकाईनें पाहिलेंही नसतें. परंतु महादजीला स्तुतीच्या फुंकरावर अलद उडवितांना नाना फडणविसाला रियासतकार बेदरकारपणें पायाखालीं तुडवितात, तेव्हांच असें पाहण्याचा प्रसंग येतो त्याला काय करावें ?

भाग २ पान ५०१ वर रियासतकार लिहितात, " घाशीरामाची मुलगी ललितागौरी हिच्या द्वारां घाशीराम नानाची मर्जी संभाळतो असा बोभाटा झाला. यांत तथ्य काय असेल तें असो. पुणें गॅझीटियर व मोरोबा–कान्होबाचें पुस्तक 'घाशीराम कोतवाल' यांत ही गोष्ट खरी मानली आहे."

एखादी बीभत्स कोटी मुद्दाम सांगावी आणि नंतर असें अमुक अमुक म्हणत होता, असें बोलून कानावर हात ठेवावे इतकी तरी धूर्तता या विधानांत दिसते. परंतु पूर्वग्रहानें पछाडलेल्यांची धूर्तता कायम टिकणारी नसते. अंतरंग कोठें तरी प्रकट व्हावयाचेंच ! कारण पान ४३३ वर ते म्हणतात, " तुळजापुरास भोप्याच्या मुलीवर नजर जातांच महादजीनें तिला योग्य मार्गानें जवळ केलें. घाशीरामाच्या ललितागौरीप्रमाणें गर्ह्य क्रम स्वीकारला नाहीं. " येथें तर नानावरील आरोप खरा मानूनच रियासतकारांनीं त्याच्यावर भाष्य केलें आहे. यावर कोणी अशी कोटी लढवील कीं, ४३३ पानावरच्या मतापेक्षां ५०१ पानावरचें सरदेसायांचे

मत अधिक परिणत व निर्णायक समजलें पाहिजे. पण तें जमणार नाहीं. कारण तें पुढील गुळमुळीत मत जर खरें तर त्याच्या आधीं केलेल्या विधानांत सरदेसाई जी तुलना करून मोकळे झाले आहेत, ती अयुक्तिक म्हणावी लागेल त्याची वाट काय ?

पुराव्याचें प्रामाण्य

नाना फडणविसावरील सदर आरोप मनानें सरदेसाई खरा मानीत असतील तर मानोत, त्याबद्दल आमचें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु इतिहास-काराच्या भूमिकेवर बसल्यानंतर कागदावर काळें करण्यापूर्वी पुरावा प्रमाण का अप्रमाण याकडे लक्ष देणें त्यांना जरूर होतें. " पुष्कळ लोक माझ्या रियासतीवर अवलंबून राहतात यामुळें मला आपली जबाबदारी विशेष जड वाटते...विवेचनाच्या भरांत निदान माझ्या कृतीनें भावी अभ्यास-कांची दिशाभूल होऊं नये अशी धास्ती मला सदैव मनांत बाळगावी लागत आहे, " असें प्रस्तावनेंत सरदेसाई लिहितात. मग ही जबाबदारी हरघडीं बाळगणाऱ्यानें येथें ती कां पाळली नाही ? ज्या आधारावर नाना फडणविसास विषयलंपट सरदेसाई ठरवितात ते आधार कोणते ? तर म्हणे पूना गॅझीटियर व घाशीराम कोतवाल हें पुस्तक ! ! हीं पुस्तकें म्हणजे काय समकालीन पुरावा ? तत्कालीन कागदपत्रें ? का बखरी तरी आहेत ? ४६८ पानावर सरदेसाई म्हणतात, " अशा आख्यायिकांवर भिस्त ठेवून मी पुढील चरित्र लिहीत नाहीं. प्रत्यक्ष घडलेल्या हकीकती ज्या ठिकठिकाणीं नमूद आहेत तेवढ्याच मी जमेस धरणार आहे. " मग हें जर खरें, तर नाना फडणविसाच्या व ललितागौरीच्या वाईट संबं-धाबद्दल ऐतिहासिक कागदपत्रांत सरदेसायांना पुरावा नमूद केलेला कोठें आढळला ?

यावर सरदेसाई यांचें आवडतें उत्तर कोणी देईल कीं, नाना

फडणवीस सर्वसत्ताधीश असल्यामुळें त्या वेळीं जाहीर रीतीनें तसें नमूद करण्याची किंवा लिहिण्याची कोणाची छाती नव्हती. कबूल. परंतु तत्कालीन खासगी पत्रव्यवहाराच्या भाऱ्यांत तरी असा एखादा उल्लेख सरदेसायांना आढळला आहे काय ? पुण्याभोंवतालच्या राहो, पण पुण्या-बाहेरच्या छपन्न संस्थानांतल्या खासगी पत्रांत तरी एखादा उल्लेख आहे काय ? सरदेसायांच्या म्हणण्याप्रमाणें नाना फडणविसाने हजारों शत्रू निर्माण केले व त्यांचा अतोनात छळ केला. यांपैकीं तरी एखाद्यानें असा शिंतोडा नानांवर उडविलेला सरदेसायांना सांपडला आहे काय ? मुख्य समकालीन कागदपत्रांचा पुरावा सोडला तर ' गपिष्ठ ' बखरींत तरी अशी एखादी गप्प नमूद आहे काय ? मग हें कांहींच नसतां एखाद्या ' गपिष्ठ ' साहेबानें लिहिलेल्या ' घाशीराम ' कादंबरीचा आधार घेऊन सरदेसाई नाना फडणविसावर इतका घाणेरडा आरोप करतात यांत कोणत्याना कोणत्या गर्ह्य कोटीनें त्याचा पाडाव करण्याचीच मनःप्रवृत्ति त्यांची दिसते असें म्हणावें लागतें.

कादंबरीमय इतिहास

बाजारबातम्या ऐकून एखाद्या साहेबानें कागदावर नमूद केलेला ' घाशीराम ' जर अस्सल पुरावा म्हणून रियासतकारांना चालतो तर सवाई माधवराव हा एका शिंपिणीचा मुलगा होता अशी माहिती देणारा पोवाडाही त्यांनीं सत्य मानून सवाई माधवरावाबद्दल सिद्धांतमय लिहा-वयास पाहिजे होतें ! मग तें त्यांनीं खरें कां मानलें नाहीं ? ललितागौरी या नांवाची एक खरीखुरी मुलगी घाशीराम कोतवालाला होती असा तरी आधार सरदेसायांना सांपडला आहे काय ? आणि तसा पुसटताही आधार सांपडलेला नाहीं त्याअर्थी महादजी शिंद्याची ' लालनबैरागीण ' व नाना फडणविसाची ' ललितागौरी ' या सारख्याच काल्पनिक मानणें

भाग आहे. सारांश, नाना फडणविसासंबंधीं लिहितांना इतिहासकाराला आवश्यक असणाऱ्या निर्विकार न्यायाधिशाची समबुद्धि तर रियासत-कारांना दाखवितां आली नाहींच; पण पक्षकाराची बाजू जोरानें मांडणाऱ्या वकिलाचें कौशल्यही त्यांना प्रकट करतां आलें नाहीं असें म्हणावें लागतें. उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून तरी नाना फडणविसाच्या निष्कलंक चारित्र्याला डाग लागू शकत नाहीं येवढेंच आमचें म्हणणें.

—४—

नाना फडणविसाच्या जाचामुळें सवाई माधवरावानें आत्महत्या केली हा सरदेसायांचा सिद्धांत. या सिद्धांताच्या परिपुष्ट्यर्थ त्यांनीं जे आधार घेतले आहेत त्यांची छाननी करणें आवश्यक आहे. पहिला आधार 'एका लेखकाचा.' या लेखकाच्या लेखावर सरदेसायांची फारच भिस्त दिसते; कारण अवतरण संपतें नसंपतें तोंच अधीरपणाने "यावरून एक गोष्ट निश्चित ठरते कीं, नानाचा जाच माधवरावास दुःसह होत चालला होता हें त्याच्या आजाराचें आद्यकारण" असा सिद्धांतही त्यांनीं ठोकून दिला आहे. ज्याच्या शब्दावर सरदेसायांचा इतका भरवसा तो मनुष्य महादजीसारखा, सखाराम हरीसारखा निदान सचिवासारखा कोणी तरी मातबर मनुष्यच असला पाहिजे आणि त्याची माहिती सर-देसायांना चागलीच असली पाहिजे असें कोणासही वाटणें साहजिक आहे. पण सरदेसाई त्याचा 'एक लेखक' असा मोघम उल्लेख करतात आणि त्याचा ठावठिकाणा सांगत नाहींत. इतर वेळीं सामान्य गोष्टींत असा मोघम हवाला त्यांनीं दिला तर कोणी कदाचित् तो मानील परंतु

---

* केसरी, १० जून १९३०

ऐतिहासिक सत्यनिर्णयाच्या वेळीं आणि विशेषतः वरीलसारख्या आरोपाचे वेळीं तो कोणी मानणें शक्य नाहीं.

श्रीयुत सरदेसाई यांनीं जरी तो आधार कोठून घेतला हें लिहिलें नसलें, तरी तो राजवाडे खंड १० पान ३३६ पत्रांक ४१५ यांत आहे. त्यांत "शके १७१७ चे सालीं श्रीमंत माधवराव नारायण पंतप्रधान कैलासवासी झाले. याचें कारण ऐसीजे" अशी सुरुवात करून "मार्गशीर्ष शु. ५ रविवारी १३ घटका रात्रीं श्रावण नक्षत्रावरी बाजीरावास वस्त्रें अलंकार देऊन दुसरे दिवशीं सोमवारीं प्रातःकाळीं शहरांत बहुत समारंभ करून वाड्यांत आणिलें. शके १७१८ नल नाम संवत्सरे सन १७९६ मार्गशीर्ष मास" असा शेवट केला आहे. सदर हकीकत मुळांत जो कोणी वाचील त्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं, लेखक बाजीरावाचा पक्षपाती आहे. अर्थात् नानाचे विरुद्ध पक्षांतील आहे. त्यानें बाजीराव खडकीच्या मुकामास आल्यानंतर नानाची व त्याची जी भेट झाली तिचें वर्णन खालील शब्दांनीं केलें आहे. "नानांनीं विनंती केली कीं, मी अपराधी आहे. त्याचें उत्तर बाजीरावानें केलें कीं, तुमचे अपराध तुम्हास माफ केले. स्वस्थ असावें. याप्रमाणें बोलून मस्तकी हात ठेवून अभयदान दिलें." अर्थात् सवाई माधवरावाच्या जाचासंबंधींचा नाना फडणविसावरील आरोप या लेखकाच्या शब्दावर खरा मानणें केव्हांही युक्त होणार नाहीं. हें तर झालेंच, पण सदर लेखाचा लेखक कोण आहे हें जोंपर्यंत कळलें नाहीं तोंपर्यंत त्याचा मुख्य आधार घेऊन अनुमानाची इमारत बांधणें युक्त नाही, निदान इतिहास लिहिण्यास बसणाऱ्याला तरी युक्त नाहीं, असें आम्हास वाटतें.

शिवाय वरील लेखकाचें जें अवतरण म्हणून सरदेसाई यांनीं घेतलें आहे त्यावरूनही त्या लेखकास सवाई माधवरावाच्या मृत्यूविषयीं

खरी माहिती नाहीं असेंच म्हणावें लागतें. कारण तो सवाई माधवरावाच्या आजाराचा उल्लेखही करीत नाहीं. भाद्रपद मासापासूनच सवाई माधवरावास ताप येऊं लागला होता, वातविकृति उत्पन्न झाली होती व तेंच दुखणें मृत्यूपर्यंत कायम होतें. मृत्यूच्या आधीं एकदोन दिवस दसऱ्याच्या स्वारीस जातांनाही त्याच्या अंगांत ताप होता या गोष्टी समकालीन अस्सल पत्रांच्या पुराव्यानें सिद्ध आहेत. असें असतां सदर लेखक त्या आजाराचा उल्लेखही करीत नाहीं, व निवळ असंतोषी म्हणूनच त्रयोदशीचे दिवशीं माधवरावानें माडीवरून उडी टाकली असें तो लिहितो. सारांश, या लेखकाचा लंगडा आधार घेतांना सरदेसाई यांनीं खालील गोष्टी केल्या :—

१. पुरावा पारखून घेतला नाहीं. २ पुराव्याचा ठावठिकाणा प्रकट केला नाहीं. ३ अत्यन्त लंगडचा व त्याही एकाच आधारावर सिद्धान्ताची कमकुवत इमारत बांधली.

सरदेसायांचा दुसरा आधार पेशवे शकावलींतील एका नोंदीचा. तो आधार कशाकरितां घेतला हेंच कळत नाहीं. कदाचित् त्यांतील एका गोष्टीच्या उल्लेखाकरितां घेतला असावा. तो उल्लेख असा. " कोजागरीचे दिवशीं सावध असतां कारभारी यास बोलावून म्हणो लागले कीं, आमचे शरीराचा भरंवसा नाहीं, दादासाहेबांचे पुत्रास आणवावें; तों सायंकाळीं अवतार समाप्त झाला. " म्हणजे बाजीरावास कैदेंतून सोडवून स्वतःजवळ आणावें ही सवाई माधवरावाची इच्छा नाना फडणविसानें पूर्ण न करतां बाजीरावाची कैद चालू ठेवली, या सरदेसायांच्या आरोपापुरतीच फार तर पुष्टि या अवतरणानें मिळेल. परंतु नाना फडणविसाच्या जाचामुळेंच माधवरावानें आत्महत्या केली, या त्यांच्या विधानाला तर हा उतारा अगदीं विरुद्ध जातो. कारण नानाच्या जाचासंबंधीं किंवा पेशव्याच्या असंतोषासंबंधीं त्या नोंदींत अवाक्षर नाहीं. मग आत्महत्या

केली यासंबंधीं तर नाहींच नाहीं. तेथें स्पष्ट वाक्य असें आहे " विजयादशमीचा उत्सव करून आल्यानंतर द्वादशीस दिवाणखान्यांत असतां अकस्मात् मेघडंबरी बंगल्याचे पायरीवरून कारंजाचे नळीवरून खालीं पडले. " 'अकस्मात् पडले' हे शब्द वाचकांनीं लक्षांत ठेवावे.

सरदेसायांचा तिसरा आधार म्हणजे मल्हारराव चिटणिसाची बखर. या बखरीचा आधार घेतांना तर सरदेसायांनीं पुराव्याच्या योग्यतेकडे आक्षेपार्ह दुर्लक्ष केलें आहे. कारण मल्हारराव चिटणीस हा बोलून चालून सातारकर छत्रपतींचा पक्षपाती. छत्रपतींची या काळीं काय स्थिति होती व ते पेशव्याविरुद्ध म्हणजे पर्यायानें नाना फडणविसाविरुद्ध किती जळफळत व पेशव्यांना किती पाण्यांत पाहात हें प्रसिद्ध आहे त्यामुळेंच त्यांचे पक्षपाती अशा चिटणिसाचा लेख या बाबतींत ग्राह्य धरण्यास अपात्र आहे. शिवाय व्यक्तिशः या मल्हार रामराव चिटणिसाला नाना फडणविसाविषयीं द्वेष बाळगण्यासारखें कारण घडलेलें होतें. मल्हाररावाचा बाप रामराव जिवाजी याची चिटणिशी नाना फडणविसानें दूर करून लक्ष्मणराव गोविंद या रामरावाच्या चुलत भावास दिली होती. ही हकीकत स्वतः मल्हार रामरावानेंच आपल्या बखरींत लिहिली आहे. छत्रपतींची हलाखी व कडक बंदोबस्त, चिटणीस घराण्याची छत्रपतींशीं असलेली एकनिष्ठा व खुद्द चिटणिसांचा वैय्यक्तिक खासगी द्वेष, इत्यादि गोष्टींमुळें या प्रश्नावर मल्हारराव चिटणिसाचें मत ग्राह्य धरणें अप्रशस्त होय. चिटणिसांचें लिहिणें सामान्यतः जबाबदारीचें असेल. पण या बाबतींत तें तसें नाही हें सरदेसायांनीं लक्षांत घ्यावयास पाहिजे होतें.

सरदेसायांचा चौधा आधार म्हणजे ग्रँटडफ. चिटणिस सातारचे

आणि ग्रँटडफहि सातारचाच. सरदेसाई लिहितात " त्यानें तपास व कागदपत्र यांच्या आधारानें जें लिहून ठेविलें तें वरील चिटणिसाचे लेखास मिळतें आहे. " ग्रँटडफनें माहिती मिळविली, तपास केला व कागदपत्र पाहिले. पण त्यानें त्यांचे आधार दिलेले नाहीत. शिवाय ग्रँटडफनें कागदपत्र पाहून इतिहास लिहिला आहे ही गोष्ट जरी खरी असली तरीहि आजवर संशोधकांनीं त्याच्या अगदी ढोबळ ढोबळ चुकाहि भरपूर दाखविल्या आहेत. सवाई माधवरावाच्या आजाराचाहि उल्लेख तो करीत नाहीं. उलट तो असें लिहितो. " त्याचा मित्र बाजीराव यास अधिक उपद्रव झालेला ऐकल्यानें तो फारच कष्टी झाला; मग त्याने आपली बसावयाची खोली सोडून बाहेर जाणें अगदी टाकले. तो कधी दरबारास येईना. त्यावरून लोकांत असें प्रसिद्ध झालें की, श्रीमंतास ज्वर येतो म्हणून ते दरबारास येत नाहीत. " सारांश, ग्रँटडफचा आधार पुष्ट्यर्थ घेणें युक्त नाही.

सरदेसाई यांचा पांचवा आधार म्हणजे " पेशवाईची अखेर " ही शकावलीवजा बखर. त्या आधारांतील एकच वाक्य घेतों म्हणजे बखरकारांचें विधान कसें विपर्यस्त व अतिशयोक्त आहे तें कळून येईल. तो लिहितो " द्वादशी रविवार गणपतीचे दिवाणखान्याचे दुसऱ्या मजल्यावर जाऊन तेथून खालीं, दाक्षिणेचे अंगांस कारंजी होती त्यावर उडी टाकली." तरी बरें, बखरकाराने आणखी एखादा मजला वाढविला नाही ! त्याचा रोख माधवराव जीव देण्याकरितां दोन मजले चढला व तेथून त्यानें उडी टाकली ! अर्थात् उपलब्ध इतर बखरींशींहि हें लिहिणें मिळतें नाही.

काव्येतिहाससंग्रहांतील ले. ३३२ हाहि एक सरदेसायांचा आधार आहे. त्यातील दोन–चार ओळींचें अवतरण घेतांनाहि सरदेसाई यांनीं त्यांत निराळीं वाक्यें घातलीं आहेत. मूळ नोंद अशी आहे " सन

सीत तिस्सैन. खासा आश्विन शु. १२ माडीवरून पडून अत्यवस्थ झाले. ते शु. १५ कैलासवास केला. राज्याचा शेवट नानासाहेबांचे वंशाचा झाला. ब्रह्मप्रळय होईल रावसाहेब बोलले. त्याप्रमाणे पुढें निदर्शनास आलें. " पण सरदेसायांनी तेंच अवतरण कसें केलें आहे पाहा. " कोजागरीच्या दिवशीं प्रकृत सावध असता कारभारी यांस बोलावून म्हणो लागले की आपले शरीराचा भरंवसा नाही. दादासाहेबाचे पुत्र जुन्नरी आहेत आणवावे. राज्याचा शेवट नानासाहेबाचे वंशाचा झाला. ब्रह्मप्रळय होईल तो अवतार समाप्त झाला. " आधाराकरितां अवतरण घेतांना त्यांत दुसरीकडचीं वाक्यें घुसडून देऊन सरदेसायांनी त्याची किंमत कवडीमोल करून टाकली आहे. पण काव्येतिहास संग्रहांतील मूळ नोंदच सरदेसायांचे विरुद्ध जाणारी असल्यामुळें अशी अनुचित ढवळाढवळ करण्याचा मोह त्यांना पडला असेल काय ? कारण त्या नोंदींत माधवराव " माडीवरून पडून अत्यवस्थ झाले " असें लिहिलें आहे. " अत्यवस्थ होऊन माडीवरून उडी टाकली " असें नाही. शिवाय त्यांतील शेवटचें वाक्य असें आहे, " ब्रम्हप्रळय होईल. रावसाहेब बोलले. त्याप्रमाणे पुढे निदर्शनास आले." म्हणजे ब्राह्मणबादशाही संपल्यावर पंचवीसतीस वर्षांनंतर ही शकावली किंवा सनावली रचली गेली हें उघड आहे.

पण ही सर्व भरती बखरपुराव्याची झाली. ती कशी अविश्वसनीय आहे हें आपण पाहिलेंच. समकालीन अस्सल पत्राचा आधार वरील बखरीपेक्षां केव्हांहि अधिक विश्वसनीय मानावा लागतो. आणि तशा तीन पत्रांचा सरदेसायांनीं उपयोग केलेला आहे. त्याचा विचार करूं. पहिलें पत्र बाळाजी रघुनाथ व केशव कोंडाजी या दोघां कारकुनांनी हैद्राबादेस गोविंदराव काळ्यांना लिहिले आहे. पत्र माधवरावाच्या मृत्युनंतर लगेच एकदोन दिवसांत लिहिलेलें आहे. तें स्पष्ट सांगतें की माधवरावाला तापांत वात झाला होता व वायूच्या

भिरडींत त्यानें खालीं उडी टाकली. या पत्राचा आधार घेतांना आगाऊच वाचकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा सरदेसायांनीं प्रयत्न केला आहे. सरदेसाई लिहितात " तिसरे दिवशीं रविवारीं अपघात झाला त्याचें पत्र हैद्राबादेस गोविंदराव काळ्यांकडे गेलें. त्यांत ' उडी टाकली ' असें स्पष्ट वाक्य आहे. पण उडी टाकली या शब्दांच्या मागें वाताच्या भिरडींत असेही स्पष्ट शब्द आहेत त्यांची वाट काय ! उडी टाकली या वाक्याचा अर्थ मुद्दाम आत्महत्या केली असा होईल. परंतु 'वाताच्या भिरडींत' उडी टाकली याचा अर्थ अगदीं स्पष्टपणें त्याच्या उलट होतो हें सरदेसायांना कळत नाहीं काय ? पण डोळे उघडून पक्षपाताच्या कड्यावरून मुद्दाम उडी टाकायला सरदेसाई तयार झाले असतां त्यांना कोण आवरणार ?

दुसरें पत्र तुकोजी होळकरानें आपला मुलगा काशीराव यास लिहिलेलें. त्यासंबंधानें सरदेसाई लिहितात " तुकोजी होळकर जरी प्रकृतीनें पंगु व जर्जर होता तरी त्यानें अपघाताच्याच दिवशीं पेशव्यास भेटून मुलगा काशीराव होळकर यास लिहिलेलें पत्र या बाबतींत पहिल्या प्रतीचा पुरावा असें मानतां येईल. " आणि त्या पत्रांत काय आहे ? तर ' श्रीमंत उठून उभे ठाकले तों भोंड येऊन सावर न धरतां खालीं दक्षिणेकडे कारंजे हौद आहेत तेथें येऊन पडले. " म्हणजे सरदेसाई जें अव्वल प्रमाण मानतात तेंच त्यांच्या आवडत्या विधानाला खोडून काढतें असें आहे !

तिसरें पत्र खुद्द नाना फडणविसाचें. पण सरदेसायांच्या मतें नाना फडणवीसच आरोपी असल्यामुळें त्याचें पत्र आम्ही विचारांत घेत नाहीं. त्यांत वायूंत श्रीमंत पडले असेंच म्हटलें आहे.

चौथें पत्र पटवर्धनी कारकुनाचें. त्याचा आधार घेतांना सरदेसायांनीं घालमेल केली आहे. " सकाळीं दोन–तीन घटका दिवसास

a 333

श्रीगणपतीचे दिवाणखान्यावर राव निजत होते. तेथून पूर्वेच्या अंगचे कवाड उघडून खालीं उडी टाकली." हें वाक्य धोंडो बापूजी जोशाच्या पत्रांतलें आहे; व "आमची वेळ जवळ आली. तुम्ही आमचे नांवाचा दुसरा करणें अशीं अनेक भाषणें अन्याजवळ केलीं तीं ते समयीं खरीं वाटलीं नाहींत, आतां खरीं वाटतात" हीं वाक्यें परशुराम-भाऊच्या पत्रांतील आहेत. पहिलें पत्र २६ ऑक्टोबरचें आहे व दुसरें पत्र ५ नोव्हेंबरचें आहे. या दोन पत्रांतील मजकूर सोईप्रमाणें एकत्र करून सरदेसायांनीं मांडला आहे. सोईप्रमाणें म्हणण्याचें कारण मुद्द्याचीं वाक्यें तेवढीं त्यांनीं गाळलीं आहेत. तीं वाक्यें अशीं आहेत. "श्रीमंत राजश्री रावसाहेब याजला शरीरीं समाधान नव्हतें. औषधी उपाय चालत होते. चित्ताची स्थिरता अलीकडे नव्हती" सारांश, समकालीन पटवर्धनी पत्रांचा आधार सरदेसायांनीं घेतला आहे तोहि त्यांच्या विरुद्ध जातो. कै. खरे स्पष्ट म्हणतात "सवाई माधवरावानें त्रासून प्राण दिला असा डफ्साहेबांच्या लिहिण्यांतला अभिप्राय आहे. त्यांत तथ्यांश दिसत नाहीं. पटवर्धनांच्या दौलतींतील माणसें प्रसंग साधल्यास नानांची आंतून कुचेष्टा करणारीं होतीं. त्यांच्या पत्रांतून अगर परशुरामभाऊ यांच्या लिहिण्यांतून या बाबतींत अवाक्षरहि निघालेलें नाहीं."

'सर्व गोष्टी यथास्थित चाललेल्या नाहींत. कांहीं तरी विपरीत प्रसंग घडणार अशा प्रकारची मोघम समजूत लोकांत त्या वेळीं उत्पन्न झाली होती हेंहि निश्चित आहे" असें म्हणून एका शकावलींतील त्या सालांत घडलेल्या कांहीं ठळक गोष्टी सरदेसाई यांनीं दिल्या आहेत. उदाहरणार्थ कार्तिकस्वामीचे देवळावर वीज, शनवारवाड्यास आग आणि पुण्यांत दुष्काळ इत्यादि. वर्ण्य विषयाला उठाव देणारी पार्श्वभूमि तयार करणें हें काव्यांत शोभतें, इतिहासांत नाहीं! ही निवळ फसवाफसवी आहे. "अशी लोकांची मोघम समजूत झाली होती" असा लोकांच्या मनःस्थितीवर

आरोप करणें चूक आहे. तसें एखादें पत्र सरदेसायांनीं काढून दाखवावें. एखादी अनिष्ट गोष्ट घडल्यानंतर भावनाप्रधान किंवा श्रद्धाळू लोक ती गोष्ट घडण्याच्या आधीं घडलेले अपशकून शोधीत बसतात व त्यांचा कार्यकारण संबंध जोडून देतात. किंवा कवि असेल तर तो कलाविलासा-करितां अशा गोष्टींची मदत घेतो. १७९५ सालांत सवाई माधवरावाचा अपघातानें मृत्यु झाल्यानंतर लोकांना मागल्या अशुभ गोष्टी आठवल्या असतील. पण त्या माधवरावाच्या मृत्यूनंतर. सवाई माधवरावाच्या मृत्यूच्या आधीं वरील विजेबद्दल, दुष्काळाबद्दल किंवा आगीबद्दल "पुढलि अनिष्ट सूचक अपशकून" म्हणून कोणी उल्लेख केल्याचें पत्र असल्यास सरदेसायांनीं काढून दाखवावें.

पण हेंहि असो. सरदेसायांच्या म्हणण्याप्रमाणें वरील देवळावर पडलेल्या विजेचा व शनवारवाड्याच्या आगीचा अर्थ, त्या वेळच्या श्रद्धाळू लोकांनीं अपशकुनासारखाच केला असें गृहीत धरलें तरी, फार तर असें सिद्ध होईल कीं लोकांनीं मानलेल्या अपशकुनांचा ठोकताळा पुढें सवाई माधवरावास झालेल्या अपघाताच्या रूपानें आला. पण त्यामुळें तो अपघात नानाच्या झालेल्या जाचामुळें आत्महत्येच्या रूपानें घडून आला हें सरदेसायांचें विधान कसें सिद्ध होणार ?

—५—

श्रद्धेची दुर्बीण आणि द्वेषाची सूक्ष्मदर्शिका एकदां मनुष्याच्या डोळ्याला लागली म्हणजे असलेले किंवा नसलेले गुणदोषही अतिशय मोठे व अतिशय सूक्ष्म दिसूं लागतात. महादजीबद्दल रियासतकार म्हणतात,

---

* केसरी, २१ जून १९३०

'श्रावण मासाच्या पारायणास महादजीनें भागवताचें पुस्तक नकल करून आणिलें त्यांत टीका नव्हती. सबब पुनः सटीक करून पाठवावें अशी त्यानें मागणी केली. त्यावरून त्यास संस्कृत येत असावे, निदान चांगलें समजत असावें अशी खात्री वाटते.' रियासतकारांची कशी लवकर सुलभतेनें खात्री पटते याविषयीं वाचकांची मात्र खात्री पटण्यास हरकत नाहीं ! पारायणाकरितां भागवत नकल करून आणलें पण तें स्वतः वाचण्या-करितां हें कशावरून ? पुराणिकाकडून श्रवण करण्याकरितां कशावरून नाहीं ? बरें, सटीक करून मागविलें पण ती टीका संस्कृतांतच कशावरून होती ? प्राकृतांत म्हणजे मराठींत कशावरून नव्हती ? शिवाय ती संस्कृतांत असली तरीही महादजी चांगला संस्कृत जाणणारा कसा ठरतो ? पूर्वी राजेरजवाडे लांबलांबून ग्रंथांच्या नकला करून आणवीत. तें खर्चाचें काम असे व अशीं कामें श्रीमंत किंवा राजेरजवाडे लोकच करीत. त्यांच्या पदरच्या शास्त्री मंडळींना त्यांचा उपयोग होई. उपलब्ध साधनपुस्तकांत असे पुष्कळ उल्लेख येतात पण तेवढ्यावरून स्वतः ते सरदार किंवा श्रीमंत लोक तीं पुस्तकें वाचून अभ्यासीत असें ठरणार नाहीं. महादजी-संबंधीं त्याला संस्कृत येत होतें, किंवा तो संस्कृत वाचीत बसत असे, निदान शास्त्री लोकांशीं वादविवाद करीत असे, हे किंवा अशासारखे चार-दोन उल्लेख स्वतंत्र रीतीनें सांपडले असते तर कदाचित् आम्हीही कबूल झालों असतों. महादजीने कांहीं गुरुभक्तिपर पदें केल्याचें प्रसिद्ध आहे म्हणतात. पण तीं हिंदुस्थानी दोहऱ्यासारखीं आहेत; आणि समजा तशीं तीं केलीं असलीं तरी त्याला संस्कृत यावें लागतेंच असें नाही. अक्षर-ओळख नसलेल्याहि सामान्य बायका पदें, आरत्या, गाणीं रचूं शकतात हें आजहि आपण पाहतो. महादजी भाविक होता, पुराण श्रवण कर-ण्याचा त्याला हव्यास होता, किंवा फारच झालें तर तो चांगला बहुश्रुत होता, असें म्हटलें असतें तर हरकत नव्हती. पण आपल्या पुरा-

भू. ८

णिकाकरिता सटीक भागवत करून आणविलें यावरून महादजीच्या संस्कृत-प्रवीणतेबद्दल रियासतकारांची खात्री पटावी याचें आश्चर्य वाटतें. ही अनुमानपरंपरा जशी विचित्र तशीच तिची कारणपरंपराहि विचित्र आहे. कारण वरील खात्रीचें विधान केल्यानंतर रियासतकार त्याला पूरक म्हणून खालील वाक्यें लिहितात, 'त्याचे व त्याच्या समस्त बंधूंचीं हस्ताक्षरें तर उत्कृष्ट लेखकांसारखीं घोटीव दिसतात.' जणुं कांही वळणदार अक्षराचा व विद्वत्तेचा कार्यकारणसंबंधच आहे. पण तीं अक्षरेंहि बिचारी संस्कृत नागरी लिपींतील नसून मोडी लिपींतील आहेत हें रियासतकारांच्या लक्षांत नसावें !

अंधभक्तीचें दुसरें उदाहरण

अंधभक्तीचें दुसरें उदाहरण पहा. सरदेसाई लिहितात, "महादजीचा वर्ण निस्सीम काळा असूनही चेहऱ्यावर बुद्धीची व औदार्याची झाक किती होती हें इटालियन चित्रकारानें शेवटीं शेवटीं काढलेल्या त्याच्या सुप्रसिद्ध तसबिरीवरून चांगलें व्यक्त होतें." आम्हीही ती तसबीर पाहिली आहे. रियासतकारांना त्यांत औदार्यसुद्धां दिसलें तर तो त्या चित्रकारापेक्षां रियासतकारांच्या श्रद्धाळू मनाचाच गुण अधिक समजला पाहिजे. पूर्वग्रहानें पछाडल्यानंतर मनुष्य कोणत्याही गोष्टीकडे दृष्टि टाकू लागला म्हणजे कशी मौज होते याचें असेंच एक उदाहरण खरे यांच्या नाना फडणविसाच्या चरित्रांत आलेलें आहे. मेजर मॅक्डोनेल्ड यांच्या नानाच्या बखरींत लिहिलें आहे कीं, "नाना व धाकटे माधवराव पेशवे यांच्या तसबिरी आहेत त्या तसबिरीमध्ये दोघांच्या चेहऱ्याची अगदीं साम्यता आहे. ही गोष्ट अगदीं चमत्कारिक आहे. नाना गंगाबाईशीं आसक्त होते असें जे लौकिकांत प्रसिद्ध आहे त्यास हें सबळ कारण आहे." त्यावर टीका करतांना खरेशास्त्री लिहितात, "चेहरा किंवा इतर अंगलट ह्यांच्या

साहश्यावरून एखाद्याच्या आईबापांचा निर्णय करणें, हें अत्यंत भ्रामक आणि धाडसाचें आहे. या पद्धतीचा स्वीकार केला तर कोण प्राणी कोणाच्या पितृस्थानीं जाऊन बसेल याचा कांहीच नेम सांगवत नाही. तथापि वादासाठी ही पद्धति गृहीत धरली तरी सुद्धां मेजर मॅकडोनेल्ड यांचें विधान टिकण्यासारखें नाही. इंग्रजांचा रेसिडेंट सर चार्लस मॅलेट यानें सवाई रावसाहेब व नाना फडणीस यांच्या तसबिरी काढविल्या आहेत. त्या अस्सल प्रति मेणवली येथें असून त्याच्या नकला पुण्याच्या कौन्सिल हॉलांत आहेत. माणसा-माणसांच्या चेहऱ्यांत जें साम्य असावयाचें त्यापेक्षां अधिक साम्य आम्हांस या दोन तसबिरींत कोठें दिसत नाहीं." ज्या पूर्वग्रहानें सवाई माधवराव नाना फडणविसासारखा मॅकडोनेल्डला दिसला त्याच पूर्वग्रहामुळें महादजीच्या चेहऱ्यांत रियासतकारांना औदार्य दिसलें एवढाच त्यांत अर्थ समजावयाचा.

महादजी आणि महात्माजी

पान ४३२ भाग २—"मनसूरशहा किंवा दत्तनाथ ह्यांच्या योग्यतेचे साधु पुरुष तत्कालीन ब्राह्मण मुत्सद्यांचेसुद्धां गुरु नव्हते. नानाजवळ चहा होत असे ती मुरलीधर ज्योतिष्यासारख्या लोभी ब्राह्मणाची." नानाविषयींच्या छिद्रान्वेषी बुद्धीचें सरदेसाई यांनीं येथें खासें प्रदर्शन केलें आहे. आध्यात्मिक गुरु करतांनाही तो मुसलमानच निवडावा, असें सरदेसाई यांचें म्हणणें आहे काय? का मुसलमान गुरु करण्यांत हिंदु–मुसलमानांची एकी करण्याची उदार दृष्टि महादजीनें प्रकट केली, असें सरदेसाई यांना भासवावयाचें आहे? ज्याला जसा अनुभव येतो त्याप्रमाणेंच कोणीही कोणाचा शिष्य बनतो किंवा उपदेश घेतो. महादजीला मनसूरशहाचा कांहीं अनुभव आला असेल म्हणून तो त्याचा शिष्य बनला हें ठीक आहे. पण तत्कालीन ब्राह्मण मुत्सद्यांनीं

त्याला गुरु केला नाहीं यामुळें ते मूर्ख हें कसें काय सुसंगत आहे ? महादजीची सरदारी सुरवातीस गेली तेव्हां तो खिन्न होऊन या गुरूची सेवा करूं लागला असता, तुला लवकरच सरदारी प्राप्त होईल, असें मोघम त्यानें सांगितलें व तें खरें ठरलें. यापलीकडे मनसूरशहाच्या चमत्कारांची कांहीं माहिती सरदेसायांना आहे काय ? असल्यास त्यांनीं जरूर सांगावी. पण आपल्या आवडत्या महादजीनें त्याला गुरु केलें त्याअर्थी तो परात्परच असला पाहिजे, आणि अशा गुरूचा परामर्ष ज्याअर्थी ब्राह्मण मुत्सद्द्यांनीं घेतला नाहीं किंवा आपापला गुरु मनसूरशहाशीं जोडून पाहिला नाहीं, त्याअर्थी त्यांना गुणग्राहकता नव्हती, असलें हें तर्कशास्त्र आहे ! शिवाय 'ब्राह्मण मुत्सद्द्यांचे सुद्धां गुरु नव्हते' या म्हणण्यांत खोंच काय ? महादजीखेरिज इतर मराठे सरदारांनींही त्याला गुरु म्हणून मानल्याचा उल्लेख नाहीं. तेव्हां मनसूरशहाला गुरु न मानण्यांत ब्राह्मणांइतके मराठेही दोषी ठरतात, हें सरदेसायांच्या लक्षांत राहिलें नाहीं. वास्तविक मनसूरशहा फकीर तो काय आणि महादजी त्याचा शिष्य झाला म्हणून तरी काय, इतिहासांत महादजीची योग्यता ठरवितांना त्याची काडीइतकीही किंमत नाहीं. समजा, महादजी मनसूरशहाचा शिष्यच झाला नसता, तरीही सरदेसायांनीं त्याच्या मार्कांतला एखादा तरी मार्क काटला असतां काय ? पण ही सगळी तर्कपरंपरा त्या चांडाळ नाना फडणविसामुळें करावी लागली !

भाग २ पान ४३४ वर महादजीसंबंधीं सरदेसाई लिहितात, " महादजीनें हिंदु—मुसलमानांस अत्यंत समतेनें वागविलें. स्वधर्मावर पराकाष्ठेची श्रद्धा असूनही त्यानें मुसलमानांस यत्किंचित् दुखविलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर काशी प्रयाग वगैरे हिंदूंचीं क्षेत्रें मुसलमानांच्या ताब्यांत असलेलीं आपल्या हस्तगत करावीं अशा नानाची पुण्याहून महादजीस सारखी टोंचणी असतांही त्यानें त्या गोष्टीकडे कानाडोळाच केला. शिवाय औरंगजेबाच्या

वेळचा हिंदु–मुसलमानांचा धार्मिक द्वेष या शंभर वर्षांत पार मावळून गेला होता. त्यामुळें धर्माचरण किंवा न्यायनिवाडा या बाबतींत मुसलमानी राज्यांत हिंदूंस किंवा हिंदु राज्यांत मुसलमानांस विशेषसा जाच किंवा भेदभाव सोसावा लागत नसे. " नंतर यापुढें लखनौच्या वजिरानें हिंदूंस दिलेल्या न्यायाचें एक उदाहरण त्यानीं उद्धृत केलें आहे.

हिंदु–मुसलमानांशीं समता

वरील प्याऱ्यांत सरदेसायांनीं म्हटल्याप्रमाणें "धर्माचरण किंवा न्यायनिवाडा या बाबतींत मुसलमानी राज्यांत हिंदूंस किंवा हिंदु राज्यांत मुसलमानांस विशेषसा जाच सोसावा लागत नसे" अशी जर सार्वत्रिक स्थिति होती तर 'महादजीनें हिंदु–मुसलमानांस अत्यंत समतेनें वागविलें' असें सांगण्यांत तरी स्वारस्य काय राहिलें ? मग तें कांहीं महादजीचें विशेष सांगण्यासारखें कर्तृत्व होत नाहीं. दुसरें असें कीं, सरदेसाई त्या वेळीं हिंदुमुसलमानांचा धार्मिक द्वेष पार मावळून गेला होता असें म्हणतात. पण त्यांनींच भाग १ पान ३१८ वर उद्धृत केलेला उतारा त्यांच्या लक्षांत राहिला नाहीं ! ज्या काळासंबंधीं सरदेसाई लिहितात त्याच काळांतला बाबूराव वैद्य, नागपूरचा वकील, १७७९ त लिहितो, "नबाब परकी. हिंदु–मुसलमान दोन पक्ष. त्यांचा वैरभाव भगवंतनिर्मित आहे." राजकीय व्यवहारांतर्ल ही स्थिति आणि मनःप्रवृत्ति, तर त्या वेळच्या धर्मभोळ्या काळांत धार्मिक बाबतींत तर ती दसपट जास्त प्रभावी असेल हें सांगावयासच नको.

हिंदूंचीं धर्मक्षेत्रें

रियासतकार आजच्या काळचा चष्मा लावून बसलेले. त्यांना महादजी म्हणजे महात्मा गांधींचाच पूर्वावतार वाटतो. पड खाऊन आणि आपला न्याय्य हक्क गमावूनही मुसलमानांना खूष ठेवणाऱ्या गांधींचा

अवतारच महादजी शिंदे होता, असें त्याना वाटत असावें. एरवीं काशी-प्रयागासारखीं हिंदु धर्मक्षेत्रें मुसलमानांच्या ताब्यांतून सोडविण्याबद्दल पुणें दरबाराकडून सारखी टोचणी असतांही त्यानें त्याच्याकडे काणाडोळा केला, असें समर्थन करण्याची बुद्धि त्यांना झाली नसती. परक्यांच्या हातांत गेलेलीं धर्मक्षेत्रें सोडविण्याचा प्रश्न मराठ्यांना किती जिव्हाळ्याचा वाटत होता, तें इतिहासांत प्रसिद्ध आहे. शिवाजी-पासून त्याकरितां तळमळ होती. नानासाहेबानें त्याकरितां स्वतः जाऊन धडपड केली. थोरल्या माधवरावाच्या मरणसमयीं कारभाऱ्यांकडून शपथा घेऊन अवश्य करण्याचीं जीं कामें ठरलीं त्यांत हें धर्मक्षेत्रें सोडविण्याचें कलम आहे. " मुबदला दाहा पांच लाखांची जहागीर द्यावी लागली तरी द्या, पण तीर्थक्षेत्रें सोडवा " अशी त्यांत आज्ञा आहे. नाना फडण-विसाची तर त्या बाबतींत सारखी टोचणीच महादजीला लागली होती असें सरदेसाईच सांगतात. मग असें असतां महादजीनें मुद्दाम काणाडोळा केला तर महादजी दोषी ठरत नाहीं काय ? या रीतीनें तो धर्मनिष्ठेच्या बाबतींत कमकुवत व धन्याचे हुकूम पाळण्याच्या बाबतींत उर्मट ठरत नाहीं काय ?

पण या बाबतींतहि आपण पूर्वी काय लिहिलें आहे हें सरदेसा-यांच्या लक्षांत नाहीं. भाग २ पान ५८ व ५९ वर हिंदूंचीं पवित्र स्थानें हातीं ठेवण्याकरितां पेशव्यांनीं किती धडपड केली व शिवाजीचें कुलव्रत कसें नेटानें चालविलें हें सांगून काशीप्रयागासंबंधीं बोलतांना तेच सांग-तात कीं, नानानें पुनः १७८९ च्या आरंभीं महादजीला लिहिल्यानंतर त्यानें उत्तर लिहिलें कीं, " ही गोष्ट केल्यानें यवनास वांकडें वाटेल. काशीबद्दल असोफुद्दौला व इंग्रज एक आहेत. ते पर्यायाचीं बोलणीं बोल-तात वगैरे. " यावरून सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणें क्षेत्रें सोडविण्याच्या टोचणीकडे महादजीनें मुद्दाम काणाडोळा केला हें तरी खोटें दिसतें. बरें,

मुद्दाम काणाडोळा केला हें सरदेसायांचें पूर्वीचें विधान खरें धरावें तर या पत्रावरून महादजी लबाड, बहाणें लावणारा व धन्याशीं कृत्रिम करणारा ठरतो. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यांत बिघाड होऊं नये म्हणून महादजीनें क्षेत्रें सोडविण्याच्या प्रश्नाकडे काणाडोळा केला, हा हेतु सरदेसाई महादजीच्या माथीं घालतात. पण त्याच महादजीनें गोवधबंदीचें फर्मानहि बादशहांकडून मिळविल्याचें सांगतात. क्षेत्रांपेक्षांहि गोवधाचा प्रश्न व्यवहारांत व सर्वत्र वैमनस्य उत्पन्न करणारा होता. ही महादजीची कृति त्याच्यावर लादलेल्या हेतूंशीं कितपत सुसंगत आहे, तें सरदेसायांनींच सांगावें.

बदामीचें शौर्य

पान २८२, २—" बदामीच्या प्रसंगांतील शौर्याबद्दल मोठा गौरव त्या वेळीं झाला याचें कारण कदाचित बरेच लोक हल्ल्यांत मेले हें असावें. वीस दिवसांत किल्ला हस्तगत झाला म्हणजे आंतील लोकांनीं तो विशेष निकरानें लढविलाहि नाहीं. खुद्द नाना फडणीस मोर्च्यांत बसून गोळे मारवी असें सांगतात." महादजी करील तें धाडस व इतर करतील तें साहस, ही जी रियासतकारांची अनुदार पक्षपाती दृष्टि बनली आहे त्याचेंच हें उदाहरण आहे. आणि असें विधान करण्याचें कारण तरी असें कीं, महादजीनें तसें म्हटलें आहे! तो म्हणतो, "माणूस जाया झाले त्यास लढाईच आहे. तथापि लढाईंत फार लोक मेले हें वाईट. अजून पुष्कळ लढाया व्हावयाच्या आहेत!" वास्तविक महादजीचें हें पत्र औपचारिक सांत्वनपर आहे. दक्षिणेंत कर्नाटकांत झालेल्या लढाईबद्दल उत्तरेंत बसून महादजी तरी काय मत देणार? पण महादजीच्या लिहिण्याचा औपचारिकपणा लक्षांत न घेतां तेच त्याचे शब्द नाना फडणविसाला शिव्या देण्याला रियासतकारांना निमित्तासारखें उपयोगी पडले. पटवर्धनांना व हुजरातीला जीव धोक्यांत घालूनहीं हल्ला

का करावासा वाटला याची सविस्तर हकीकत अस्सल पत्रांतून ऐ. ले. सं. भाग ८ मध्यें आली आहे. खुद्द वेढा घालणाऱ्यांची सविस्तर अस्सल पत्रें बोलत असतां त्याना गौण लेखून महादजी त्यावर अभिप्राय प्रकट करील तोच बरोबर धरून चालणें अनुचित आहे. " बदामीचा किल्ला अत्यंत बळकट, किल्लेकऱ्यांची तयारी व तर्तूद फार. आगीचा मार अतिशय. तेव्हां नुसती मोर्चेबंदी करून किल्ला हातीं याव-यास फार दिवस लागतील. तशांत टिपू तर प्रचंड सेनेसह श्रीरंग-पट्टण सोडून निघाला त्याअर्थी तो आपल्या रोखें खचित येणार याकरितां हल्यानें किल्ला काबीज करावा असें ठरलें." अशी खरी हकी-कत आहे. आणि हल्ल्यानें किल्ला काबीज करतांना नेहमींच मनुष्यहानी फार होत असे. पण कोणीकडून तरी नानाचा उणापक्ष दाखवावा, ही रियासतकारांची मनःप्रवृत्ति बनलेली त्याला ते तरी काय करणार? 'वीस दिवसांत किल्ला हस्तगत झाला म्हणजे आंतील लोकांनीं तो विशेष निकरानें लढविलाही नाहीं' असें विकृत विधान करून त्याला पुरावा म्हणून पुढचें वाक्य सरदेसाई असें लिहितात कीं, 'खुद्द नाना फडणीस मोर्चांत बसून गोळे मारवी असें सांगतात.' नाना फडणवीस भित्रा होता. अर्थात् ज्याअर्थी तो मोर्चांत बसण्याचें धाडस करी, त्याअर्थी त्या बाहेरच्या मोर्चापर्यंतही किल्लेकऱ्यांचा गोळा येत नसलाच पाहिजे!!

४९६ पानावर रमण्याची हकीकत देतांना सरदेसाई लिहितात "श्रावणमास दक्षणेची अशीच दक्षता नाना ठेवी. सालोसाल रमण्यांत गेलेले ब्राह्मण वाहून जात." वास्तविक सरदेसायांना येथें नानाची स्तुतिच अभिप्रेत आहे. परंतु हा प्यारा वाचतांना वाचकाला ही नानाची निंदाच वाटावी अशी त्याची रचना झाली आहे. श्रावणमास दक्षिणे-करितां येणाऱ्या ब्राह्मणांची नाना अशी चोख व्यवस्था ठेवी कीं, त्यांतले पुष्कळ ब्राह्मण पुरांत वाहून जात! "रमण्याजवळ आंबील ओढा नांवाचा

एक ओढा होता, त्याचें पाणी पावसाळ्यांत फार फुगे " हें वाक्य असतें म्हणजे वाक्याची संगति तरी जुळली असती; पण वाक्याची संगति जुळली तरी विधान चूक आहे. सरदेसाई 'सालोसाल ब्राह्मण वाहून जात' असें म्हणतात. शकावल्यांत फक्त एकदांच असे ब्राम्हण वाहून गेल्याचा उल्लेख आहे. आणि तोहि बहुधा नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दींतील असावा.

—६—

'लांचखाऊ' निःस्पृह रामशास्त्री !

भाग २ पान ४९३ वर रामशास्त्र्यावर लांच खाण्याची संवय असल्याचा आरोप ध्वनित केला आहे. त्याला आधार म्हणून खरे भाग ८ पत्र ३६ यांतील अवतरण घेतलें आहे. त्यांत सरदेसाई यांचे शब्द असे—' डिसेंबर १७८६ पुण्यांत पंचायतमिध्यें राघोपंत गोडबोले, जयरामपंत बापट व शास्त्रीबुवा न्यायाधीश, अशीं तीन प्रस्थें आहेत. लोकांचा सर्वस्वापहार करावा या कामांत तिघांची एक हातोटी आहे. नानाजवळ दाद लागणें म्हणजे विचार कळतच आहे. सराफ्यामध्यें तों कोणा एकाचा भरंवसा राहिला नाहीं. यादोबा रणछोड सराफानें दिवाळें काढिलें. मातबर दुकान अकस्मात् दीपोत्सव करतें असा प्रकार जाला आहे.'

मूळ पत्र खालीलप्रमाणें आहे—" राजश्री रंगराव वोढेकर व पुरंदरे यांची पागा यांचा मुक्काम अद्यापि हडपसरासच आहे. आणखी फौज येथें ठेवीत नाहींत. श्रीमंतांच्या वाड्यांत पंचमीस जेठी यांच्या

---

* केसरी, २४ जून १९३०.

लढाया झाल्या. आणखी येथील तालमींचे आखाड्यांतील गड्या-गड्यांच्या कुस्त्या झाल्या...आणखी कर्नाटकचे पहिलवानास रतीब दिला आहे. मास पक्ष झाल्यावर आणखी लढाई होईल. रा. यादोबा रणछोड यांचें पुण्यांत सराफीचें दुकान होतें. त्यांत त्यानें दिवाळें काढिलें. सराफ्यामध्यें तो कोणा एकाचा भरंवसा राहिला नाहीं. मातबर दुकान असतें तें अकस्मात दीपोत्सव करिते, त्याचप्रमाणें झाले आहे. पुण्यांत पंचाइती मध्यें रा॥ राघोपंत गोडबोले एक प्रस्थ व रा॥ जयरामपंत बापट एक प्रस्थ व शास्त्रीबुवा एक प्रस्थ. याप्रमाणें तीन प्रस्थें आहेत. लोकांचा सर्वस्व अपहार करावा याप्रमाणें तिघांची एक हातोटी आहे. श्रीमंत रा॥ नानाजवळ दाद लागणें म्हणजे विचार कळतच आहे! लष्करचें वर्तमान काय आहे तें कळत नाहीं, यास्तव वडिलीं लिहिलें पाहिजे."

या अवतरणासंबंधीं बोलावयाचें म्हणजे प्रथम अवतरण जसेंच्या तसें न घेतां त्यांत रियासतकारानीं बदल केला आहे. दुसरें, अवतरणांत अवांतर गैरलागू हकीकत आहे, तीहि घेतली आहे. पुण्याच्या सराफ्या-संबंधींची व रणछोड सराफाच्या दिवाळ्यासंबंधींची हकीकत तेथें गैर-लागू आहे. मूळ पत्र मोरो आप्पाजी नांवाच्या कारकुनानें मिरजकरांना लिहिलेलें पुण्याचें एक बातमीपत्र आहे. असे हे कारकून पुण्यांत अव-लोकनांत येणारी स्थिति व बाजारी हकीकत प्रत्यहीं आपापल्या माल-कांस लिहून कळवीत असत. पण यावरून ते जी हकीकत लिहून पाठवीत ती प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं जाऊन पक्का शोध करूनच लिहीत असें नाहीं. प्रत्यक्ष अवलोकनांत येणाऱ्या गोष्टी व गांवांत चाललेल्या चर्चा, तर्कवितर्क ऐकून त्या ते लिहीत. अशा पत्रांतील बातम्या प्रमाण मानणें युक्त नाहीं. उपरोक्त बातमीपत्रांत त्या वेळीं पुण्यांत घडलेल्या हकीकती दिल्या आहेत. त्यांत श्रीमंतांच्या वाड्यांत झालेल्या सरकारी कुस्त्या, रणछोड सराफानें काढलेलें दिवाळें व तदनुषंगानें सराफ्याच्या

हलाखीचें सामान्य वर्णन व नंतर पुण्याच्या पंचायतीची हकीकत अशा क्रमानें हकीकती दिल्या आहेत. मात्र त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध आहे असें नाहीं. परंतु रियासतकारांनीं अनुक्रम बदलला आहे. आणि त्यांची अशी मांडणी केली आहे कीं त्यानें गैरसमज व्हावा. 'पुण्यांत पंचायत चालली आहे. त्यांत राघोपंत गोडबोले, जयरामपंत बापट व रामशास्त्री आहेत. ते असे जबर लांच घेतात कीं विचारतां सोय नाहीं. लांच देतां देतां सर्वस्व नाहींसें होतें ! सराफकद्यांतला येवढा मोठा रणछोड सराफ पण त्यानेंही दिवाळें काढलें !' असा समजच त्यांच्या मांडणीनें होतो. वास्तविक रणछोडासंबंधींचा मजकूर सरदेसायांच्या वर्ण्य विषयाशीं गैरलागू आहे. बरें, ज्या शब्दांवरून सरदेसाई रामशास्त्री लांच खात होता असें म्हणतात, ते शब्द मुळांत काय आहेत तें पाहूं. मूळ शब्द असे आहेत. "पुण्यांत पंचायतीमध्यें रा. राघोपंत गोडबोले एक प्रस्थ, व रा. जयरामपंत बापट एक प्रस्थ व शास्त्रीबुवा एक प्रस्थ, याप्रमाणें तीन प्रस्थें आहेत. लोकांचा सर्वस्व अपहार करावा याप्रमाणें तिघांची एक हातोटी आहे." या शब्दांवरून रामशास्त्री लांच खातो हाच अर्थ कसा निघतो ? खटल्यांचा निकाल करून गुन्हेगाराकडून अतिशय जबर दंड घेतले असा अर्थ कां निघणार नाहीं ? इतर दोघांचें असो, पण रामशास्त्री फारच कडक होता व त्याची परीक्षा अतिशय कडक होती, असें सरदेसाईच पान ५१७ वर लिहितात. एक मार्मिक श्लोक उद्धृत करून ते लिहितात "पेशव्यांच्या दारापुढें नेहमींच कर्दम असे. तद्वत् तो शास्त्रीबुवांच्या दारापुढेंही असे. फरक इतकाच कीं, पेशव्यांच्या दारापुढील कर्दम दानोदकानें होई व शास्त्रीबुवांचे दारापुढील कर्दम नापसंत झालेल्या विद्वानांच्या नेत्रोदकानें होई !" अशा कडक परीक्षेचा मनुष्य न्यायासनावर बसल्यानंतर कडकच शिक्षा कां करणार नाहीं ? न्यायबुद्धीची कठोरता दयेनें भरून काढावी लागते असें म्हणून त्याच्या कडक स्वभावाला दोष दिला तर एक वेळ

चालेल. परंतु रामशास्त्री कडक दंड घेतो म्हणून तो खूप लांच खातो हा अर्थ कसा योग्य ठरेल ? पेशव्यांच्या राज्यांत न्यायाधिशांनीं वसूल केलेले दंड त्यांच्या खासगी तिजोरींत जमा होत अशी माहिती सरदेसायांना सांपडली नाहीं तोंपर्यंत वरील 'सर्वस्व अपहारचा' लांच असा बिनदिक्कत अर्थ करणें प्रशस्त दिसत नाहीं.

जातां जातां दुसरीही एक मौज सांगण्यासारखी आहे. भाग २मध्यें ज्या रामशास्त्र्याला लांचखाऊ न्यायाधीश म्हटलें, त्याच रामशास्त्र्याला भाग १ पान ३८९ वर 'धवलयश' म्हटलें आहे. "नानानें हरीपंत फडके, कृष्णराव काळे, महादजीपंत गुरुजी, रामशास्त्री असल्या धवलयश सहाय्यकांचें नैतिक बळ राज्यास लाभविलें." निःस्पृहपणा किंवा निरपेक्षपणा हेंच न्यायाधीशाचें सर्वस्व किंवा धवलयश होय. परंतु तो लांच खाई असें व्यंजित करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे रामशास्त्र्याचा मात्र रियासतकार 'सर्वस्वापहारच' करतात असें होत नाहीं काय ?

नऊ वर्षांचा तरुण पेशवा

भाग १ वर पान ४७९ "लग्न म्हणजे गृहस्थाश्रमाची सुरुवात, व सांसारिक जबाबदारीचा आरंभ ही जाणीव तरुण पेशव्यास करून देण्याकरितां विशिष्ट ग्रंथांची व न्यायनीतीची ओळख त्यास करून देण्यांत आली." हें रघुवंशांत शोभण्यासारखें गंभीर वाक्य वाचून, आठव्या वर्षी उपनयन झालेल्या व नंतर बारा वर्षे गुरुगृहीं राहून अध्ययन करून आलेल्या एखाद्या विशी उलटलेल्या तरुणासंबंधीं रियासतकार बोलत असतील असा गोड संभ्रम वाचकांना पडेल. परंतु त्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं अवघ्या नऊ वर्षांच्या माधवरावाबद्दलच ते बोलत आहेत ! मुलामुलींचीं लहानपणीं लग्नें लावण्यांत आईबापांचीच हौस फिटावयाची असते, त्याप्रमाणें नवव्या वर्षी लग्न झालेल्या तरुण पेशव्या-

संबंधीं लिहिताना आणि ' सांसारिक जबाबदारी ' ' विशिष्ट ग्रंथ ' ' न्याय-नीति ' इ. गैरलागू भाष्य करतांना रियासतकारांच्या लेखणीला आपली हौस फेडून घ्यावयाची होती इतकेंच दिसतें. कोठली जबाबदारी आणि कोठला गृहस्थाश्रम ! सवाई माधवराव त्या वेळीं अवघा नऊ वर्षांचा होता. येवढ्या अल्लड आणि अप्रबुद्ध मुलाला भलत्याच गंभीर गोष्टींची संथा देण्यांत नाना फडणीस पढतमूर्खच असला पाहिजे.

पेशव्याच्या प्रकृतींतील फरक

सरदेसायांनीं सवाई माधवरावाच्या प्रकृतीसंबंधानेंहि परस्परविरोधी विधानें केलीं आहेत. पान ४८५ भाग १ वर ते म्हणतात, ' विद्येंत निपुण किंवा स्वभावानें चतुरस्त्र नसला, तरी माधवरावास मर्दानी खेळांची आवड फार दांडगी होती. ' नंतर पान ४८६ वर लिहितात कीं, "पेहेलवान, कुस्त्या खेळणारे, वज्रमुष्टीवाले, दंडछडी व तिरंदाजी करणारे वगैरे अनेक हुन्नरी माणसें पदरीं ठेवून व्यायामाची व श्रमाची आवड उत्पन्न करण्यांत आली. दररोज तालीमखान्यांत जाऊन मुद्गल व लेजीम वगैरेचा अभ्यास तरुण पेशवा नियमानें करीत असे. त्यांतल्या त्यांत नाद असा शिकारीचा व हरणांचा विशेष होता. खुल्या हत्तीवर किलाव्यांत बसून त्यास हत्ती चालवितां येत असे. पर्वतीच्या खालीं मैदानांत घोड्यावर बसून बोथाटीचे खेळ वगैरे चालत. या खेळांत पेशव्याचें मोठें नैपुण्य दिसून येई." घोडी फेरणें, तालीम करणें, शिकार करणें हीं सर्व बळकट व काटक शरीरासच झेपतात हें उघड आहे; व येथपर्यंत सरदेसायांचा रोख तसाच आहे. परंतु पान ५०९ भाग २ वर ते म्हणतात, " माधवरावाचें शरीर बिलकुल काटक नव्हतें. ऊन तहान वगैरे बिलकुल त्यांस सोसत नसत असे पुष्कळ उल्लेख आहेत ! ! " शिवाय असे पुष्कळ उल्लेख आहेत हें जर खरें तर पहिलें वर्णन कशाला केलें ? पण असे पुष्कळ उल्लेख तरी किती आहेत ते सरदेसायांनीं मांडावे म्हणजे बरें पडेल. आमचे माहिती-प्रमाणें तसे उल्लेख नाहींतच म्हणण्याइतके थोडे आहेत.

* पेशव्यांचें गणेशपूजन

गेल्या तीन-चारशें वर्षांच्या इतिहासाकडे पाहिलें तर महाराष्ट्रांत गणपतिपूजेचा संप्रदाय विशेष जोरानें प्रवर्तित करण्याचा मान सुप्रसिद्ध मोरया गोसाव्याकडे जातो. कोंकणांतील पुळ्याचें गणपतिस्थान पांचसहाशें वर्षांइतकें जुनें असून मोरगांवाहूनहि पुरातन आहे असें म्हणतात व पुळें-वर्णनाच्या पुस्तकांतहि तसेंच म्हटलें आहे. पण तेथून कोणी विशेष नामांकित गणपतिभक्त किंवा सांप्रदायिक झाल्याचें माहीत नाहीं. पटवर्धनांचा पूर्वज किंवा मूळ पुरुष हरभटबावा हा पुळ्याच्या गणपतीची भक्ति करूनच उत्कर्ष पावला आणि तेथून पुढें सर्वच पटवर्धन मंडळी नामांकित गाणपत्य झाली ही गोष्ट खरी असली तरी हरभट

* सह्याद्रि, ऑक्टोबर १९३५

शवाचा काळहि बराच पुढचा आहे. त्याचा जन्म सन १६५५ सालीं झाला म्हणतात. म्हणजे त्याची कारकीर्द बाळाजी विश्वनाथाच्या समकालीनच येईल. त्यापूर्वीच्या शेंदोनशें वर्षांच्या काळांत पुळ्याच्या गणपतीच्या प्रसादाने निर्माण झालेला कोणी नामांकित गाणपत्य आढळत नाहीं इतकेंच आम्हांस म्हणावयाचें आहे.

मोरया गोसाव्याचें चरित्र प्रसिद्धच आहे. त्यानें किती खडतर तपश्चर्या केली व शेवटीं मोरगांवाहून प्रत्यक्ष गणपतीस चिंचवडास कसें चालत आणलें, गणपतीने प्रसन्न होऊन त्याच्या सहा पिढ्यांत मूर्तरूपानें वास करण्याचा वर कसा दिला, त्यानें गणपति संस्थान कसें निर्माण केलें, त्याची परंपरा कशी फैलावली इत्यादि गोष्टी सर्वश्रुत आहेत. मोरया गोसाव्याची कीर्ति त्या काळीं इतकी गाजली होती कीं खुद्द अवरंगजेब बादशाहानेहि त्याला म्हणजे त्याच्या संस्थानाला जमिनी वगैरे इनामें करून दिल्याचे उल्लेख सापडतात.

शिवाजीमहाराजांचे वडील शहाजीमहाराज भोसले मूळ रजपूत; अर्थात् त्यांचें दैवत एकलिंगजी म्हणजे शिवाचें असें असतांहि म्हणजे कुळांतील दैवत निराळें असतांहि शहाजी महाराजांनी मोरया गोसाव्यास इनामें व देणग्या दिल्याचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत. जिजाबाईसाहेब व शिवाजीमहाराज यांची विशेष गणपतिभक्ति पाहतां, ती त्यांनीं शहाजी महाराजांपासूनच उचलली असावी असें दिसतें. जिजाबाईसाहेब यांनी तर प्रत्यक्ष गाणपत्य व्रत स्वीकारलें असावें असें वाटतें. पुण्यांतील पुरातन कसब्याच्या गणपतीचें देऊळ हें त्यांनींच बांधल्याचें प्रसिद्ध आहे. त्या गणपतीचें रोज नेमानें दर्शन घेण्याचा त्यांचा परिपाठ कधी चुकला नाहीं, अशी आख्यायिका गायकवाडांनी ‘पुणें वर्णनांत’ दिली आहे.

शिवाजी महाराज आईबापांप्रमाणेंच गणपतिपूजक असून चतुर्थीचा

उपवासहि करीत असत या आख्यायिकेस उपोद्बलक अशी नवी माहिती नुकतीच इ. सं. स. ग. जोशी यांनी उपलब्ध केली आहे. भोर संस्थानांतील आंबवडे गांवीं असलेला गणपति शिवाजी महाराजांनीच स्थापला ही ती माहिती होय. एके वेळीं महाराजांचा मुक्काम आंबवड्यास पडला. त्यादिवशीं चतुर्थी होती. पण गांवांत गणपतीचें देऊळ नव्हतें म्हणून महाराजांनी स्वतःच त्या दिवशीं तेथें गणपतीची स्थापना करून चतुर्थीस गणपतिदर्शन घेण्याच्या आपल्या नेमाची सांगता केली व शेरीपैकीं जमीनहि देवस्थानास लगेच नेमून दिली. अद्यापहि तें स्थान प्रसिद्ध असून ही हकीकत तेथल्या सर्वांच्या तोंडांत आहे म्हणतात.

पण महाराजांचें गाणपत्यव्रत सिद्ध करणारा दुसरा एक अधिक महत्त्वाचा पुरावा आज उपलब्ध आहे तो म्हटला म्हणजे रघुनाथ पंडिताच्या राजव्यवहारकोशाचा. हा कोश महाराजांनीं राज्याभिषेकानंतर मुद्दाम आज्ञा करून रघुनाथपंताकडून तयार केला. अर्थात् रघुनाथपंत महाराजांच्या समकालीन होय हें सांगणें नको. त्या कोशाच्या उपोद्घातांत पुढील श्लोक आहे.

यः सिद्धिमावहति चिंचवडाधिवासी । हेरंबपादभजनेन महानुभावः
नारायणाभिधसुधीतिलकादवाप । तस्मात् अनुग्रहमसौ शिवसार्वभौमः

या स्पष्ट उल्लेखावरून महाराजांनी मोरया गोसाव्याचा वंशज नारायण गोसावी याजवळून अनुग्रह घेतला हें उघड होतें. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हटली म्हणजे या सबंध उपोद्घातांत कोठेंही रामदासाचें नांव आलेलें नाहीं ! असो.

शिवाजी महाराजानंतर भोसल्यांपैकीं संभाजी, राजाराम, शाहू किंवा पुढचे छत्रपति यांनीं गणपतिभक्ति केल्याचें कोठेंही आढळत नाहीं. भोसल्यांचे कुळाचार म्हणून प्रतापसिंह महाराजांनी मुद्दाम तयार कर-

विलेली विस्तृत तपशीलवार कलमबंदी पारसनिसांनी इतिहाससंग्रहांत छापलेली आहे. त्यांतहि कोठें तसा उल्लेख सापडत नाहीं.

भोसल्यानंतरचे महाराष्ट्राचे छत्रपति म्हणजे पेशवेच होत! पेशव्यांच्या घराण्यापुरतें पाहिलें तर गणपतीचे भक्त नानासाहेब, थोरले माधवराव व अमृतराव हे तिघेच दिसतात. पहिले बाळाजी विश्वनाथ किंवा थोरले नाना यांच्या दैवतांसंबंधीं कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. बाजीरावसाहेब व चिमाजी आप्पासाहेब हे शिवभक्त होते. त्या दोघांचा चिंचवडकर देवाशीं फार घरोबा होता व त्यांवर त्यांची भक्तीहि होती. तथापि त्यांची मुख्य उपास्य देवता गणपति खचित नव्हती. ब्रह्मेन्द्रस्वामी, कायगांवकर पाटणकर दीक्षित इत्यादि सत्पुरुषांप्रमाणें ते चिंचवडकर देवांना मानीत, त्यांचा प्रसाद घेत, त्यांना इनामें देणग्या देत, आदरभाव दर्शवीत, चिंचवड संस्थानचा माल इकडून तिकडे नेण्याआणण्याचा असतां जकातमाफीचीं दस्तकें देत इतकेंच दिसतें. तत्कालीन धार्मिक समजुतीप्रमाणेंच इष्टकार्यसिद्ध्यर्थ निरनिराळ्या क्षेत्रांचे ठिकाणीं अनुष्ठानें पेशवे करवीत असत, त्यांत केव्हां केव्हां मोरगांव चिंचवड थेऊर या गणेश-क्षेत्रांतहि बाजीरावसाहेब किंवा चिमाजी आप्पासाहेब यांनी अनुष्ठानें करविल्याचे दाखले सापडतात. उदाहरणार्थ पेशवे दप्तर भाग २२ मधील १७३४ सालची ही नोंद पाहा—

छ १५ जमादिलौवल

अनुष्ठानखर्च. थेऊरास (अनुष्ठान) केले त्यास दक्षिणा.

२१६ रु. नमस्काराबद्दल.

१२० रु. भास्करभट, एक लक्ष वीस हजार नमस्कार.

९६ नारंभट, ९६००० नमस्कार

२१४ प्रदक्षणेबद्दल.

५७ अनंतभट, ५७ हजार प्रदक्षिणा.
५७ बालंभट, ५७ हजार प्रदक्षिणा.

पण येवढ्या उल्लेखावरून बाजीरावसाहेब किंवा चिमाजी आप्पासाहेब यांचें गणपति हें मुख्य दैवत होतें असें मानण्याचें कारण नाहीं.

बाजीरावसाहेबांचे मुलगे तीन. नानासाहेब, राघोबादादा व जनार्दनपंत. चिमाजी आप्पासाहेबांचे एकुलते एक चिरंजीव भाऊसाहेब. भाऊसाहेब निस्सीम शिवोपासक होते. त्यांनीं एक दुर्मिळ काश्मिरी लिंग मिळविलें होतें व त्याची पूजा ते स्वतः करीत. या काश्मिरी लिंगाच्या पूजेची स्वतंत्र व्यवस्थाच होती. कालांतरानें भाऊसाहेबांनंतर तें लिंग पेशव्यांच्या देव्हाऱ्यांत समाविष्ट झालें. तथापि त्याची पूजा, दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत जोगळेकर नांवाच्या एका स्वतंत्र पुजाऱ्याकडून करविण्यांत येत होती असा दाखला उपलब्ध झाला आहे.

नानासाहेब हेच खरोखर पेशव्यांतले आद्य गणपतिपूजक. जनार्दनपंतासंबंधीं माहिती उपलब्ध नाहीं.

नानासाहेबांचे चिरंजीव माधवराव बल्लाळ यांची गणपतिभक्ति विख्यातच आहे. राघोबादादा हे पूर्ण शिवभक्त. त्यांचा दत्तक मुलगा अमृतराव मात्र गणपतिभक्त. औरस मुलगा बाजीराव हा शिवभक्त. सवाई माधवरावासंबंधीं विशेष माहिती नाहीं.

पेशव्यांच्या वाड्यांत गणपतिपूजेचा व उत्सवाचा प्रघात नानासाहेब पेशव्यामुळें पडला, व कुटुंबांतील कर्तबगार नामांकित माणसाने सुरू केलेले सांप्रदाय जसे पुढील वंशज कुलाचार म्हणून सतत चालू ठेवतात तोच प्रकार वरील गोष्टीसंबंधीं दिसतो. नानासाहेबाची गणपतीवर इतकी निष्ठा होती कीं, तत्कालीन गाणपत्यांत तो अग्रेसर समजला जाऊं

लागला. इतिहास-मंडळाच्या एका अहवालांत श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी ओंकारघराण्यांतील एका तत्कालीन बाडावरून गणपतिभक्तांची एक छंदोबद्ध मालिका प्रसिद्ध केली आहे. त्यांत नानासाहेबाचा प्रामुख्यानें उल्लेख सांपडतो. गणपतिभक्तीमुळें चिंचवडकर देवांवर त्याची फारच निष्ठा जडली होती. तो त्यांस किती मानी हें पुढील उल्लेखावरून चांगलें दृष्टोत्पत्तीस येतें—" शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे. इहिदे सितैन मया व व अलफ. भाद्रपद मासीं चिंचवडचे देव धरणीधर महाराज, मोरगांवाहून आले. श्रीमंत मोतीबागांत असतां गैरराबत्यामुळें खबर पावली नाहीं. यामुळें श्रीमंत अंतर्महालांत असतां धरणीधरमहाराज रुसून नदीपलीकडे न उतरतां संस्थानी चिंचवडीं जाऊन पावले. नंतर श्रीमंतांस खबर लागली, तेव्हां श्रीस आपले हातें पत्र लिहून कोन्हेर त्रिंबक येकबोटे यांस पाठविले. त्यांनी जाऊन संस्थानास समारंभासहित देवास घेऊन आले. श्रीमंती नदीपलीकडे डेरे देऊन साहित्य पावते केलें. महाराज आले. श्रीमंती रुप्याचा देव्हारा दिल्हा व हातीं देऊन त्याचे खर्चास मौजे बाणेरें तालुका हवेली हा गांव इनाम करून दिल्हा. संतोष करून वाटे लावले." (पुरंदरे दप्तर भाग ३. पृ. ११२, शिवापूरकर देशपांडे शकावलि.)

श्रावणमासांत लाखो रुपये खर्च करून विद्वत्परामर्श घेण्याचा रमण्याचा मोठा उत्सव जसा बाजीरावानें प्रथम सुरू केला, तसा गणपत्युत्सव प्रथम नानासाहेबानें सुरू केला. त्याआधीं पेशव्यांच्या घरांत हा उत्सव होत नसे. यासंबंधीं शकावलीकार स्पष्टच उल्लेख करतो तो असा—" राजे भोसले यांचा बंदोबस्त सातारियास राखून आपण राज्य केलें. पुणियाची वस्ती वाढविली. गणपतीचा उच्छाह करू लागले. वाडियांत सात खणी इमारत बांधून नाचाचा दिवाणखाना केला. गणपतीचा उच्छाह तेथें करीत होते." (पुरंदरे दप्तर भाग २ पृ. ११५)

गणपति हें नानासाहेबाचें मुख्य आराध्यदैवत होतें तर त्यानें

पर्वतीस गणपतीचें मुख्य देऊळ कां बांधलें नाहीं, असा कोणी साहजिकच तर्क करतील. त्याला उत्तर असें कीं, पर्वतीच्या टेकडीवरील स्वयंभू देवता पर्वताई देवी होती; नानासाहेबाची आई काशीताई हिला पायाचें कांहीं दुर्धर दुखणें होतें. तें या देवीला नवस केल्यामुळें गेलें आणि म्हणून नानासाहेबाने आईचा नवस फेडण्याकरिता स्वतःच्या मातृभक्तीचें चिरकालिक स्मारकच होऊन राहील असें पर्वतीचें रमणीय देवस्थान निर्माण केलें.

अब्दालीच्या स्वाऱ्या होऊं लागल्या तेव्हां तत्कालीन भाविक धर्मसमजुतीप्रमाणें नानासाहेबानें आपल्या इष्ट दैवतांस नवससायास करणें साहजिकच होतें. त्यासंबंधीं कांहीं उल्लेख वाचनीय आहेत. उदाहरणार्थः— 'अब्दालीची फत्ते मल्हारराव अथवा भाऊसाहेब अथवा दादासाहेब यांतून कोणीही केलिया वेंकटेशास रुपये १०००० दहा हजार देवावे. काम जाहलियावर द्यावे. काम होईल तेव्हां करावे.'

'चिरंजीव माधवरावजी यास त्रिंबक जेजुरी कुरकुंब मोरेश्वर येथे दर्शनास पाठवावे. थेऊरी जावें. चिंचवडी देवाकडे जावे.'

'गंगा म्हसले येथें गणपति गंगेंत आहे. येथे चऊथरा चांगला बांधावा. देऊळ नवे थेऊरी महातारीच्या डोहावर केले आहे तसें करावें. येक ब्राह्मण ठेवून पूजा नैवेद्य नंदादीप चालवावा, व चऊथरा देऊळ (चिंचवडकर) देवास पुसोन करावे. पंधरा हजार लागतील. जरूर करावें. आपूर्व स्थल आहे. हरि दामोदराकडे नेमोन सनद दिली आहे.'

'खेड विसाद येथे गणपति नरसिंह येक दोन देव आहेत. त्यास पूजा नैवेद्य नंदादीप ब्राह्मणभोजन दरसाल पांचशें रुपयेपर्यंत करावा. सिवरामपंतानी करावे. चौकशी हरी दामोदरांनी करावी. याप्रमाणें करावे. येथून सनद दिली आहे.'

'मोरेश्वरी स्थलाची सोये करून नगारखाना घालावा. खर्च सुभा-
कडे नेमून द्यावा.'

नानासाहेबांमुळें अर्थात् गोपिकाबाईचीही श्रद्धा गणपतीवर बसली होती त्यासंबंधी एक उल्लेख असा सापडतो.

सुा सबा आरबैन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खो मुा

नवस खर्च

परभारे रत्नशालेपैकी

छ १५ जिल्हेज श्रीगणपति रांजणगांव विा सौ. गोपिकाबाई याच्या डोल्यास पीडा जाहाली सबब द्रिष्टीचा नवस केला. रा बचाजी विश्वनाथ ता रामाजी विश्वनाथ बरवे सोने.

नानासाहेबाइतकी वैभवशाली कारकीर्द दुसरी कोणतीच झाली नाहीं. त्या दृष्टीनें गणपत्युत्सव फारच उत्साहानें पार पडत असे. खुद्द पेशव्याचा मुक्काम पाऊसकाळामुळें राजधानीस असावयाचा. श्रावणमास दक्षिणेच्या देकारामुळें अख्या हिंदुस्थानांतून झाडून सारे विद्वान् व तमासगीर पुण्यास आलेले असावयाचे. अर्थात् श्रावणास जोडूनच भाद्रपदांत होणाऱ्या या गणपत्युत्सवास फारच रंग भरत असें हें सांगणें नको. दुर्दैवानें या उत्सवासंबंधी तपशीलवार वर्णनें मात्र सांपडत नाहींत. तथापि खुद्द पेशव्यांच्या रोजकीर्दीतून त्रुटित उल्लेख सांपडतात त्यावरून थोडीबहुत कल्पना येते.

तारीख ५-८-१७५४

खर्च जिन्नस—गा राजश्री भाऊ रा गोविंद सिवराम ता राघोजी गवडा

गणपतीजवळ (ळ) फुलाचें झाड करून ठेवावयाबद्दल फुलमरीचें फिरंग्यानें पेटी मखमली मढीव, आंत फुलें रेशमाचीं (अशी) पाठविलीं ती पेटी लाकडी फुलासमवेत.

(पेशवे दप्तर भाग २२ पृ. ९६ उतारा नंबर १५३)

माहे जिल्काद

ता. १८-९-१७५४

खमस खमसेन स्वारी पंतप्रधान

खर्चाचें बंद छ ३०

गणपत्युत्सवास आलेल्या हरदास-गोसाव्यांची, नटव्यांची, गवयांची, कलावंतिणींची नांवनिशीवार यादी. बिदागीसुद्धा.

(पेशवेदप्तर भाग २२ पृ. १०० उतारा नंबर १५७)

पेशवे दप्तर भाग १८ मधील १२५ व्या पानावर गणपत्युत्सवांतला जो जमाखर्च घेतलेला आहे त्यावरून १७६१ सालीं ५१ हरदास किंवा गोसावी, १०६ नृत्यकुशल कलावंतिणी, ४४ गवई व नटवे (नटवे म्हणजे हल्लीच्या उत्सवांतील नकलाकारांचे पूर्वज), पखवाज वाजवणारे १७, गुरव कर्णेकरी १० इतक्या लोकांचे कार्यक्रम झाल्याचें दिसतें. पेशव्यांसारखा हिंदुस्थानचा सम्राट उत्सव करावयास बसल्यानंतर अत्यंत गुणी व नामांकित कसबी कलावंत लोक येऊन हजेरी देत असतील हें सांगावयास कशास पाहिजे? त्या वेळेच्या सुबत्तेच्या मानानें बिदागीच्या रकमा मात्र आज फारच हलक्या दिसल्या तर नवल नाहीं. या ५१ हरदासांना ६३२ रुपये, कलावंतिणींना ५२६ रुपये, गवई-नटव्यांना १८५, गुरवांना ९०, कर्णेकऱ्यांना १५. नक्त बिदागीखेरीज या लोकांना कापड व पोषाकहि देण्यांत आले आहेत. सध्याचा गणेशोत्सव भाद्रपद शुद्ध ४ पासून

भाद्रपद शुद्ध १४ पर्यंत चालतो. शनिवारवाड्यांतील उत्सव शु. १ पासून दशमीपर्यंत चाले. त्या वेळीं गणपतिरंगमहाल हंड्या-झुंबरांनी व आरासेनें अत्यंत शोभिवंत करण्यांत येई.

नानासाहेबाचा मुलगा, थोरला माधवराव, याची गणपतिनिष्ठा बापापेक्षाहि जाज्वल्य होती. रोग असाध्य ठरल्यानंतर तो मुद्दाम थेऊरास गणपतीच्या देवळांतच जाऊन राहिला व अखेर तेथेच गजानन गजानन करीत असतां एखाद्या योग्याप्रमाणें त्याचा नेत्रद्वारें प्राण गेला असें तत्कालीन पत्रांत नमूद आहे. मरतेसमयीं कफ होऊन वाचेनें गजाननाचें नामस्मरण होणार नाहीं. करिता अतिसारच व्हावा, कफ होऊं नये अशी त्याच्याच सांगण्यावरून गंगा विष्णु व रणछोड या महान् भिषग्वरांकडून मुद्दाम योजना करण्यांत आली होती. मरणसमयीं माधवरावाने आपल्या कार-भाऱ्यांकडून एक करारनामा लिहून घेतला. त्यांत काशीसारखीं हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें सोडवूं, पांच लाखांची दौलत राहीतोंपर्यंत श्रावणमासांतला विद्वत्परामर्षाचा देकार बंद करणार नाहीं इत्यादि कलमें आहेत. हा करारनामा मुद्दाम गणपतीसमक्ष झाला. त्यालाच साक्ष ठेवून त्यावर कारभाऱ्यांनी आपापल्या सह्या केलेल्या आहेत. याही गोष्टीवरून माधवरावाची गणपती-भक्ति कसोटीस लागते. दुखणें असाध्य होऊन माधवराव थेऊरास आला त्याच दिवशीं त्यानें मोत्यांचा तुरा दहा हजार रुपयांचा गणपतीस वाहिला होता.

शाहिरानें माधवरावाच्या मृत्यूचा हृदयंगम पोवाडा केलेला प्रसिद्ध आहे. त्यांत रमाबाईने पुढीलप्रमाणें गणपतीची हृदयद्रावक आळवण केली आहे.

स्वारी पुण्याहून गेली थेउराला ।
त्या गणपतीच्या सेवेला ।

रमाबाई विनवी त्या गणपतीला ।
चुडेदान देई तूं मजला ।
येवढें वरीस राख रावसाहेबाला ।
अवघा सोन्यानें मढवीन तुजला ।
मंदील मुंडासें शिरपेच वाइला ।
हिरे जोडीन तुझ्या मुगुटाला ।
सोन्याचा कळस लाविन तुझ्या शिखराला ।
पांचा लक्षांचा नवस केला ।
बाई विनविती । मज प्रसन्न व्हावे गणपती ।
कशी हीन झाली तुझी मति ।

नानासाहेबानें पार्वतीची व गणपतीची अशा दोन सोन्याच्या मूर्ति करविल्या त्याप्रमाणें माधवरावानेंहि आपल्या उत्कट भक्त्यनुरूप गणपतीची एक नवी सुवर्णमूर्ति मुद्दाम कर्नाटकांतील कारागिराकडून करवून आणविल्याचा दाखला पेशवे रोजकीर्दींत मिळतो तो असाः—छ १२ जमादिलावल सु॥ सबा तिसैन मया व अलफ.

तुलजाजी राजे चंदावरकर यांचेकडून सोन्याची गणपतीची मूर्ति घेऊन माणसें आलीं त्यास १४० रुपये दिले. [पेशवे दप्तर भा. २२ पृ. १०३ उ. नं. १६४ ता. १७-१०-१७६६]

माधवरावाच्या कारकीर्दींत गणपत्युत्सव चांगलाच साजरा होत असे हें सांगणें नको. १७६७ सालीं झालेल्या शनिवारवाड्यांतील उत्सवासंबंधीं पुढील दोन खर्चाच्या नोंदी आढळतात.

२६८२ रुपये गणपतिउत्सवानिमित्त खर्च झाले. ह्या खर्चांत मुख्यत्वेंकरून हरदास, गवई, कलावंतिणी वगैरेंच्या बिदाग्या आल्या आहेत.

१९५ रुपये, खाशा दिवाणखान्यात लावावयासी खरेदी चित्रें रागमालेचीं सुमार ३६ येकून रसानगी यादी रुपये.

[पेशवे दप्तर भा. २२ पृ. १०८ उ. नं. १७९ तारीख २५-९-१७६७ ते २४-१०-१७६७]

माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणराव गादीवर आला. त्याची कारकीर्द अवघी सात आठ महिन्यांची. त्याच्या कारकीर्दींत वाड्यांत उत्सव झालाच पण गणेशोत्सवांतच म्हणजे शु. १३ स गारद्यांनी शनिवारवाड्यांत त्याचा खून केला. हीच तेवढी उत्सवासंबंधानें कायमची लक्षांत राहण्यासारखी गोष्ट झाली !

नारायणरावाच्या मृत्यूनंतर पहिलीं दोनतीन वर्षें पुण्याच्या दौलतीला फारच संकटाचीं गेलीं; त्यामुळें शनिवार वाड्यांत उत्सव तांत्रिक करविण्यात येत असे. १७७४ सालच्या पुण्यांतील गणपतिउत्सवासंबंधीं नाना फडणीसाचीं दोन आज्ञापत्रें पाहण्यासारखीं आहेत. त्यांवरून उत्सवाचे कांहीं अधिक तपशीलहि कळतात. पत्रें अशीं.

" राजश्री नारो आप्पाजी स्वामी गो॥ विनंति उपरी पत्र पाठविले ते पावले. गणपती उच्छाहाची याद पावली. अनुष्ठानाचे येकवीस ब्राह्मण चार दिवस लावणें. कलावंताचे ताफे चांगले पाच सात व हरदास जुने बहुतां दिवसांचे सात आठ दहा पर्यंत असतील तितके, या करवी उछाह करणें. सालाबादप्रमाणें इतक्यांत बिदाई करणें. विशेष कांहीं करावयाचें नाहीं. जाणिजे. " [पेशवे दप्तर भाग ३२ प. नं २७]

" राजश्री नारो आप्पाजी स्वामी गो॥ यांसी विनंति उपरी श्रीगणपतीचा उत्साह होत आहे ह्यास ललिताचे दिवसी समारंभ बहुत होत असे तो तसा करावयाचा नाही. नित्य हरिकीर्तन होत असते त्याप्रमाणेंच ललिताचे रोजी करून ललिताच्या चार ओव्या म्हणून आरती

करवावी. खिरापत वाटल्यानंतर स्वस्तपणें बसोन प्रसाद श्रीमंतास वगैरे देणें ते द्यावें. बंदोबस्त चांगला राखावा. गणपती पोहोचवाल त्या दिवशीं पालखीत गणपती घालून समागमे वाजंत्री यांचा एक ताफा देऊन पोहोचवावा. आणखी समागमे न देणे. थोडक्यांत लिहिल्याप्रमाणें करावें. जाणिजे. छ ५ रजब सु॥ खमस सबैन मया व अलफ हें विनंति." [पेशवे दप्तर भाग ३८ पत्र नं २८]

१७७८ सालीं सवाईमाधवराव पुरंदरावर होता. त्या वर्षी गडावरच उत्सव मोठ्या प्रमाणांत करण्यांत आला. या वेळीं सवाई माधवराव अवघा ३-४ वर्षांचा असेल. उत्सवाची सुंदर माहिती मल्हार बल्लाळाच्या पत्रांत आली आहे. ती अशी—

२८-८-१७७८

"सेवेसी मल्हार बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ६ साबानपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. पुरंदरी श्री गणपतीचा उत्साह चतुर्थीपासून काल शुक्रवारपर्यंत यथास्थित जाहला. रात्रौ नित्य श्रीमंत कथेस बसत होते. दीड पावणेदोन प्रहरपर्यंत रात्र कथेस होत असे. काल सा घटिका दिवस शेष राहिला होता, तेव्हां श्री गणपतीचे प्रस्थान जाहले. स्वारीसमागमे श्रीमंत गेले होते. पर्जन्याची झड बसली होती परंतु स्वारी जातेसमयीं चांगला पर्जन्य उघडला होता. स्वारीस शोभा फारच चांगली आली होती. राजहंस बच्चा हत्ती याजवर जरिपटका दिला होता. व तेजरावा हत्तीण शिवापुराहून आणिली होती. श्रीमंतांची मर्जी बहुतच प्रसन्न होती. आज तेजरावा हत्तीण मागती शिवापुरास रवाना केली. स्वारीचा बंदोबस्त राजश्री बलवंतराव पटवर्धन यांनी चांगला केला होता. आपण श्रीमंताचे पालखीजवळ होते. स्वामीच्या वाड्यापुढील रस्त्यानें थोरल्या तल्याकडे स्वारी गेली होती." (पेशवे दप्तर भा. ३२ पत्र नं. २९)

या सालचा हा उत्सव पुण्यांतहि सरकारवाड्यांत म्हणजे शनिवारवाड्यांत पूर्वींच्या चार वर्षांपेक्षां फार उत्साहाने झाला असें परशुरामभाऊ पटवर्धनांनीही आपल्या पत्रांत लिहिलें आहे. तें म्हणतात— "सरकारवाड्यांत चतुर्थीचा उत्सव होत आहे. आज चार वर्षें संकलितच करीत होते. (पण) यंदा उभयता कारभारी (नाना फडणीस व सखाराम बापु) येथे (पुण्यास) आहेत त्यामुळें समारंभ बराच होत आहे."

सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं हा उत्सव फारच चांगला झाल्याचें नमूद आहे. त्या सालीं १८१ कथेकऱ्यांच्या कथा झाल्या व त्यांना २१५५ रुपये बिदागी दिली. हरदासांखेरीज गवई ३९, कलावंतिणींचे ताफे ४, गुरव पखवाजी ४३, वाजंत्री ताफे २५ आले होते. त्यांना अनुक्रमें ३२९, १०२६, १२३ व २४० रुपये नक्त बिदागी व खेरीज कापडचोपड देण्यांत आलें. या उत्सवांत सर्व लहानमोठ्या कामगारांस भाग घ्यावा लागे. त्यांनाहि पेशवे पोषाख व मिठाई देत व गरिबांस शिधा वांटीत. वाड्यांत ब्राह्मणभोजनें होत. शेवटच्या दिवशीं फुलांनीं मढविलेल्या पालखींत उत्सवमूर्ति घालून वाजतगाजत मिरवणूक काढून तिचें नदीवर विसर्जन होई. त्या वेळीं पेशवे पायउतारा पालखीबरोबर समागमें असत. इंग्रज रेसिडेंट मॅलेट हाहि पेशव्यांच्या गणपतिउत्सवांत हजर राहिल्याचे दोन मौजेचे उल्लेख पारसनिसांच्या 'सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार' या पुस्तकांत आले आहेत.

"सेवेसी महादजी चिंतामण याची विज्ञप्ति कीं, सर चार्लस वारे मालिट इंग्रज आज तिसरे प्रहरीं राजश्री हरिपंत तात्या याचे वाड्यांत श्रीगणपती उत्साहानिमित्त मंडळीसुद्धा आले होते. तात्या कांहीं कचेरीस बसले नव्हते पोट फार दुखत होतें. राजश्री दाजीबा व बाबा व अन्याबा व माधवराव यांजप्रमाणे बसले होते. व राजश्री बहिरोपंतबाबा व त्यांचे

पुत्र अन्यावा आले होते. मी प्रातःकाळीं राजश्री परशरामभाऊ यांजला घेऊन मालिटाकडे आमंत्रण केलें होतें. राजश्री बहिरोपंत बाबांनी याज- प्रमाणें सांगितलें होतें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति."

"सेवेसी महादजी चिंतामण याची विज्ञप्ति कीं, मालिट इंग्रज यांस श्रीगणपती उत्साहाबद्दल आमंत्रण सरकारचे वाड्यांत राजश्री आन्याबा मेहेंदळे यांनीं सोमवारीं तिसरे प्रहरी या म्हणोन आपली आज्ञा सांगि- तली होती. आज्ञेप्रमाणें मंडळीसुधा, उदईक मालिटास आमंत्रण केले. यासी तिसरे प्रहरी येतात. सेवेसी श्रुत होय विज्ञप्ति."

१७९१ सालच्या गणपती उत्सवांतील दरबाराचें वर्णन मेजर प्राइस यानें केलेलें प्रसिद्धच आहे.

दुसरा बाजीराव हा रावोबाइतकाच कडक शिवभक्त होता. राघो- बादादाला त्याच्या शिवभक्तीच्या अतिरेकामुळें 'सांब' हेंच टोपणनांव मिळालें होतें. 'दादासाहेब पुण्यप्रतापी निस्सीम शिवभक्त' असा शाहिरा- नींहि त्याचा गौरव केलेला आहे. त्याच्या पत्रांतून श्रीकाराचे जागीं 'श्रीसांबो जयति' हेच शब्द असत. त्यानें माधवरावाशीं भांडून अमृतराव दत्तक घेतला. तेव्हांपासून 'श्रीसांबः सपुत्रो जयति' असें शब्द तो घालूं लागला अशी एका संशोधकाची उपपत्ती आहे; ती खरी असो वा खोटी असो. राघोबादादाच्या श्रीकारातील सांबपुत्र म्हणजे गणपती, त्याची भक्ति अमृतरावानें उचलली येवढें मात्र खरें. बाजीरावानें शिवांची व अमृतरावानें गणपतीची अशा वाटण्या झाल्या. तथापि कुळाचार म्हणून दरसालचा गणेशोत्सव बाजीरावास शनिवारवाड्यांत करावाच लागे. १७९९ साल च्या उत्सवांत बाजीरावानें कायगांवकर लक्ष्मीनारायण दीक्षितास पालखी पाठवून आणल्याचें पत्र राजवाड्यांच्या खंडांत छापलेलें आहे. बाजीराव

पुण्यास नसला तर कोपरगावास जाऊन उत्सव करी असेंहि ऐतिहासिक लेखसंग्रह पत्रें नं. ६१४९ व ६१५० वरून दिसतें.

पेशवाईतील शेवटच्या गणेशोत्सवाचा उल्लेख १८१५ सालचा सांपडतो. त्या वर्षी बाजीरावानें १५०० रुपये गणपती व ऋद्धिसिद्धीच्या मृण्मय मूर्ति करण्याकडे खर्च करावयाचे व हंड्या झुंबरांतून एक हजार रुपयाच्या मोंबत्त्या म्हणजे मेणबत्त्या लावावयाच्या असा संकल्प केल्याचें पेशवे दप्तर भा. ३२ पत्र नं ३० वरून दिसून येतें.

बाजीरावाचा भाऊ अमृतराव याच्या कर्मठ गणपतीभक्तीबद्दल १७९७ च्या पत्रात असा उल्लेख सांपडतो 'अमृतराव व त्याचे पुत्र विनायकराव प्रत्यही आबा शेलूकराच्या बागेंत दुर्वा आणावयास जात असतात!!' त्यावर टीका करतांना खरे शास्त्री लिहितात, 'अमृतराव व त्यांचे पुत्र बाहेर पडावयाचे म्हणजे चारदोनशें माणसांच्या लवाजम्यानिशीं पडावयाचें हें उघडच आहे. ते दिवस पेशवाईला किती विपरीत आले हे वाचकांस सांगावयास नकोच. तर अशा त्या दिवसांत महत्त्वाचीं कामें बाजूस ठेवून सरंजामानिशीं गांवाबाहेर दूर्वा आणावयास जाणाऱ्या अमृतरावांच्या वर्तनाला दांभिक देवभक्ति म्हणावें कीं स्वच्छंदी श्रीमंती म्हणावें हें समजत नाही!' खऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणें अमृतरावाचा आचरटपणा दिसतो खराच. तथापि त्या उदाहरणावरूनच त्याची कर्मठ गणेशभक्ति तरी चांगली दिसते येवढे खास!

* पेशवाईतील श्रावणमास

सध्या श्रावण महिना सुरू आहे. या महिन्याचें धार्मिक माहात्म्य पूर्वी असेल तितकेंच आजही आहे. पण पेशवाईत त्याला जें सार्वजनिक महत्त्व होतें तें आज राहिलेलें नाहीं. सध्या गणपतिउत्सवामुळें भाद्रपद महिना सार्वजनिक महत्त्वाचा ठरतो, तसा पेशवाईत श्रावण महिना ठरे. गणपत्युत्सव तेव्हांही साजरे होत. पण ते सर्व खासगी असत. उलट श्रावणमासांत पेशवे जी लक्षावधि दक्षिणा वांटीत त्यामुळेंच हा महिना तेव्हां मोठ्या उत्सवासारखा भासे. पाऊसकाळामुळें आपल्या स्वाऱ्याशिकाऱ्या संपवून मराठी फौजा घरोघर आलेल्या असत. यामुळें सैनिकांच्या कुटुंबीयांशीं गांठीभेटी पडून त्यांचा आनंद द्विगुणित

* केसरी, ता. १७ ऑगस्ट, १९३४

झालेला असे. पेशव्यांचाही मुक्काम बहुधा पावसाळ्यामुळें राजधानीसच पडे. या सर्व गोष्टींमुळें उत्सवप्रियता वाढे. वरील सर्व दृष्टींनी श्रावण मासाचें महत्त्व कितीही असलें तरी त्याला जें एक तऱ्हेचें राष्ट्रीय स्वरूप येई, तें त्या वेळीं 'श्रावणमास दक्षिणेच्या' रूपाने पेशवे जो लक्षावधि पैका विद्वानांस वांटीत त्यामुळेच होय व त्याचीच आज थोडी माहिती द्यावयाची आहे.

दाक्षिणेचा उगम

श्रावण–मासांत विद्वान ब्राह्मणांना दक्षणा वांटण्याचा प्रघात प्रथम शिवाजीमहाराजांनीच चालू केला असावा, असें कै. पारसनीस म्हणतात. दुसऱ्या कांहीं जणांचें म्हणणें असें कीं, जरी या संस्थेचा उगम खुद्द शिवाजीमहाराजांपर्यंत नेऊन पोंचवितां आला नाहीं, तरी संभाजी किंवा राजाराम या छत्रपतींच्या कारकीर्दींत तो सुरू झाला असावा. तळेगांव–दाभाडें वगैरे प्रांत छत्रपतींच्या खासगींतला होता. त्या खासगींतूनच ब्राह्मणांची श्रावण–मासीं संभावना केली जाई. पुढें तो प्रांत दाभाडे सेनापतींकडे गेल्यावर पूर्वपरंपरेस अनुसरून त्यांनींही श्रावणांत दाक्षिणा देण्याचा परिपाठ चालू ठेविला. त्रिंबकराव दाभाड्याच्या मृत्यूपर्यंत तो चालला. त्यानंतर १७३० अखेर डभईची लढाई होऊन त्रिंबकराव दाभाडे मृत्यु पावला. म्हणून दक्षिणेची पद्धत थांबली. ती पुढील सालीं बाजीरावाने फिरून पुण्यास सुरू केली. पेशव्यांच्या बखरींतही दाभाड्यांचा देकार पेशव्यांनी पुण्यास चालू केला असेंच म्हटल्याचें आढळतें. कसेंहि असो, बखरकाराच्या विधानांत कांहीं तथ्य असावेसें दिसतें. कारण पेशवेदप्तरांत जुन्यांत जुना श्रावण-मास दक्षिणेचा उल्लेख १७३२ सालचा सांपडतो. पेशवे-दप्तर भाग २२ मधील पुरंदरे शकावलींत १७३५ सालची याबाबत नोंद आहे ती अशी : "राजश्री पंतप्रधान याणी

ब्राह्मणांस दक्षणा दिल्ही. श्रावणमासाचे ब्राह्मण जमा जाले होते. त्यास तीन सालीं ३ हजार ब्राह्मण आले. रुपया, दोन, तीन, चार, पांच, दहा, बारा ऐसे दिले." नोंद १७३५ सालाची आहे व तींत 'तीन साली' असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून १७३२ सालापासूनच दक्षिणेची प्रथा प्रथम पुण्यांत पडली असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं. बाजीरावाच्या कारकीर्दीत रमण्याच्या कल्पनेची सुरुवात असल्यामुळें व केवळ विद्वाना-पुरतेंच दक्षिणेचें मर्यादित स्वरूप असल्यामुळें देकार पुण्यांतच कबुतर-खान्यांत किंवा हुजूरपागेंत होई. १७३६ व ३७ सालच्या देकाराचेच तेवढे आंकडे आज उपलब्ध होतात. ते अनुक्रमें १६,३५४ व ४९,०७३ रुपये असे आहेत.

देकारांतही संस्मरणीय कारकीर्द

१७४० नंतर नानासाहेब पेशव्याची कारकीर्द सुरू झाली. ही कारकीर्द इतर अनेक दृष्टींनी जशी वैभवसंपन्न आणि संस्मरणीय ठरली त्याप्रमाणें देकारांत आणि विद्वत्परामर्षांतही ठरली असें म्हणावें लागतें. कारण ह्याच कारकीर्दींत दक्षिणेचा आंकडा ३० हजारांवरून चढत चढत १६ किंवा १८ लाखांपर्यंतही चढलेला आहे! नानासाहेबानंतरही दरसाल हा रमणा किंवा देकार सतत दुसऱ्या बाजीरावअखेर चालू होता. पण तेव्हाहि ५।६ लक्षांवर उडी गेली नाहीं. देकार वाढला त्याप्रमाणें ब्राह्म-णांची संख्याही वाढली. म्हणून त्यांत, निवड करून, टीप करून, विद्वा-नांची त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें सरकार—वाड्यांत निराळी संभावना करावी व मग अवांतर ब्राह्मणांस देकार द्यावा, अशी व्यवस्था करणें भाग पडलें. १७५१ सालीं पर्वतीच्या टेकडीखालीं मैदान—जागा पाहून एक मोठें थोरलें ५०—६० हजार ब्राह्मण मावतील असें आवार निवडून त्यावर कुसूं घालून रमणा तयार करण्यांत आला. त्यास ५ दरवाजे

केले. देकाराचे वेळीं ब्राह्मण रमण्यांत कोंडावे व प्रत्येक दरवाज्यावर पेशवे व इतर मातबर अधिकाऱ्यांनीं बसून एकेकास दक्षिणा देऊन बाहेर काढून लावावें अशी व्यवस्था झाली. या महिन्यांत सारखा पाऊस पडत असावयाचा; त्यामुळें पर्वतीखालीं मराठी सैन्याप्रमाणें अस्ताव्यस्त पसरलेल्या ब्राह्मणांचे साहाजिकच हाल होत. म्हणून निवाऱ्याकरितां चाळीस हजार ब्राह्मणांना पुरतील अशा धर्मशाळाहि बांधण्यांत आल्या. खेरीज पालें, राहुट्या, चांदण्या ठोकून जादा हंगामी सोय करीतच असत. दक्षिणा मिळून रमण्याचे कोंडींतून सुटण्यास दोन दोन दिवस लागत. तेवढ्या अवधींत ब्राह्मणांना प्रत्येकीं तांदूळ, तुरीची डाळ हा शिधा व थोडें मीठ देऊन वर एक एक टका देत. त्यांतून त्यानी तूप, भाजी, लांकूडफांटा विकत घेऊन आपापला स्वयंपाक उरकावा.

नानासाहेबाच्या या कारकीर्दींतील देकाराचे विश्वसनीय आकडे सांपडतात ते पुढीलप्रमाणें:—१७४९–१, २३, ५३०; १७५१–२,५०, ०००; १७५२–६२८, ३५३; १७५३–२, ०६, ०१९; १७५४–८२८, ३४८. भारतवर्ष पंतप्रधान शकावलींत १७५८ सालाच्या नोंदींत पर्वतीवर दरवाज्यास तट बांधला व अठरा लक्ष रुपये एकंदर ऐंशी हजार ब्राह्मणांत वांटले अशी माहिती दिली आहे. १७५२ सालच्या देकाराचें वर्णन समकालीन शकावलीकार पुढीलप्रमाणें करतो— "राजश्री भाऊसाहेब पेशवे पर्वतीस जाऊन रमणियाचा वोढा बांधिला, ब्राह्मणास दक्षणा द्यावया कारणें. ही तजवीज श्रावण शु॥ ७ स केली. नंतर शु॥ ८ सोमवारीं पुण्यांत ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचा आरंभ केला. पांचाठायीं दक्षणा द्यावयास द्वारें केलीं आणि दक्षणा फार फार दिल्ही. बारातेरा लाख रुपये वांटले ! खबुतरखान्यांत भिकार–भणंग यांस देकार महादजी गोविंद यांजकडून देवविला. अठरापगड जातींतून जो घ्यावयास गेला त्यास दिला. रमणियांत रात्रीं दिवट्या लाविल्या. ब्राह्मणां-

वर उजेड पाडविला. गांवापावेतों वाटेने दुरस्ता हिलाल लाविले. मोठा धर्म जाला. पन्नाससाठी हजार ब्राह्मण हालला. सत्तर हजारपर्यंत गणती आली. नाना धर्मात्मा थोर ! ऐसा कोणी झाला नाहींसा दिसते ! !" या नोंदीवरून ब्राह्मणांबरोबरच इतर सर्व जातींनाहि देकार होई हें दिसून येईल. बखरकारानें नानासाहेबाची इच्छा एक लाखापर्यंत ब्राह्मण पुण्यास जमावें अशी होती म्हणून सांगितलें आहे. आणि ती जवळजवळ सफळच झाली. कारण ५० पासून ८० हजारापर्यंत ब्राम्हणांचा आंकडा वाढल्याचें नमूद आहे. श्रावणमास दक्षिणेची कीर्ति नानासाहेबाच्या कारकीर्दींतच किती वाढली होती याचें सुरस वर्णन एका समकालीन शाहिरानें आपल्या पोवाड्यांत केलें आहे. तें असें "श्रावणमासी दक्षणा पुण्यांत । मिळाले ब्राह्मण, नाहीं गणित । बुंदेलखंड, माळवा, काशीप्रांत । कर्नाटक, तेलंगण आणि गुजराथ । हे अवघे तळकोंकण सदोदित मिळालेत । पर्वतीस तेलंगी ब्राह्मण डोकीं देतात । ओघ्राळ ओघ्राळ रुपये (दिले तरी) नाहि घेतात । शिव्या श्रीमंताला देतात । "

पानपतानंतर

थो. माधवरावाच्या कारकीर्दीच्या सुरवातीस पानिपतच्या अरिष्टामुळें देकार रोडावला. १७६२ सालीं अवघे ११८९८ रु. खर्च पडले आहेत. पुढील सालीं तर निजामानें पुण्यावर स्वारी करून पुणें प्रांत लुटला, पुणें शहर जाळून पोळून उध्वस्त केलें. पर्वतीच्या देवळांतील देव फोडले; रमणा व त्याबरोबर चाळीस हजार ब्राह्मणांच्या धर्मशाळा वगैरेही जाळून टाकिल्या. अर्थात् त्या सालीं देकार झालाच नाहीं. पुढें ६५ सालीं रमणा जळाल्यामुळें गांवांत कबुतरखान्यांत १,३२,०४३ रुपये दक्षिणा वाटण्यांत आली. कै. पारसनिसांनी, 'याच सालीं पर्वतीस प्रथम रमणा तयार केला व तेव्हापासून तो तेथें चालू झाला' असें म्हटलें आहे. पण तें चूक असावें. 'प्रथम' या शब्दाचा अर्थ १७६३ सालीं उध्वस्त झाल्या-

नंतर प्रथम. तात्पर्य, ६५ सालाच्या सुमारास माधवरावाने रमणा फिरून बांधविला. ६८ सालीं २,८८,७४५ रुपये वांटल्याची एक नोंद सांपडते.

सवाई माधवरावाचे कारकीर्दीत फिरून रमण्यांतील देकार मोठ्या प्रमाणावर चालू राहिला. १७७६–५,०५,१२८; १७७७–५३,६९९; १७७८-६०,०२६, १७८७–१,४३,३२९; १७८८–२,१८,६३०; १७८९–२,२५,३३४; १७९१–९९०००; रमण्यांत इतकी दक्षणा वांटली खेरीज वाड्यांत विद्वानांस वाटली ती निराळीच. "कोणी कोणाची रदबदली करूं नये अशी बंदी आली होती."

या व पुढील बाजीरावाच्या कारकीर्दीतील देकारासंबंधी वाडांच्या पेशवा रोजनिशींत ज्या चारपांच तपशलिवार विस्तृत नोंदी सांपडतात त्यावरून पुणें शहरांतल्या साऱ्या पालख्या जमा करून विद्वानांच्या घरो-घर पाठवून त्यांना आदराने शनिवारवाड्यांत दक्षिणा द्यावयाकरितां कसें बोलावून आणण्यांत येई, रमण्यांत बायकांनासुद्धां दक्षणा कशी देत, विद्वान व लायक असून दुखणेंकरी पडल्यामुळे रमण्यांत किंवा वाड्यांत जाववत नसलेल्या ब्राह्मणांना घरोघर जाऊन योग्य ती दक्षिणा कशी पोचविली जाई, उत्सवास जमणाऱ्या हजारों ब्राह्मणांचा व तो सोहळा पाहण्याकरितां लोटलेल्या लक्षावधि शहरकरी तमासगिरांचा बंदोबस्त ठेवण्याकरितां पेशवे आपल्या निरनिराळ्या किल्ल्यांवरून व तालुक्यांतून हजार पंधराशें जादा शिपाई प्यादे कसे आणवीत, वगैरेहि बारीक तपशील पुष्कळच कळतात.

१७९६ सालच्या रमण्याचें सुंदर शब्दचित्र खरे पत्र नं. ३८२७ वर आलें आहे. तें असें—"पांच सफरी बारा घटका दिवस आल्या-वर श्रीमंतांची स्वारी दक्षणा देण्याकरितां रमण्याकडे गेली. प्रथम पर्वतीस देवाचें दर्शन घेऊन मग रमण्याचे दरवाज्यांत बसले. बारा घटकांनंतर प्रारंभ झाला. नेमणुकेप्रमाणें शास्त्री, वैदिक, पंडित वगैरे आले

होते. नेमणुकीची याद व ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचे प्रतीची याद होती त्याप्रमाणें द्यावयास प्रारंभ केला. प्रत्येक दरवाजावर थोडा वेळ बसून आपण वांटावी असें करीत. परशुरामभाऊ, अय्याशास्त्री यांचें भाऊ यज्ञेश्वरशास्त्री व इतर मुत्सद्दी निरनिराळ्या दारांवर बसून दक्षणा देत होते. हें दक्षणा देण्याचें काम दुसऱ्या दिवशीं दिवस बारा घटका येईपर्यंत चाललें होतें. त्या दिवशीं रात्रीं पेशवे रमण्यांतच राहिले होते. रमण्याबाहेर भोवताल्या फौजा चौकीस होत्या. संध्याकाळीं दिवसास राजश्री दौलतराव शिंदे आले व राजश्री बापू होळकर व भोसले यांजकडील वकील आले होते. शिंदे याणी घोड्यावर बसून रमण्यांतूनच ब्राह्मणांस प्रदक्षणा केली. श्रीमंतांनी रमण्यांतून पायउतारा एक व बाहेरून पायउतारा एक येणेंप्रमाणें दोन प्रदक्षिणा केल्या आणि पर्वतीवर डेरा दिला होता तेथें ब्राम्हणांचा तमाशा पाहात बसले. अस्तमानीं ब्राह्मण सारे झाले. उपरांतिक तोफांचे बार करविले. ब्राह्मण जाण्याचे वाटेवर हिलाल लाविले होते व चंद्रज्योतीहि बहुत लाविल्या. ब्राह्मण सारे रमण्यांतून निघाल्यावर श्रीमंतांची स्वारी निघाली. महतापा लावीत बुधवारांतून वाड्यांत आली."

पेशवे-दप्तर भाग २२ मध्यें २४५ नंबरास एक नोंद आहे तीवरून परीक्षेखेरीज दक्षिणा द्यावयाची नाहीं असा कटाक्ष होता व तो बराच काळजीपूर्वक पाळला जात होता असें दिसतें. ती नोंद अशी "१८९७५४ रु. पर्वतीस रमण्यांत दक्षणा ब्राह्मणांस दिली पैकीं वजा रामजी भदे शागीर्द नि॥ गोविंदराव नीलकंठ याने दक्षणा आपले वळखीवर शिपारस करवून अकरा रुपये रमण्यांत जात होता. त्यास परीक्षा न घेतां अकरा रुपये दिल्हे म्हणून सरकारचे खिजमतगारांनी धरून आणिलें. त्याची चौकशी करता विद्वान् नाहीं सबब दक्षणा माघारी घेतली ते. आसामी एक रु. ११."

रमण्याचें देशी थाटांत वर्णन

दुसऱ्या बाजीरावींत १७९७ सालीं ४,२४,८९०; १८०१ सालीं रमण्यांत सवालाख दक्षणा शिवाय वाड्यांतला विद्वानांचा परामर्ष, अशा नोंदी सांपडतात. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ९८ सालीं पेशव्यांचें पाहून कोल्हापूरकर छत्रपतींनाही श्रावणमास दक्षिणा वांटण्याची इच्छा झाली. खरे पान १५३८ वरील पत्रांत म्हटलें आहे—" श्रीमंत् महाराज याणी श्रावणमासाची दक्षणा, श्रीअंबिकेच्या देवालयीं वांटली. ५००० रुपये लागले. सालमजकुरीच हा सांप्रदाय नवीन घातला आहे ! "

पेशवे दप्तर व वाडांच्या रोजनिशांवरून १८०६ सालीं बाजीरावानें ८०० रुपये खर्चून रमण्याची दुरुस्ती केल्याचें दिसतें. ब्राम्हणांना वांटावयाच्या शिध्याच्या तांदुळाच्या सडाईबद्दल, तात्पुरतीं छपरें घालावयाबद्दल, प्यादे, कोठवळे, दास्तानाचे रखवालदार, पहारेकरी, कर्णेकरी, शिंगाडे, यांच्या मेहनतीबद्दल, रमण्याच्या पांची दरवाजांचे पुढील सोप्याचे भिंतीवर चित्रें काढण्याबद्दल, रोशनाई व आतषबाजीबद्दल, अशा नाना प्रकारच्या कामांबद्दल रकमा खर्ची पडल्या आहेत. त्यावरूनहि बरेच बारीक मनोरंजक तपशील कळतात.

कॅप्टन मूरनें १७९७ सालीं समक्ष पाहून रमण्याच्या जत्रेचें केलेलें वर्णन प्रसिद्ध आहे. तथापि त्या वेळच्या एका देशी शाहिरानें काढलेलें चित्र अधिक हुबेहूब असल्यामुळें तेवढेंच देऊन पुरें करूं.

" श्रावणमासीं मोठा धडाका। अन्नशांतिचा चालु तडाखा। रमण्यामध्यें छपऱ्या—रावट्या। सरोवर सुंदर निर्मळ पाणी। आंबेमोहराचे तांदूळ तिसडी। डाळ तुरीची पिंवळ बेगडी। लवण ताबूल गंडा रोकडी। प्रतिपदेपासून चालू खिचडी। षष्ठी दिवशीं मुहूर्तवेळीं। गज—उंटावर वाहे खजिना। द्वारिं रोकडा जामदारखाना। द्विजवृंदाचा हम कारखाना। कर्ण

ऊपमा नाहीं कोणा। उदार प्रभु बाजीराव दाणा। भरून अंजळी विद्वज्जना। दक्षणा देई भडभडा ॥ चा० ॥ पेश्वे किर्तीचा झेंडा फडफडा ॥ राप्ता दर्वाजा वाहे घडघडा ॥ चा० ॥ पांचि दर्वाज्याशिं फरे उभे, तोबे मारिती ॥ हत्ती घोडे काठ्या सोटे द्विजथवे कांपती ॥ खडा पहारा चौक्या राहती ॥ मशाल गस्ती फिरती ॥ चाल ॥ भर ओंग्राळें फुटाणे ॥ चार पैसे विडा देणें ॥ शिका कुकुंम छापणें ॥ चा० ॥ धर्मधक्का देऊन त्यांशी गचांड्या लोटून देती ॥ सोरट मंडळ नानाविध जन आशिर्वादें निंदास्तुती ॥ बाजार जिन्नस कापड मेवा मिठाई बर्फि सुर्ति ॥ साठीं सुकेळी फणसपोळी दहीं ताक-पोहे मिळती ॥ सप्तम दिवशीं जनसमाहरी निराहरी प्रदक्षिणा करिती ॥ परमानंदे कोंडिती ब्राह्मण नाहीं गणना लक्षावर्ती ॥ सुटतेकाळीं द्विजसंज्ञेशी धडधडांत तोफा सुटती ॥ तरुवर जैसा प्रफुल्ल गिरिवर नळेदीप-चंद्रजोती ॥ चौघडा झांज घणघोर म्हणे मनोहर शहरीं घरोघर-पारणीं द्विज नक्ताचीं ॥ खरेदी बाळ्या बुगड्या टीक लालड्या मोतीं वित्ताचीं ॥ ”

* पेशवाईतील शिक्षणखातें

श्रावण मासाचें महात्म्य पेशवाईत फार असे. तें तसें प्राप्त व्हावयास पेशव्यांचा देकारच मुख्यतः कारणीभूत झाला. पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पुण्यांत प्रथम श्रावणमास दक्षणा वांटण्याचा प्रघात सुरू झाला व तो पेशवाई संपेपर्यंत अखंड चालला. एवढेंच नव्हे तर पेशवाईनंतरही एल्फिन्स्टननें तो निराळ्या रूपानें जिवंत ठेविला. पेशवे दक्षिणेप्रीत्यर्थ जो पैका खर्च करीत असत त्यापैकीं दोन लाख रुपये निराळे काढून, त्यानें ब्राह्मणांकरितां दोन पाठशाळा घालावयाचें ठरविलें. त्यांतही पुढें सुधारणा होऊन केवळ संस्कृतांत जे प्रावीण्य दाखवितील त्यांना बक्षिसें देण्यासाठीं प्रतिवर्षी पन्नास हजार रुपये खर्च करण्याचें ठरलें. पुढें

---

* साप्ताहिक त्रिकाळ, २७ ऑगस्ट १९३४

१८५१ सालीं त्यांतूनच 'पुणें पाठशाळा' आणि 'पूना कॉलेज' निघालें व फिरून १८६२ सालीं त्यांतून डेक्कन कॉलेज निघालें. म्हणजे, १७३० सालच्या सुमारास विद्योत्तेजनाबद्दल जी दक्षिणा वाटण्याची प्रथा सुरू झाली ती १९३०पर्यंत म्हणजे डेक्कन कॉलेज संपुष्टांत आणण्याची योजना होई-पर्यंत, अखंड चालूच राहिली असें म्हणावयास हरकत नाहीं.

पेशवाईत सध्यांप्रमाणें स्वतंत्र विद्याखातें नव्हतें. त्यावेळचीं विद्या-लयें म्हणजे पंडितांचीं किंवा शास्त्र्यांचीं घरें. अशा पंडितांच्या घरीं शिक्षणाकरितां अनेक विद्यार्थी येऊन राहात व ते पंडितच विद्यार्थ्यांचा योगक्षेम चालवीत. या पंडितांना किंवा शास्त्र्यांना पेशवे हमेश धर्मा-दाय म्हणून रक्कम पोंचवीत असत. यामुळें ती सर्व रक्कम शिक्षणोत्तेजना-करितां खर्ची पडली, असें समजलें पाहिजे. श्रावणमास दक्षणेचा देकार नानासाहेबाच्या कारकीर्दीत सोळा ते अठरा लक्ष रुपयांपर्यंत वाढला. अर्थात् इतके रुपये पेशव्यांनीं विद्येवर खर्चिले असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या-वेळीं विद्या म्हणून जी समजली जात असे ती मुख्यतः वेदशास्त्रांचीच आणि तत्कालीन सर्व वर्णांच्या अनुमतीनें ती ब्राह्मणांनींच फक्त शिका-वयाची असेंहि ठरलेलें असे. त्यामुळें दक्षिणा मिळणाऱ्यांत मुख्य ब्राह्मणच दिसले, तर आश्चर्य नाहीं.

एल्फिन्स्टननें १८२१ सालीं लिहिलेल्या आपल्या रिपोर्टांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "विद्येला उत्तेजन मिळावें एवढ्याकरितांच मुद्दाम पेशव्यांनीं दक्षिणेचा हा देकार सुरू केला." मराठी शाहिरांनीं अनेक ठिकाणीं या देकारा-संबंधीं व रमण्यासंबंधीं गौरवपर उद्गार काढलेले नमूद आहेत. प्रभाकर म्हणतो " वांटून खिचडी रमण्यांत आनंदें पुण्यांत मोहरापुतळ्यांची। खूष केले शास्त्री पंडित विद्यामंडित विप्र विद्यार्थी। गेले कीर्त गात ते ब्राह्मण तीर्थोतीर्थी॥" दुसऱ्या एका पोवाड्यांत तो म्हणतो "वेदशास्त्र-

संपन्न मुखोद्गत वदति अनंदाने । असे ब्राह्मण प्रतिसूर्य पाळिले त्यांच्या छंदाने । प्रतिवार्षिक दक्षणा लक्ष ब्राह्मण श्रावणमासीं । असा धर्म आहे कुठें अवांतर कोण्या ग्रामासी । निरिच्छ योगी ध्याति गाति जे ईश्वर नामासी । अन्नवस्त्र धनधान्य तयांच्या धाडिति धामासी । नंदादिप नैवेद्य ठाइठाइ विठ्ठलरामासी । उच्छाहास दिले गांव लावून सुभद्रासुताच्या मामासी । " रामजोशी 'पुणें वर्णनांत' म्हणतो " रमणाही ब्राह्मणांसाठीं बांधिला केवढा । श्रावणमासी खर्चतो कोट्यावधि तोडा । जागोजागीं मौज अनिवार । नसे अंतपार । वर्णु तरि काइ । कविराज म्हणे धन्यधन्य पेशवाई. "

पेशव्यांची ही दक्षणा इतकी लोकप्रिय झाली कीं, त्यांचें पाहून इतर सरदारही या महिन्यांत दक्षणा वांटू लागले. १७९८ सालीं करवीरकर छत्रपतींनाही श्रावणमास दक्षणा वाटण्याची लहर आली होती ! पेशवाईनंतर गायकवाड सरकारनें रमण्याच्या धर्तीवर खिचडी चालू करून विद्वत्परामर्ष सुरू ठेवला होता हें प्रसिद्धच आहे.

नानासाहेबाच्या दातृत्वामुळें सबंध हिंदुस्थानांतले विद्वान लोक श्रावणमासांत पुण्यास लोटत असत. शृंगेरी, कांचीवरम्, श्रीरंगपट्टण, कुंभकोणम् तंजावर, रामेश्वर, मथुरा, कनोज, काशी इत्यादि झाडून साऱ्या विद्वत्तेच्या आगरांतून लोक आलेले नमूद आहेत. १७५१ सालीं ब्राह्मणांना दक्षणा देणें शिस्तवार व्हावें म्हणून पर्वतीखालचा प्रसिद्ध रमणा मुद्दाम बांधण्यांत आला. आजही त्याचीं भिंताडें पर्वतीखालीं पहावयास सांपडतात. रमण्याच्या पूर्वबाजूनें आंबिलओढा आहे. पावसाळ्यांत या ओढ्यास पाणी येऊन रमण्याकरितां आलेल्या ब्राह्मणांना नेहमी फार त्रास होई. नानासाहेबाच्या कारकीर्दीत मुद्दाम दोनतीनदां हा ओढा खणून रुंद व खोल करण्यांत आल्याच्या नोंदी सांपडतात. दरवर्षी हा ओढा थोडेंफार नुकसान करीच. तथापि सन १७५९

सालीं या ओढ्यानें पांचसहाशें ब्राह्मणांचे बळी घेतले! भारतवर्ष पंतप्रधान शकावलींत "श्रावणमासदक्षणेकरितां श्रावणमासीं ऐंशी हजार ब्राह्मण जमले होते. पुढील महिन्यांत भाद्रपदमासीं पाऊस मोठा पडला. पक्षाचे दाक्षिणेस ब्राह्मण पर्वतीस गेले होते, तों ओढ्यास पाणी येऊन दोन-चारसे असामी वाहून गेले" अशी एक नोंद आहे. भारतवर्षांतील ही शकावली फार अशुद्ध छापलेली असल्यामुळें 'दोन-चार' बद्दल 'दोन-चारसे' असे शब्द 'मुद्राराक्षसा'च्या प्रभावामुळें पडले असतील, असें वाटत होतें. पण ती नोंद सर्वस्वी बरोबर आहे, हें इतिहाससंशोधक पुरंदरे मास्तर यांनीं पुरंदरे दप्तरांतून जी एक नवी समकालीन शकावली उपलब्ध करून दिली तीवरून दिसतें. त्या शकावलींतली नोंद अशीः—

"प्रमाथीनाम सवसरे सके १६८१ सन ११६९ भाद्रपद वद्य आमावाशा मंदवारी परवतीस श्रीमंतांनी पक्षाची दक्षणा दर आसामीस येक रुपयाप्रमाणें द्यावयास ब्राह्मणास कारकून पाठविले. दक्षणा मध्यरात्रपर्यंत दिल्ही. सात आठ हजार ब्राह्मण जाले. मध्यरात्री सोडिले. ते येतांना आंबीळवोहळेस (आंबील ओढ्यास) पाणीयाचा लोंढा येऊन चार पांचसे ब्राह्मण वाहून गेले. दुसरे दिवसी मुरदे श्रीमंतानी उमगविले. से दोनसे सांपडले त्या नदीनें लांब वाहून गेले. जागा जागा सांपडले तेथें मूठमाती देविली. त्यांमधे फुरसंगीचा कुळकर्णी चिंतोबा राहाणा वाहवला व विठोबा कावळा कुळकर्णी मौजे उरली ता हवेली याचा लेक जेष्ट होता, लग्न जाले नव्हते, तोहि वाहवला असे. ब्राह्मण सात आठसें पावेतो बुडाले असेत. श्रीमंत फार श्रमी जाले. मोठे आरिष्ट जालें!"

भाद्रपदांत वळवाचे पाऊस पडतात, त्याने अकस्मात् ओढ्यांना पाणी येऊन माणसें बैलगाड्या वाहवल्याच्या हकीकती आपण सध्याही ऐकतों. पण वरील प्रसंगीं झालेली मनुष्यहानी विलक्षणच होय, यांत शंका नाहीं.

१७५४ सालीं "श्रावण शु॥ ६ गुरुवारीं दुपारपासून श्रीमंतांनीं दक्षिणा द्यावयास प्रारंभ केला. अष्टमीस संध्याकाळीं रमण्यांत कोंडले होते ते देकार देऊन सोडले. दोनचार ब्राह्मण चेंगराचेंगरींत मेले." शकावलीकार म्हणतो "दक्षिणा यंदा गुदस्तापेक्षां नेमस्त दिल्ही. ब्राह्मण पासष्ट हजारपर्यंत अवघे जाले असतील. आठ लक्ष रुपये लागले असतील" या नोंदीवरून १७५३ सालीं दक्षिणेचा समारंभ झाला होता व तेव्हा आठ लक्षांहून अधिक दक्षिणा वांटण्यांत आली होती, हें स्पष्ट होतें. त्या सालाची प्रत्यक्ष नोंद मात्र सांपडत नाहीं.

या सालाच्या श्रावणांत पर्वतीचा ओढा खणून रुंद करण्यांत येऊन दरवर्षी ओढ्यांतील पुरामुळें होणारा त्रास कमी करण्यांत आला होता. त्यासंबंधीं पेशवे रोजकीर्दींत पुढील नोंद आहे. "खमसखमसेन छ. १ साबान गोविंदा बेलदार पर्वतीचा ओढा खणते समयीं दरड पडोन दुखावला सबब खर्चास बक्षीस" पेशवे रोजकीर्दींत दुसऱ्या दोन तीन नोंदी आहेत, त्या अशा.—"खमस खमसेन छ ६ साबान (२०–७–५४) धर्मादाय श्रावणमासची दक्षिणा एकंदर इस्तकबील छ. २८ रमजान तागाईत छ. ६ सव्वाल खर्च रुपये.

६७९६८२ थोक दक्षिणा रमण्यांत ब्राह्मणास, भिकारास व बायकांस वाटिली. बंद अलाहिदे सात.

१४८६६६ वाड्यांत वाटली विद्यमान राजश्री नाना"

वर समकालीन शकावलीकारानें आठ लक्ष रुपये या सालीं वांटल्याचें म्हटलें आहे. पण, नक्की आकडा ८२८३४८ इतका पाहिजे हें उघड आहे.

याच दिवसाच्या दुसऱ्या एका नोंदींत एक मनोरंजक उल्लेख आहे म्हणून ती उतरून घेतो

१२५ धर्मादाय देणें आम्हाका गवईण इला श्रावण मासची दक्षिणा
(ही सावनूरची गवईण होती.)
५० आमाका
५० तिच्या दोन मुलांना
२५ तिच्या नवऱ्याला

१७५५ सालीं किती दक्षिणा वांटली तें नक्की कळत नाहीं. शकावलींत फक्त पुढील नोंद सापडते. " श्रावण शु॥ ६ बुधवारीं श्रीमंतांनीं श्रावणमासचे दक्षिणेंत रमणीयांत दक्षिणा द्यावयाचा प्रारंभ तिसऱ्या प्रहरा केला. ब्राह्मण शुक्रवारीं संध्याकाळीं सुटले. " श्रावणमास दक्षिणेबाबत शकावलींतून नोंदी सापडतात व कांहीं कांहीं समकालीन पत्रेंही आढळतात. तथापि आजवर खुद्द पेशव्यांचें त्यासंबंधीं एखादें पत्र उपलब्ध नव्हतें. तसें एक पत्र सुदैवानें आम्हास उपलब्ध झालें आहे. पत्र पुरंदरे दप्तरातील व अद्याप अप्रसिद्ध आहे. तें खुद्द राघोबादादानें नाना पुरंदऱ्यांस लिहिलें असून, त्यांत श्रावणमास दक्षिणेसंबंधीं प्रसंगोपात्त मौजेची माहिती आलेली आहे. तें पत्र असें—

श्रीशंकर

" चिरंजीव राजश्री नाना (धोंडोपंत पुरंदरे) यांसी रघुनाथ बाजीराव आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें विशेष. काल येक कलमदान जाहाले. यानंतर परवा दक्षणा आम्ही दिल्ही तेव्हा मामांनी अथवा कोणी सांगावी आणि द्यावे असे जाहाले नाहीं. आमच्या मनास आली तितकी दिल्ही. पंधरा हजार ब्राह्मण जाहाले. त्यास सत्तावीस हजार लागले. वैदिक उत्तम आले होते. आणि नानाकडे आठ हजार जाहाले. तीस हजार रुपये लागले. या प्रकारची दक्षणा जाहाली. तिकडे पंडितास दक्षणा दिल्ही. वैदिक आले नव्हते. त्याच्या मतें आम्ही पंडितास दक्षणा दिल्ही त्यास

जितका दर बसला तितकाच हिकडे बसला. परंतु आम्ही मामाच्या आथवा पुराणीक आथवा बहिरव जोसी वगैरे दोन च्यार भट होते, बाबुराव होते, याच्या आनुमते दक्षणा दिल्ही. याच्याच आनुमते केले त्यावरून नानास असें वाटले बहुधा कीं आपणास उदारशक्ती फार आहे असे दर्शवायासाठीं फार दिल्ही ! मागे जेव्हा मनसबा पुसला होता तेव्हा सांगितले होते कीं खर्च थोडा करावा. त्यावरून असे त्यास भासले असेल. येके दिवसी म्हणाले कीं—सहजावरी गोष्ट निघाली होती—आम्ही म्हटले कीं आम्हाकडे वैदिक फार आला तिकडे आला नसेल, असे म्हटले. बहिरव जोसी म्हणाले खरेच. त्यावरून नाना म्हणाले कीं वैदिकही आर्ष आणि हेंही आर्ष; त्या-वरून असा तर्क केला. कोणी आम्हास अवमानतात आम्ही संभालीतच आहो; जे जेथे राग करावा तेथे राग करतो. जेथे सोसायाचे तेथे सोसतो, असे आहे हे आशिर्वाद. "

सर्व हिंदुस्थानांतले विद्वान ब्राह्मण पुण्यास जमत असल्यामुळें तत्कालीन धार्मिक किंवा आचारविषयक वादही विद्वत्सभा करून यावेळीं निकालांत काढण्याची अनायासें सोय होत असे. नाशिक येथील हिरण्य-केशी व ऋग्वेदी ब्राह्मणांचा कांहीं एका मुद्द्यासंबंधीं मोठा तंटा उपस्थित झाला असतां, भाऊसाहेब पेशव्यांनीं, ' आतां लवकरच पुण्यास श्रावण-मासानिमित्त ब्राह्मण जमा होतील तेव्हां विद्वद्सभा करून निकाल करून देऊं, ' असें आश्वासन दिलेलें त्यांचें पत्र पेशवे दप्तरांत छापलेलें आहे.

१७७६ व १७९७या दोन सालांच्या विल्हेवार याद्या उपलब्ध होतात, त्यांवरून असें दिसतें कीं, पहिल्या सालीं २६७ पंडित, ११३७ वैदिक, ६१ जोशी, ८२ पुराणिक, ४० वैद्य, १३ कवि आणि ५४ तपस्वी आले होते. १७९७ सालच्या संभावनेंत १०३४ पंडित, १७२८ वैदिक, २१३ जोशी, १०४ पुराणिक, १२६ वैद्य, ४३ कवि आणि १०८ तपस्वी आढळ-

तात. दक्षणा मिळालेल्या निरनिराळ्या सालांतील विद्वानांच्या याद्यांवरून सामान्यतः कोणाची संभावना होई तें कै. पारसनीस यांनीं एके ठिकाणीं दिलें आहे, त्याचा तपशील असा वैदिकः—आश्वलायन दशग्रंथी, आपस्तंब पंचग्रंथी, तेलंग जटापाठी, वाजसनेई शतपथ संपूर्ण व पदक्रम जाणणारे, सामवेदी, अथर्ववेदी, पंचग्रंथी, काण्व क्रमपाठी, श्रौतीसोमाचे अध्वर्यु. पंडित :—व्याकरण, कौस्तुभ पढलेले. नैयायिक :—भावानंदी जाणणारे. मीमांसक —शास्त्र दीपिका पढलेले. वेदांतीः—भाष्य व प्रकरणें, सिद्धांत लेश असे दोन पद्धतीचे. जोशीः—ग्रहपर्वक व संपूर्ण जातक, ताजक पढलेले, पत्रिका वर्षफल जाणणारे. पुराणिकः—कौमुदी व वेदांतिक न्यायप्रकरण पढलेले. काव्यपाठी :—माघान्त काव्यें पढविणारे. अलंकारी :—कुवलयानंद पढविणारे. वैद्यः—शारंगधर पढविणारे व संपूर्ण पढवून रसायनक्रिया जाणणारे. खेरीज अग्निहोत्री, तपस्वी वैदिक, गायत्री, मांत्रिक, इत्यादि प्रकारचे विद्वान् व शास्त्रज्ञ असून शिवाय कवीही असत. याशिवाय विद्यावंतांचे पुत्रपौत्र, सरकारचे आश्रित उपाध्ये, दूरदेशस्थ, देवालयांत धरणें देऊन राज्यास शुभ चिंतन करणारे, व अन्य जातींचे म्हणजे जंगम, गोसावी, फकीर वगैरेही लोक असत.

नानासाहेबाच्या कारकीर्दीपैकीं सहा सात सालांचेच दक्षणेच्या रकमेचे निश्चित व विश्वसनीय आंकडे सांपडतात. १८ लाखांपर्यंत या कारकीर्दीत देकार चढला आहे. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीतही दोन तीन सालचे आंकडे सांपडतात. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीपैकीं सुमारें सात सालांचे सांपडतात.

१७९७ सालीं कॅप्टन मूर नांवाच्या युरोपिअन अधिकाऱ्यास प्रत्यक्ष रमण्याचा समारंभ पाहण्याची संधि सांपडली. आणि युरोपियनांच्या चौकस आणि साक्षेपी स्वभावाप्रमाणें त्यानें ती लिहूनहि ठेविली आहे. ती मौजेची आहे. ती अशीः—

" श्रावण महिन्यांत दक्षिणा वांटण्याची पद्धत किंवा देकाराची पद्धत फार उपयोगी आहे. कारण पावसामुळें प्रवाशी ब्राह्मणांची गैरसोय होते ती पूर्णपणें निवारते. पर्वतीच्याखालीं चाळीस हजारपर्यंत ब्राम्हण जमतात. या दक्षिणेच्या देकारांत अर्थात् निःस्पृह परीक्षेबरोबरच शिफारशीची आणि वशिल्याची गर्दी होत असलीच पाहिजे. कांहीं वेळा तर चेहऱ्याकडे पाहूनच परीक्षा संपत असल्यास आश्चर्य नाहीं ! पर्वतीच्या टेंकडीच्याखालीं एक चौरस रमणा करण्यांत आला असून, त्याला एकापुढें एक दरवाज्यांची जोडी असलेले असे चार मोठाले दरवाजे आहेत. अर्थात् ब्राह्मणांखेरीज आंत कोणाचा शिरकाव होणें शक्य नसल्यामुळें, आम्हांस पंचाईतच होती. पण, अखेर मला व कॅप्टन् गार्डनरला आंत गंमत पहाण्याकरितां प्रवेश मिळाला. आम्ही आंत गेलो. दक्षिणा वांटण्याचे कामावर एका दरवाज्यावर अमृतराव पेशवा बसला होता. त्यानें मोठ्या आदरानें आम्हांस बोलावून आपणांजवळ बसवून घेतलें. पण त्यामुळें खरी गंमत पहावयास सवड झाली नाहीं. या दरवाजाशीं एक गंधाचें घंगाळ भरलेलें असून, त्यांत हात बुडवून प्रत्येक ब्राह्मणाच्या वस्त्रावर पंजा उठवण्याचें काम करण्यांत येत होतें. हा शिक्का असलेल्यानें दक्षणा घेऊन बाहेर पडावें. रात्रीं दहा वाजेपर्यंतही ब्राह्मणांना आंत घेत होते. कोणालाही विन्मुख लावीत नाहींत. सर्व कोंडी पूर्ण झाल्यावर मगच बहुधा दक्षिणा वांटण्यास सुरुवात करतात. कारण एकादा लुच्चा दुबार उपटावयाचा ! दरवाजांतून आंत येत असतां बहुधा दक्षिणा देत नसावेत. कारण मग गंधाच्या खुणेची जरूर नाहीं. सामान्यतः तीन ते दहा रुपयां-पर्यंत दक्षणा देतात. एका दारांत पेशवा, दुसऱ्यावर अमृतराव, तिसऱ्यावर चिमाजीअप्पा, चवथ्यावर नाना फडणीस दक्षणा वाटावयास बसतात. दौलतराव शिंदेही रमणा पहावयास आला होता. तो संध्याकाळीं पांच वाजता परत गेला. या समारंभानिमित्त पर्वतीभोंवतालचा सारा प्रदेश

माणसांनीं अगदीं कालवला गेला होता. यंदाचा (१७९७) देकार जादा झाला. लोकप्रियता मिळविण्यासाठीं बाजीरावाची ही युक्ति असावी. पांच लाख रुपये वांटले."

खुद्द रमण्याचें म्हणून त्याच्या बांधकामाचें व व्यवस्थेचें तपशीवार वर्णन केल्यास तेंही मनोरंजक होण्यासारखें आहे. पण तूर्त येथेंच पुरे.

* पेशव्यांचा व्यायामाचा शोक

पेशव्यांच्या कुटुंबांतलें सारे पुरुष तालमीचे व मर्दानी खेळांचे शोकी होते. पेशवे-दप्तर, पटवर्धन-दप्तर, पुरंदरे-दप्तर, वाडांच्या डायऱ्या, पारसनिसांचा इतिहास-संग्रह वगैरे समकालीन व विश्वसनीय साधनांतून याविषयीं पुष्कळ उल्लेख सांपडतात. ते एकत्र केले म्हणजे पेशव्यांच्या कुटुंबांतील पुरुषांच्या व्यायामप्रियतेवर व त्यावेळच्या एकंदर समाजाच्याहि तालमीसंबंधीच्या शोकावर चांगला प्रकाश पडतो.

थोरले नानासाहेब म्हणजे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव आणि चिमाजीअप्पा यांच्याविषयीं स्पष्ट उल्लेख अद्याप सांपडत नाहींत. पण हे तीनहि पुरुष युद्धकलेंत व मर्दानी खेळांत प्रवीण असावेत असें मानण्यास हरकत

---

* केसरी, ता. ७ व २५ सप्टेंबर, १९३४

दिसत नाहीं. नानासाहेबांपासून स्पष्ट उल्लेख सांपडू लागतात. ते स्वतः नियमानें स्वतःच्या खास तालीमखान्यांत मेहनत करीत असत. त्यांनी आपल्या विश्वासराव व माधवराव या पुत्रांनाही तो नाद लावला होता व इतर अनेक कलावंताप्रमाणें पदरीं नामांकित मल्ल आणि जेठीहि पाळले होते. नानासाहेबांच्या रोजकीर्दींत १७५४ सालाच्या जमादिलाखर महिन्याच्या २८ तारखेस पुढील उल्लेख आहे. 'बाजे खर्च तालीमखान्याकडे मुद्गलास तर्फे गोविंदजी भोई, तेल चेमली वजन पक्के ८८८९.'

२१–३–५७ च्या त्यांच्या रोजकीर्दींत त्यांच्या सरकारी तालिमखान्याचें थोडें वर्णन आहे. ती नोंद अशी—

नानासाहेबांचा तालिमखाना

" मल्हारराव भिकाजी यांजकडे सरकाराचे दागिने तालिमखान्याकडील होते, त्यांपैकीं मशारनिल्हेनी पाठविले ते जमा. गुजारत विश्रामजी शेळका खासबारदार दिमत सोनजी धनवडे. दागिने जमा तालिमखान्याकडेः— ९ दगडी दागिने (२ नाल लहान, २ नाल थोर, १ खरबुजी, २ नाल चकरी, २ जोड नाल) २ नाल शिशाचे. १३ लांकडी दागिने (२ गदा १ गदा लहान, १ सोटा, ६ मुद्गल जोड्या, १ चंदनी जोडी, २ शिशव्याच्या जोड्या सुमार, १ फरश चंदनी. २ मुद्गल जोडी, १ लहान) एकूण २४ दागिने सरकारांत सदरहूप्रमाणें पावले असें म्हणून जाब लिहून दिला असे. छ २८ जमादिलाखर सदरहू दागिने इदेभान चौकीदार दिमत भवानसिंग व लछाजेठी वल्लद एकजेठी याचे हवाला केला असे. " (पेशवा डायरी भाग ३ व्हॉल्यूम १, पान ११५).

आनंदराव नांवाचा एक गृहस्थ नानासाहेबांच्या आप्तवर्गीयांपैकीं होता. त्याला त्यांनीं उत्तमपैकीं पाहिलवान बनविला होता. आणीबाणीच्या वेळीं नानासाहेब त्याला लढवीतहि. एक वेळ नानासाहेब साताऱ्यास

असतां शाहू छत्रपतीकडे कांहीं जेठी 'आव्हान' देऊन आले तेव्हां नानासाहेबांनी या आनंदरावाला महाराजासमक्ष जेठीशीं लढविलें. त्यांत आनंदरावानें कुस्तींत 'जेठी' चीत मारिला; म्हणून खूष होऊन शाहू-महाराजांनीं त्याला कांहीं जमीन इनाम करून दिली. (पेशवे–दप्तर)

खमसखमसेन म्हणजे १७५४ सालीं जिल्हेज महिन्याच्या पहिल्या तारखेस लच्छा व कन्हैया या दोन जेठ्यांनी कुस्त्या घेतल्या म्हणून २५ रुपये त्यांना बक्षीस दिले आहेत. तसेच त्याच सालाच्या दुसऱ्या एका महिन्यांत येगा जेठी याला ७५ रुपये दिलेले आहेत.

"खमसखमसेन रमजान छ २० खर्च जामदार–इनाम देणें पहिलवान कुस्ती लढले, सबब रसानगी चिठ्ठी आसामी २ दर आसामी आंख २४." "इनाम देणें सदू पाथरवट पहिलवान यांस कुस्ती लढला, सबब रसानगी चिठ्ठी आंख ३०."

भाऊसाहेबांची ख्याति

भाऊसाहेब पेशव्यांची तालमीबद्दल विशेष ख्याति होती. चिंतामणराव वैद्यांनी 'दुर्दैवी रंगू' कादंबरींत पानपतच्या रणांगणावरहि सूर्योदयापूर्वी हजार नमस्कार घालण्याचा त्यांचा परिपाठ चुकला नाहीं असें लिहिलें आहे. त्या वर्णनांत अतिशयोक्तिच असेल असें म्हणवत नाहीं. दररोज व्यायाम करण्याची ज्याला संवय लागली आहे त्याला दिवसभर कितीहि कष्टाचें काम पडलें तरी रोजची मेहनत केल्याखेरीज राहवत नाहीं. मोठमोठ्या कंत्राटदारांना कारखान्याच्या तळावर हंगामी आखाडे आपल्या नोकरांकरितां मुद्दाम तयार करून द्यावे लागतात हें आजहि पाहावयास सांपडतें. सुतार, लोहार यांसारखे शारीरिक कष्टाचे धंदे करणारे लोकहि पहाटे किंवा काम झाल्यावर रात्रीं तेथे मेहनत केल्याखेरीज राहात नाहीत! भाऊसाहेबांचे बाबतींत तर ही गोष्ट

मुळींच खोटी नाहीं. कारण उदगीरच्या मोहिमेस निघण्याच्या आधीं कोणा मुजफरखान गारद्यानें त्यांच्या खुनाचा प्रयत्न केला. पण जखमा पूर्ण बऱ्या होईपर्यंतही त्यांना व्यायाम सोडवला नाहीं ! पेशवे-दप्तराच्या पहिल्या भागांत ता. १६-१२-१७५९ रोजीं त्यांनीं स्वहस्तें नानासाहेबांस जें पत्र लिहिलें आहे त्यांत ते म्हणतात, " माझी प्रकृत प्रस्तुत बरीच आहे. दोहो तिहीं दिसाआड येकदा जेवतों. संभाळून जेवावे लागते. पथ्य अगदीं नाहीं. जड मात्र फार खात नाहीं. औषध पहिलें चालतें तेंच आहे. जखमेचें कातडें अजून बळकट झालें नाहीं. शिरेवर (जखम) म्हणून आंग थोडेसें दुखत असतें. शक्त अजून चांगली येत नाहीं. पाठीमुळें दंड—नमस्कार नाहींत, ते चाली लागल्या याहून बरें वाटेल. थोडाथोडा प्रारंभ आहे. "

या पत्रावरून दंड—नमस्काराचा व्यायाम भाऊसाहेब सतत स्वारींतहि घेत असत हें स्पष्ट दिसतें.

पेशवा रोजकीर्दींत एक नोंद पुढीलप्रमाणें आढळते—

" खर्च जामदार—खासगत खर्च रा. भाऊकडे चोलणा तालिमेकरिता वेतविला गु॥ गोविंद केशव गजनीसनगे यो

राघोबादादांची मेहनत

भाऊसाहेबांप्रमाणें राघोबादादाही नेमाने आखाड्यांत जाऊन मेहनत करणारा होता. याच्या पुराव्यास खुद्द राघोबाच्या पत्रांचाच आधार मिळतो. पुरंदरे मास्तर यांनी 'पुरंदरे दप्तरांत' संशोधिलेलें राघोबाचें एक पत्र पुढीलप्रमाणें आहे.

॥ श्रीशंकर ॥

पो. छ. २९ रबिलोवल

'चिरंजीव राजश्री नाना (धोंडोपंत पुरंदरे) यांसी प्रति रघुनाथ

बाजीराव आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे. विशेष. तुम्ही पत्राचें उत्तर पाठविलें तें पावलें, लिहिला मजकूर सविस्तर अवगत झाला. ज्वराचा मजकूर लिहिला तर तो सखारामपंती सांगितला असावा परंतु तो लटका! यांत संदेह अंगडींतला आहे कांहीं ताजेहि होत आहे दू वख्त दंड काढतो. दो रोजाआड घोडी फेरावयास जातो. खातो तें जिरतें. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें असें. बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद.'

पेशवे दप्तर भाग १८ मधील ५५ नंबरच्या पत्रांत रघुनाथराव आपल्या भावास म्हणजे जनार्दन बाजीरावास लिहितो, "महंमदहुसेन याची व ढोल्याची झोंबी लावावी. आज नानापासी मी बोललो कीं, महंमद हुसेन पाडील. त्यास तीर्थरूप राजश्री भाऊस सांगून झोंबी लावून कोण पाडतो कसे होते तें सविस्तर लिहावें. सत्वर झोंबी लावावी. तीर्थरूपास कागद वाचून दाखवून कसें होतें तें लिहिणें." त्याच भागांतील ८९ व्या पत्रांत फिरून रघुनाथराव भाऊसाहेबास लिहितो कीं, "तीर्थरूपाची आमची पैज पडली आहे, तरी महंमद हुसेनाची झोंबी लावावी."

विश्वासराव व माधवराव

विश्वासराव व थोरले माधवराव यांनाहि तालमीचा बाळाभ्यासच होता. खमसखमसेन म्हणजे १७५४ सालच्या रमजान महिन्याच्या १३ व्या तारखेच्या रोजकीर्दीतील एक नोंद अशी आहे—"खर्च जिन्नस-राजश्री विश्वासराव व माधवराव यांजकडे तालिमखान्यांत लावायासी आगरबत्ती सुमार १" या वेळीं माधवराव विश्वासराव यांचीं वयें अदमासें १२ आणि १५ इतकीं असतील.

१७६६ सालीं माधवराव आजारी झाले तेव्हां त्यांच्या आईनें

म्हणजे गोपिकाबाईनें एका पत्रांत त्यांस आग्रहपूर्वक लिहिलें कीं, " तालीम तुमच्या प्रकृतीस मानवत नाहीं तर ती करण्याचें तुम्हीं सोडून द्यावें " त्यावर त्यांनीं उत्तर लिहिलें कीं, " मला वडिलांचे आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय ? तालीम सोडली. हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों. " (खरे पान १४४) व्यायाम करण्याचा त्यांचा अभ्यास अगदीं लहानपणापासून होता. पण क्षयाचीच व्याधि झालेमुळें त्यांचें शरीर निकोप व दणगट राहिलें नाहीं हें दुर्दैव होय.

नारायणराव पेशव्याच्या तालमीविषयीं स्पष्ट उल्लेख कोठें सांपडला नाहीं. तथापि त्याच्या मर्दानी खेळांविषयीं दोनचार उल्लेख पेशवेदप्तर भाग ३२ मध्यें आलेले आहेत. ३४ नंबरच्या पत्रांत तो तीर पाठविण्याविषयीं नाना फडणवीसास लिहितो. ४३ नंबरच्या पत्रांत तो नानाफडणवीसास लिहितो, " दाहा बोथाट्या उत्तम बोंडाच्या बुढ्यासमेत त्यांत दोन आम्हां जोग्या बारा हात लांब आखूड रामेच्या व दाहा भाले फली बढ्या समेत तयार करून पाठवणें. दोहोचहूं दिवसी घोडी फेरावयास जाण्यामुळें बोथाट्या फार मोडतात. बोथाट्या व भाले सत्वर पाठवणें. "

सवाई माधवरावाच्या इतर सर्व शिक्षणाबरोबर त्याच्या शारीरिक शिक्षणाची काळजी नाना फडणवीसानें यथास्थित घेतली होती. त्याच्या मर्दानी शिक्षणाबद्दल व मेहनतीबद्दल युरोपियन लोकांनीहि समक्ष पाहून माहिती लिहून ठेवलीच आहे. सातारा येथील पारसनीस म्यूझियममध्ये सवाई माधवरावाच्या दिनचर्येचा चारपांचशें पत्रांचा एक स्वतंत्र रुमालच आहे. त्यांत यासंबंधीं कांहीं लेख वाचल्याचें प्रस्तुत लेखकास चांगलें स्मरतें. घोड्यावर बसून भाला फेकणें, दांडपट्टा खेळणें वगैरे मर्दानी खेळ माधवराव खेळत असे. उदाहरणार्थ—वाडकृत पेशवा डायरीमधील तिस्सास-मानीन छ २२ मोहरमची नोंद पहा (१७८८-८९) 'बाजेखर्च राजश्री

राव यांचेकडे दांडलकडी खेळते समई हातास बांधावयास रुमाल तापत्या-चा सुमार १. तसलमात· हणमंता टिळेकर खिजमतगार तागा कद हात २७ नग ८२ एकूण आंख ६."

गोपिकाबाअीचा उपदेश

काव्येतिहाससंग्रहांत ता. ८-११-१७८३ रोजीं गोपिकाबाईनें आपल्या नातवाला म्हणजे सवाई माधवरावाला दिनचर्या कशी आखावी याविषयीं जे नियम सांगितले आहेत त्यांत व्यायामासंबंधीं पुढील महत्त्वाचें कलम आढळतें. "तालिमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्तिअन्वयें चढते दंड असावे. बरोबर समवयी मुलें पांचचार संभावितांचीं असावीं व जेठी एक दोघे व नेहमीं विश्वासूक गृहस्थ असावयाचे ते असावे. जेठी यांनी कुस्तीचे डाव शिकवावे नंतर समवयी मुलांसुद्धा प्रकृतीस जो खुराक मानेल तो नेमेकरून घेत जावा."

इतिहाससंग्रहांत सवाई माधवरावाच्या ज्या दोनतीन दिनचर्या छापल्या आहेत त्यांवरून त्याला बाळपणापासूनच वज्रमुष्टी, कुस्ती वगैरेची फार गोडी लागलेली दिसते. एका दिनचर्येंत असें म्हटलें आहे—"शिंदे, पोरगे यांच्या वज्रमुष्टीच्या लढाया लावतात. एखादा थकून पडला तथापि ढालाइताकडून सोडगे मारवावे, बळेंच उभा करून पुन्हा लढवावें. नाकांतून, तोंडांतून रक्तें आलीं तत्रापि सोडूं देत नाहींत. दोनचार मुलें दुखण्यांस पडलीं आहेत."

दुसऱ्या एका दिनचर्येंत असें म्हटलें आहे कीं 'दोनप्रहरीं मुलें घेऊन बसावें. मनस्वी खेळ करावे. वज्रमुष्टीच्या ध्वजा कराव्या असें होत असतें!' तिसऱ्या एका दिनचर्येंत पुढील उल्लेख आहे. 'गणेशपंत पेठे यांचा पुतण्या नमस्कारास येत असतो. त्याचें शरीर वायुबद्ध आहे. स्थूल

बहुत आहे. त्यांजला दोन दिवस चौसोपींत एक प्रदक्षिणा धाववितात, बैठका करवितात."

'पूना इन बायगॉन डेज' या पुस्तकांत पारसनीस म्हणतात, 'मराठेशाहींत लोकांचे सगळ्यांत आवडते खेळ म्हणजे मर्दानी खेळ. पेशवे काळांत लोकांनी त्यांत पूर्णत्व मिळविलें होतें. मुकीचे व वज्रमुष्टीचे किंवा कुस्तीचे सामने फारच चुरशीचे होत. त्यांतल्या त्यांत कुस्ती जिंकणें ही सर्वांत मोठी गोष्ट मानली जाई आणि पेशवे पैलवानांचा भारी भारी बक्षिसें देऊन गौरव करीत. सवाई माधवरावाच्या पदरीं गोविंदा जेठी, मिना जेठी आणि तिमा जेठी हे तीन वज्रमुष्टी लढणारे होते. त्यांना दर दसऱ्याच्या दरबारांत अनुक्रमें १५०,१४७ आणि १०० रुपयांचा पोषाख मिळण्याचा मान होता.'

१७८० सालच्या वैशाखांत २७ सवाल रोजीं एक नोंद अशी सांपडते 'माहे सवाल अव्वल ऊर्फ वैशाख छ २७ रोज जेठी पट्टणकर यांच्या पांच लढाया जाल्या त्यास पूजेस' "पारसनिसांच्या इतिहाससंग्रहांत सवाई माधवरावकालीन सणाविषयीं माहिती देणारीं एकदोन पत्रें सोळा मार्च व वीस मार्च १७८६ सालचीं छापलीं आहेत. त्यांत होळीच्या दिवशीं सवाई माधवरावापुढें मुद्दाम जेठींची लढाई लावल्याचा उल्लेख आहे. 'जेठींची लढाई लाविली. आबाजी व इश्रा यांची लढाई दोन घटका पावेतो झाली. दोघेहि समतुल्यच राहिले मग मनाई झाली.(म्हणजे कुस्ती सोडविली)."

मोरो अप्पाजीचें पत्र

याच सालच्या मोरो आप्पाजीच्या ११ डिसेंबरच्या पत्रांत पुढील माहिती आहे, 'श्रीमंतांच्या वाड्यांत पंचमीस जेठी यांच्या लढाया झाल्या. कर्नाटकांतून पेशजी तीन जेठी आले होते. अडीच महिने रतीब खाऊन बनून गेले. काल कुस्ती झाली. त्यांस तिघां जेठ्यांपैकीं दोघे जेठी यांस

येथील शहरांतील तालमेच्या आखाड्यांतील गड्यांनी चीत केले. एकास मखवा गौळी याने व एकास कल्ल्या गौळी याने. याप्रमाणें दोघांनी दोघांस चीत केलें. एक जेठी कर्नाटकचा त्याची व आबाजी सुतार याची कुस्ती झाली. आबाजीस त्याने चीत केलें. आणखी तेथील तालमीचें आखाड्यांतील गड्यागड्यांच्या कुस्त्या झाल्या. आणखी कर्नाटकचे पहिलवानास रतीब दिला आहे. मास पक्ष जाहल्यावर आणखी लढाई होईल." (खरे नं. ३०६६)

प्रभाकराच्या खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यांत खर्ड्याची लढाई जिंकून पेशव्याची स्वारी पुण्यास आली तेव्हा "तसेंच लष्कर पुण्यास आले पहावया जन सर्व निघाले" त्या वेळच्या पेशव्याच्या परिवारात नेहमीप्रमाणें पहिलवान आणि जेठी होते असें म्हटलें आहे. "पहिलवान आणि जेठी मस्ते, खुराक त्यांना बदामपिस्ते, सदा धुंद जिलिबींत (परिवारांत) चालती" त्याच पोवाड्यांत पेशव्याच्या तालीमखान्याचा असा उल्लेख आहे, "गारपिराच्या मग रोखांना, तमाम दिधला फरासखाना, उजव्या बाजूस जामदारखाना, डावीकडे तो जव्हेरखाना, देवडीबराबर सराफखाना, चकचकीत खुब शिलेखाना, मध्ये रायाचा (सवाई माधवराव) तालीमखाना, खळखळखळ लेजिमा वाजती."

पेशवे कुटुंबांत दुसऱ्या बाजीरावाला आरोग्य आणि आयुष्य सर्वांहूनहि भरभक्कम लाभलें होतें. तो लहानपणापासूनच हूड होता, याविषयीं त्याच्या मास्तरानेच सर्टिफिकेट दिलेलें प्रसिद्ध आहे ! पेशवे दप्तर भाग ३ मध्ये त्यासंबंधी पुष्कळ उल्लेख आहेत, "दिवसभर आखली करावी, शिकू नये, हा उद्योग. क्रीडासक्ती फार. निरंकुश गजसादृश्य आहे." पुण्याच्या गादीवर बसविण्याकरिता त्याला जुन्नराहून आणावयास पटवर्धनांचें पथक गेलें. त्यांतला आबा काळे बाजीरावाचें वर्णन करतांना पहिलेंच वाक्य लिहितो, की, "श्रीमंतांचें शरीरसामर्थ्य चांगलें आहे."

बाजीरावाला तालमीचा शोक फार होता. पेशवे दप्तर भाग २२ मध्यें त्यानें स्वहस्तें लिहिलेले स्वतःचे खासगी जमाखर्च छापले आहेत. त्यांपैकीं पुढील दोन नोंदी पाहा. पहिली नोंद सन्नामयातेन सालाची म्हणजे १४-१०-१८०६ ची आहे. त्यांत 'तालीमखाना नवा शुक्रवारचे वाड्यापुढे रस्ता मधीं टाकून बांधला आहे' असा स्पष्ट उल्लेख आहे. दुसरी नोंद तिसामयातेन सालाची म्हणजे २४-६-१८०८ ची आहे. त्यांत '३६००रु. किमतींत तालिमखान्यांत लाल माती आणून तयार उत्तम करोन घालावयाबद्दल खर्च जाहले' असें म्हटलें आहे.

पुण्यास असता बाजीरावानें पहिलवान पदरीं बाळगून तालमीचा शोक मनसोक्त पुरवला तसा तो ब्रह्मावर्तास गेल्यावरही टिकवला. तेथें त्याच्या औदार्यानें नुसते ब्राह्मणच जमा झाले नव्हते तर गुणी लोक, गवई, बीनकार, बहुरूपी यांच्याप्रमाणें पहिलवानही जमले होते. "त्यांच्याजवळ बाळंभटदादा या नांवाचे एक प्रख्यात पहिलवान होते. त्यांची कुस्तेगिरी सुप्रसिद्ध आहे. त्यांनीं लखनौचा नबाब वजीद अल्लीशहा यांजकडून आलेल्या एका गर्विष्ठ पहिलवानाचा गर्व एका क्षणांत परिहार केला होता. बाळंभटदादाप्रमाणेंच सिद्दी, बडा हरि व छोटा हरि असे तीन पहिलवान बाजीरावसाहेबांजवळ प्रसिद्ध होते व त्यांच्यावर त्यांची फार मेहरबानी असे."

बाजीरावाची शरीरप्रकृति उत्तम असून त्याची प्रवासाची आणि कष्टाची हौस कांहीं विलक्षणच. नेपोलिअनच्या मांडीखाली पुष्कळ घोडीं मरत असें म्हणतात. बाजीरावाचेंहि तसेंच एक वर्णन खरें पत्र नंबर ६०५१ मध्यें आलें आहे. "छ ११ जिल्हेजी श्रीमंतांची स्वारी निघोन बनेश्वरास जाणार अशी आवाई घातली. सायंकाळचे सहा घटिका दिवसास श्रीमंत राजश्री अप्पासाहेब व राघोबादादास व दाजीसाहेबास सांगोन पाठविलें कीं आठा दिवसांचें सडें सामान घ्यावें. स्वारीबरोबर यावे

याप्रमाणें आज्ञा जाहली. सायंकाळीं दोन घटिका दिवसास स्वारी निघाली ती सासवडास गेली. तेथे मुक्काम एक जाहला. दुसरें दिवशीं कूच करून बेलसरे येथे मुक्काम केला. ते दिवशीं भुलेश्वरास सात कोस जाऊन तिसरे प्रहरीं माघारी भोजनास आले. मार्गीं तीन घोडी व खासे पालखीचे भोई असे मृत्यु पावले—स्वारी फार जलद. "

बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजीअप्पा याच्याहि तालमीच्या शोकाबद्दल एका पोवाड्यांत उल्लेख आलेला आढळतो. पोवाडा निंदात्मक आहे. तथापि या माहितीपुरता उपयोगी आहे. शाहीर म्हणतो :—

" थोरले ते तप करिती जान्हवी-काठीं। (अमृतराव)
मधल्यांच्या भोवती असे ती बायकाची दाटी। (बाजीराव)
धाकटे लाविती कुस्त्या पाळुनिया जेठी। (चिमाजी अप्पा)
करोनि ऐसे ढंग त्यांनी हो राज्या लाविली काठी। "

असो. आता तत्कालीन व्यायामाच्या सर्वसाधारण शोकाबद्दल थोडें सांगून पुरें करूं. थॉमस ब्राउटन् हा १८०९ सालीं दौलतराव शिंद्याच्या लष्कराबरोबर ' कमांडर ऑफ दि रेसिडेन्स एस्कॉर्ट ॲट दि कोर्ट ऑफ शिंद्या ' या हुद्द्यानें फिरत असता त्यानें अनेक तऱ्हेची प्रत्यक्ष पाहिलेली माहिती साक्षेपानें लिहून ठेविली असून त्या माहितीचें एक सुंदर पुस्तकच तयार झालें. त्या पुस्तकांत एके ठिकाणीं शिंद्याच्या सैन्याच्या तळावरही सैनिक शिपाई आखाडे तयार करून तेथेंहि आपल्या तालमीस खंड पडूं देत नसत याविषयीं फार चांगली माहिती आली आहे ती पूर्णपणें विश्वसनीय आहे.

तो आपल्या निमारा येथील मुक्कामाच्या २१ जुलै १८०९ च्या पत्रांत लिहितो, " गेले कांहीं दिवस पुष्कळ पाऊस पडून गेला आता आमच्या शिपायांनी या हंगामांत घ्यावयाच्या व्यायामांना जोरानें सुरुवात केली

आहे. सर्व हिंदुस्थानांतील लोकांत तालमीचें किंवा कसरतीचें अगदीं वेडच आहे म्हटलें तरी चालेल. आखाड्यांत त्यांचें कांहीं नियम आणि समारंभ ठरलेले असतात आणि ते अत्यंत कसोशीनें पाळण्यांत येतात. खडक नसलेली अशी मऊ मातीची ऐसपैस जागा, शक्य तर झाडाच्या सांवलीखाली निवडून, ती खणून, त्यांतला खडानूखडा वेचून काढून ती भुसभुशींत करण्यांत येते. अशा जागेला ते आखाडा म्हणतात. ते तो फार पवित्र मानतात. त्याच्याजवळ जोडा आणूं देत नाहींत. त्याच्या एका टोकास मातीचा एक ओटा तयार केलेला असतो. तालमींत येणाऱ्या प्रत्येकानें त्या ओट्याला मुजरा करून मूठभर माती वाहावयाची असते. तालमींत येणाऱ्या सगळ्या तालीमबाजांत जो विशेष सरस आणि लढाऊ पठ्ठा असेल त्याला त्या मोसमापुरता आखाड्याचा 'खलिप' नेमण्यांत येते. खलिप म्हणजे व्यवस्थापक आणि शिक्षक त्यानें आखाड्याची झाडलोट करविणें, कुस्ती वगैरे खेळ शिकविणें हीं कामें करावयाचीं. आखाड्यांतल्या प्रत्येकजणानें लंगोट कसलेला असतो आणि एका विशिष्ट जातीची पांढरी माती अंगाला फासलेली असते. पहिला व्यायामाचा प्रकार म्हणजे दंड. दुसरा व्यायाम कुस्ती. हिंदुस्थानांतले लोक या कलेंत अत्यंत प्रवीण आहेत. कुस्तींत अर्थात् निवळ शक्तीपेक्षां कौशल्यावरच अधिक भर असतो; तथापि किती केलें तरी ती कुस्तीच. यामुळें हाड निघणें किंवा हाड मोडणें असे प्रकार हमेश घडतात. दंड-कुस्तीनंतर दुसरे दोन व्यायाम म्हणजे मुदगळ आणि लेझीम. मुदगळ दोनअडीच फूट लांब व सुमारें वीस पौंड वजनाचे असतात. लेझीम म्हणजे एक भक्कम वेळूची काठी. त्याला एक बळकट लोखंडी सांखळी लावून त्या काठीचें धनुष्य बनविलेलें असतें. त्या सांखळीला वजन वाढण्याकरिता जड लोखंडाच्या पत्र्या लावलेल्या असतात. उजव्या हातानें एकदा धनुष्याची दोरी शक्य तितकी ओढावयाची, नंतर दुसऱ्या हातानें ओढावयाची

असा तो खेळ आहे. हे सर्व व्यायाम–प्रकार उत्कृष्ट आहेत. त्यानें छाती रुंद व भरदार होते, शरीराला घाट येतो, स्नायु बळकट होतात. मोसमाच्या सुरुवातीस आखाड्यांत येऊ लागलेला नवीन उमेदवार पाहावा आणि मोसमाच्या अखेरीस तो पाहावा म्हणजे विलक्षण फरक दिसल्याशिवाय राहत नाहीं. मेहनत झाल्यावर सर्व पठ्ठे एखाद्या पहिलवानाभोंवतीं मंडळ करून त्यानें सांगितलेलें कवित म्हणतात. नंतर ते प्रथम खलिपाला रामराम किंवा जयगुरु करून मग आपआपसांत करतात व एका रांकेंत खलिपाबरोबर सर्वजण थोडे दंड काढतात. नंतर एका मोठ्या थाळींत प्रसाद आणून वांटण्यांत येतो. असो. अशा आखाड्यांत पठ्ठा तयार झाला म्हणजे त्याला पहिलवान ही संज्ञा प्राप्त होते.

महाराज दौलतराव शिंद्याला असल्या पहिलवानांचा फार शोक असून त्यानें एक फार नामांकित कुस्तीगीर पहिलवान सध्या पदरीं बाळगला आहे. तो त्याला रोजीं एक बकरें आणि दहा शेर दूध इतका खुराक देत आहे! परवाच मथुरेचा एक पहिलवान येऊन या मराठा पहिलवानाशीं लढला. त्याला मराठा पहिलवानानें चीत मारलें. त्यामुळें दौलतराव इतका खूष झाला कीं, त्यानें तेथल्या तेथें ५०० रुपयांचें कडें आपल्या पहिलवानाच्या हातांत घातलें!

हिंदुस्थानांतला प्रत्येक मोठा सरदार किंवा सरंजामदार, आपल्या पदरीं असे पहिलवान बाळगण्यांत भूषण मानतो. त्यांच्यावर त्यांची इतकी खुषमर्जी असते की, पहिलवान चाहील त्या वेळीं खास स्वारीच्या हत्तीघोड्याचाहि उपयोग करण्याची त्याला स्पेशल परवानगी असते. पहिलवानीचें वेड इतकें वाढलें आहे कीं, अनेक स्त्रियांनीहि पुरुषांप्रमाणें वस्तादांकडून शिक्षण घेऊन आपलीं शरीरें पहिलवानासारखीं कमावलीं असून त्या खेडोखेडीं तेथल्या पहिलवानांना आव्हान देत फिरत असतात. कित्येक वेळां हे स्त्री-जेठी इतके कांहीं तयार झालेले असतात कीं, भारीभारी पहिलवानांचीहि अब्रू घेतात. म्हणून बहुधा सर्व नामांकित पहिलवान त्यांच्याशीं कुस्ती खेळण्याचें नाकारतात!!"

* पेशवाईंतील भूकंपादि चमत्कार

कानपूर वगैरे ठिकाणीं भूकंपाच्या धडाक्यानें पुष्कळ प्राणहानि झाली आहे. सप्तग्रहीच्या तावडींत सांपडल्यामुळें हे अनर्थ घडत आहेत असें ज्योतिषी सांगतील. पण कारण कांहींहि लावलें तरी भूकंप, उल्कापात किंवा धूमकेतूचा उदय हे विलक्षण चमत्कारच गणले जातात. असा एखादा प्रसंग घडल्यानंतर ज्याला त्याला तशासारखे पूर्वी घडलेले प्रसंग आठवतात व तो त्यांचे हवाले देऊं लागतो. सध्याचीं वर्तमान-पत्रेंहि तेंच करतात. एखाद्या गांवीं भूकंप झाला, तर त्या गांवीं पूर्वीं कधीं तसा झाला होता कीं काय वगैरेची माहिती तीं मिळ-वून देतात. ज्ञान आणि जिज्ञासातृप्ति हाच त्यांचा उपयोग; एरवीं प्लेगच्या

* केसरी ता. २६ जानेवारी १९३४

लागणी आणि मृत्यु देतांनाहि आजतारखेस मृत्युसंख्या इतकी आणि गतवर्षीच्या त्याच दिवसाची मृत्युसंख्या इतकी असें त्यांनीं कशाला दिलें असतें? पांच वर्षांपूर्वी, पन्नास वर्षांपूर्वी, अशा क्रमानें मागें जात जात जितकी माहिती कळेल तितकी बरीच. करमणूक तरी खचित होईल, असें समजून ऐतिहासिक साधनांवरून दीडशें—दोनशें वर्षांच्या काळांत झालेल्या महत्त्वाच्या भूकंपादि चमत्कारांची हकीकत पुढें दिली आहे. मनुष्याची जिज्ञासा आज आहे तितकीच पूर्वी होती. त्याचीं साधनें मात्र मर्यादित होतीं. पण तेव्हांचे चौकस लोक अशा चमत्कारांची नोंद कौतुक किंवा अपूर्व म्हणून जरूर करून ठेवत, इतरांस कळवीत व खरेपणाबद्दल चौकशीहि करीत, हेंहि पुढील हकीकतीवरून कळून येईल.

बखरींतून भूकंपांचीं, उल्कापातांचीं, चार-चार इंद्रधनुष्यें पडल्याची भरमसाट वर्णनें पुष्कळ आहेत. त्यांना थारा न देतां शकावल्या व समकालीन पत्रें इत्यादि विश्वसनीय साधनांतूनच पुढील नोंदींची निवड केली आहे.

पेशवाईतील पहिली नोंद १७३७ सालाची सापडते. त्या सालीं डिसेंबरांत दुश्चिन्हें झाल्याची तत्कालीन नोंद आहे. शकावलीकार लिहितो, " मार्गेश्वर वद्य ९ रविवार यामागें सातआठ दिवस पहाटेस व सायंकाळीं अवशीं पहाटे दिशा लाल होतात. चार घटकांपर्यंत लाल अभ्र असतें. मागती निवळतें. दिशादाह होतो. दुश्चिन्ह आहे. "

" नक्षत्र थोर पडिलें "

याच्या आधी कांहीं दिवस, बहुधा एप्रिल किंवा मे महिन्यांत, गोव्यास धूमकेतु दिसत होता. धूमकेतूच्या उदयामुळें राजाला किंवा राज्याला कांहीं अपाय होतो किंवा कांहीं मोठी थोरली क्रांति होते असा समज आहे. त्याचा खरा कार्यकारणभाव काय असेल तो असो; तथापि योगायोग तरी तेव्हा असा आला कीं, साष्टीचा किल्ला व मुलूख चिमाजी

अप्पासाहेबांनीं जिंकून फिरंग्यांच्या राज्याच्या नाशाची पहिली आहुति टाकली ! साष्टीवर मराठ्यांचा हल्ला होण्यापूर्वी गोव्यास धूमकेतु दिसत होता व तच्छान्त्यर्थ तेथल्या लोकांचे उपाय व अनुष्ठानेंही चालू होतीं. अर्थात् तीं पाद्र्यांचीं विलायती पद्धतीचीं होतीं इतकेंच ! खुद्द पोर्तुगीज इतिहासकारांनींच यासंबंधीं स्पष्ट नोंद करून ठेवली आहे. मेच्या १३, १४ व १५ या तारखांस गोंव्यांतल्या सर्व फिरंगी देवळांतून सरकारी रीतीने सार्वजनिक प्रार्थना करण्यांत आली, असाहि विश्वसनीय दाखला सापडतो. पुढील सालीं १७३८ एप्रिलच्या २१ व्या तारखेस एक चमत्कार नमूद आहे. त्या दिवशीं देशी तिथी वैशाख शु. १२ असून नृसिंहजयन्ती होती. त्या दिवशीं सकाळीं सहासात घटका दिवस येतांच अनेक तारे तुटलेले लोकांनी पाहिले. शिवाय अकस्मात् तोफांसारखा प्रचंड गडगडाट झाला. शकावलीकार लिहितो, " ते दिवशीं प्रातःकाळच्या सहासात घटका दिवसा अकस्मात् आकाशध्वनीचा शब्द जाला. जसा भांड्यांचा (तोफेचा) आवाज होतो त्याप्रमाणें कढाडिलें (कडाडलें) असे. गाडियाच्या घडगडीसारखें वाजत गेलें. आकासीतून (आकाशांतून) दिवसा जे समयीं आवाज जाला ते समयीं नक्षत्र थोर पडिलें (उल्कापात झाला). दुचिन्न जालें असे."

विद्युत्पात

यानंतर बरेच दिवस उल्कापात, धरणीकंप, धूमकेतु वगैरे प्रकट झाल्यासंबंधीं नोंदी सापडत नाहींत. १७३८ सालानंतर नोंद सापडते ती १७५२ सालाची. ता. ५–२–५२ रोजीं "फाल्गुन सुद १ मंगळवारीं पुण्याहून खबर आली कीं माघ वद्य सोमवारीं लोहगडापासून सुमुद्रपर्यंत दिवसा धरणीकंप झाला. उतरंडी पडिल्या. दोप्रहरा जाला" (पुरंदरे-दप्तर लेखांक ३७२). भारतवर्ष पंतप्रधानाच्या शकावलींत पान ३७ वर

समान खमसेन सालीं आश्विन वद्य ४ स म्हणजे ता. ३१ ऑक्टोबर १७५७ रोजीं टोकें व धोम येथें भूकंप झाल्याचें नमूद केलें आहे. याच महिन्याच्या ६ व्या तारखेस आळंदीच्या देवळावर वीज पडल्याचीही एक नोंद सापडते.

विद्युत्पात हा कांहीं भूकंपासारखा विशेष अलौकिक प्रकार नव्हे. तथापि स्थानमहात्म्याकरितां त्याचें वर्णन शकावलीकाराच्या शब्दांत देतो. "वा॥ १० गुरुवारीं श्रीज्ञानेश्वराच्या देवळात अवशीचे साघटका रात्रीं वीज शिरली. धुपारती करून एक गुरव व एक ब्राह्मण व एक विधवा बायको ऐशीं समाधीपाशीं गेलीं होतीं, तेव्हां वीज शिरली; यामुळें बायकोचे मांडीस धक्का लागला, परंतु वांचली आहे. गुरवाच्या उरावर धक्का बसला. त्याच्या गळ्याची कंठी तुटली. परंतु तो बोलतचालत होता, वाचेसा होता. ब्राह्मणास पुरती जरब बसली, तो पडला. मंडपांत आणिला, तो वारला. देवळांतील विठोबारखमाईवरील वस्त्रें हरपाळलीं आणि वीज देवळांतून वरती गेली. देवळास चीर पडली. बाहेर शिखरापाशीं ज्या वाटेने निघाली तेथे एक वाटीच उडोन गेली. तीच वीज चोपाळ्यावर पडली. चोपाळा भंगला. चिरा पडिला. ये जातीचें वर्तमान जालें. असें कोणी सांगितलें कीं दारावाटेनेच वीज माघारी गेली. मग शिखरास लागोन चोपाळियावर पडली."

१७६० सालांत अशा चमत्कारांच्या दोन नोंदी सापडतात. एक नोंद अशी—"दत्ताजी शिंदे पडल्याची खबर देशीं आली, म्हणून पडदुरानजिक भाऊसाहेब व विश्वासराव नानासाहेबाची भेट घेऊन दिल्लीस चढाई करून गेले" व पुढें लगेच म्हटलें आहे, "दोन घटका रात्रीस तारा पडून नगाऱ्यासारखा नाद झाला." या नोंदीला दुसऱ्याहि एका शकावलींतील नोंदीचा पुरावा सापडतो. तीत म्हटलें आहे, "तारा रात्रौ दुसरे

घटका पडून नगाऱ्यासारखा नाद उठला" काव्येतिहास संग्रह ले. ४९२.

रक्ताचा झरा

२४ नोव्हेंबर १७६० रोजची नोंद अशी आहे. कार्तिक व॥ २ दोडज येथे वाड्यांत विहिरीस करंगळीएवढा चार घटका रक्ताचा झरा वाहिला. [भारतवर्ष पं. प्र. दुसरी शकावली] या हकीकतीस काव्येतिहास संग्रहांतील लेखांक ४९२ हा पुष्टि देतो. त्यांत असें म्हटलें आहे, "फाल्गुन व॥ २ मौजे दउडज तालुके निरथडी येथे वोढ्यांत करंगली-एवढा रक्ताचा झरा चार घटका वाहिला म्हणून गांवकरी यांनी रा. नारो अप्पाजी (तुळशीबागवाले) जिल्हेदार यास अर्जदास्त पाठविली."

पण यापेक्षां एका महत्त्वाच्या चमत्काराची नोंद नाना फडणविसांनी आपल्या आत्मचरित्रांत नमूद करून ठेविली आहे. ते लिहितात, "तेथे पृथ्वीपतींचें दर्शन श्रीमंतांचें (भाऊसाहेबांचे)आज्ञेवरून घेतलें. तदनंतर श्रीमंतांचे लष्करांत श्रीमंतांजवळ आलों. बसलों असतां भूमिकंप झाला" ही हकीकत पानपत स्वारींतील आहे. असल्या दुश्चिन्हांचा उपयोग भाविक किंवा श्रद्धाळु लोकांनी पानिपतच्या अरिष्टाची उपपत्ति लावण्यास केला असल्यास आश्चर्य वाटावयास नको.

यापुढें १७६४ सालीं घडलेला चमत्कार विशेष महत्त्वाचा आहे. त्यासंबंधीं खऱ्यांच्या भागांत ४६० नंबराला छापलेल्या पत्रांत पुढील दोन चमत्कार नमूद झाले आहेत.

(१) "पुरंदर घेतला आणि निळकंठ महादेव तेथें (सासवडास) गेले होते. तेव्हां गांवाजवळ संगमेश्वर देव आहे, तेथील नदीमध्यें विहीरा होता. त्यांतील झऱ्यास रक्त येऊं लागलें. ते समयीं हे स्वतः गेले आणि त्यांत अंगवस्त्र टाकिलें. तें भिजलें तो रक्ताप्रमाणें पाणी. ऐसें तीन दिवस होत होतें. त्यास एक महिना झाला."

(२) " मौजे निमगांव टाकळी घोडनदीतीर येथें ज्येष्ठ व॥ ११ चे दिवशीं सायंकाळीं दिवस दोन घटका ते समयीं गांवचे दहा-पांच माणूस गांवकरी तीरास गेले होते. तेथील कौतुक मेघडंबर आलेसें जाहलें. आणि अकस्मात् एक मोठा घागरीएवढा वाटोळा दगड पडला आकाशावरून. तो भूमिगत होता. तों तेथून धूर निघाला तो आभाळास लागला. तेव्हां वर गर्जना झाली. वृष्टी एक बिघापावेतों दगडांची जाहली. हें कौतुक जवळील पहात आहेत तों तो दगड घोड्याएवढा जाहला. घटकाशी जाहली तों हत्तीहूनही मोठा झाला. गडबडत नदींत गेला. ते भयभीत तोंपर्यंत होते. मग सावध होऊन जागा बघितला तों हातभर खोलमात्र आहे आणि बिघाभर दगड पडले आहेत. त्यांनी गांवांत जाऊन सांगितलें. मग सर्व भोवर गांवामधील लोक पहाण्यासी आले. येथूनही फडणिसांनी (पुण्याहून नाना व मोरोबा फडणीस यांनी) कारकून पाठविला, तो देखील पाहून आला. "

पत्र १ जुलई १७६४ रोजचें असून लेखक गंगाधर बापूजी ओक पटवर्धनांचा फडणीस हा आहे. हें पत्र त्यानें गोविंद हरि पटवर्धनास लिहिलें आहे. पत्राच्या शेवटीं तो लिहितो. 'हें पत्र राजश्री गंगाधर बापूजी फडणीस यांनी पुण्याहून आम्हास पाठविलें त्याची नकल करून पहावयास पाठविली आहे.'

धूमकेतु निघाला

शकावलीवरून १७६९ च्या ऑगस्ट-सप्टेंबरांत धूमकेतु दिसत होता असें दिसतें. शब्द असे आहेत -" श्रावणमासीं व पुनः भाद्रपदमासीं धूमकेतु निघत असे. अतिवृष्टि जाली, महागाई जाली." काव्येतिहाससंग्रहांतील शकावलींत अधिक विस्तार आहे. (ले. ४९२) "श्रावणमासीं धूमकेतु एक महिनाभर निघत होता, व पर्जन्याची अतिवृष्टि झाली.

त्याजमुळे पिकें गेलीं. भाद्रपदमासापासून पर्जन्य अगदीं गेला. महर्घता झाली. मार्गशीर्षमासीं धूमकेतु आठ दिवस निघत होता व सात दिवस पर्जन्य लागला." ही थोरल्या माधवरावसाहेबांची कारकीर्द.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत फिरून एकदा रक्ताचा झरा वाहिल्याचें दुश्चिन्ह नमूद आहे. "शके १७१८ नळनाम संवत्सर माघमासीं मौजे बेलसर नजीक जेजुरी येथे कऱ्हेच्या तीरीं करांगळीएवढी रक्ताची धार वाहिली." (सन १७९७) [काव्येतिहाससंग्रह—शकावलि.]

उत्पातांची रेलचेल

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत उत्पातांची रेलचेलच सापडते. १८०३ सालीं काशी-बनारसकडे फार मोठे भूकंप झाल्याच्या हकीकती नमूद आहेत, त्या महत्वाच्या आहेत. "आश्विन शु॥ १४ स (ता. ३० सप्टेंबर १८०३) श्रीकाशीमध्ये दोन तारे थोर पडले. चार घटका उजेड पडला. पडत्येसमयीं वीज कडाडत्ये तैसा शब्द मोठा जाला. भूमिकंप मोठा झाला. दोनतीनशें घरें पडलीं. भागीरथीस खळखळ बहुत चार घटका सुटली. दीड दिवस पर्जन्य लागला. बिंदुमाधवाजवळील मोहोल्यांतील दोनशेंपर्यंत घरें जळालीं. गंगेचें उदक पात्रामध्ये खळखळोन दोन-दोन भाले उंची असें उदक तीन घटकापर्यंत उडत होतें. आणि पाण्यांतून आवाज मोठेमोठे होऊन रात्रौ सहस्रावधि नक्षत्रें पतन पावलीं."

भूकंपामुळें काशींत काय अवस्था झाली याचें वर्णन असें सापडतें, "भाद्रपद शु॥ १४ स भर मध्यान्हीं धरणीकंप झाला. एक घटका घरेंमाड्या दणाण झाला. माणसें निजले जाग्यास कुशीस होतीं तीं उपडीं किंवा उताणीं पडलीं. गुरें दाव्यास बांधलीं तीं खालवर झालीं, कौलें घरावरील पडलीं. दाण्याचा गंज म्हणून पेठ आहे त्यास आग लागून जळाली. दोन तारे पडले. त्यांचा उजेड भर दिवसा चांदण्यासारखा पाव

घटका पडला. मनुष्यांचीं अवसानें गेलीं. घरें सोडून अंगणांत बाहेर आलीं. सर्वांच्या मतें आजच कल्पान्त कीं काय असें भासलें. "

हा भूकंप काशी, प्रयाग व गया या तिन्ही ठिकाणीं एकाच वेळीं झाला. शिवाय वर श्रीनगर, श्रीविष्णूचें स्थान बद्रिकेदारासन्निध चारपांच कोसांवर होतें त्याहि शहरामध्यें व आसपास धरणीकंप झाले. भूमी दुभंगली, हजारपांचशें हात घरें कोसळलीं. पर्वतहि कोसळले.

उत्तरेंत हा अनर्थ चालला असता दक्षिणेंत कुलाब्याजवळच्या शिद्द्यांच्या जंजिऱ्यासही अकस्मात् आग लागून सर्व सरंजाम इमारत आदि करून जळाले. शिवाय शेंदोनशें माणूसही मेलें. (खरे भाग १४.)

१८०७ सालीं मार्गशिर्षमासीं पुण्यास धूमकेतु दिसत होता. फिरून १८१२ सालीं आश्विनमासीं धूमकेतु दिसत असल्याची व फाल्गुन शु॥ १२ स (म्हणजे ता. २३--२–१८१२ रोजीं) एक धरणीकंप झाल्याचीही नोंद नमूद आहे.

* शर्यतींतहि 'स्वदेशी' पाहिजे

घोड्यांच्या शर्यतीच्या जुगाराबद्दल नेहमीं जी हाकाटी होत असते ती मुख्यतः दोन गोष्टींमुळे. एक अशी कीं द्यूताचें निंद्य व्यसन समाजांत उजळ माथ्यानें फैलावण्यास त्यानें मदत होते. आणि दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे आपण आपलीं घरें उपसून परदेशांची धन करतों ही होय. पहिलें कारण तात्त्विक असल्यामुळें त्याची सत्यता मनाला सहज पटवितां येते; परंतु दुसऱ्याची सत्यता पटण्याइतका आकड्यांचा रोकडा पुरावा सहजासहजीं हाताशीं तयार असूं शकत नाहीं. पण तो तसा मिळतो तेव्हां त्याचें स्थूल ज्ञानहि अचंबा आणि उद्वेगच उत्पन्न करतें यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांत दरसाल जे चव्वेचाळीस लाख रुपये शर्य-

---

* केसरी ता. २२ एप्रिल १९३२

तीवर खर्चले जातात त्यांतले फक्त दीड लाखच हिंदी लोकांच्या हातांत पडतात हें ऐकून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं ?

घोडयांच्या शर्यतींचा मूळ हेतु कोठल्याहि देशांत गेलें तरी एकच असतो. तो हा कीं, देशांतील घोडयांच्या पैदाशीला उत्तेजन मिळून तो धंदा उजगारीला यावा. खेळ, करमणूक हा शर्यतीचा समाजाला उपयोग म्हणतां येईल; पण त्यांचा खरा उद्देश देशी घोडयांच्या धंद्याला भरपूर उत्तेजन मिळावें हाच असतो. शर्यत म्हणजे चढाओढ आणि चढाओढी-शिवाय गुणोत्कर्ष होत नाही. या शर्यतीमुळेंच अनेक सरसनीरस घोड्यांचे नग किंवा नमुने एकत्र पाहावयास सांपडतात, त्यांची कार्यक्षमता कळते आणि त्यामुळें आपल्या धंद्यांत काय काय सुधारणा करावयास पाहिजेत हें घोड्यांच्या मालकांना समजून येतें. म्हणजे समाजाला करम-णूक हा एक गौण फायदा असला तरी देशी घोड्यांच्या धंद्यांत सुधारणा हा अंतिम राष्ट्राचाच फायदा असतो. अगदी आजहि हा धंदा सर्वस्वी परकी लोकांच्या हातीं जाऊन, हिंदी लोकांच्या डोक्यावरून हात फिरवून लंकालूट फायदा ते ओढीत असले तरी त्यांचाहि हेतु या हिंदी धंद्याची वाढ व्हावी असाच जाहीर झालेला असतो ! !

महाराष्ट्रांतील घोड्यांचा धंदा

पेशवाईअखेरपर्यंत हिंदुस्थानचा घोडयांचा धंदा चांगलाच तेजींत होता. त्या काळीं घोडा नाहीं असें गांवांत घर नाहीं, आणि त्यावर बसतां येत नाहीं असें माणूस नाहीं, अशी अक्षरशः स्थिति असल्यामुळें सध्यासारख्या शर्यतींचा आंगतुक उपक्रम करण्याची तेव्हा जरूरच पडत नसे. त्या वेळीं इकडे हा धंदा इतका तेजींत होता आणि निरनिराळ्या अवलादींच्या उत्कृष्ट घोड्यांची इतकी समृद्धि होती कीं, 'मी माझीं घोडीं बिनभेसळ काढलेलीं आहेत, त्याचीच ही चौथी–पांचवी पिढी

आहे,' असें मालकाला अभिमानानें म्हणावेसें वाटे. अरबी लोक आपल्या घोड्यांची अवलाद शुद्ध राखण्याविषयीं जी दक्षता व अभिमान बाळगतात तोच अभिमान इकडेहि लोक बाळगीत; पण त्याचेंहि कारण निरनिराळ्या अनेक अवलादींची येथें समृद्धि होती हेंच असलें पाहिजे. पण १८१८ सालीं इंग्रजांचा एकछत्री अंमल झाला आणि स्मशानशांति पसरली, तेथपासून सर्व मनु पालटला.

दोनचार वर्षांतच घोड्यांचा धंदा इतका बेसुमार घटला कीं १८२१ सालीं खुद्द कंपनी सरकाराला जाहीरनामे काढून जातीनें लक्ष घालावें लागलें. जाहीरनामाच सगळें बोलत असल्यामुळें तो जशाचा तसा देतों. "जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादर सुरु इसने अशरीन मयातन व अलफ. तमाम लोकांस मालुम व्हावया-करतां हुकूम केला जातो जे. कलम १ कोणी आपले घरीं घोडीं बाळगीत आले त्यांस घोडे उत्पन्न होत गेले. त्याची फरोक्ती होऊन फायदा होत गेला. हाली घोडा बालगून घोडे उत्पन्न होतील तेव्हा जाले आहेत ते कोणी घेणार नाहीत म्हणोन बालगावयासी अनमान करतील, तर घोडी बालगीत आले त्याणी पुढेहि बालगून त्यांस घोडे उत्पन्न होतील ते व जाले असतील ते, चांगले पाहून सरकारांत खरेदी दिल्यास पाचा वर्षापासून सहा वर्षाचा घोडा घ्यावयाचा इरादा आहे, त्याप्रमाणें घेत आहेत; हे समजोन घोडी बालगणार लोकांनी खातर-जमेने बाळगावी. कलम २. घोडा चांगला अवलादीचा असेल व पुढे उत्पन्न झाला तो खरेदीस द्यावयाचा असल्यास सरकारांत रुजू करावा म्हणजे खरेदी घेऊन, किंमतीशिवाय, घोडा पसंत झाला तर अवलाद चांगली म्हणोन रु. ३०० इनाम मिळेल."

वरीलसारखाच दुसरा एक जाहीरनामा सन १८२२ च्या जाने-

वारींत सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी काढलेला पारसनिसांचे इतिहा-
ससंग्रहांत छापलेला आहे. त्यांतल्या अटी किंवा शर्ती आणि कारणें
बहुधा वरच्या जाहीरनाम्यासारखींच आहेत. फक्त बक्षिसांच्या बाबतींत
सढळपणा आहे. सदरहू प्रतापसिंह महाराजांचा जाहीरनामा कंपनी सर-
कारनेंच त्यांच्याकडून काढविलेला आहे हें तत्कालीन इतिहास जाणणा-
ऱ्यांस सांगणें नकोच.

या जाहीरनाम्यांत उल्लेख केल्याप्रमाणें एतद्देशीय घोडयांचा धंदा
बसूं नये व त्यांच्या मालकांची किफायत बुडूं नये हा सद्धेतु कंपनी सर-
कारच्या मनांत खरोखर कितपत असेल देव जाणे. कंपनीसरकाराच्या
लष्कराला घोडे लागत त्याची अडचण भागावी हाच पोटांतला मुख्य
भाव होता यांत शंका नाहीं. परदेशांतून मुद्दाम घोडीं आणविणें हें
अधिक खर्चाचें व परावलंबी काम. शिवाय पाहिजे तशा प्रकारचीं घोडीं
मिळण्याची पंचाईत. त्यामानानें येथल्याच चालू धंद्याला थोडी
लालूच दाखविली तर आपलें काम साधतें तें साधतेंच; शिवाय
बेकार प्रजेचा दुवाहि वर मिळवितां येतो अशीच त्याची सरळ उपपत्ति
लावतां येते ! शिवाय ही अडचण कंपनीसरकारला यापूर्वीच जाणवली
होती. व हेच उपाय त्यांनीं तेव्हां अनुसरले होते. याला खुद्द त्यांच्या
गव्हर्नर जनरलाच्या १८१५ च्या डायरींतलाच पुरावा उपयोगी पडेल.
'प्रायव्हेट जर्नल ऑफ मार्किस ऑफ हेस्टिंग्ज' या पुस्तकांत पान
२३३ वर खालील नोंद आहे. "बंदरावरून मी गांवांत गेलों आणि
तेथल्या पागेची पाहणी केली. सुमारें ६०० घोडे होते. निरनिराळ्या
अवलादींचे चांगले नमुने होते. नवीन अवलादी तयार करण्याचा आमचा
प्रयत्न बराच सफळ झालासा दिसला. इंग्रजी अवलादींचीं शिंगरें सर्वांत
देखणीं व पसंत होतीं. त्यांच्या खालोखाल रणजितसिंग या काठेवाडी
अवलादीचा नंबर लागेल. अरबी घोडयांची अवलाद मात्र सुमारच

दिसली. याचें कारण असें असावें कीं, अरबी वळूंपासून ज्या घोड्या काढवितात त्या चांगल्या थोराड नसतात त्यामुळेंच त्यांची प्रजाहि तशीच होते; याकरितां आम्ही एक नवीन उपाययोजना सुरू केली आहे. जमीनदारांना आम्ही एकेक घोडी बक्षीस देतों. अट येवढीच कीं, त्यांनी ती विकावयाची नाहीं. नंतर त्या घोडी-ला शिंगरें झालीं म्हणजे त्यांतलीं एक एक वर्षाचीं शिंगरें आम्ही म्हणजे कंपनी सरकार प्रत्येकीं शंभर रुपयांस खरेदी घेतों. असें केलें तरच तरणोपाय आहे. कारण कंपनी सरकाराच्या लष्कराला पुरतील इतके घोडे परदेशांतून आणावयाचे म्हणजे सर्वस्वी परावलंबी काम. ते पाहिजेत तसे व पाहिजेत तितके वेळेवर कसे मिळणार ? "

एतद्देशीय घोड्यांच्या धंद्याला ओहोटी

कसेंहि असो. सन १८७५ सालापर्यंत सरकारी लष्कराला व खासगी लोकांच्या उपयोगाला पुरून उरतील इतके घोडे हिंदुस्थानातच निपजलेले होते. पण त्यानंतर इंग्रजी ' थरो ब्रेड ' घोड्यांचा इकडे प्रसार होऊं लागून एतद्देशीय घोडयांच्या धंद्याला जी एकदा ओहोटी लागली ती कायमचीच ! त्यानंतर आजपर्यंत या घोडयांच्या शर्यती म्हणजे हिंदी लोकांचा पैसा आणि युरोपिअन लोकांचीं चैन असाच अर्थ झालेला आहे.

देशी घोडे निकस असतात या सबबीवर त्यांना शर्यतींतून मज्जाव करावयाचा; परंतु निकस म्हणून छाप मारतांना त्यांच्या परीक्षा मात्र घ्यावयाच्या नाहींत. एक वेळ हिंदी घोडे निकस आहेत असें धरून चाललें, तरी त्यांच्यांत सुधारणा होण्याकरितां शर्यतींतून त्यांना विशेष उत्तेजन हवें. परंतु तसें करून आपल्या घरचा धंदा सरकार काय म्हणून बुडवील ? १८२२ सालचें सरकारी धोरण आतां पार बदलून गेलें आहे.

इंग्लंडाखेरीज इतर देशांत स्वदेशी घोडयांना विशेष संरक्षण

देण्यांत येतें. त्यांना खरेंखुरें उत्तेजन मिळावें म्हणून कांहीं नामांकित शर्यती खास त्यांच्याकरितां राखून ठेवलेल्या असतात. इंग्लंडने तसेंच केलें असतें; परंतु तूर्त त्यांच्या परिश्रमाने तयार झालेली थरो ब्रेड घोड्याची जात कोठल्याहि घोड्याला मारण्यासारखी तयार झाल्यामुळें तो निर्बंध त्यांनी घातला नाहीं इतकेंच. आफ्रिकेचाहि दाखला पाहण्यासारखा आहे. आफ्रिका इंग्रजांच्या हातीं जाण्यापूर्वी तेथे घोड्यांची संख्या परिमितच होती; म्हणून पुढें तेथें शर्यतींचा उपक्रम सुरू करण्यांत आला. अर्थात् परदेशी घोड्यांना त्यांत मज्जाव होता हें सांगणें नकोच. त्याचा फायदा असा झाला कीं, तेथल्या घोड्यांच्या निपजीचा धंदा बेसुमार फोफावला; इतका कीं, बंडाच्या वेळीं खुद्द एकट्या आफ्रिकेनें ५००० घोडीं हिं. सरकाराला पुरवलीं! पण नंतर फिरून परदेशी घोड्यांच्या आयातीवरचें नियंत्रण काढतांच हिंदुस्थानांत झालें तेंच तेथे घडून आलें. आफ्रिकेचाहि धंदा ठार बुडाला!

१९३०-३१ सालचे आंकडे पाहिले, तर असें दिसतें कीं, हिंदुस्थानांत शर्यतींत धावणारीं घोडीं अशीं होतीं—

८१४ इंग्रजी व ऑस्ट्रेलियन घोडीं.
५६१ आरबी
आणि अवघी १८७ हिंदी

आणि त्यांच्या शर्यतीवर लावलेल्या बक्षिसांचें प्रमाण पाहावें, तर तेंहि परदेशांतून आलेल्या घोड्याला २८७१ आणि हिंदी घोड्याला १०२७ असें पडतें. आणि घोडीं तयार करण्याचा खर्च मात्र परदेशी किंवा हिंदी मालकांना सारखाच येतो. मग अशा कोणत्या आशेवर हिंदी धंदेवाल्यांनीं धंदा चालवावा? कलकत्त्याला शर्यती होतात; त्यांतील एकहि शर्यत हिंदी घोड्यांकरितां नसते. फक्त इंग्लिश आणि ऑस्ट्रेलियन

घोड्यांची तेथें वरणी ! पुण्या-मुंबईच्या शर्यतींतून हिंदी घोड्यांना भाग घेऊं देतात, पण तो नांवालाच. आरबी घोडा अनुभवाने हिंदी घोड्या-पेक्षा निकस ठरलेला आहे. तरीहि अरबी घोड्याच्या शर्यतीला बक्षिसें मोठीं. पण येवढेंच नव्हे. हिंदी घोड्याविषयींची अनुदार वृत्ति इतकी कळसाला पोंचली आहे कीं, हिंदुस्थानांत काढलेल्या व तयार केलेल्या परंतु आरबीच घोडयाला परदेशांतून आणलेल्या आरबी घोडयाबरोबर धांवूं देत नाहींत. 'वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब' हिंदी घोडयांच्या शर्यतीकरितां ३०००० रुपये व १०० पौंडांचा एक कप इतकें बक्षीस लावीत असे; तो खर्च त्यांनीं एकदम २०५०० रुपयांवर आणला. पण या शर्यती सुरू करतांना टर्फ क्लबनें आपला उद्देश मात्र असा सांगितला होता कीं, एतद्देशीय घोडयांच्या धंद्याला मदत करावी म्हणूनच आम्ही हा उपक्रम केला आहे !

एतद्देशीय घोडयांचा धंदा उजगारीला आणण्याकरितां सरकारने म्हणे चौदा कोटि रु. उत्पन्नाची जमीन उपयोगांत आणली आहे. शर्यती दरसाल मारे जोरांत चाल आहेत, लोकहि चढाओढीनें भाग घेत आहेत, आणि या उधळपट्टीच्या ओल्या दुष्काळांत हिंदी शर्यती घोडे ५० सुद्धा विकले जात नाहीत ! टर्फ क्लब म्हणतो, हिंदी घोडयांची संख्याच थोडी म्हणून त्यांच्याकरितां जास्त शर्यती कशा ठेवाव्यात ! पण हिंदी धंदे-वाल्यांचें उत्तर असें कीं हिंदी घोडयांच्या शर्यतींची संख्या वाढवून त्यांना तुम्ही डोकेंच वर काढूं देत नाहीं, मग कोण लेकाचा डोळे उघडून बुडावयाला तयार होईल ?

सारांश काय की, सध्याच्या शर्यतीचा प्रकार म्हणजे हिंदी जन-तेच्या पैशावर चाललेली विलायती धंद्याची भरभराट. पण असा प्रकार लोकांनी उघडया डोळ्यांनी तरी पाहतां कामा नये. शर्यती अजी-बात बंदच झाल्या तर फार बरें. पण त्या तशा होऊं शकत नाहींत अशी

खात्री आहे तोंपर्यंत तरी कायदेकौन्सिलांतील सभासदांनी त्यांत लक्ष घालून ही उधळपट्टी थांबवण्याकरितां झटलें पाहिजे. त्यांनीं लक्ष घातलें, तर खालील तीनचार कायदे पास करून घेण्याची खटपट करावी. अेक असा कीं, सगळ्या शर्यत-मैदानांनीं सरकारी लायसेन्सेस घ्यावींत. दुसरा, परदेशाहून येणाऱ्या घोड्यांवर जकात बसवावी. तिसरा, दरशर्यतींत एक शर्यत खास हिंदी घोड्यांकरितां राखून ठेवण्यांत यावी आणि त्या शर्यतीकरितां लावले-ल्या बक्षिसांची संख्या परदेशी घोड्यांच्या बक्षिसांच्या सरासरीच्या मानानें कमी नसावी. चौथा, हिंदुस्थानांत आलेले परदेशी चांगले घोडे येथें शर्यती जिंकल्यानंतर फिरून अवलादीकरितां परदेशांत पाठविण्यांत येतात तें बंद करावें. कारण या प्रकारानें इतर देशांच्या घोड्यांच्या निपजीला मात्र आम्ही मदत करतों आणि आमचा धंदा बसतो.

सध्या सरकारला पैशाची तूट चांगलीच जाणवूं लागली आहे. अशा वेळीं जर परदेशाहून आयात होणाऱ्या घोड्यांवर जकात बसवली, तर सरकारला मोठीच किफायत होईल. दरसाल २००० पासून ४००० पर्यंत घोडे परदेशांतून हिंदुस्थानांत येतात आणि त्यांच्या किंमतीहि २८ लक्षांपासून ३३ लक्षांपर्यंत येतात! तेव्हां त्यांवर जकात बसवली, तर सरकाराला ही केवढी तरी किफायत होईल?

* मराठ्यांच्या उत्तरेतील मोहिमा

या संशोधनात्मक ऐतिहासिक निबंधांत १७२० पासून १७४० पर्यंत, म्हणजे पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत, मराठ्यांच्या उत्तरेकडे स्वाऱ्या झाल्या, त्यांची हकीकत, पेशवे-दप्तरांत नवीन उपलब्ध झालेल्या साधनांच्या आधारें देण्यांत आली आहे. ती वाचल्यानंतर खुद्द पेशवाई-संबंधींही आपली साधनसामुग्री अजून किती अल्प आहे याचा प्रत्यय येतो व नवीन माहिती आढळतांच ती काळजीपूर्वक जेथल्या तेथें बसवून, गेलीं पन्नास वर्षें घडत असलेल्या इतिहासमूर्तीच्या निरनिराळ्या अवयवांना रूप आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशोधक लेखकांबद्दल कौतुक व आदर वाटूं लागतो यांत शंका नाहीं.

*प्रतिभा, ३१ जुलै १९३३. —निबंधकार वि. गो. दिघे.

खुद्द पेशवाईसंबंधीं पाहिलें, तर थोरले माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीविषयीं विपुल साधनसामुग्री उपलब्ध आहे. नानासाहेब व दुसरा बाजीराव यांसंबंधींहि बरीच आहे, तरी ती वरील तीन कारकीर्दीइतकी नाहीं. पण बाळाजी विश्वनाथ व पहिले बाजीराव यांसंबंधीं मात्र फारच थोडी अस्सल पत्रांची सामुग्री उपलब्ध होती. पण अलीकडे पेशवे-दप्तरांतून निवडक कागदपत्रांचे अव्वल दर्जाचे अनेक साधनग्रंथ प्रसिद्ध झाल्यामुळें, एकंदर पेशवाईसंबंधीं इतकी नवीन व बहुमोल सामुग्री निर्माण होत आहे कीं, तिच्यासंबंधीं चिकित्सा, वर्गवारी व अभ्यास होऊन शालोपयोगी इतिहासापर्यंत तिचें लोण पोंचावयास अजून पंधरावीस वर्षें सहज लागतील.

पेशवे दप्तरानें बाळाजी विश्वनाथाबद्दल पांचदहा नवीन पत्रांचीच भर टाकली, परंतु पहिल्या बाजीरावासंबंधीं मात्र नवीन माहिती तीनचारशें छापील पानें भरण्याइतकी विपुल निर्माण केली आहे. तीसुद्धां परिपूर्ण, भरपूर आहे असें नव्हे हें हा प्रस्तुत दिघ्यांचा निबंधहि सांगेल. कारण कार्यकारणभावाची डाकबंद साखळी अनेक ठिकाणीं अधू राहिलेली या निबंधांतही दिसून येते. तथापि नवीन सामुग्रीनें पहिल्या बाजीरावाच्या चरित्राची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति काढणें मात्र शक्य झालें आहे. त्या चरित्रांतील एक भाग म्हणजेच रा. दिघे यांच्या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय होय; व तो त्यांनीं आस्थेवाईकपणें अभ्यास करून लिहिण्याचा प्रयत्न केला असें उघड दिसतें.

या निबंधात सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे १७२० पासून १७३७ पर्यंत बाजीराव, चिमाजी आप्पा, पिलाजी जाधवराव वगैरे लोकांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्यांची हकीकत होय. ही सर्वच हकीकत बहुतेक नवीन व त्रुटित आहे, यामुळें त्यांतून सुसंगत कथासूत्र निर्माण करण्यांत श्री. दिघे

यांना सगळ्यांत अधिक परिश्रम पडले असतील. सदरहू निबंधाच्या शेवटीं सरदेसायांच्या तारखांच्या चुकांच्या बाराखड्यांचे जे तक्ते दिलेले आहेत त्यावरून हें स्पष्टच होईल. डायरी भरण्याकरितां रोजीं पन्नास पन्नास पत्रांच्या तारखा लावून मोकळें होणाऱ्या लोकांना आपण अभ्यासकांची किती दिशाभूल व गैरसमज करतों हें त्या तक्त्यावरून चांगलें कळून येणार आहे.

पहिल्या प्रकरणांत लेखकानें माळवा-गुजराथसंबंधीं लिहिलें आहे; त्यावरून १७१८ मध्यें सय्यदांमार्फत मराठ्यांशीं झालेल्या तहांत गुजराथ व माळवा मराठ्यांना बादशहाकडून देण्यांत आलेला नव्हता असें स्पष्ट दिसतें, व " शाहू आपणास मोगलांचा अंकित समजत असल्यामुळें त्याच्याकडून माळव्यावर चढाई करण्यास अनुमति मिळणें शक्य नव्हतें, " असें निबंधकारांनींच स्पष्ट लिहिलेलें आहे. पण पुढें ३-१२-१७२२ चें बाजीरावानें उदाजी पवारास लिहिलेलें एक पत्र त्यानें उद्धृत केलें आहे. त्यांत बाजीरावाचे शब्द असे आहेत–" प्रांत गुजराथ व प्रांत माळवा निम्मे मोकासा हुजरून आम्हाकडे आहे. त्यापैकीं निम्मे मोकासा तुम्हास सरंजाम करून दिला आहे." येथें 'हुजरून' याचा अर्थ शाहू महाराजाकडून. म्हणजे शाहूनें प्रांत गुजराथचा व माळव्याचा निम्मा मोकासा पेशव्यास दिला. यावरून १७२२ सालाच्या आधीं केव्हां तरी माळवा मराठ्यांस मिळाला असला पाहिजे असें मानणें भाग येतें किंवा तसें नसेल तर मग बाजीरावाच्या पत्राचा काल तरी ठरविण्यांत लेखकानें चूक केली असें तरी मानावें लागेल.

त्याच प्रकरणांत दुसऱ्या एका ठिकाणीं दयाबहादर व गिरधरबहादर यांच्या चकमकीचें व युद्धाचें वर्णन आहे. लेखकानें " १७२८ च्या सुरुवातीस उदाजी पवार व चिमणाजी दामोदर यांच्याशीं झालेल्या एका

चकमकींत गिरधरबहादर मेला असावा " असा तर्क केला आहे. पण तो सकारण व शुद्ध नाहीं. तसेंच पेशवा-दप्तर भाग १३ मध्यें बाजीरावानें स्वतः जीं दोन पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत स्वतः बाजीरावच चुकला, दयाबहादराऐवजीं त्यानें चुकीनें गिरधरबहादर लिहिलें असावें असा तर्क केला आहे. पण नुसताच तर्क म्हणजे तर्कट होय! बाजीरावाची गैरसमजूत होण्यापेक्षां लेखकाचीच ती होण्याचा जास्त संभव वाटतो.

'भोपाळचें युद्ध व निजामाचा पाडाव' या प्रकरणांत पृष्ठ ५७ वर लेखक म्हणतो "सर्व सैन्य एकत्र होतांच खरगोणावरून पुनाशा-जवळ ८० हजार फौजेनिशीं नर्मदापार होऊन बाजीरावानें माळव्याचा मार्ग धरला" हें सर्व प्रकरण बारकाईनें वाचूनही २६ मे १७३७ पासून बाजीराव उत्तर-हिंदुस्थानांतच असावा असा वाचकांचा समज किंवा गैरसमज होतो. पृष्ठ ५५ वर बाजीरावानें पिलाजी जाधवास निजामाच्या भेटीस पाठविले त्याचें वर्णन आहे. तेथें म्हटलें आहे कीं—"२६ मे रोजीं पेशव्यांची आज्ञा घेऊन पिलाजी निघाला तो २८ मे रोजीं सिरोंज येथें निजामाच्या मुक्कामावर येऊन पोचला" म्हणजे तेव्हां बाजीराव सिरोंजे-पासून दोन मजलीवर कोठें तरी आहे. त्यानंतर त्या वेळेपासून डिसेंबर १७३७ पर्यंत तो वरच आहे अशी समजूत होते. बाजीराव माळव्यांतून दक्षिणेंत परत आला व नंतर फिरून वर गेला हा हकीकतीचा दुवा नसल्यामुळें घोटाळा झाला आहे. पेशवे-दप्तर भाग २२, पृष्ठ १८१ वरून बाजीराव आषाढ वद्य ६ (२–७–३७) रोजीं दिल्लीच्या स्वारीहून पुण्यास आला, नंतर भुइंजेकडे शाहू महाराज फिरत होते त्यांच्या संन्निध महिना पंधरा दिवस जाऊन राहिला व नंतर ऑक्टोबरच्या १५ तारखेस फिरून उत्तर-हिंदुस्थानाच्या स्वारीकरितां डेरे-दाखल झाला, अशी खरी वस्तुस्थिति आहे. बाजीरावाचे भुइंजेकडील मुक्कामही पेशवा रोजकीर्दींत तपशीलवार सापडतात. श्री. दिघे यांनीं त्या रोजकीर्दींचा भरपूर उपयोग

केला असतां हे मुक्काम त्यांच्या दृष्टींतून कसे वगळले गेले कळत नाहीं.

'बाजीरावाच्या कार्याचें समालोचन' या शेवटच्या प्रकरणांत लेखकानें बाजीरावाच्या कर्तृत्वाचें महत्वमापन केलेलें आहे, तें अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें वाटते. त्यांत त्यानें प्रांजळपणें कबुली दिली आहे कीं, "स्वकर्तव्याची जाणीव असणारा, जोमदार, सर्वांस काबूंत ठेवून काम बजावून घेणारा, तडफेचा पुढारी राष्ट्रास हवा होता. सातारच्या गादीवर अधिष्ठित झालेल्या शिवाजीच्या वंशजाकडून ती अपेक्षा पुरी होण्याचा संभव नव्हता. त्याचे साहाय्यक जे पेशवे ते अप्रतिम कर्तृत्ववान असल्या-मुळें मराठ्यांचें पुढारीपण पेशव्यांकडे त्यांच्या गुणांमुळेंच साहजिक चालून आलें. महाराजांचें आसन सर्वस्वी पेशव्यानें स्थिर केलें आणि म्हणून साहजिकच छत्रपति, पेशव्यांच्या आहारीं गेले. अठराव्या शतकांतील विस्तार पावणारें मराठ्यांचें साम्राज्य शाहू छत्रपतीचें नसून ती पेशव्यां-चीच वाढती जहागीर होती. शिवाजी जर स्वराज्यसंस्थापक तर बाजी-राव साम्राज्यसंस्थापक होय यांत शंका नाहीं."

हें महत्त्वमापन करीत असतांच बाजीरावाच्या उत्कर्षानें अधोमुख होऊन, द्वेषानें मशालीसारखे जळणारे प्रतिनिधीसारखे जे नादान दरबारी सरदार होते, त्यांचेंहि यथायोग्य वर्णन लेखकानें निःपक्षपातीपणें केलें आहे. त्यामुळें जातिद्वेषानें इतिहासाकडे पाहणाऱ्या कांहीं लोकांना जरी वाईट वाटलें, तरी खऱ्या चिकित्सकांना आनंद व कौतुकच वाटेल!

लेखकाच्या मतें, मोगल साम्राज्याच्या बुंध्यावर घाव घातले, म्हणजे त्याच्या फांद्या आपोआपच खालीं येतील अशा कल्पनेनें झालेल्या बाजीरावाच्या उत्तरेच्या स्वाऱ्या मात्र योग्य नव्हत्या. प्रथम त्यानें कर्नाटक व निजाम यांचाच बंदोबस्त करावयास हवा होता! कारण "साम्राज्य घसरणीस लागलें, म्हणजे प्रथम दूरच्या प्रांतावरील पकड नाहींशी होते व असल्या भागाचे लचके तोडणें सोयीचें पडतें. बुंध्यावर घाव

घालण्यांत बाजीरावानें विसाडवाईच केली असें म्हणावें लागतें. ” पण स्वतःच्या या आक्षेपाचें निराकरण पूर्वीच्या आपल्या विवेचनांतच ग्रंथकर्त्यानें खरे यांच्या विवेचनाचा अनुवाद करून केलें आहे! तें असें कीं, कसेहि असलें, तरी पेशवे छत्रपतींचे नोकर. राजघराण्याचा स्वयंभू नैतिक पाठिंबा त्यांना कसा प्राप्त होणार ? यामुळें शाहूनें सरदारांना जे प्रांत वांटून दिले, त्यांत फत्तेसिंग प्रतिनिधीकडे कर्नाटक व नीराकांठचा प्रदेश आणि पेशव्यांकडे बागलाण, खानदेश, माळवा वगैरे प्रांत आले. अर्थात् कार्यक्षेत्र निवडण्याच्या बाबतींत पराधीनता असल्यामुळें पेशव्यांच्या ताब्यांत जो प्रांत आला तेथें त्यांनीं करामत दाखविली यांत त्यांचें काय चुकलें ? असो.

या पुस्तकांतील ‘ दिल्लीवर चढाई ’ व ‘ भोपाळाचा संग्राम ’ हीं दोन प्रकरणें चांगलीं उतरलीं आहेत. पुस्तकाची भाषा बरी आहे, तथापि प्रस्तावनाकार प्रो. पोतदार यांच्याप्रमाणेंच ‘लेखकाचा विचार व सराव वाढेल तसतशी ती चांगली होत जाईल’ असें आम्हासही वाटतें. पहिल्या तीनचार प्रकरणांत पुनरुक्ति बऱ्याच ठिकाणीं झालेली आहे. ‘ या सर्व चिन्हांवरून मोगल राजवटीचे दिवस संपुष्टांत आले आहेत हें सांगण्यास भविष्यवाद्याची जरूर नव्हती ’, ‘निजामानें उठावणी करून कांहीं काल तरी शाहूच्या राज्याचें अस्तित्व संशयास्पद केलें ’, ‘ चपळाईच्या दौडींत त्यांचें कसब साठविलेलें होतें ’, ‘ यशासारखा यशदाता नाहीं ’, ‘मोगल सैन्यांत मानाच्या जागा अनुभवश्रेष्ठाना न देतां कुलश्रेष्ठांना देण्याचा प्रघात पडला होता. रस्त्यात होणाऱ्या कलागतींपेक्षां जास्त युद्धाचें ज्ञान नाहीं अशा पोरसवदा अमीर–उमरावांच्या नातलगाना मनसबा दिल्या ’, ‘स्वगृहापासून मराठे दूर गेले असून, युद्धारंभाच्या पायापासूनही त्यांचा संबंध पार तुटला होता ’ वगैरेंसारखीं थेट भाषांतरित वाक्यें, फारच हेंगाडी वाटतात !

* पर्वतीवरचें भुयार

श्री. विष्णुपंत करंदीकर यांनीं पर्वती पंचांच्या साहाय्याने पर्वतीवर खोदकाम सुरू केलें असून त्यासंबंधीं 'टाइम्स' आदिकरून वर्तमानपत्रांतून पुष्कळच मजकूर प्रसिद्ध झाला आहे. पर्वतीवर एक गुप्त खोल भुयार असून तें थेट शनिवारवाड्यांत निघतें अशी आजवर एक दंतकथा प्रचलित होती ! देवदेवेश्वराच्या प्राकारांतील पूर्वाभिमुख दरवाज्यालगत आंत शिरतांच उजव्या हातास एक पिंजरा घातलेलें बळदाचें तोंड दिसतें; आणि तेवढें नुसतें वरूनच पाहून जो तो तेथून प्रत्यक्ष शनिवारवाड्यांत जाऊन पोचल्याचा अनुभव आल्यासारखें करतो. "पर्वती उंच टेकडीवर आणि शनिवारवाडा पार लांब नदीच्या पातळीवर. अंतर

* केसरी, १८ जानेवारी १९३५

सहज मैल-दीड मैलाचें. असें असतां उभ्या माणसाला खांद्यावर भाला टाकून लीलेने त्यांतून जातां येईल असें प्रचंड भुयार भूमींतून बांधणें ही काय गोष्ट आहे ! " अशीं कल्पनांचीं जाळीं तो सहजच विणतो. आणि श्री विष्णुपंत करंदीकरांसारखा नागसंस्कृतीचा अभ्यासक वाटाड्या बरोबर असेल, तर मग पर्वतीच्या टेकडीखालचा सर्वच भाग भुयारांनी आणि लेण्यांनी गजबजून मधमाशांच्या मोहोळासारखा झालेला त्याच्या मनश्चक्षूंस दिसणें मुळींच कठिण नाहीं !

भुयारासंबंधीं दंतकथा

पण दुर्दैवानें ही भुयाराची दंतकथा प्रत्यक्ष पाहतां निर्मूल आहे. भुयाराची दंतकथा भुयाराप्रमाणें खरोखरीच पोकळ आहे. अथवा त्याहून खरें बोलावयाचें तर ती फारच 'भरीव' आहे असें म्हटलें पाहिजे. कारण या भुयाराचें तोंडच तेवढें उघडें असून पुढें सर्वच भाग भरलेला म्हणजे कायमचाच बंद आहे ! प्रत्यक्ष या भुयारांत आंत उतरून पाहतां तें एक साधें अंधार असावें इतकेंच दिसतें. तें सुमारें १॥ पुरुष उंच तीन वावा लांब म्हणजे सुमारें १०॥ फूट लांब व १॥ वाव रुंद म्हणजे सुमारें ५॥। फूट रुंद आहे. बारकाईनें तपासून पाहतां कोठे वाट चिणून किंवा बुजवून टाकल्याचीहि खूण दिसत नाहीं. भिंती ठोकून पाहतां पोकळ किंवा खोल आवाजहि येत नाहीं. सारांश, तेथे भुयार किंवा भुयाराचा मार्ग वगैरे कांहीं-एक नसून, तें एक सांठवाचें अंधार किंवा 'तहखाना' असावा इतकेंच दिसतें. देवदेवेश्वराच्या देळांतील जमीन खालपासून म्हणजे बाहेरच्या पायऱ्यांच्या तळापासून सुमारें दहापंधरा फूट उंच आहे. अर्थात् ती सर्व जमीन भरून काढतांना सांठवणीच्या सोयीचें म्हणून हें एक अंधार त्यांत काढलेलें असावें.

अंधारांत उभें असतां वर डोक्यावर दोन लोखंडी कड्या टांगलेल्या दिसतात. श्री. करंदीकर यांचें म्हणणें कीं, याच ठिकाणीं नानासाहेबाने

आपलीं सुवर्ण तुलादिक दानें केलीं आणि लोखंडी कड्या हें त्याचें प्रत्यक्ष प्रमाण! पुरंदरे शकावलींतील एक नोंद अशी आहे कीं, " तळवटीं घरें बांधिलीं आहेत तेथें तुळा केल्या." तिचाहि आधार ते घेतात. परंतु हें अंबार म्हणजे " तळवटी " बांधलेलें घर धरलें तरी तें एकच आहे. 'घरें' नाहींत. शिवाय तुलादानाचा समारंभ नानासाहेबासारख्या सम्राटाला एखाद्या अंधाऱ्या बळदांत उरकण्याचें कांहींच कारण नाहीं. पेशवे-दप्तरांत व ऐतिहासिक लेखसंग्रहांत पर्वतीच्या तळवटीं म्हणजे टेकडीच्या पायथ्याशीं घरें वाडे बांधल्याचे उल्लेख सापडतात. तुळेचा समारंभ तेथेंच झाला असणें अधिक संभवनीय आहे.

श्री. करंदीकर यांनीं नानासाहेबाच्या समाधीच्या उत्तरांगाच्या परसांत बरेंच खणून काढलें आहे. खणीत असतां एक दगडी खिडकीची चौकट अर्धी दगडमातीनें बुजलेली दिसली. म्हणून तेथून खणावयास सुरुवात केली. तों जिन्यासारख्या तीन पाहिऱ्या सापडल्या; नंतर उजवीकडे उत्तरांगें सुमारें पंधरावीस फूट खणलें. तेथून पुनरपि पश्चिमपूर्व खणलें. खड्डा वीसबावीस फूट खोल आहे. एकंदर स्वरूप पाहतां गोमुखीच्या आकाराचें हेंहि एक सांठवाचें सामान्य अंबार किंवा तळघर असावें इतकेंच वाटतें. भुयार वगैरे कांहीं नाहीं. दक्षिणेस नानासाहेबाच्या समाधीचें घर, पश्चिमेस तट, उत्तरेस देवदेवेश्वराच्या प्राकाराचा तट, व त्या अलीकडे लकडखाना, पेशव्यांचीं न्हाणी व शौचकूप वगैरे ठिकाणें. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां उकरलेल्या जागीं एखादें सामान्य अंबार असावें इतकीच फार तर कल्पना धावते. पेशवे-दप्तरांत पर्वती संस्थानासंबंधीं स्वतंत्र रुमालच आहेत. त्यांत बांधकामापासून इत्थंभूत बारीकसारीक गोष्टींचीसुद्धा नोंद आहे असें श्रीमंत आबासाहेब मुजुमदारांनीं घेतलेल्या टिपणांवरून दिसतें. ते स्वतः इतिहाससंशोधक असून पर्वती संस्थानाचे एक पंचच आहेत. आणि पर्वतीचा अधिकृत इतिहासहि ते लिहीत आहेत.

पर्वतीवर जर खरोखरीच पूर्वापार काहीं भुयारें असतीं किंवा पेशव्यानें जर तशीं कांहीं नवीं तयार केलीं असतीं, तर बांधकामाच्या जमाखर्चांत त्यांचा कोठे ना कोठे तरी 'सूड' लागल्याशिवाय राहता ना! श्री. करंदीकर यांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यानीं पेशवे-दप्तरात परवानगी मिळवून पर्वतीचे जमाखर्च बारकाईनें पाहून, कांहीं लेखी दाखल्याच्या आधारानें उत्खनन करावें, म्हणजेच कांहीं भुयार वगैरे असल्यास सापडेल.

ऐतिहासिक पुराव्याचा अभाव

त्याआधीं त्यांनी रमण्यांतलें बुजून गेलेलें तळें, व विष्णूच्या देवळाखालीं टेकडीच्या तळास एक टाकें आहे, तें उकरून साफ करून शोधावें. टाकें पांडवकृत्यासारखें फार सुंदर आहे. आंत चार चौरस खडकाचेच कोरलेले मोठे खांब आहेत. शेवाळलेल्या घाण पाण्यानें ते टाकें दुर्गंध झाले आहे. पाणी कंबरेइतकें आहे. कांहीं दिवसांपूर्वी एक माथेफिरू मुसलमान या ठिकाणीं आमचा पीर निघाला म्हणून धरणें धरून बसला होता. त्याला अखेर पंचांनी पोलीस-मदत आणून हुसकावून दिला असें सांगतात. या ठिकाणीं साफसफाई करून शोध झाल्यास बरें होईल. पर्वतीच्या टेकडीवरील निवडुंग नाहींसा करण्याचें कामही सुरू आहेच. त्याच्या जोडीस वरील दोन कामें पंचांनी हातीं घेतल्यास सर्वच दृष्टींनी तें योग्य ठरेल. श्री. विष्णुपंत करंदीकर पुराणांत इतिहास शोधणारे असून, नाग-संस्कृतीचा त्यांनी अभ्यास चालविलेला आहे. त्यांच्या मतें दक्षिणेंत नाग-संस्कृतीचे अवशेष आहेत. खुद्द पुणें शहरांतही पुष्कळ आहेत. पण शहरा-पेक्षा पर्वतीची टेकडी अर्थातच पुरातन आणि पर्वतीवर भुयार असल्याची दंतकथाही आहे; आणि नागसंस्कृतीच्या खुणा म्हणजे तर भुयारें! तेव्हां असे सारे दोरे जुळवून श्री. करंदीकरांनी हें उत्खननाचें काम सुरू केलेलें आहे पण त्यांत त्यांना अद्यापि निश्चित विधान करण्याइतपत त्या संस्कृतीचा दृश्य पुरावा कांहीं एक मिळालेला नाहीं असे आम्हास वाटतें.

तानाजीची समाधि सिंहगडावर आहे काय?

गेल्या माघ व॥ ९ स सिंहगडावर तानाजीच्या नांवानें एक मेघडंबरी बांधण्यांत आली, हें सर्वश्रुत आहे. सदर मेघडंबरी ज्या एका दगडावर बांधण्यांत आली आहे तो दगड म्हणजे तानाजीची मूळ समाधिच होय असें अद्यापही पुष्कळ लोक समजतात. किंबहुना ती तानाजीची समाधि असणें शक्य नाहीं अशी मनोमय खात्री असलेले विवेकी लोकही वकिली लढवून असें म्हणतात कीं, प्रत्यक्ष लेखी ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं व उलटपक्षीं प्रस्तुतचा दगड हाच तानाजीच्या समाधीचा दगड असें लोक मानतात, त्याअर्थीं संशयाचा फायदा घ्यावा; व तो दगड हेंच तानाजीचें समाधिस्थल असें मानावें. म्हणूनच याबाबत सुचणारे कांहीं विचार पुढें मांडीत आहें.

---

* मन्वंतर, एप्रिल १९३७

तानाजीची समाधि सिंहगडावर नाहीं असें मी म्हणतों याला कारणें पुढील प्रमाणें आहेत. आपल्या सामाजिक मनोवृत्तीकडे व इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, मृत मनुष्याचें, मरणोत्तर कांहींएक स्मारक करूं नये, अशी हिंदु माणसाची संस्कारामुळें बनलेली मनःप्रवृत्तिच असते. कदाचित् त्याच्या निरहंकार वृत्तीचा किंवा मानवी देहाविषयींच्या तुच्छता बुद्धीचा तो परिणाम असेल. कसेंही असो. आपण हिंदु लोक फारशीं स्मारकें किंवा स्मृतिचिन्हें उभारीत नव्हतों हें सत्य आहे. युरोपिअन, क्रिश्चन लोकांत कुठलाही क्षुल्लक फाटका मनुष्य मेला तरीहि त्याचें नांव कोरलेली शिळा त्याच्या दफनभूमीवर बसविण्याची वहिवाट आहे. आपणाकडे तसें असतें तर तानाजीचें समाधिस्थान सहजच निश्चित झालें असतें. आपल्या लोकांत छत्र्या किंवा समाधीसारखीं स्मृतिचिन्हें कोणाची बांधीत होते ? तर एक तर तो राजा किंवा मोठा सरदार असला पाहिजे. किंवा संन्यासी असला पाहिजे किंवा त्याच्या नांवानें कोणी तरी सती गेलें असलें पाहिजे! तानाजी यांपैकीं कोणीच नव्हता. तो राजा नव्हता संन्यासीही नव्हता; तसेंच तो लढाईत सिंहगडावर मृत्युमुखीं पडल्यामुळें तेथें त्याची बायको वगैरे कोणी सती जाणें शक्य नव्हतें. शिंदे होळकरांच्या घराण्यांतील कांहीं पुरुषांच्या छत्र्या उत्तर हिंदुस्थानांत बांधलेल्या आहेत. त्यांचा निर्देश करून कोणी अपवाद उभा करील व त्या अपवादाप्रमाणें तानाजीचीहि समाधी सिंहगडावर कोणी बांधलेली आहे असें म्हणेल तर त्याला उत्तर असें कीं तानाजी हा व्यक्तिशः शूर असला तरी शिवाजीच्या इतर सरदारांच्या मानानें त्या वेळीं तो दर्जानें एक क्षुल्लक सरदारच होता. मातबर फौज पदरीं बाळगणारा सरदार नव्हता. तो फक्त हजार पायदळाचा नाईक किंवा सुभेदार होता. तानाजीसारखे असे शेंकडों सरदार शिवाजीच्या पदरीं असतील व त्यांपैकीं किती तरी तानाजीप्रमाणेंच स्वामिकार्यावर पराक्रम करून ठार पडले असतील. त्यांचीं

स्मारकें किंवा समाध्या ज्या न्यायानें कोणी बांधल्या नाहींत, त्याच न्यायानें तानाजीचीहि समाधि सिंहगडावर बांधली न जाणें हेंच स्वभाविक वाटतें.

पण सिंहगडावर तानाजीची समाधि नसली पाहिजे या विधानाला दुसरा एक निःसंदिग्ध व बळकट पुरावा देता येतो. तो तुलसीदास शाहिराच्या समकालीन पोवाड्याचा. त्यांत तानाजीचें उत्तरकार्य सिंहगडावर न होतां तें उमराठ्यास म्हणजे तानाजीच्या गांवीं झालें असा स्पष्ट उल्लेख आहे. तानाजीच्या मुरद्याला रेशमाचा दोरा घालून तो पालखींत ठेऊन प्रथम राजगडास शिवाजीमहाराज होते त्यांच्याकडे शेलारमामा व सूर्याजींनीं नेला, मग महाराजांनीं तो तेथून वाजतगाजत उमराठ्यास नेला, व तेथें त्याचें उत्तरकार्य संपादिलें, अशी तपशीलवार हकीकत त्यांत दिली आहे. अर्थात् तानाजीची समाधि कोणी केव्हां बाधली असेल, तर ती उमराठें गांवांतच दहनस्थानी असली पाहिजे, सिंहगडावर असणें शक्य नाहीं हें स्पष्ट होतें ! आतां यावर कोणी असें म्हणेल कीं, " सिंहगडावर तानाजी पडला त्या ठिकाणीं आदरपूर्वक शिवाजीनें एखादें समाधीसारखें बांधकाम केलें असेल. वसई-मोहिमेंत मोरे आडनांवाच्या एका मराठे वीरानें पराक्रम केला व तो ठार पडला त्या ठिकाणीं कोणी समाधीवजा देवळी आणि पादुका स्थापल्याचें तुम्हींच लिहिलें आहे." त्यावर माझें उत्तर असें—" क्षणभर वरील म्हणण्याप्रमाणें समाधि बांधली असें गृहीत धरूं. पण तसें असेल तर त्या स्थळाचा लेखी उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांत कोठेंना कोठें तरी व्हावयास नको काय? पेशवे-दप्तरांत सिंहगड किल्ल्याच्या जमाखर्चाचे पुष्कळ रुमाल आहेत. त्यांत अगदीं बारीकसारीक क्षुल्लक स्थलांचाहि उल्लेख सापडतो. पण त्यांत तानाजीच्या समाधिस्थलाचा चुकूनही उल्लेख आलेला नाहीं. सध्याच्या स्मारकउत्सवाचे खटपटे अध्यक्ष गोविंदबुवा देसाई हे असें सांगतात कीं तानाजीची समाधि असलेली जागा ही सातारकर छत्रपतींच्या मालकीची आहे, व सातारकर ती

तानाजीचीच समाधि असें मानतात ! यावर माझें म्हणणें असें कीं, तर मग ती समाधि तानाजीची आहे असा लेखी उल्लेख सातारकरांच्या जुन्या दप्तरांत किंवा जुन्या जमाखर्चांत अवश्यमेव सापडला पाहिजे. पण श्री. देसाई यांना तो उल्लेख शोधून आणून प्रसिद्ध करण्याविषयीं अनेकवार सूचना करूनही त्यांच्या हातून तें काम झालें नाहीं. माझ्या कल्पनेप्रमाणें तानाजीची खरी समाधि सिंहगडावर नाहींच तर तिचा उल्लेख सातारकरांच्या झालें तरी दप्तरांत कोठून येणार ? गडावरलि राजाराम महाराजांची छत्री सातारकरांच्याच ताब्यांत आहे. तिचा सर्व खर्च व पूजाअर्चा त्यांच्याकडूनच होते; असें असतां त्या छत्रीच्या पुजाऱ्याकडून वर्षांतून केव्हांही तानाजीच्या समाधीला गंधफूलहि वाहिलें जात नाहीं. याचा सरळ अर्थ असा दिसतो कीं, ती समाधि तानाजीचीच आहे असा कांहींएक दाखला सातारकरांच्या दप्तरांत नसला पाहिजे. गेल्या वर्षापासून मी श्री. देसाईबुवा यांस असें सुचवीत आलों कीं सिंहगडावर तुम्ही म्हणतां ती तानाजीची समाधि नसावी. तिला ऐतिहासिक आधार नाहीं. आहे तो विरुद्ध आहे. करितां पेशवे-दप्तरांत, गडाखालील गांवांत व खुद्द उमराठ्यास शोध करून आधीं स्थलनिश्चिती करा, नाहीं तर संभाजीच्या तुळापूर येथील स्मारकाचा जसा विवेचक लोकांच्या दृष्टीनें बोजवारा उडाला तसें होईल. कारण तुळापुराचें स्मारक झाल्यानंतर लवकरच समकालीन लेखी विश्वसनीय दाखले सापडून संभाजीची समाधि तुळापूर येथें नसून ती जवळच वडू नामक गांवीं आहे असें निःसंदिग्ध रीतीनें सिद्ध झालें, तसें होईल !

उत्सवप्रिय लोकांना उत्सव करावयास कांहीं तरी प्रतीक किंवा उपरी उत्सव मिळली तरी भागतें. पण संशोधकांचें किंवा चिकित्सकांचें त्यानें समाधान होत नाहीं. उत्सवमंडळानें सध्या मेघडंबरी बांधून तानाजीचें देऊळ केलें आहे तें सुंदर आहे याबद्दल शंका नाहीं व तानाजी सिंहगडावरच रणांत पडला ही सत्य गोष्ट असल्यामुळें एक तऱ्हेनें सबंध

सिंहगड हीच निसर्गानें तानाजीची बांधलेली प्रचंड समाधि आहे आणि त्यामुळें गडावर कोठेंही त्याचें देऊळ बांधलें तर तें कोणीही पूज्यच मानील. पण मुद्दा आहे तो येवढाच कीं, ज्या ठिकाणीं तानाजीचें खरोखर दहन झालें व त्यावर समाधि बांधण्यांत आली तें स्थळ प्रत्यक्ष सिंहगडावर आहे किंवा अन्यत्र कोठे आहे ? *

---

* सदर लेख प्रसिद्ध झाल्यानंतर पुणें येथील सकाळपत्राच्या १-५-३७ च्या अंकात या लेखाला पुष्टी देणारा मजकूर कुलाबा येथील राष्ट्र तेजपत्राच्या २९-४ च्या अंकांत आल्याचें मुद्दाम नमूद केलें होतें. म्हणून तो अंक आणून पाहता त्यांत पुनः ८-४-३७ च्या राष्ट्रतेजांत आलेल्या श्री. वि. ज. कामत यांच्या लेखाचा हवाला दिलेला आढळला. म्हणून तोहि अंक आणविला. श्री. कामत यांच्या लेखांत पुढीलप्रमाणें माहिती आहे.

" प्रतापगड उतरून पहिल्या पठारावर आल्यावर अफजलखानाचें थडगें लागते. त्याच्या खालीं उतरून महाडाकडे येणाऱ्या रस्त्याने कपडे गांवापर्यंत आल्यावर उजव्या बाजूला सावित्री नदीच्या खोऱ्यांत देवळे गांव लागते. तेथे बाजी प्रभूचे दूरचे वंशज राहतात. पलीकडे सुमारे चार मैलांवर तानाजी मालुसरे यांचे गांव उंबरडें आहे. तेथे तानाजीचा घरटा अद्यापि पहावयास मिळतो. गांवाजवळच तानाजीची समाधि म्हणून गांवकरी लोक दाखवितात. परंतु तानाजीची समाधी येथे कशी हें आम्हांस अज्ञेयच आहे."

* रियासतीचा कळसाध्याय

मराठी रियासतीच्या उत्तरविभागाचा हा तिसरा म्हणजे शेवटचा विभाग नुकताच रियासतकार रा. सा. गो. स. सरदेसाई यांनीं पुरा करून प्रसिद्ध केला आहे. या भागांत सन १७९५ पासून १८४८ पर्यंत म्हणजे पेशवाई नामशेष होऊन त्यानंतर कांहीं काळ जीव धरून राहिलेली सातारकर छत्रपतिशाहीहि नष्ट होईपर्यंतचा इतिहास आलेला आहे. या भागांतील वसई-प्रकरणापर्यंतचा जो इतिहास आला आहे तो सोडला, तर तेथूनचा पुढील सर्व भाग आजपर्यंत अज्ञातच होता; म्हणून तो एक तऱ्हेने अपूर्वच आहे असें म्हणतां येईल. 'अपूर्व' याचा अर्थ पूर्वी त्या कालखंडांतील इतिहासासंबंधीं कोठें कांहींहि लिहिलें नव्हतें असा नव्हे.

---

* केसरी, ५ ऑगस्ट १९३२

राजवाडे आदिकरून अनेक संशोधकांनीं साधनें व टिपणें करून ठेवलेलीं होतीं. परंतु त्या साधनांवरून एकत्र व सुसंगत असा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मात्र कोणी केला नव्हता. यामुळें इतिहासाभ्यासी व संशोधक सोडले, तर सामान्य वाचकांना हा सर्व इतिहास अपूर्वच वाटेल, व त्याबद्दल सरदेसायांना यथार्थ अभिमानहि बाळगतां येईल. नवीन भूप्रदेश आक्रमण करून त्यावर प्रथम निशाण लावणारा हा तेथला सर्वस्वी मालकच होय. पुढें मागें कोणी अधिक पराक्रमी पुरुष येऊन तें निशाण उपटून टाकीपर्यंत तरी पहिल्याची मालकी अबाधित राहणार हें निश्चित आहे. या दृष्टीनें वसईच्या तहानंतरचा जो इतिहास अेकत्र करून सरदेसायांनीं प्रथमच वाचकांस दिला त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. असो.

मराठेशाहीचा कळस !

प्रस्तुत विभाग हा सरदेसायांनीं म्हटल्याप्रमाणें एकंदर मराठेशाहीचा कळस होय. त्याचप्रमाणें तो सरदेसायांच्या कर्तबगारीचाहि कळस आहे. आज बरींच वर्षे परिश्रम करून मराठी रियासतीचें बरेंवाईट देऊळ त्यांनीं बांधीत आणलें होतें, त्यावर शेवटीं या विभागाचा हा कळस त्यांनीं चढविला. देवळाच्या शिखरावर पताकाहि आवश्यक असते; म्हणून त्यांनी एक पताकाहि कळसावर उभी करून रूपकाची पूर्तता केली आहे. कळसावरील पताकेवर पुढील वाक्य आहे—"मराठींत जितकी म्हणून साधनसामुग्री प्रसिद्ध आहे, ती आता बहुतेक माझे नजरेखालून गेली आहे. तशीच इंग्रजी सामुग्रीहि. मला वाटतें, मी यापूर्वी जीं अनुमानें वेळोवेळीं नमूद केलीं तीं जास्त वाचनानें व अभ्यासानें आतां सर्वथा बदलावींशीं वाटतात!!" शेंड्यावर बसून बुंध्यावर कुऱ्हाड चालविण्यापैकींच हा प्रकार कित्येकांना वाटेल ! तर कित्येकाना तो प्रांजळपणाचाच कळस होय असेंहि भासेल. कसेहि असो, या भागानंतर आपल्या सर्व रियासती

पुनः लिहून काढून शिवाय त्यांत नवीन साधनसामुग्रीची भर घालावयास सरदेसाई लागणार आहेत असें त्यांच्या प्रस्तावनेवरून दिसतें. तेव्हां अशा वेळीं दोषदर्शनाचें काम निस्पृहपणें व यथास्थित झालें, तर लवकरच या त्यांच्या 'सुधारून वाढविलेल्या शुद्ध रियासतींना' पुष्कलच उपयोग होईल अशी आमची कल्पना आहे. पण तसें करीत असतांना त्यांत टीकेचा कडवटपणाहि कोठें प्रकट होणें अपरिहार्य आहे. अशा वेळीं 'महत्त्व व्यक्तीचें नाहीं, कार्याचें आहे' या सरदेसायांच्याच वाक्याचा हवाला देण्याखेरीज आम्ही दुसरें काय करणार ?

कै. खरेशास्त्री यांचें भांडवल

पण परीक्षणाच्या तपशिलांत शिरण्याच्या अगोदर आम्हास एक गोष्ट मुद्दाम निदर्शनास आणावयाची आहे. आणि प्रथमच तिचा स्पष्टपणें उच्चार करावा अशाच योग्यतेची ती आहे. ती ही कीं, सरदेसायांची रियासत म्हणून शिक्का मारलेल्या या पोत्यांत कै. खरे यांनी निवडून पाखडून सडून ठेवलेल्या धान्याचा गल्लाच मुख्यतः ठेचून भरलेला आहे. आणि म्हणूनच सहाशें पानांचें एवढें बाळसें या खंडाला लाभलेलें आहे! जर कोणी परीक्षक आतील धान्याची चिकित्सा करण्याकरिता हें पोतें ओतूं लागेल, तर लोकाच्या मालकीचा बराच गल्ला बाहेर पडून पोत्याची मात्र स्थिति 'An empty sack cannot stand' या इंग्रजी म्हणीसारखीच होईल अशी आमची खात्री आहे. या सहाशें पानांच्या भागांत वसईमोहिमेपर्यंतचा मजकूर सुमारें अडीच-तीनशें पानें इतका आहे. आणि तो बहुधा सर्व खरेशास्त्री यांच्या तयार प्रस्तावनांवरून जवळ जवळ उतरून घेतलेला आहे. ही अजब गोष्ट पाहून रियासतकाराना कोणी विनोदानें धान्य मोजणाऱ्या मापाची उपमा दिली तर ती बरोबरच ठरेल. आपल्या रियासतींतलें प्रत्येक प्रकरणरूपी माप हातीं घेऊन त्यांनी शेंकडों खंडी

गल्ला मापून टाकला आहे. त्यांपैकीं जवळ जवळ निम्मा गल्ला कै. खरे-शास्त्री यांच्या मालकीचा आहे, असें आम्ही स्पष्टपणें विधान करतों !

आतां सरदेसायांच्या बाजूनें कोणी असें म्हणतील कीं, इतिहास हा कांहीं मनचा लिहावयाचा नसतो. जास्तींत जास्त जितके जुने आधार मिळतील तितके आधार घेऊन त्यावरच इतिहासमंदिर उभारावयाचें असतें. आम्हाला हें मान्य आहे; पण याचा अर्थ असा नव्हे कीं, कोणा एका विशिष्ट गृहस्थाने परिश्रमपूर्वक वर्षानुवर्षें खपून, साधनांचा अभ्यास करून, त्यावरून स्वतंत्रपणें इतिहासप्रबंध लिहावा आणि त्याचा उद्या कोणी जसाच्या तसा उपयोग करावा ! सरदेसायांकडून असाहि आक्षेप येईल कीं " आजवर मी खऱ्यांच्या ऋणाचा वेळोवेळीं आधारांत उल्लेख करून लिहि-लेंच आहे, मग त्यांचा मजकूर उतरून घेण्यास हरकत कोणती ? " पण यावर आमचें म्हणणें असें कीं, आधारांच्या गर्दीत किंवा पादटीपांत श्री. खरे यांचें नांव देऊन शपथेला मोकळे होऊन भागणार नाहीं. पादटीपांत दिलेले आधार हे त्या मुद्द्यांपुरतेच असतात. ग्रंथकर्त्यांच्या हकीकतीला, मजकुराला किंवा विधानांना कोठून कोठून पुष्टि मिळेल हें दर्शविण्याइतपतच त्यांचा आधार असतो. त्याचा अर्थ असा नव्हे कीं, पादटीपांत उल्लेखलेल्या ग्रंथाचा वरील मजकूर सारांश किंवा नक्कल आहे. पण प्रस्तुत पुस्तकाच्या सहाशे पानांपैकीं सुमारें अडीचशें-तीनशें पानें जर रियासतकारांनीं मुख्यतः खरे यांच्या तयार प्रस्तावनावरून एकापुढें एक जवळ जवळ उतरून घेतलेलीं आहेत, तर वास्तविक त्या ऋणाचा उल्लेख किती जिव्हाळ्यानें, प्रेमानें व प्रांजलपणानें त्यांनीं करावयास पाहिजे होता बरें ? त्यांनीं असें म्हणावयास पाहिजे होतें कीं "या भागांत सवाई माधवरावाच्या मृत्यू-पासून पुढें वसई-तह-अखेरपर्यंत दिलेली हकीकत कै. खरे यांनीं आपल्या ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या प्रस्तावनांतून इतकी सुसूत्र, सुंदर व तपशीलवार दिलेली आहे कीं, त्यापेक्षां कांहीं निराळें अधिक कोणास

लिहितां येणार नाहीं. म्हणून माझ्या या पुस्तकातलीं पहिलीं सुमारें तीनशें पानें त्यांच्या प्रस्तावनांचा क्रमवार सारांशच आहे, हें अभ्यासी वाचकांच्या सहज लक्षांत येईल. खऱ्यांसारख्या अधिकारी इतिहासलेखकानें दोनदोन चारचार वर्षें परिश्रम करून ज्या साधनांवरून या उत्कृष्ट प्रस्तावना लिहिल्या त्या साधनांचा फिरून स्वतंत्रपणें अभ्यास करण्यांत फुकट वेळ घालविण्यासारखें होय. म्हणून हाच मार्ग मला स्वीकारावासा वाटला. खऱ्यांच्या लक्षांत न आलेले किंवा खऱ्यांच्यानंतर मला उपलब्ध झालेले नवीन तपशील मी त्यांत ठिकठिकाणीं दाखल केले आहेत तेहि अभ्यासकांच्या लक्षांत येतीलच. खऱ्यांचा मजकूर मी घेतला आहे; त्यांचे तर्क, निर्णय किंवा प्रमेयें स्वीकारलेलीं नाहींत. सुसंगत ऐतिहासिक मजकुराचा पाण्याचा पाट खऱ्यांचा आहे, परंतु शेवटीं निष्कर्ष किंवा प्रमेयरूपी खऱ्यांच्या गोमुखांतून त्याचें पाणी न सोडतां तेथें मी माझें मुख त्याला जोडलेलें आहे ! हा मोठा फरक आहे." असें स्वच्छ रियासतकारांनीं प्रस्तावनेंत म्हटलें असतें तर फार बरें झालें असतें.

स्वतंत्र इतिहासरचनेचें महत्त्व

रियासतकारांच्या थोरल्या माधवरावाच्या भागाला खऱ्यांचा फार उपयोग झाला आहे, तरी त्यांत नुसती त्यांच्या मजकुराची नक्कल नाहीं. असें असता तेथें रियासतकारांनी प्रस्तावनेंत खऱ्यांचे मनसोक्त आभार मानून त्यांच्या मजकुराची मी लयलूट केली आहे असें म्हटलें आहे. आणि उलट या भागांत मात्र लयलूटच नव्हे तर लंकालूट असतांना खऱ्यांचा उल्लेखही नाहीं! पण हें रियासतकार कां करतील ? सर्व साधनांचा स्वतंत्रपणें अभ्यास करून आपण आपला इतिहास लिहिला अशी त्यांची महत्त्वाकांक्षा. मग त्यालाही कोणी नको म्हटलें होतें ? खुद्द ज्या कागदपत्रांवरून खऱ्यांनी आपल्या प्रस्तावना लिहिल्या, त्यांच कागदपत्रांचा स्वतंत्रपणें

अभ्यास करून सरदेसायांना आपली निराळी हकीकत लिहितां आली असती. खऱ्यांच्या खंडांतील पत्रांचा सरदेसायांनी वाटेल तेवढा उपयोग केला असता, तरी त्यांना कोणी दोष दिला नसता. कारण खऱ्यांनी साधनें लोकांस उपलब्ध करून दिलीं, तरी तीं त्यांच्या मालकीचीं नव्हत; फक्त त्यांवरून त्यांनीं लिहिलेला इतिहास हा मात्र खास त्यांच्याच मालकीचा होता. मग त्या साधनांचा स्वतंत्र अभ्यास करावयास रियासतकारांना कोणी नको म्हटलें होतें ? किंबहुना अशा साधनांवरून स्वतंत्रपणें प्रत्येकानें आपापल्या बुद्धीप्रमाणें इतिहास लिहिणें हेंच श्रेयस्कर. कारण त्यामुळें निरनिराळ्या विवेचनपद्धति व निरनिराळ्या मांडणी निर्माण होऊन, त्या त्या विषयांचें निरनिराळ्या बाजूंनी यथार्थ ज्ञान होण्यास मदत होते.

श्रीरंगपट्टणची मोहीम

उपलब्ध साधनें तींच असलीं, तरी त्या साधनांचा परिपाक हा ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणें आणि कौशल्याप्रमाणें निरनिराळाच बनणार. नेपोलियन बोनापार्ट याच्या आयुष्यांत घडलेल्या गोष्टी त्याच त्या असणार. तरी त्याच्या एकट्यासंबंधींचीं परस्परविरोधी शेंकडों चरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. याचा अर्थच असा कीं, स्वतंत्र तऱ्हेनें ज्याला विषयाचें आकलन करण्याची शक्ति आहे, तो साधनें आवश्यक म्हणून तींच घेईल. परंतु त्यापासून परिपाक निर्माण करील तो मात्र स्वतःच्या बुद्धीनुसार स्वतंत्रच असेल. खुद्द पेशवाईअखेरच्या कालासंबंधानें पाचसहा इंग्रज इतिहासकारांचे इतिहास उपलब्ध आहेत. पण त्यांचीं साधनें एकच असतां कोणी कोणाचा सारांश दिलेला नाहीं. पण या बाबतींत एक जवळचें उदाहरण दाखवितां येईल; व तें म्हटलें म्हणजे श्रीयुत दत्तोपंत आपटे यांच्या श्रीरंगपट्टण-मोहिमेच्या पुस्तकाचें. या मोहिमे-

संबंधीं शेंकडों पत्रें खरे यांनी आपल्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत छापलीं आहेत व त्यांवरून स्वतःच्या बुद्धयनुसार निघणारा इतिहासहि त्यांनीं आपल्या प्रस्तावनांतून लिहिलेला आहे. असें असतां श्रीयुत आपटे यांनीं खऱ्यांच्या साधनांचा व अवान्तर अशा इतर पुष्कळ साधनांचा स्वतंत्रपणें अभ्यास करून त्या मोहिमेचा साग्र इतिहास लिहिला आहे. मग तसें करावयास रियासतकारांना कोणी नको म्हटलें होतें! आतां ही गोष्ट खरी कीं, तसें करावयाचें झालें, तर सहा महिन्यांत सहाशें पानें इतिहास वायुगतीने जलद लिहितां येणार नाहीं. पण त्याला कोणी काय करावें ?

चित्रकाराचा दृष्टान्त

रियासतकारांची ही कृति पाहून आम्हास दुसरा एक दृष्टान्त सुचतो. एखाद्या अत्यंत बुद्धिमान व कुशल चित्रकाराने एखाद्या अफाट भूप्रदेशाचें मोठें सुंदर चित्र वर्षानुवर्षें खपून तयार करावें; तें त्याच्या दुर्दैवानें त्याला आलेख्य-रंगांत (आर्ट गॅलरींत) प्रविष्ट करतां येऊं नये; पुढें एखाद्या फोटोग्राफरनें येऊन क्षणांत त्या चित्राचा फोटो काढावा आणि तो जगांत अमुक चित्राचा फोटो असें न म्हणतां स्वतःच्या नांवावर प्रसिद्ध करून वाहवा मिळवावी; तशासारखेंच सरदेसायांचें करणें होय. सरदेसायांनी आपल्या फोटोला हा फोटो अमुक चित्राचा आहे असें नुसतें प्रांजळपणें म्हटलें असतें म्हणजे सर्व खऱ्यांना पावलें असतें. कारण मग त्यांत चित्रकाराचीच योग्य ती वाहवा होऊन तें चित्र मुळांतून जाऊन पाहण्याची आणि त्याचा उद्धार करण्याची आतुरता वाचकांस उत्पन्न झाली असती. खरेशास्त्र्यांचे ग्रंथ धुळींत पडले होते त्यांचा मीं अशा तऱ्हेने उद्धार केला, असें तेव्हां रियासतकारांना यथार्थ म्हणतां आलें असतें.

आम्ही असें स्पष्ट म्हटलेंच आहे कीं, श्रीयुत सरदेसाई यांनी खऱ्यांच्या ऐतिहासिक प्रस्तावनांवरून हा भाग उतरून काढला आहे. हें

विधान वरील विवेचन वाचूनही कित्येकांना धाष्टर्याचें वाटेल. परंतु ह्यापुढें प्रकरणशः चर्चा करतांना आम्ही खरे व सरदेसाई यांची जोडीच ठिक-ठिकाणीं खांद्याला खांदा लावून उभी करणार आहों. तेव्हां त्याविषयीं आम्हास कांहीं शंका वाटत नाहीं.

नकलेंतील अक्षम्य चूक

पण तेथपर्यंतहि वाचकांना तिष्ठत न ठेवतां त्यांच्यापुढें सरदेसायांच्या तोंडूनच त्यांची एक अक्षम्य चूक वदवितों. 'मराठेशाहींत इंग्रजांचा प्रवेश' या बहुधा खऱ्यांच्या प्रस्तावनेवरून उतरून घेतलेल्या सरदेसायांच्या प्रकरणांत सरदेसायांनीं बाळोजी कुंजराला दरवेळीं सडकून दोष दिलेला आहे; याचें कारण खऱ्यांनीं तसें केलें आहे म्हणून!! परंतु तें मत तर सरदेसायांना मान्य नाही. तेव्हां त्या प्रकरणांत एक टीप देऊन सरदेसाई लिहितात, 'ही सल्ला बाळोजी कुंजराची नसावी. उलटपक्षीं यशवन्त-रावास भेटून त्याची समजूत काढा, पण इंग्रजांचा आश्रय करूं नका, असें बाळोजी कुंजर अखेरपर्यंत बाजीरावास पढवीत सांगत होता असें वर्णन आहे. आणि वसईस बाजीरावानें इंग्रजांचा आश्रय करतांच बाळोजी तेथून लगेच शिंद्याकडे निघून गेला. यापुढील त्याचा आयुःक्रम अहर्निश राज्यरक्षणाचा होता हें पाहतां वरील प्रकार जास्त संभवनीय दिसतो.' ही टीप दिल्यानंतरहि पुढल्या पानांत फिरून कुंजराला दोष दिलाच आहे! याचा अर्थच असा कीं, नकल करून घेण्याच्या आवेशांत आपण दुसऱ्याचीं मतेंहि नकलून घेतलीं, आणि तोंडघशीं पडण्याची पाळी आली असें सरदेसायांच्या मागाहून लक्षांत आलें म्हणून त्यांनीं ही टीप दिली! एखादें पुस्तक लिहावें आणि त्याच्या शेवटीं मुद्दाम टीप जोडावी कीं, 'या माझ्या पुस्तकांतील मतें मला मान्य नाहींत, तीं चुकलीं आहेत,' त्यासारखीच ही सरदेसायांची कृति होय! मत मान्य नव्हतें, तर

अमान्य हकीकत आधीं उतरून घेतलीच कशाला ? बरें, ती लिहून छापून झाली तर तेवढें प्रकरण पुनः छापावयास येत नव्हते ? तसें केलें असतें म्हणजे आपल्या हातानें आपली फजीती करून घेण्याचा प्रसंग येताना !

—२—

सरदेसायांचें दुसरें प्रकरण महाडचें कारस्थान व नानास कैद हें आहे. बहुतेक सर्व मजकूर खरेशास्त्री यांची प्रस्तावना पुढें ठेवून सारांश काढलेला आहे. नमुने पाहा—सरदेसाई पान २९ पहिल्या ४ ओळी हा खरे ४९०७ दुसऱ्या पॅऱ्याचा सारांश आहे; पान ३० पहिल्या ओळी बारा खरे ४९०८ पानाचा सारांश; पान ३० ओळी १३-२२ खरे ४९०९ पहिल्या पॅऱ्याचा सारांश; पान ३४ दुसरा पॅरा खरे पान ४९१२ चा सारांश; पान ३५ पहिला पॅरा, खरे ४९१३ पहिल्या पॅऱ्याचा सारांश; पान ३५ दुसरा पॅरा खरे ४९१४ पहिल्या पॅऱ्याचा सारांश; पान ३८, मधला पॅरा. शेवटच्या कांहीं ओळी खरे पान ४९१२चा सारांश; पान ३९ पहिला पॅरा खरे पान ४९१६ व १७चा सारांश; त्याच पानांतील दुसरा पॅरा ५ ओळीनंतरचा पुढील मजकर खरे पान ४९१५ दुसऱ्या पॅऱ्याचा सारांश. पान ४० मधला पॅरा, खरे पान ४९१८, मधल्या पॅऱ्याची नक्कल; पान ४५ मधला मोठा पॅरा, खरे पान ५०४६ ते ५०४७ पानांचा सारांश; पान ४६ वरील सगळा आंकडा म्हणजे ४ पानें, ४६ ते ५३ खरे पान ५०४८ ते ५०६७ यांवरील पॅऱ्यांचा सारांश असें म्हणण्यास हरकत नाहीं. पान ५४, आंकडा ५, खरे ५१८६ व ८७चा सारांश; पान ५९ खरे ५१८१ चा सारांश; पान ५७, ५८ आंकडा ६ खरे

* केसरी, ९ ऑगस्ट १९३२

५१८०, ८१ ची नकल; पान ५९ खरे ५१८१ चा सारांश; पान ५९ शेवटच्या पॅऱ्याच्या दोन ओळी व पान ६० चा पहिला पॅरा खरे ५१८४ पानाची व ८५ वरील पाहिल्या पॅऱ्याची नकल; पान ६० दुसरा पॅरा खरे ५१८४ ची नकल थोडा फेरफार करून. पान ६१ ते ६४ खरे ५१९२ ते ९५ चा सारांश; पान ६५ शेवटचा पॅरा व ६६ वरील पहिला पॅरा खरे ५३०३–४–५ चा सारांश.

असंबद्ध रचना

वर दिलेल्या तपशीलावरून या प्रकरणांत खऱ्यांचा मजकूर किती तें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. मजकुरासंबंधानें इतकें झाल्या-नंतर सरदेसायांच्या विशेषाबद्दल म्हणजे असंबद्ध रचनेबद्दल व गैरलागू माहिती घुसडण्याबद्दल निर्देश करूं. या भागांतील केसोपंत कुंट्यांची व त्यांच्या वंशाची हकीकत असंबद्ध आहे. ५७ पानावरील पहिल्या पॅऱ्यांत सरदेसाई लिहितात, " पुढें नानास असाच कारभारावर राहूं दिला, तर शेणवीमंडळ, शिंदे बाया, अमृतराव पटवर्धन, बाहेरचे निजाम व इंग्रज हे सर्व एक होण्याचा संभव दिसतांच नानाचा वेळींच बंदो-बस्त करण्याचा घाट सर्जेरावाने रचला. त्याचीं कारणें नीट समजून घेण्यासारखीं आहेत. ' या शेवटच्या वाक्यावरून वाचकास वाटतें कीं, आतां त्या कारणांचें दिग्दर्शन व्हावयास सुरुवात होईल. परंतु तें दिग्दर्शन कोठल्या कोठे अस्त पावतें आणि पुढच्या पॅऱ्यांत आंग्र्यासंबंधीं भलतीच लांबलचक हकीकत येते. वास्तविक ती तेथें सर्वस्वं गैरलागू आहे. पण 'ग्वाल्हेर जागिरदारान ' या सरदेसायांनाच प्राप्त असलेल्या पुस्तकांतील दुर्मिळ माहिती कोठें तरी सांगण्याची रियासतकारांनी सवड साधली इतकेंच.

गैरलागू मजकूर

पान ६० वरील दुसरा पॅराहि असाच असंबद्ध आहे. वरच्या

मजकुराशीं त्याचा कांहीं संबंध दाखविला नाहीं. त्याचप्रमाणें पान ६५ वरील पुढील मजकूर " नानाचा अडथळा दूर होतांच बाजीराव आपला कारभार स्वतःच पाहूं लागला. उगाच नांवापुरतें त्यानें अमृतरावास पुढें केलें. सर्व जमाखर्च बाजीराव आपले आपणच लिहूं लागला. असे कित्येक जमाखर्च त्याच्या हातचे लिहिलेले असून, त्यांत कित्येक रकमा सांकेतिक तपशिलानें लिहिलेल्या आतां समजत नाहींत ! " खरें पाहिलें तर पेशवे-दप्तरांत रियासतकारांना हे बाजीरावाचे खासगी जमाखर्च पाहावयास मिळाले. तेव्हां इतरांपेक्षा आपणास असलेली अधिक माहिती प्रदर्शित करण्याकरितां त्या गैरलागू असंबद्ध ओळी घुसडल्या इतकेंच. पण त्या प्रदर्शनांत दुसरेंहि एक उपप्रदर्शन झालें आहे. कारण ज्या बाजीरावाच्या स्वहस्तें लिहून ठेवलेल्या जमाखर्चाचा हवाला सरदेसाई येथें देतात, ते सन १८०४ पासून पुढचे आहेत, आणि प्रस्तुत हकीकत चालली आहे ती १७९८ सालांतली! म्हणे नानाचा अडथळा दूर होतांच सर्व जमा-खर्च बाजीराव आपला आपणच लिहूं लागला! जणुं कांहीं नाना फडणवि-सच सर्व राज्याचे जमाखर्च हातानें लिहीत होता. बाजीरावाचे जे जमा-खर्च पेशवे-दप्तरांत प्रसिद्ध झाले आहेत, ते त्याचे व्यक्तीचे खासगी स्वरूपाचे आहेत, राज्यासंबंधींचे नाहींत.

महादजीसंबंधीं पक्षपात

यानंतर दुसरी एक मौज सांगण्यासारखी आहे. पान ३४ वर सरदेसायांनी महादजी शिंद्याच्या केशरी नामक राखेचा उल्लेख केलेला आहे. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या रियासतीच्या भागांत नानाला लाथा मारतांना आणि महादजीच्या पायावर कपाळ छिनवून घेतांना सरदेसायांनी महादजीच्या वास्तविक रक्षा असतांना त्या मुळींच नव्हत्या असें मुद्दाम ठासून लिहिलें होतें. आणि उलट नानाच्या रक्षेला इतिहासाचा यत्किं-

च्चितही आधार नसतांना त्याचें चारित्र्य मळविण्याचा उपद्‌व्याप केला होता. त्याच वेळीं केसरीच्या परीक्षणांत आम्ही सरदेसायांना आधारासकट खोटें पाडलें होतें. खरेशास्त्र्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतील अस्सल पत्रांत आलेल्या या 'राखे'चा उल्लेख मुद्दाम हातचा राखून ठेवून, त्या वेळीं सरदेसायांची नवीनच ओळख झालेल्या राघवपथ्थरगडवाळीचें नांव आम्ही सरदेसायांना सांगितलें होतें. त्याचा फायदा घेऊन रियासतकारांच्या एका निनांवी पक्षपात्यानें मुद्दाम आडरानांत शिरून मुंबईच्या एका पत्रांतूत थोडीशी टवाळीही केली होती. परंतु आता सरदेसायांनाच आपल्या हातानें महादजी शिंद्याच्या राखेचा उल्लेख करावा लागला आहे. तेव्हां अजून तरी रियासतकार आपली चूक मोकळ्या मनानें दुरुस्त करतील काय ? मात्र आम्ही अजूनही असें म्हणतों कीं, नाना फडणविसाच्या राखेसंबंधीं एकही उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांत उपलब्ध नाहीं. उपलब्ध होईल तेव्हां तो मोकळ्या मनानें मान्य करूं. सरदेसाई कुत्सितपणें लिहितात, 'महादजी शिंद्याची राख केशरी म्हणून नानाच्या ओळखीची होती.' नानाच्या ती ओळखीची असो किंवा नसो, नानासाहेबांच्या मात्र ती आतां जन्माच्या ओळखीची होईल ! शिवाय सरदेसायांनी हेंहि लक्षांत ठेवावें कीं, राघवपथ्थरगडवाली व ही केशरी या दोनच रक्षा महादजीच्या नव्हत. आणखी तिसरीही एक आहे. खरे पान ५३९९ वरील पत्रांत खालील वाक्य आहे—' महादजी शिंदे यांच्या बायका व नाटकशाळा दौलतराव शिंदे यांणी जेष्ठ शु॥ १ स किल्ले नगरास रवानगी केल्या.' त्याचप्रमाणें पान ५४०३ वरील पत्रांत खालील वाक्य आहे, 'महादजी शिंदे यांच्या रक्षेची कन्या येथील महाराजांच्या (कोल्हापूरच्या) रक्षेच्या पुत्रास द्यावयाचा निश्चय होऊन मुलास टिळा लाविला.' ही रक्षा म्हणजे केशरी नव्हे किंवा राघवपथ्थरगडवाली नव्हे, तिसरीच होय !

चिमाजीच्या लग्नाची तारीख

पान ४८ वर सरदेसाई लिहितात—'बाजीरावाचें लग्न पुण्यास १६।२।१७९७ रोजीं झालें व त्याच सुमारास अमृतरावाचा मुलगा विनायक बापू व चिमाजीचें लग्न हेहि समारंभ या वेळीं करून बाजीरावानें चारदोन महिने निभावले.' पेशवाईची अखेर या शकावलीवरून सरदेसाई चिमाजीच्या लग्नाची ता. १६-५-१७९७ अशी देतात, पण त्यांनीं दिलेली तारीख चुकली आहे. त्यासंबंधीं टीपेंत ऊहापोह करतांना ते म्हणतात कीं, पेशवाईची अखेर या शकावलींत चिमाजीच्या लग्नाच्या नोंदींत तिथि व वार बिनचूक दिला आहे म्हणून तीच बरोबर; व म्हणूनच ती ग्राह्य धरली. त्यांनीं अग्राह्य ठरविलेले आधार म्हणजे खरे लेखांक ४२३९, ४२४१ व ४२४५. वास्तविक या तत्कालीन अस्सल पत्रांत चिमाजीच्या लग्नाची हकीकत आहे, पण ती सरदेसायांना ग्राह्य वाटत नाहीं. त्यानंतर तिसराहि एक आधार त्यांनीं भारतवर्ष शकावलीचा दाखविला आहे. त्यावरून ते म्हणतात कीं, तींत चिमाजीच्या लग्नाची तारीख १८-६-१७९७ आहे. म्हणजे सरदेसायांनीं ग्राह्य मानलेल्या 'पेशवाईची अखेर' या शकावलींतील तारखेच्या समीप येणारी आहे. अर्थात् भारतवर्ष शकावलीचा आधार व पेशवाईची अखेर शकावलींतील तिथि व वार इतका तपशील. तेव्हां इतकें जमल्यावर खऱ्यांची तारीख चूक म्हणावयास हरकत कोणती ? पण आता इतिहास-संशोधक म्हणविणाऱ्या रियासतकारांच्या हें कसें लक्षांत येत नाहीं कीं, शकावलि झाली तरी ती अस्सल पत्रांशीं पडताळूनच बिनचूक किंवा चूक म्हणावयाची असते. खऱ्यांच्या समकालीन अस्सल पत्रांपेक्षां पेशवाईनंतर लिहिल्या गेलेल्या शकावलीची एवढी मातबरी त्यांना कां वाटावी ? खऱ्यांच्या तीनही पत्रांवर पैवस्तीची तारीख मुसलमानी महिना मुसलमानी साल व शिवाय मराठी महिना दिलेला आहे. त्या तीनही समकालीन

पत्रांतून चिमाजीच्या लग्नाचे उल्लेख आलेले आहेत. पत्र समकालीन आहे, जबाबदार व्यक्तीनें लिहिलेलें आहे, व त्यावर पैवस्ती तपशीलवार दिलेली आहे, असें असतां ती काय म्हणून नाकारावयाची ?

शिवाजीची नवी जन्मतिथि

दुसरी एक मौज अशी कीं, भारतवर्ष शकावलीचा आधार देतांना आपल्या १६।५।१७९७ या तारखेशीं त्यांतील तारीख जुळती दाखविण्याकरितां त्यांनीं ती १८-६-१७९७ अशी दिली आहे, परंतु जंत्रीवरून ती ८-६-१७९८ ही येते; तेव्हां ही नजरचूक झाली म्हणावें झालें ! तिथि व वार बिनचूक आहेत. अर्थात् अधिक तपशील बरोबर आहेत, म्हणून ती मला मान्य हें भाष्यहि व्यर्थ होय. तसें असेल तर शिवभारतकाराने मितीच्या बाबतींत अधिकांत अधिक तपशील देऊन ते बरोबर दिलेले आहेत. तेव्हां शिवभारताने दिलेली शिवाजीची नवीन जन्मतिथि सरदेसायांना मान्य करावी लागेल ! त्यास त्यांची तयारी आहे काय ? सरदेसायांना आडरानांत जाण्यास आणखी एक कारण आमच्या मतें संभवतें तें असें. बाजीरावाच्या लग्नाच्या वेळीं शिंदे व भोसले यांचें प्रकरण हातघाईवर येऊन पुण्यांतच लढाई सुरू होणार होती. म्हणून बाजीरावानें आपल्या लग्नाची शकल काढून कांहीं दिवस दोन्ही सरदारांना थांबवून धरलें. अगदीं थेट तीच स्थिति १७९८ सालीं आली व मागच्या प्रमाणेंच यावेळींहि तीच युक्ति बाजीरावाने अवलंबिली. शिंदे बायांच्या व दौलतरावाच्या कटकटी सुरू होऊन पुण्याजवळ लढाई होणार; म्हणून फिरून श्रीमंतांनीं दोनही पक्षांच्या लोकांस आज्ञा ऊर्फ प्रार्थना केली कीं, चिमाजीचें लग्न होईपर्यंत दोनही पक्षांनी सबुरी करावी. सारांश बाजीरावाच्या व चिमाजीच्या लग्नाच्या वेळीं युद्धाच्या कटकटी होणार होत्या. ही गोष्ट खऱ्यांच्या प्रस्तावनेवरून सरदेसायांच्या मनांत भरलेली. म्हणून १६

फेब्रुवारी १७९७ व जून १७९८ या कालान्तराने घडलेल्या हकीकती एकत्र घुसडण्याची बुद्धि सरदेसायांना झालेली असावी.

अचूक माहितीचा मासला !

पान ५६ वर रियासतकारांनीं केसोपंत कुंट्याची हकीकत दिली आहे; व लगेच तेथें तडकाफडकी त्याची छोटी वंशावळहि देऊन कुंट्यांच्या सगळ्या पिढ्यांची माहिती असल्याचा आव घातलेला आहे. या वंशावळीनंतर खाली मुद्दाम शोधपूर्वक टीप दिली आहे ती अशी—" केशव गणेश कुंटे, राहणार नागांव, यांस तुकोजी होळकरानें पुण्यास आपला बातमीदार म्हणून सन १७६८ त खासगीवाल्यांजवळ ठेविलें, व मुलगा विष्णु केशव कुंटे बी. ए. रावबहादूर देवासचा कारभारी होता." ही दिव्य माहिती देतांना रियासतकार भानावर होतेसें दिसत नाहीं. हिशेब पाहा. १७६८ सालीं या केशवराव कुंट्याला बातमीदार नेमलें, त्याअर्थी तो तेव्हां निदान वीसपंचवीस वर्षांचा असेल. त्याचा मुलगा म्हणे बी.ए. रावबहादूर कुंटे ! मुंबई युनिव्हर्सिटी समारें १८५७ सालीं निर्माण झाली असें धरलें, तर रियासतकारांचे हे विष्णुपंत कुंटे बी. ए. झाले त्या वेळीं निदान वीस वर्षांचे असतील. म्हणजे या बी. ए. कुंट्यांचा जन्म १८३७ सालीं झाला असावा असें धरावें लागतें. सरदेसायांच्या माहितीप्रमाणें त्यांचे वडील म्हणजे केशवराव गणेश हे १७४८ सालीं तरी जन्मले असें म्हणणें ओघानेंच प्राप्त. कारण १७६८ त ते बातमीदाराच्या जबाबदारीच्या जागेवर आहेत. म्हणजे त्यांच्या ८९ व्या वर्षी हे कुंटे त्यांच्या पोटीं आले असें धरावें लागतें ! हें मुळींच संभवनीय नाहीं. पण हें सर्व व्यर्थ होय. कारण मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरांत १८७३ सालीं विष्णुपंत बी. ए. झाल्याची नोंदच आहे. सारांश, मुद्दाम विशेष माहिती म्हणून आपण देतों ती कितपत बरोबर आहे याचा थोडा तरी विचार सरदेसाई मनाशीं करते तर बरें होतें.

पान ६४ वर यशवंतराव घोरपडे मुराररावाचा चुलत बंधु म्हटलें आहे; त्यासंबंधीं आम्ही नुसता संशय प्रदर्शित करून ठेवतों. तसेंच पान ३० वर महादाजीपंत दाजी याला परशुरामभाऊ पटवर्धनाचा वडील पुत्र म्हटलें आहे तें उघडच चूक आहे. अर्थात् ती क्षुल्लक नजरचूक असली, तरी दुरुस्त होणें मात्र इष्ट आहे. रामचंद्रपंत आप्पा म्हणजे भाऊंचा थोरला मुलगा, याची माहिती अन्यत्र सरदेसायांनींच दिलेली आहे.

—३—

"दक्षिणेंत वाघ उत्तरेंत होळकर" हें सरदेसायांचें सहावें प्रकरण आहे. त्यांतील वाघाच्या मजकुरापुरता येथे विचार करावयाचा आहे. खऱ्यांच्या प्रस्तावनेचा कित्ता पुढे ठेवून त्यावरून हें प्रकरण तयार झालें आहे. खरे यांच्या बाराव्या खंडांत 'वाघाच्या बंडाचा शेवट' नामक प्रकरणांत सुमारें ४० पानें या मनोवेधक वृत्तान्ताने व्यापिलीं आहेत; त्या ४० पानांचा कुरतडलेला सारांश म्हणजे सरदेसायांचें हें प्रकरण. सरदेसायांच्या पहिल्या पांच ओळी (पान १५८-५९) ही खरे पान ६५९० शेवटच्या पॅऱ्याची जवळजवळ शब्दशः नक्कल आहे. नंतर त्यापुढील ४० ओळी मजकूर खरे पान ६७३०-६७३५ यांवरील मजकुराचा शब्दशः सारांश आहे. त्यापुढील सरदेसायांचा पान १६० दुसरा पॅरा व पान १६१ वरील सुरुवातीच्या पांच-सात ओळी म्हणजे खरे–प्रस्तावना पान ६५५९-६५६० दुसऱ्या पॅऱ्याचा सारांश. यानंतर सरदेसाई (पान १६१) 'तेथून तो सावनुरास गेला' येथपासून 'अकरा महाल ताब्यांत घेतले' येथपर्यंत खऱ्यांच्या शब्दांत सारांश (खरे

* केसरी, १२ ऑगस्ट १९३२

पान ६४६०). यानंतर सरदेसाई पान १६१ "तेथून तो धोंडोपंत गोखल्यावर हुबळीपावेतों गेला" येथपासून सुमारें २४ ओळी मजकूर 'डवगी नाल्याच्या' लढाईसंबंधीं आहे तो सर्व खरे पान ६५५१–५२ या खऱ्यांच्या प्रस्तावनेचा शुद्ध सारांश आहे. पान १६२ दुसरा पॅरा खरे पान ६५६६ मधील दुसऱ्या पॅऱ्याचा सारांश आहे. पुढें पान १६३, दुसरा पॅरा खरे पान ६५८२ वरील दुसऱ्या पॅऱ्याची नक्कल आहे. तसेंच पान १६४ दुसरा पॅरा, खरे ६५८६ व ८७ पानांची नक्कल.

आयत्या पिठावरील रेघोट्या

सारांश, सरदेसायांचें हें प्रकरण म्हणजे खरेशास्त्र्यांच्या आयत्या तयार पिठावर रेघोट्याच होत. रेघोट्याच म्हणण्याचें कारण, नुसत्या रेघोट्यांतून ज्याप्रमाणें अक्षरें उमटत नाहींत व अर्थप्रतीति होत नाहीं, त्याप्रमाणें सरदेसायांनी जो हा कुरतडलेला सारांश दिला आहे त्याची स्थिति आहे. कार्यकारणभावांची व्यवस्थित सांखळी, वर्णनांचा सुसंगतपणा, ऐतिहासिक सत्याविषयी कसोशी व आत्मीयतेने तद्रूप झाल्यामुळें निर्माण झालेली वर्णनशैली इत्यादि गुणांच्यायोगाने खऱ्यांचें हें प्रकरण फार बहारीचें वठले आहे. कोणीकडे हें खऱ्यांचें अस्सल प्रकरण आणि कोणीकडे सरदेसायांनी ही केलेली त्याची नक्कल !

पण आमची तक्रार आहे ती निराळीच आहे. ती अशी कीं, रियासतकारांनी खऱ्यांच्या मजकुराचा सारांश आपला म्हणून उतरून घेतला तर ते घेवोत; पण तसें करतांना अस्सलबरहुकूम तरी घ्यावयाचा होता. त्या अवघ्या आठ पानांत इतक्या अक्षम्य चुका तरी करून ठेवावयाच्या नव्हत्या ! उदा. पान १५९ वर रियासतकार म्हणतात, "परशुरामभाऊ व हरिपंत तात्या हैदरावर चालून गेले. तेव्हां देसाई पळून श्रीरंगपट्टणास गेला; त्याची मुलेंमाणसें श्रीरंगपट्टणाच्या किल्ल्यांत होतीं.

तीं परशुरामभाऊने हस्तगत करून मिरजेस नेऊन कैदेंत ठेविलीं आणि श्रीरंगपट्टणाचा किल्ला जमीनदोस्त केला." एकापुढें एक तीनदा श्रीरंगपट्टण असा उल्लेख आला असतांना सरदेसायांच्या हातून ही चूक व्हावी हें आश्चर्य होय. वास्तविक तेथे श्रीरंगपट्टणाच्याऐवजी शिरहट्टी पाहिजे व मुळांत म्हणजे खऱ्यांच्या प्रस्तावनेंत तेंच आहे. पण उतरून घेण्याच्या आवेशांत रियासतकारांच्या हातून तो हस्तदोष घडला असावा. एरवीं श्रीरंगपट्टणाचा किल्ला परशुरामभाऊ जमीनदोस्त करणार कसा आणि एकदा तो जमीनदोस्त झाल्यानंतर पुढें चारच ओळींनंतर टिपू त्या देसायाला व धोंडजी वाघाला फिरून श्रीरंगपट्टणाच्याच किल्ल्यांत कैदेंत घालणार कसा? दुसरी चूक पाहा. पान १६१ वर ते लिहितात कीं, "वाघाने वासुदेवकाकास थापा मारून नवस फेडण्याच्या निमित्ताने चार माणसांनिशीं सावनुरांत प्रवेश करून घेतला." मूळ खऱ्यांच्या लेखांत चार नसून चारशें आहे, आणि तेंच बरोबर; कारण सावनूरचें लढाऊ ठाणें काबीज करावयाचें तें चारांनी कसें काबीज होतें? पण या चुकीचें खापर छापखान्यावर फोडण्याची सवड रियासतकारांना देऊन पुढे पाहूं.

नक्कलहि बरोबर नाही

वरील मजकुराच्याच पुढें ते लिहितात कीं, डवगी नाल्याच्या लढाईनंतर "चिंतामणराव पटवर्धन अगोदरच जाऊन इंग्रजांस मिळाला होता, तो ही बातमी कळतांच गोखल्यांचे मदतीस धावून आला." हें चूक आहे. गोखले व वाघ बरोबरच होते. पान १६१ वर "हल्ल्याळास इंग्रजी पलटणास जाऊन मिळण्यासाठी प्रथम चिंतामणराव निघाला व मागाहून धोंडोपंत गोखलेहि २८ जून शनिवारीं मध्यरात्रीं निघाला," असें सरदेसाई लिहितात. पण त्या तारखेस गोखले व पटवर्धन एकत्रच होते व २८ जून मध्यरात्रींहि ते बरोबरच निघालेले आहेत.

खुद्द चिंतामणरावाचा 'वाका' व खरे पान ६५५१ व ५२ पाहा. पान १६२ वर सरदेसाई लिहितात, 'वाघाचें शिर कापून आणून हजर करणारास हजार रुपये बक्षीस देऊं असा जाहीरनामा वसलीने प्रसिद्ध केला.' पण ज्या खऱ्यांच्यावरून वरील मजकूर लिहिला तेथे म्हणजे पान ६५६६ वर ३०,००० रुपयांचें बक्षीस असें स्पष्ट लिहिलेलें आहे; आणि तेंच खरें आहे. सबंध कर्नाटक ग्रासूं पाहणारा वाघ कीं ज्यावर खुद्द वेलेस्लीसाहेबांना मोठ्या फौजेनिशीं जातीने मोहीम करावी लागली त्या वाघाला सरदेसाई समजतात तरी काय कोणास ठाऊक! पान १६४ वर सरदेसाई लिहितात, 'वाघाच्या पाठलागांत त्याची कलावन्तीण व भाची दोघी सांपडल्या. त्यांचा वसलीने बंदोबस्त करून दिला.' खरे लिहितात, 'पाठलागांत वाघाची कलावन्तीण व भाचा अशा दोन महत्त्वाच्या असाम्या सांपडल्या; त्यांत इंग्रजांनी कलावन्तीण ठेवून घेतली आणि भाचा बापू गोखल्याच्या राखणीस घातला.' (खरे पान ६५८६).

स्वतःच नीट वाचा

पान १६१ वर सरदेसायांनी डवगी नाल्याच्या लढाईची हकीकत दिलेली आहे. धोंडजी वाघ व धोंडोपंत गोखले यांच्या ह्या लढाईत झालेल्या चकमकींची हकीकत अत्यंत मनोवेधक असून, मराठी बखरींतून, इतिहासांतून, लोकवार्तांतून व आख्यायिकांतून तो वृत्तान्त चिरंतन झालेला आहे. इतका सर्वश्रुत प्रसंग असतां सरदेसायांनी एक अक्षम्य चूक केलेली आहे, ती पाहून आश्चर्य वाटतें. सदर लढाईत मुख्य सरदार धोंडोपंत गोखले याला धोंडजी वाघाने ठार मारलें व सूड उगविला ही महत्त्वाची हकीकत असतां ते लिहितात कीं, 'त्या वेळीं थोडीच पण निकराची चकमक उडून तींत आप्पा गोखले ठार झाला आणि धोंडोपंत

व बापू जखमा लागून जीव बचावून पळून गेले!' असला विपर्यास म्हणजे पानिपतावर भाऊसाहेब जिवंत राहिले किंवा राक्षसभुवनाच्या लढाईंत विठ्ठल सुंदर निभावला, असल्या चुकांचाच नमुना होय. सरदेसाई झोकांत लिहितात, 'चिंतामणरावाच्या पत्रांत व त्याने लिहिलेल्या वाक्यांत वाघाच्या स्वारीची हकीकत संपूर्ण व सुसंगत असून, तिच्या आधारानें ही वाघाची मोहीम अभ्यासकांनीं नकाशा पुढें ठेवून ध्यानांत आणली पाहिजे.' पण दुसऱ्याला सांगण्याच्या आधीं स्वतःच नीट वाचलें असतें, तर बरें होतें.

आणखी मौजा

रियासतकारांच्या दुसऱ्या दोन मौजा अशा. त्यांनी वाघाच्या बंडाच्या हकीकतींत पान १६० वर इंग्रजांची मदत प्रथम आणणारा आप्पाजी भगवंत रानडे याची हकीकत देतांना खालील पादटीपेंत तो आप्पाजी रानडे न्यायमूर्ति म. गो. रानडे यांचा पणजा अशी माहिती दिली आहे. सामान्य वाचकांना सरदेसायांच्या सूक्ष्म अभ्यासाचें कौतुक वाटल्यास आश्चर्य नाहीं. परंतु त्यांनीं लक्षांत ठेवावें कीं, ही माहिती खऱ्यांची आहे, सरदेसायांची नाही! खऱ्यांनींच ती पान ६५५९ वर शोधपूर्वक पण सहेतुक दिलेली आहे. ती टीप अशी आहे—'हे आपाजी-पंत रानडे कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे पणजे होत. इंग्र-जांच्या विद्या व कल्पना यांचा फैलाव करण्यांत व त्याद्वारें महाराष्ट्राच्या मनोभूमीवर इंग्रजांचें साम्राज्य कायम करण्यांत ज्यांचा जन्म गेला त्यांच्याच पणजाने दक्षिणेकडून महाराष्ट्रांत प्रवेश करण्याची पाऊलवाट इंग्रजांना प्रथम काढून दिली ही वाचकांस कौतुक वाटण्याजोगी गोष्ट आहे.' तेव्हा याबाबत बहुश्रुतपणाबद्दल व बारीक दृष्टीबद्दल कौतुक करावयाचें तर तें खऱ्यांचें!

पान १६५ वर बंडाचा शेवट करतांना सरदेसाई लिहितात, वाघाचा चार वर्षांचा मुलगा सलाबतखान बसलीस सापडला. त्याची व्यवस्था त्यानें श्रीरंगपट्टणास करून दिली. हा मुलगा सन १८२२ सालीं महामारीने मरण पावला.' पण ही माहितीहि खऱ्यांच्यावरूनच उतरून घेतलेली आहे. मात्र खऱ्यांनी, तिचा वाघाशीं तादृश संबंध नसल्यामुळें ती मुद्दाम पादटीपेंत दिली आहे. त्यांची नोंद अशी—'वाघाचे बुनगे लुटले, त्यांत त्याचा चार वर्षांचा मुलगा सलाबतखान सापडला. तो इंग्रजांनी पाळला; व तो पुढे २६ वर्षांचा होऊन कॉलऱ्याने मेला अशी हकीकत इंग्रजी पुस्तकांतून सापडते.' मग सरदेसायांनीं काय केलें? तर २६ वर्षांचा हिशेब करून १८२२ हा सन दिला इतकेंच!

सारांश, असें हें सरदेसायांचें प्रकरण आहे. या मोहिमेंत समाविष्ट झालेल्या युद्धचमान पक्षांची परिस्थिति, त्यांचें बलाबल, त्यांच्या हालचालींचें पृथक्करण आणि एकंदर हकिकतींतील सुसंबद्धपणा व वर्णनांतील सत्य व सौंदर्य इत्यादि गुण खऱ्यांच्या या उत्कृष्ट प्रकरणांत प्रकर्षानें दिसतात. तें प्रकरण मुळांतून वाचणाऱ्या वाचकांची सरदेसायांच्या या प्रकरणाशीं गांठ पडल्यानंतर त्यास उद्वेग व विषाद उत्पन्न होतो. खऱ्यांचें अत्यंत समतोल विवेचन पाहून धोंडजी वाघाबद्दल जी आत्मीयता उत्पन्न होते तिचा मागमूसहि सरदेसायांच्या लिखाणांत नाहीं; उलट त्या प्रकरणाच्या शेवटीं बसलीची विनाकारण भरपूर स्तुति करून त्यांनी वाघाच्या एकंदर कर्तृत्वावर बोळा फिरवला आहे.

नकलांपेक्षां अस्सलच पहा

वाघाच्या बंडानंतर सरदेसायांनीं 'बाजीरावानें पामरास तोंडघशीं पाडलें' हें पोटप्रकरण दिलें आहे. हें सर्व प्रकरण म्हणजे खरे यांच्या बाराव्या भागांतील 'शिंद्याचें हिंदुस्थानांत प्रयाण' या भागाचा शुद्ध

सारांश आहे! असले सरदेसायांनीं लोकांचें काढलेले सारांश स्वतंत्र भासवून, कांहीएक परिश्रम न करतां, आपले म्हणून दडपून दिलेले पाहून खऱ्यांच्या पात्रतेविषयीं जितकी आदरबुद्धि दृढ होत जाते तितकी ती उलट बाजूविषयीं ढासळूं लागते. वर्गांत क्रमिक पुस्तक म्हणून नेमलेल्या इतिहासांतील मजकूर पाठ करून जशाच्या तसा किंवा आपल्या स्मरण-शक्तीच्या पात्रतेप्रमाणें कमीअधिक करून विद्यार्थी पेपर लिहितात तसलाच हा प्रकार होय. टेक्स्टबुकांतील मजकूर पेपरांत बरोबर उतरून देणारा विद्यार्थी पहिला म्हणून गाजावयाचाच! अलीकडे शाळाखात्यांतून लावलेले मराठी इतिहास हे सरदेसायांच्या रियासतीचे सारांश असतात असा प्रवाद आहे. तो खराहि असेल. कारण शालोपयोगी इतिहास लिहिणाऱ्या सामान्य शिक्षकांचा इतिहासाचा अभ्यास तो कितीसा असणार? आर्थिक मदतीचें एक साधन म्हणून इतिहासकार बनलेल्यांनी स्टँडर्ड म्हणून बोलबाला होत असलेल्या सरदेसायांच्या रियासतीचा अपहार केला तर आश्चर्य नाहीं; परंतु स्वतंत्र म्हणून गाजणाऱ्या रियासतकारांनीं आपल्या रियासती खऱ्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतील प्रस्तावनांवरून सजविल्या आहेत, हें कितीजणांनी पाहिलें आहे? शालोपयोगी इतिहास लिहिणाऱ्या शिक्षकांना आम्ही खात्रीपूर्वक सांगतों कीं, जर सारांशच द्यावयाचा तर तो खऱ्याच्या प्रस्तावनांचा दिलेला बरा; कारण नकलेपक्षां अस्सलाचा आधार घेतलेला केव्हांहि चांगला.

—४—

शिंदे–बायांची चढाई व पटवर्धनांचा नाश हें सरदेसायांचें तिसरें प्रकरण होय. या प्रकरणांत सहा पोटविषय आहेत–(१) सर्जे-

* केसरी, १६ ऑगस्ट १९३२

राव घाटगे (२) महादजीच्या बायकांचें दौलतरावाशीं युद्ध (३) छत्रपतीची चढाई (४) करवीरकरांशीं नानांचा करार व परशुरामभाऊंची कुचंबणा (५) पट्टणकुडीची लढाई (६) परशुरामभाऊंचा पुरा सूड. हें सर्व प्रकरण म्हणजे पूर्वीप्रमाणेंच एकट्या एक खऱ्यांच्या आयत्या तयार प्रस्तावना पुढें ठेवून त्यांचा काढलेला सारांश आहे. खरे यांच्या १० व्या व ११ व्या भागांत सातारकर महाराजांचा दंगा, परशुरामभाऊंची शेवटची स्वारी पूर्वार्ध व उत्तरार्ध, करवीर राज्यावर स्वारी पूर्वार्ध व उत्तरार्ध हीं प्रकरणें आहेत. त्यांची नक्कल म्हणजे सरदेसायांचें हें प्रकरण होय. खऱ्यांच्या-खेरीज घेतलेले आधार म्हणजे 'पेशवाई-अखेर' या शकावलींतील दोन-तीन ओळी मजकूर, जिवबादादा बक्षींच्या चरित्रांतील चारपांच ओळी व काव्येतिहास–संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या नारो हरि करंदीकराच्या हकी-कतीचा उतारा. तो उतारा सबंध तीन पाने मोठा आहे. पण तो सांगून-सवरून घेतलेला आहे. म्हणजे हीं तीनचार पानें सोडलीं, तर या २९ पानांच्या प्रकरणांतील सुमारें २५ पानें खऱ्यांच्या प्रस्तावनांवरून उतरलेलीं आहेत. नुकतेंच विविधज्ञानविस्ताराच्या एका अंकांत एका 'निरीक्षकाने' या रियासतीच्या खंडाचें आपल्या नांवाला शोभेल असें निरीक्षणच केलें आहे. त्यांत तो एका ठिकाणीं म्हणतो, "महाराष्ट्राच्या या गिबनचीं वर्णनें बहुधा जुन्या पत्रानेंच केलेलीं असतात. त्यांत त्याच्या पदरचा एकहि शब्द नसतो. या गिबनचा हा अलिप्तपणा पाण्यांतील पद्मपत्राप्रमाणेंच आश्चर्यकारक आहे." निरीक्षकाचा हा दृष्टान्त आम्हांला तंतोतंत पटतो! पद्मपत्राप्रमाणें पाण्यांत राहून अलिप्त राहणें काय किंवा समुद्रांत राहून कोरडें राहणें काय सारखेंच. उदा० हेंच प्रकरण घेतलें तर तें लिहिलें सरदेसायांनी असें म्हणावयाचें. पण आंतला मजकूर मात्र सर्व खऱ्यांचा सारांश आहे हें लक्षांत घेतलें, म्हणजे पद्मपत्राचा अलिप्तपणा मनावर फारच ठसतो! कसा तो पाहा—

सरदेसाई पान ६७ पहिला पॅरा, खरे पान ६८७७ पहिल्या पॅरॅची थेट नक्कल; पान ६८ पहिला पॅरा सबंध आठ ओळी, खऱ्यांचें अवतरण; पान ६८ शेवटचा पॅरा खालून तीन ओळी व पान ६९ पहिला पॅरा सबंध खरे पान ६८७८ ची नक्कल; पण तें खऱ्यांचें म्हणून सांगून-सवरून घेतलें आहे. पान ९४ वरील शेवटचा पॅरा व ९५ वरील तोच मजकूर पुढें चालू खरे पान ६८७९ ची शब्दशः नक्कल; पान ७० दुसरा पॅरा पहिल्या ७ ओळी खरे ५३२२ पानाचा सारांश; मात्र तेथें खऱ्यांनी ज्येष्ठ शुद्ध १ लिहिलें आहे, सरदेसाई वैशाख वद्य ३० म्हणतात; पान ७१ पहिल्या ८ ओळी खरे ५४२१ चा शब्दशः सारांश; पान ७५ शेवटल्या तीन ओळी व पान ७६ वरील पहिल्या तीन ओळी, खरे ५८५१ तिसऱ्या पॅरॅतील सारांश; पान ७६ शेवटच्या पॅरॅतील खालून ६ ओळी खरे पान ५८५२ शेवटच्या पॅरॅची नक्कल, पान ७७ पहिला पॅरा, खरे ५८५४ ची थेट नक्कल, पान ७८ वरील १२ ओळींपासून पॅरा संपेपर्यंत खरे ६१२६ चा सारांश; पान ७७ शेवट पॅरा ७ ओळी व पान ७८ पहिला पॅरा १२ ओळी, खरे पान ६११९ पहिला पॅरा व दुसरा पॅरा यांचा जवळ जवळ शब्दशः सारांश; पान ८६ पहिला पॅरा खरे पान ५८६५ चा व तसाच दुसऱ्या पॅरॅचा सारांश. पान ९० मधला पॅरा खरे पान ५८४७, ४८, ४९, ५० पाहा. पान ९३ शेवटचा पॅरा, खरे ६२५३ तिसऱ्या पॅरॅचा सारांश शब्दशः; पान ९४, खरे ६२७८ ते ६२८४ यांचा सारांश; पान ७९ ओळी ८ ते १७, खरे ५४०६ पाहा. पान ७९ पहिला पॅरा खालून पांच ओळी, खरे ५४०७ पहिल्या पॅरॅतिल अखेरच्या चार ओळींची व त्यानंतर दुसऱ्या पॅरॅतील पहिल्या दोन ओळींची शब्दशः नक्कल; पान ८० दुसरा पॅरा पहिल्या ११ ओळी खरे ५४०७ व ५४०८ ची जवळ जवळ नक्कल, पान ८१ पहिल्या पॅरॅतील खालून ७ ओळी खरे ५४११ दुसऱ्या पॅरॅचा

सारांश; पान ८१ दुसरा पॅरा पहिल्या ११ ओळी खरे ५४१० दुसऱ्या पॅरॅची नक्कल; पान ८१ दुसरा पॅरा ओळी १२ ते १४ खरे ५४१२ दुसऱ्या पॅरॅचा सारांश; पान ८१ दुसरा पॅरा ओळी १५ ते २०, खरे ५४१३ दुसऱ्या पॅरॅचा सारांश; पान ७९ शेवटच्या दोन ओळी व पान ८० पहिला पॅरा, खरे ५४१४ ते ५४१८ पानांचा सारांश; पान ८२ पहिला पॅरा खरे ५४३३ व ५४३४ चा सारांश; पान ८३ ओळी १४ पासून पुढें २३ पर्यंत खरे ५५७८ चा सारांश.

यानंतर मुद्दाम थोडेसें लिहावयाचें तें गैरलागू माहिती घुसडण्याबाबत. त्या बाबतींत रियासतकारांचा हातखंडा आहे. विषयाला गैरलागू असलेली माहिती किंवा हकीकत ते गाळीत नाहींत किंवा गाळावयाची नसली तरी पादटीपांत द्यावी ती देत नाहींत. मजकुरांत मध्येंच कोठेंतरी बसवून देतात. त्यांच्या या पद्धतीमुळें एखादा मनुष्य सरळ बोलत असता मध्येंच कांहीं बिचूक बोलला तर ऐकणाराची जी भावना होते, तशीच भावना हे असले विलग अप्रस्तुत उल्लेख येण्यानें होते. अशीं उदाहरणें या एका खंडांतूनच किती तरी काढून दाखवितां येतील. तूर्त या प्रकरणांतील एकदोन उदाहरणांचा उल्लेख करूं. पान ९० वरील शेवटच्या पॅरेंत भाऊंच्या मृत्यूनंतर लगेच त्यांच्या चहाकॉफीचा उल्लेख आलेला आहे. वास्तविक तो तेथें किती हास्यास्पद व असंबद्ध दिसतो हें तो सबंध पॅरा वाचून पाहिल्याशिवाय लक्षांत येणार नाहीं. खरें पाहिलें तर ही असंबद्ध माहिती येथें येण्याचें कारण काय ? तर खऱ्यांनी त्या प्रकरणात एके ठिकाणीं ती दिली आहे म्हणून! पण खऱ्यांनी तरी ती कां दिली तर ते जीं पत्रें प्रस्तावनांच्या पुढें छापीत त्यांतली कोणतीही मनोरंजक किंवा उपयुक्त माहिती सुटूं नये असा त्यांचा कटाक्ष असे म्हणून. मात्र खऱ्यांनी ती कशी औचित्यभंग न होतां दिली आहे हें पान ५८५१ वरून दिसून येईल.

परशुरामभाऊंच्या चहाकॉफीच्या माहितीनंतर लगेच सरदेसाई लिहितात, " त्यांची मुलगी बयाबाई बहुतेक माहेरींच असे. ती बरेच दिवस जिवंत होती. सन १८०३ मध्यें ती जिवंत असल्याचा उल्लेख आहे." ही माहितीहि प्रस्तुत असलेल्या मजकुरांत फारच विसंगतपणें आलेली दिसते. परशुरामभाऊला बयाबाई नांवाची एक मुलगी होती, तिला बालपणींच वैधव्य आलें, पुढें रामशास्त्र्याकडे शास्त्रार्थ विचारून भाऊंनी तत्कालीन लोकसमजुतीविरुद्ध तिच्या पुनर्विवाहाला संमति मिळविली होती अशी आख्यायिका आहे. ती आख्यायिका लोकहितवादींनी आपल्या ऐतिहासिक गोष्टींत दिली आहे. कै. रानडे यांनीं पुनर्विवाहाचें एका ठिकाणीं मंडन करतांना त्या आख्यायिकेचा आधार घेतला आहे. पण खरेशास्त्र्यांनी एका ठिकाणीं मुद्दाम टीप देऊन त्या विधानाची असत्यता सिद्ध केलेली आहे व कोठच्या सालापर्यंत बयाबाई जिवंत आहे हें दर्शविलें आहे, इतकी माहिती जेव्हां एखाद्या वाचकाला आगाऊ असेल, तेव्हां कदाचित् त्याला सरदेसायांच्या या नोंदीचें स्वारस्य कळलें तर कळेल!

परशुरामभाऊंच्या मृत्यूनंतर करवीरच्या झालेल्या मोहिमेसंबंधीं लिहितांना ते म्हणतात, " आणि खुद्द रामचंद्र आप्पास पकडून कैद करावें असा हुकूम पलटणास आला, त्याबरोबर तो एकदम जमखिंडीस जाऊन राहिला. आणि तेथेंच तो सन १८१४ च्या जानेवारींत मरण पावला. रामचंद्र आप्पा निघून जातांच इतर सर्व मंडळी करवीरचा वेढा उठवून चालती झाली. ता. २० एप्रिल रोजीं खुद्द डॉस पलटण घेऊन करवीराहून परत फिरला इत्यादि." वरील अवतरणांत १८०० सालाची हकीकत चालली असतांना १८१४ सालांतली हकीकत कशाला? पुढें कोठें रामचंद्र आप्पाची हकीकत देतां येणार नाहीं. पण त्याच्या मृत्यूची तारीख तर आपणाला ठाऊक आहे. तेव्हां ती नोंदली असली म्हणजे बरी, इतकीच दृष्टि त्यांत दिसते. महत्त्वाची, गैरमहत्त्वाची, प्रस्तुत

अप्रस्तुत अशा माहितीच्या ओळी रियासतकारांनी एकत्र गांठलेल्या पाहिल्या म्हणजे खरोखर विनोदानें उपमा सुचते ती नंदीबैलवाल्याची. तो मिळेल तो कपडा, चोळी, पटकूर, चिंधी, सदरा, काय मिळेल तें घेतो आणि तें घेऊन आपल्या नंदीवरील कपड्यांना गांठी देऊन बांधून टाकतो. तसलाच सर्वसंग्रह सरदेसाई करतात ! दिसावयाला वरीलसारखे आक्षेप क्षुद्र दिसतात. परंतु असल्या क्षुद्र आक्षेपार्ह गोष्टींचीहि गर्दी या रियासतीच्या भागांत कमालीची झाली आहे व तो लेखनाचा एक मोठा दोष आहे असा एक आमचा मुद्दा आहे. म्हणून तूर्त त्याचा येथें उल्लेख केला. असले गैरलागू उल्लेख किती आहेत हें मोजणी करावयाचें म्हटल्यास एक स्वतंत्र लेखांक लागेल.

पान ८९ वर परशुरामभाऊंच्या वधासंबंधीं लिहितांना कोल्हापूरकर महाराजांनीं भाऊंना ते आसन्नमृत्यु असतां मारविलें नाहीं, असें मत प्रदर्शित केलें आहे. ते म्हणतात, " भाऊला महाराजांसमोर आणलें त्या वेळेस त्यास जीव नव्हता, शवच महाराजांपुढें आणलें; आणि महाराजांनीं तें घोड्यावरून ढकलून देऊन त्याचा शिरच्छेद करविला. जिवंत हस्तगत झाल्यावर मुद्दाम प्राण घेतला नाहीं. " आपण हें भाष्य करतों तें किती खोटें आहे याची मनांत जाणीव असल्यानेंच कीं काय सरदेसाई पुढें पान ९१ वर लिहितात कीं, " परशुरामभाऊंना लढाईत मृत्यु आला कीं हस्तगत झाल्यावर मुद्दाम छत्रपतींनीं मारविलें यापैकीं कोणताहि भाग खरा असला तरी " इ०

आतां वरील चुकीचें विधान केलें आहे त्यासंबंधीं विचार करूं. याच मुद्द्यासंबंधीं पूर्वीं प्रो. लठ्ठे व खरेशास्त्री यांच्यांत जाहीर वाद झाला होता. लठ्ठे यांचें म्हणणें अर्थातच परशुरामभाऊंस छत्रपतींनी लढाईत पाडाव होऊन सापडल्यानंतर घोड्यावरून ढकलून शिलेदारांकडून ठार

मारविलें नाहीं. परंतु त्यावर खऱ्यांनीं अस्सल पत्राधारें ती गोष्ट सप्रमाण खोडून काढली होती. त्यांच्या ११ व्या भागामध्यें त्यासंबंधीं अनेक पत्रें नमूद असून, त्यावरून महाराजांनीं निंद्यपणें वधच करविला असें सिद्ध होतें. त्या पत्रांचा निष्कर्ष खरेशास्त्री प्रस्तावनेंत लिहितात तो असा-" परशुरामभाऊंस जखमा लागल्यामुळें घोड्यावरून पडतांच विश्वासरावाच्या स्वारांनीं त्यास घोड्यावर उचलून घेऊन आपल्या महाराजांपुढें नेलें. तेव्हां ते आसन्नमृत्यु होते. त्यांस पाहतांच महाराजांनीं त्वेषानें मारा म्हणून सांगितलें. त्या क्षणीं विश्वासरावानें भाऊंस घोड्यावरून ढकलून दिलें, आणि महाराजांबरोबर शिलेदार मंडळी होती त्यांनीं तरवारीचे वार करून भाऊंचें शरीर छिन्नविच्छिन्न केलें. जखमांनीं घायाळ झाल्यामुळें ते आपोआपच मृत्युपंथास लागले असतां महाराजांनीं त्यांना मारून विनाकारण दुष्कीर्ति संपादन केली!" रामचंद्र आप्पानें पुढें लगेच कोल्हापुरावर मोहीम केली, त्या वेळीं एका चकमकींत विश्वासराव गायकवाड पाडाव होऊन सापडला. तेव्हा इशीम येऊन रामचंद्र आप्पानें विश्वासरावास ठार मारविलें. याचें कारण हा विश्वासराव भाऊंना मारणारांपैकीं एक होता म्हणूनच होय. 'छत्रपति म्हणवितात, कर्में अंत्यजाचीं करतात,' हे तत्कालीन पत्रांतले उद्गार पाहतां भाऊंचा निंद्यपणें वधच केला गेला होता हें सिद्ध होतें. सरदेसायांना त्यावर पांघरूण घालावयाचें आहे. म्हणून पुढें विश्वासराव गायकवाडाच्या वधाची हकीकत देतांना ते मोघम म्हणतात—" महाराजांच्या मर्जीतला एक सरदार विश्वासराव गायकवाड जिवंत हस्तगत झाला असता त्यास रामचंद्र आप्पानें ठार मारविलें." म्हणजे रामचंद्र आप्पाला उगाच शिव्या मिळणार आणि विश्वासराव गायकवाडानें भाऊला जीव असतां ठार मारलें ही गोष्ट मात्र अप्रकट राहणार. असा हा पक्षपात दिसतो. पट्टणकुडीची लढाई झाल्याबरोबर खुद्द कोल्हापूरकर छत्रपति महाराजांच्या पदरच्या शाहिरांनी दोन पोवाडे रचले. त्यांतहि परशुरामभाऊंस ठार

मारविलें असेंच म्हटलें आहे.एकांत असें म्हटलें आहे,"राजापाशीं घेऊन आले डेऱ्यासुमार । धनी महाराज बोलला 'नको दृष्टीला, जीवे मारा नेऊन दूर।' दौलतरावें विश्वासरावें तोडून केलें चूर." नाना फडणविसाचा एक पोवाडा समकालीन म्हणून उद्धृत करून त्याला अव्वल प्रमाण मानून शिरोधार्य मानणाऱ्या सरदेसायांनी मग याच पोवाड्याकडे दुर्लक्ष कां करावें समजत नाहीं !

ते लिहितात, "खुद्द लढाईत असलेल्या गृहस्थांनी लिहिलेल्या वरील हकिकतीपुढें इतर लेखांची मातबरी बिलकुल नाहीं." पण तो सर्वच प्रकार कसा आपमतलबीपणाचा आहे तें पाहा. ज्या गृहस्थाचा वर सरदेसाई हवाला देतात तो गृहस्थ म्हणजे नारो हरि करंदीकर; तो भाऊंतर्फे छत्रपतीच्या लष्करांत बातमीदाराच्या कामावर होता व तो लढाईतही हजर होता अशी हकीकत सांगितली, म्हणजे त्याच्या पुराव्या-वर डोळे मिटून विश्वास ठेवावा अशी साहजिकच प्रवृत्ति होते. परंतु प्रश्न इतकाच आहे कीं, भाऊंच्या मृत्युप्रसंगीं जवळ असलेल्यानें लढाईच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं रामचंद्र आप्पाला लिहिलेली हकीकत ग्राह्य धरा-वयाची का पुढें वीस वर्षांनी त्याच गृहस्थानें स्मरणानें लिहून दिलेली हकीकत ग्राह्य मानावयाची ? ज्या नारो हरि करंदीकराच्या काव्येतिहास-संग्रहांतील 'पत्राला' सरदेसाई प्रमाण मानतात तेंच सरदेसायांनी स्वतः नीट वाचलें असतें तर बरें होतें. त्याच्या शेवटीं रामचंद्रपंत आप्पाला 'कैलासवासी' म्हटलें आहे. आणि रियासतकारांनीच पान ९४ वर त्याच्या मृत्यूचें साल जानेवारी १८१४ असें दिलें आहे. यावरून एक गोष्ट तर स्पष्ट आहे कीं, सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणें तें 'पत्र' लढाईच्या दिवशींचें नसून पुढें अठरावीस वर्षांनी लिहिलेलें आहे. शिवाय दुसरें असें कीं, सरदेसाई त्याला 'पत्र' म्हणतात. पण वास्तविक ती बखरवजा हकीकत आहे. कारण त्या लेखाचे सुरुवातीस मांडवगणाहून भाऊसाहेबांची

सुटका झाल्यापासूनची हकीकत सांगण्यास सुरुवात केली आहे. तो लेख वाचणाराच्या सहज लक्षांत येईल कीं, सन १८१८ नंतर कांहीं वर्षांनी सरदेसायांच्यासारख्या कोणा तरी इतिहासकाराला नारो हरि करंदीकराने ती हकीकत लिहून दिली. सारांश, सरदेसायांनी दोन गोष्टी केल्या. सदर लेखाला तें समकालीन पत्र नसतां त्याच्यावरचा भाग छाटून तें समकालीन पत्र आहे असें भासविलें. आणि दुसरें त्याची तारीखहि चुकीची दिली. नारो हरि करंदीकर लढाईच्या दुसऱ्या दिवशीं आप्पास लिहितो, "महाराजांचे समक्ष आलेवर, घोड्यावरून ढकलून दिलेवर, मारा म्हणून मुख्यांनी सांगितलें. मग दहापांच असामींनीं वार टाकले. तोंडावर तों बाकी तिळमात्र जागा राहिली नव्हती." भाऊसाहेबांच्या निंद्य वधाचा आरोप सरदेसायांनी असा पुसून टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे; शिवाय परशुरामभाऊंवर कोल्हापूरकरांनी लढाईचे पूर्वी कांहीं दिवस मारेकरी घातले होते, ही दुसरी गोष्ट समकालीन पत्रांत असतां त्याचा मात्र उल्लेख करण्याची सरदेसायांना बुद्धि झाली नाहीं. तेव्हां हा निःपक्षपातीपणा केवढा म्हणावा ?

आतां दुसरा पक्षपात पाहा. साताऱ्यास परशुरामभाऊंनी वेढा दिला व पुढें सातारा काबीज केला वगैरे हकीकत प्रसिद्ध आहे. या बाबतींत अनेक कंड्या छत्रपतींच्या बाजूने उठविण्यांत आल्या त्यांपैकींच छत्रपतींच्या सिंहासनाची अमर्यादा परशुरामभाऊंनी, केली ही एक होय. भारतवर्ष जुन्या ऐतिहासिक गोष्टी या प्रकरणांतील २५ व्या गोष्टींत हीच कंडी खुलवून सांगितली आहे ती उतरून घेण्यासारखी आहे. "परशुराम भाऊनें जसें शत्रूचें एखादें शहर लुटतात त्याप्रमाणें तें शाहूनगर लुटून मोठा अनर्थ केला. राजाची अत्यंत अप्रतिष्ठा केली. आणि राजाचे चौरीबारदार जवळ होते त्यांस म्हणाला कीं, मी राजाच्या तख्तावर बसतों. मजवर चौरीमोर्चेल वारा. तें भाषण ऐकून एका चौरी

धरणारास अत्यंत कोप येऊन तो त्यास म्हणाला, चौरी मोर्चेल तर नाहीं परंतु तुझ्यावर कुंचे (केरसुण्या) वारूं. तो असें बोलतांच परशुरामपंत तरवार उपसून धांवला, परंतु त्या दोघांच्यामध्यें राजाचा उपाध्याय येऊन हात जोडून बोलला कीं, 'परशुरामपंत ! तुमच्या अधमपणाची कमाल झाली आहे. आतां आवरतें घ्या !' हे त्या ब्राह्मणाचे नम्रतापूर्वक तिरस्काराचे शब्द ऐकतांच भाऊची वृत्ति थोडी निवळली व तो तेथून निघून गेला. तरी त्यानें जातांना राजाच्या सिंहासनास लाथ मारिली. ही गोष्ट चतुरसिंग कोल्हापुराकडे गेला होता, त्यास समजली, तेव्हां त्यास अत्यंत राग येऊन त्यानें परशुरामभाऊंचें तासगांव लुटून त्याचा नवा बांधलेला वाडा जाळून टाकिला, आणि कोल्हापुरास निघून गेला."

असल्या आचरट, खोटया, नाटकी आख्यायिकाही सरदेसाई अव्वल पुराव्याच्या मानतात ! कारण पान ८२ वर ते लिहितात, 'चतुरसिंग व भवानजी शिर्के पळून कोल्हापुराकडे जाऊं लागले. त्यांचा पाठलाग हरि परशुरामाने करून वसंतगडाखालीं त्याचे पुष्कळ लोक पाडाव केले तरी ते दोघे जीव बचावून कोल्हापुरास पळून गेले. परशुरामभाऊने शाहूनगर लुटलें. तख्ताची वग़ैरे बहुत अमर्यादा केली. " पण हा तख्ताच्या अमर्यादेचा आरोप किती धाधांत खोटा आहे हें खुद्द वेढयाच्या वेळीं लिहिलेल्या भाऊंच्या अस्सल पत्रावरूनच दिसून येतें. ते लिहितात, "पदाची जागा. निकड करतां येत नाहीं. कांही महाराजांची मर्जी, कांहीं सरकारकाम, असें पाहून कारभार विल्हेस लाविला पाहिजे. या बेतानें चालिलें आहे. यामुळें जे दिवस लागतील ते लागोत" (खरे पान ५४३५.) अस्सल पत्र खुद्द त्या जबाबदार व्यक्तीचें हजर असतां तें अमान्य करून आपमतलबीपणानें उठविलेल्या कंड्यांना अव्वल प्रमाण सरदेसाई मानतात; तेव्हां इतिहासकाराची जबाबदारी ते ओळखत नाहींत असें म्हणण्यापेक्षां त्यांचा त्यांत कांहीं तरी

गूढ हेतु असेल असें म्हणणें जास्त शोभेल. धडधडीत सत्यावर असत्याचें रंगरोगण फासल्यामुळें कोल्हापूरकर व सातारकर खूष होतील; पण सत्यान्वेषी इतिहासवाचक रुष्टच झाल्याखेरीज राहणार नाहींत.

—५—

पेशवे घराण्याची अखेरची अहवाल' या प्रकरणांत बाजीरावाची सर्व कौटुंबिक माहिती, ब्रह्मावर्त येथील त्याचें उर्वरित आयुष्य, अमृतराव व चिमाजी आप्पा यांच्या उत्तरआयुष्याची व वंशांची हकीकत व मुख्यतः बाजीरावाचें स्वभाववर्णन व त्यासंबंधीच्या उताऱ्यांवरून सरदेसायांनी केलेलें त्याच्या कारकीर्दीचें महत्त्वमापन या गोष्टी येतात. शेवटची गोष्ट सोडली तर या प्रकरणांत कांहीं एकाच गोष्टीसंबंधाने विस्तृत सुसंगत हकीकत सांगावयाची नाहीं, तर ठिकठिकाणचे तपशील एकत्र करून ते नुसते एकत्र नोंदावयाचे आहेत. व तें काम रियासतकारांनी बरें केलें आहे. हें प्रकरणांतील विषयासंबंधीं झालें. यद्यपि या प्रकरणांत सुसंगत हकीकत सांगावयाची फारशी नसली तरी जी ढोबळ हकीगत सांगावयाची तिचीही मांडणी विल्हेवार झालेली नाहीं एवढी गोष्ट मात्र खरी.

सुरुवातीस बाजीरावाच्या लग्नाच्या बायकांची याद दिली आहे. नंतर ब्रह्मवर्तास दत्तक घेतलेल्या मुलांची हकीगत दिली आहे. त्यानंतर बाजीरावाच्या ब्रह्मावर्त येथील चरित्राची हकीकत आहे. नंतर त्यालाच जोडून बाजीरावाची मुलगी बयाबाईसाहेब यांच्या तोंडून राजवाड्यांनी वदविलेली हकीकत नानासाहेबांच्या मृत्यूअखेर उतरून घेतली आहे. नंतर बाजीरावासंबंधीचे जेवढे म्हणून स्वभावदर्शक उतारे मिळतील तेवढे

* केसरी, २ सप्टेंबर १९३२

एकत्र केले आहेत. परंतु बाजीरावाच्या या स्वभाववर्णनांतच अवांतर मजकूरही दिला आहे. बाजीरावाचें स्वभाववर्णन चाललें असतांना पान ५४८ वरील चार्लस मॅलेट इंग्लंडला गेला वगैरे हकीगतीचा पॅरा उगाचच घुसडला आहे. त्याप्रमाणें पान ५५७ वर काशीबाई पेठीच्या हकीगती-संबंधी एक उतारा घेतला आहे. त्याचा तेथें वास्तविक कांहीं संबंध नाहीं. तो पान ५४१ वर जेथें ताईपेठीसंबंधी हकीकत सांगितली आहे तेथें द्यावयास पाहिजे होता. बाजीरावाचें स्वभाववर्णन करतांना नारायण रामचंद्र व हरि उद्धव यांस बाजीरावानें आपले वकील म्हणून कलकत्त्यास पाठविलें होते ही हकीगत कशाला ? पान ५६० वर व्यंकट नरसीला २६००० रुपये दिल्याची जी हकीकत आली आहे ती त्या प्रकरणांत पान ५५० वर येऊन गेलेलीच आहे. सगळ्यांत विशेष मौजेची गोष्ट म्हणजे बाजीरावाच्या कौटुंबिक माहितींतच मोरोबादादा फडणविसाची जी लांबलचक हकीकत दिली आहे ती कशाला ? ती माहिती अन्यत्र मोरोबासंबंधाची हकीकत दिली आहे तेथेंच द्यावयास पाहिजे होती. असो.

आतां या प्रकरणांत आढळलेल्या शंका किंवा चुका नमूद करूं. प्रकरणाच्या सुरुवातीसच धोंडोपंत मंडालिकांच्य मुलीचें म्हणजे बाजी-रावाच्या दुसऱ्या बायकोचें नांव देतांना सत्यभामा कीं सरस्वती असा संशय रिसायतकारांनीं प्रकट केला आहे; परंतु असा संशय घेण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. रावसाहेब मंडलीक यांच्या चरित्रांत खुद्द त्यांच्या घराण्यांत लिहून ठेवलेल्या विश्वसनीय टिपणांत ही हकीगत सरदेसायांना मिळाली असती. शिवाय तिचें माहेरचें नांव दुर्गा असें होतें वगैरे आणी-कहि तपशील मिळाला असता. त्या हकिकतीवरून बाजीरावाच्या दुसऱ्या बायकोचें सासरचें नांव सत्यभामा नसून सरस्वतीच होतें, असें निश्चितपणें म्हणतां येतें. पहा मंडलीक चरित्र प्रकरण दुसरें पान ९.

पान ५६२ वर मोरोबादादाच्या मृत्यूची माहिती देतांना सरदे-

साई लिहितात, " सप्टेंबर १८०३ मध्यें मोरोबादादा मृत्यु पावला. स्त्री चिमाबाई. त्याचा मुलगा नाना यानें पुढें इंग्रजी अंमलांत बंड केलें." मोरोबाच्या मुलानें इंग्रजी अंमलांत बंड केलें ही माहिती अपूर्व आहे. पण तशीच ती सर्वस्वीं चूक आहे!! कारण खरे पान ७८७७ वर पत्र नंबर ६७०८ मध्यें असा स्पष्ट उल्लेख आहे. 'मोरोबादादा यांचे पुत्र लोहोगडीं होते. बहुत प्रकृत क्षीण झाली होती. दादांचें वर्तमान तेथें आलें. पण त्यास कळूं न दिल्हें. समजो न दिल्हे. दादांचे आठवे दिवशीं नानास देवाज्ञा झाली, म्हणून सरकारांत लिहिलें आले.' त्याच्या आधीं पान ७८७० वर मोरोबादादाच्या मृत्यूची व त्याच्या मुलाच्या बिघडलेल्या प्रकृतीची नोंद आहे. त्याचप्रमाणें खरे ७८८० पत्र नं. ६७११ मध्ये खालील वाक्य आहे. " मोरोबादादा फडणीस याची स्त्री व सून व नातू लोहोगडीं आहेत. त्यास पुण्यास आणून खर्चाचा बंदोबस्त करून देऊन स्वस्थ वाड्यांत असावें, याप्रमाणें दादाकडील हरीपंत केतकर यास बोलावून सदरहू प्रमाणें आज्ञा झाली आहे." या पत्रांत मोरोबा दादाच्या मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या घरांतील लावून दिलेल्या व्यवस्थेसंबंधीं हकीकत आहे.

सारांश, समकालीन अस्सल पत्रांनींच मोरोबादादाच्या मुलाचा मृत्यु स्पष्टपणें दिलेला आहे. पण याहिपेक्षा तारीखवार नोंद पंतप्रधान यांची दुसरी शकावली यांत आलेली आहे ती अशी—पान ९६ "आर्बा मयातैन व अलफ भाद्रपद शु॥ ११ मोरोबादादा फडनीस अमृतराव यांजबरोबर होते ते मुक्काम बोढे येथें मूठ लागून मेले व त्यांचे चिरंजीव लोहोगड आंबेगांव येथें रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ नारायण नाना भाद्रपद वा॥ ६ स मेले. त्याचे पुत्र बाबूराव वहिनीबाईचे" असें असतां सरदेसाई म्हणतात कीं, त्याचा मुलगा नाना याने पुढें इंग्रजी अमलांत बंड केलें! सरदेसायांनी आपल्या विधानाला आधार म्हणून कांहीं खाली

टीपेंत दिले आहेत. ते पाहतां त्यांत कोठेंहि मोरोबादादाच्या मुलाच्या बंडासंबंधीं उल्लेख नाहीं. ही माहिती सरदेसायांनी ऐकीव आख्यायिकेवर अथवा गुप्त अप्रसिद्ध आधारावर लिहिली असण्याचा संभव आहे. अशा आधारावर विधान करणें इतिहासकारास प्रशस्त नाहीं हें तर झालेंच; पण ही माहिती सर्वस्वीं चूक आहे. वाटल्यास सरदेसायांनी प्रसिद्ध वा गुप्त आधारानिशीं आपलें विधान सिद्ध करावें असा त्यांस आमचा आग्रह आहे ! सांगण्यासारखी दुसरी मौज म्हणजे सरदेसाई मोरोबाची सुटका झाली व तो २३ जानेवारी १८०० रोजीं पुण्यास आला असें लिहितात. खरे प. नं. ५६०६ चे अस्सल पत्रांत स्वतः मोरोबादादास भेटावयास गेलेला रामचंद्र श्रीधर काळे लिहितो, "रा. मोरोबादादा फडणीस जुन्नराहून आषाढ शु. १ स म्हणजे २३-६-१८०० रोजीं पुण्यास आले." तेव्हां २३-१-१८०० ही तारीख सरदेसायांनी कोठली काढली ?

पान ५६१ वर 'श्रीमंत व शिंदे–होळकर गारपीरावर जाऊन भेटले' येथपासून 'माझे कांहीं म्हणणें नाहीं' येथपर्यंतचा मजकूर एकाच अवतरणांत दिला आहे. जणुंकांहीं तो एकाच पत्रांतला मजकूर आहे. परंतु त्यातला मजकूर कांहीं अस्सल पत्रांतला व कांहीं खऱ्यांच्या प्रस्तावनेंतला असा एकत्र करून एका अवतरणांत दडपून दिला आहे. सरदेसायांची ही पद्धति सुप्रसिद्धच आहे. अस्सल पत्रांतला मजकूर व आधुनिक लेखकाचा मजकूर एकत्र करून एका अवतरणांत घालून वाचकांची दिशाभूल करणें बरें नव्हे.

बाजीरावाच्या सातव्या बायकोसंबंधीं लिहितांना सरदेसाई म्हणतात कीं, ती 'मुखरीकर अभ्यंकरांची कन्या.' मुखरीकर हें नांव त्यांनी कोठून काढलें कळत नाहीं. राजवाड्यांनी इतिवृत्तांत जी हकीकत दिली आहे तींत तें नाहीं व इतर आधारांतहि आढळत नाहीं. उलट भारत-

इतिहास-संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत रा. गुप्ते यांनी एक टिपण छापलें आहे. त्यांत त्यांनी हकीकत दिली आहे; त्यावरून मुखरीकर अभ्यंकर नसून अवसरीकर अभ्यंकर असें स्पष्ट होतें व तेंच बरोबर असावेसे दिसतें.

पान ५४१ वर मोरदीक्षित मराठ्याच्या बायकोचें नांव सरदेसाई काशीबाई देतात; पण पेशवे-दप्तर भाग २२ मध्यें बाजीरावाच्या हातच्या नोंदी आहेत. त्यांवरून तिचें नांव सगुणाबाई असें दिसतें. उदाहरणार्थ, तेथें पान १४७ वर अशी नोंद आहे "३६०० रुपये मोरदीक्षित मराठे व सौ. सगुणाबाई दीक्षित यांजकडील खर्चाचे एक वर्षाचें बेगमीस" किंवा त्याच भागांतील पान १५१ वरील नोंद पाहा. "१००० रुपये सगुणाबाई दीक्षित मराठे यांस बक्षीस दिले. ११ जिल्हेज."

पान ५४६ वर सरदेसाई म्हणतात, "रावसाहेब व त्यांचें कुटुंब हीं नेपाळांतून परत आलीं. रावसाहेबांनी लक्ष्मीबाईस मिळून बरीच दंगल माजविली, तेव्हां त्यास पकडून ब्रह्मावर्त येथें २०-८-१८६२ रोजीं फाशीं देण्यांत आलें." परंतु मागच्याच पानावर लक्ष्मीबाई इंग्रजांशीं लढत असतांना १८-६-१८५८ रोजीं ग्वाल्हेरजवळ समरांगणावर पतन पावली अशी हकीकत दिली आहे!

पान ५५० वर बाळोजी कुंजराला पुरंदऱ्यांचा लेकावळा म्हटलें आहे. कारण खऱ्यांनीं तसें म्हटलें आहे! पण तें चूक आहे. बाळोजी कुंजर हा पुरंदऱ्यांचा लेकावळा नसून एका पाटलाचा लेकावळा होता, अशी खरी हकीकत आहे. त्याला आधार पंतप्रधान यांचे दुसरे शकावलीचा. भारतवर्षांत शकावलि छापली आहे तेथील नोंद अशी. पान ९२ "बाळोजी कुंजर पाटलाचा दासीपुत्र तो नाना पुरंदरे यांजकडे चाकर होता. पुढें बाजीराव शिवनेराहून आल्यावर त्यांजकडे

गेला. त्याचेतर्फे नाना फडणवीस यांजकडे महाडास नानास अनुकूल करून घेऊन बाजीराव गादीवर बसल्यावर त्याला कारभार सांगितला " हीच हकीकत बरोबर आहे अशी आमची खात्री आहे. वाटल्यास सरदेसायांनीं पेशवे-दप्तरांत शोध करावा.

पान ५५९ वर सरदेसाई लिहितात 'पेशव्यांचें घराण्यांत रथ वापरल्यासंबंधीं या एकट्या दुसऱ्या बाजीरावाचाच उल्लेख आहे '; तेहि चूक आहे. वाडांच्या पेशवा डायरींत व खुद्द इतर साधनग्रंथांत सरदेसायांनीं शोध घ्यावा. इतर पेशव्यांसंबंधी पांचसहा तरी उल्लेख खास आहेत.

पान ५५४ वर रियासतकारांनी सन १८४८ च्या सुमारास ब्रह्मावर्त येथें रघुनाथराव विंचूरकरांनी बाजीरावाची भेट घेतली ती हकीकत दिली आहे. तेथें ते लिहितात, "तीर्थयात्रा करून रघुनाथरावास बाजीरावाने पुनः ब्रह्मावर्तास बोलाविलें आणि सांगितलें "यात्रा करून परत यावें. याच मुक्कामीं तुमचें लग्न कर्तव्य आहे.' या वेळीं बाजीराव व विंचूरकर दोघेही समवयस्क पाऊणशें उमरीचे होते ! " शेवटच्या वाक्याने केलेला उपहास उघडच दिसतो. परंतु दुर्दैवाने त्या बाबतींत रियासतकारांनीच स्वतःस उपहासास्पद करून घेतलें आहे. पाऊणशें वर्षांच्या म्हाताऱ्याने बरोबरीच्या म्हाताऱ्यास लग्नाचा आग्रह करणें हें खचित उपहासास्पद व हास्यास्पद झालें असतें. परंतु बिचारा रघुनाथराव विंचूरकर त्या वेळीं अवघा २५।२६ वर्षांचा असल्यामुळें, विनोदही गेला आणि सत्यही संपलें, आणि तेल गेलें तूप गेलें हातीं राहिलें धुपाटणें, अशी रियासतकारांची स्थिति झाली आहे ! विंचूरकर घराण्याच्या इतिहासांत रघुनाथरावाचा जन्म १८२४ सालीं झाल्याचें नमूद आहे. अर्थात् १८४८ सालीं तो अवघा चोवीस वर्षांचा होता हें उघड आहे. रघुनाथराव विंचूरकर त्या सालीं काशीयात्रेस गेला त्याचें कारण त्या

वर्षीं त्याची प्रिय पत्नी व मुलगी मृत्युमुखीं पडलीं हें होय. अर्थात् बाजीरावासारख्या म्हाताऱ्याने रघुनाथरावासारख्या तिशीच्या आंतील तरुणाजवळ लग्नाची गोष्ट काढली तर त्यांतही कांहीं वावगें दिसत नाहीं हें उघड आहे ! !

सदरहू प्रकरणांत राजकीय इतिहासाखेरीज बाजीरावासंबंधीं जेवढीं जेवढी म्हणून इतर हकीकत मिळाली तेवढी सर्व एकत्र देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांत आणीकहि कांहीं गोष्टींची माहिती जरूर होती असें आम्हांस वाटतें. बाजीरावानें मराठी शाहिरांना केलेली मदत, रामजोशासाठी उभारलेली यात्रा पट्टी, प्रसिद्ध कवि मोरोपन्त पराडकराच्या मुलाचा घेतलेला परामर्ष वगैरेंची हकीकत द्यावयास पाहिजे होती. अनंत फंदीचें सुप्रसिद्ध ' माधवनिधन ' हें ऐतिहासिक काव्य; त्यांतली हकिकत तर खुद्द बाजीरावानें आपल्या हातानें त्याला लिहून दिली. यावरून बाजीरावाच्या स्वभावावर पुष्कळ प्रकाश पडतो. शिवाय त्या हकिगतीस ऐतिहासिक महत्त्वहि होतें. त्याच-प्रमाणें बाजीरावाच्या काळचें पुणें, त्यानें बांधलेले वाडे व विलासस्थानें वगैरेंसंबंधीं माहिती, त्याचप्रमाणें फुलशहरच्या नवीन वसाहतींसंबंधींची जी विश्वसनीय हकीकत कै. पांडोबा पटवर्धन यांनीं उपलब्ध केली ती, सरदेसायांना एकत्र करतां आली असती व ती या प्रकरणाशीं खचित सुसंबद्ध, उपयुक्त व मनोरंजक ठरली असती. या प्रकरणाचीं पानें ५४० ते ५६६ म्हणजे २६ आहेत. त्यांत खुद्द सरदेसायांचा मजकूर पांचचार पानें असेल नसेल. बाकी सर्व खरे, राजवाडे, इतिहाससंग्रह वगैरेंतील अवतरणें नुसतीं एकापुढे एक जोडून दिलीं आहेत !

—६—

पान १९९. सरदेसाई परस्परविरोधी विधानें किती जलद करतात याचें उदाहरण पाहा. या पानावर बारामतीच्या लढाईचें वर्णन देतांना ते लिहितात, "दोन घटका लढाई झाली. मान्याने झाडून तोफा नेल्या. गणपतराव पानसे यांस जखमा लागल्या. नाना पुरंदरे जरीपटका काढोन सासवडच्या सुमारें आले. पांडोजी कुंजर प्रथमच पळाले ते दोन दिवसांनी पुरंदऱ्यास मिळाले. मालोजी घोरपडे जखमा लागून पाडाव गेले. पांडुरंगराव बारामतीकर लढाईत होते ते जखमा लागून एका घोड्यानिशीं औरंगाबादेस पळून गेले. हा पांडुरंगराव सन १८१० सालीं वारला. लढाईनंतर मान्याने आपला मुक्काम बारामतीस केला." प्रथम सांगावयाचें म्हणजे वरील अवतरणांत पांडुरंगरावाच्या मृत्यूची हकीकत आली आहे ती या मजकुरांत गैरलागू आहे, कारण प्रस्तुत हकीकत चालली आहे १८०२ ची! फार तर ती माहिती खालीं टीपेंत दिली असती तर बरें झालें असतें. दुसरें असें कीं, वरील अवतरणांत नाना पुरंदऱ्यांनी जरीपटका वांचवला व तो संभाळून ते सासवडास आले असें म्हटलें आहे. पण मग चारच ओळींनंतर सरदेसाई लिहितात, "मान्याने जरीपटक्याचें निशाण हस्तगत केलें होतें. तें सन्मानपूर्वक पुरंदऱ्याकडे परत पाठविलें!" मग कोणती गोष्ट खरी? लोकांचे उतारे उतरून घेऊन नुसते जोडण्याची पेंढारी पद्धति स्वीकारली गेली म्हणून अशा गमती होतात. "आश्विन शु. १२" पासून अकरा ओळींचा मजकूर अवतरणांत दिला आहे आणि पुढील मजकूर खऱ्यांच्या प्रस्तावनेंतून उतरून घेतला आहे. वाचकांनी खरे प्रस्तावना पानें ७४२२, ७४२३ पाहावी.

पण हे उतारे घेतांना अवधान न ठेवल्यामुळें दुसऱ्या चुका कशा

---

* केसरी, ९ सप्टेंबर १९३२

होतात याचेंहि उदाहरण वरील ठिकाणींच सापडतें. वर दिलेल्या अवतरणांत " मालोजी घोरपडे जखमा लागून शत्रूकडे पाडाव गेले " असें सरदेसायांनी लिहिलें आहे. नंतर तीनचार पानें टाकून सतरा दिवसांनंतर झालेल्या हडपसरच्या लढाईत फिरून मालोजी घोरपडे पेशव्यांच्या बाजूनें होळकरांशीं लढत असतां जखमी झाल्याचें लिहिलें आहेच ! मग मालोजी घोरपडे शत्रूकडे पाडाव गेलेला परत केव्हां व कसा आला या शंकेचें निरसन कसें होणार ? ज्या खऱ्यांच्या एकट्या एक प्रस्तावनेचा बहुधा सर्व आधार घेऊन हें प्रकरण सरदेसायांनीं आपलें म्हणून सजविलें तींत मात्र ही हकीकत अनुसंधान ठेवून दिलेली आहे. खऱ्यांनी लिहिलें आहे, 'घोरपडे पाडाव सापडले होते. त्यांच्या जखमांची उत्तम बरदास्त ठेवण्यांत आली आणि ते बरे झाल्यावर वांई देशांत कुमठें म्हणून त्यांचें इनामगांव होतें तेथें त्यांची रवानगी करून देण्यांत आली. "

पान २०० वर सरदेसाई लिहितात, " बाजीरावास पदावरून काढण्याचा किंवा त्यास नाहींसा करण्याचा यत्किंचित् विचार यशवंतरावाचे मनांत नव्हता. कसा झाला तरी तो शिपाईगडी होता. भ्याडपणा धारण करून आयत्या वेळीं दगा देण्याचा त्याचा स्वभाव असता, तर त्यानें बाजीरावास पुण्यांतून पळवून इंग्रजांचे आश्रयास जाऊं दिलें नसतें." या दिव्य वाक्याचा अर्थ सरदेसायांनीच उकलून दाखवावा. आम्हास तर त्यापासून कांहींच अर्थबोध होत नाहीं.

पान २०६ वर सरदेसाई लिहितात, " कोंकणांत बाजीरावाबरोबर बरेंच मोठें लटांबर गेलें. दादासाहेबांचे लेकावळे कृष्णसिंग, हैबतसिंग व लक्ष्मणसिंग बरोबर होते. त्यांस बाजीरावाने परत पाठविलें. " सरदेसायांनी अर्थातच हें खऱ्यांच्या वरून उतरून घेतलें. उतरून घेतांना विवेक नसला म्हणजे खऱ्यांची चूक असली तरी ती उतरून घेणाऱ्याहि

माथीं मारणें योग्यच आहे. हैबतसिंग हा दादासाहेबांचा लेकावळा नसून नानासाहेबांचा लेकावळा होता व कृष्णसिंग व लक्ष्मणसिंग हे त्याचे धाकटे भाऊ होते. या हैबतसिंगासंबंधीं स्पष्ट उल्लेख भावे मराठी दप्तर रुमाल २ मध्यें रमाबाईच्या सतीप्रसंगीं आलेला आहे, तो सरदेसायांनीं काढून पाहावा. वाटल्यास थोडीबहुत आणखी हकीकत आम्ही सरदेसायांना सांगतों. कृष्ण-सिंगाचा मुलगा कोंडिरामसिंग. लक्ष्मणसिंगाला दोन मुलगे मल्हारसिंग व गणपतसिंग. हैबतसिंगाचा मुलगा एक गणपतराव; गणपतरावाला एक मुलगा खंडेराव. लक्ष्मणसिंग १८३१ सालीं वारला.

पान ९७ वर " नानास तपकीर ओढण्याची संवय होती " हा पॅरा पूर्वापर संबंध नसतां मध्येंच अचानक शिंक यावी तसा घुसडला आहे. याच प्रकरणांत पुढें नानाच्या आवडीनावडी दिलेल्या आहेत तेथें ती हकीकत दिली असती तर चाललें असतें.

पान ९८ वर नाना फडणविसाच्या बायकांची यादी देतांना बगाबाई-च्या गळ्यांत लग्नांत सहा ठसे बांधले होते असें लिहिलें आहे. त्या हकीकतीची जरूर काय ? आमचा तर्क असा आहे कीं, नाना फडणविसाच्या पहिल्या सहा बायकांच्या नांवांचे ते ठसे असावेत. पण सरदेसायांच्या लक्षांत ही गोष्ट कशी यावी ? बगाबाईसंबंधीं एक अधिक उल्लेख सापडला, द्या तो कोंबून; मग त्यांत औचित्य असो वा नसो. त्याच पानावर सरदेसाई लिहितात, " जिऊबाईखेरीज सर्व बायका नानाच्या हयातींत वारल्या. " पण त्याच्याच वर ९ व्या ओळींत सरदेसायांनीं लिहिलें आहे, "बगाबाई नानांच्या मृत्यू-नंतर १४ व्या दिवशीं वारली ! "

पान ९९ वर नानाच्या सांत्वनाचें एक पत्र देऊन उगाच जागा अडविली आहे. त्याच पानावरील चौथा पॅरा म्हणजे सरदेसायांच्या अविवे-काचें प्रदर्शन आहे. ती एक कुरतडलेली नोंद आहे. 'महाराष्ट्र मंडळाची

बखर' म्हणून एक बखर भारतवर्षांत छापली आहे. त्यांतला एक कुरतडलेला उतारा सरदेसायांनीं येथें घेतला आहे. आधीं हा उतारा जसा घेतला आहे तसा घेण्याची जरूर काय ? त्यांत नाना फडणविसाच्या आजापासून फिरून सुरुवात केली आहे ती कशाकरितां ? वास्तविक मोरोबादादाचा वंशज कोण आहे हें आपल्याला माहीत आहे याच्या प्रदर्शनापुरताच त्याचा उपयोग आहे. पण मोरोबादादाची व त्याच्या मुलाची स्वतंत्र हकीकत सरदेसायांनीं याच पुस्तकांत अन्यत्र विस्तृत दिलेली आहे. तेथें ती माहिती द्यावयाची होती ! नाना फडणविसाशीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं. बरें, कुरतडलेलें अवतरण आहे तें असें, " नानाचा आजा बाळाजी महादेव, त्याचा बाप जनार्दन बाबा मुकामची फडाणिशी करीत होते आणि बाबुराव स्वारीची करीत. पुढें नानांनी मुकामची फडाणिशी पानिपत-स्वारीपासून नारायणरावाच्या अखेरपर्यंत पंधरा वर्षें केली. बाबुरावांचे पुत्र रामचंद्र हल्लीं चित्रकोटास विनायक अमृतराव पेशवे यांच्यापाशीं आहेत " हा पॅरा सामान्य वाचकांस कसा कळेल ? तो जनार्दन बाबा हा नानाचा पणजा समजेल, बाबुराव हा नानाचा कोण हें त्याला कळणार नाहीं. पुढें बाबुरावाचे पुत्र रामचंद्र असें म्हटलें आहे. पण बाबुराव रामाचा मुलगा मोरोबादादा, मोरोबादादाचा मुलगा धाकटा नाना व कदाचित् धाकट्या नानाचा रामचंद्र हा मुलगा असावा.

सारांश, सरदेसायांच्या लिखाणांत कोठें काय व कशी माहिती येईल व वाचकाचा गोंधळ उडेल याचा नेम नाहीं.

पान १२२ वरील शेवटचा पॅरा म्हणजे असंबद्धपणाचा एक नमुना आहे. त्यांतल्या पहिल्या वाक्यांत नाना फडणवीसाच्या आवडीनावडीचा उल्लेख आहे. लगेच दुसऱ्या वाक्यांत नानाची पेठ वसविण्याची हकीकत आहे. त्यानंतर लगेच पुढील वाक्यांत माधवराव जाधवराव या

नानाच्या वकिलाची हकीकत आहे. तेथें त्या वकिलाची जात कोणती येवढेंच दर्शविण्याचा त्यांचा खरा हेतु. परंतु त्याबरोबरच तो वकील कोणाच्या पदरचा, पेशव्यांकडे केव्हां आला, मरण कधीं पावला, त्याच्या जागीं दुसरा कोण वकील नेमला व तो वकील मॅलेट पुण्यास आल्यावर त्याच्याकडे कधीं रुजू झाला वगैरे गैरलागू किती तरी माहिती जोडली आहे. तरी बरें, सरदेसायांनीं मॅलेट कधीं मेला, त्याचा वंश कोठें आहे वगैरे हकीकत पुढें दिली नाहीं ! वास्तविक माधवराव जाधवराव हा एकच मराठा गृहस्थ नानाचे पक्षांतील होता येवढें म्हणून थांबावयाचें व वाटल्यास पुढली हकीकत खाली टीपेंत स्वतंत्रपणें द्यावयाची; पण तसें करावें तर लेखकाचें वैशिष्ट्य तें काय राहिलें ?

ही झाली त्या पॅऱ्यातील मजकुराच्या मांडणीची स्थिति. आंतील मजकुराच्या सत्यतेबद्दल तर फारच मौज दृष्टीस पडते. येन केन प्रकारेण नाना फडणविसाला कारणें शोधून काढून नेस्तनाबूद करण्याच्या भावनेने लेखक अंध झालेले. त्यांना इतिहासकाराची समतोल दृष्टि येणार कोठून ? ते म्हणतात “ नानाच्या साहाय्यकांत बहुतेक ब्राह्मणच आढळतात ! तथापि माधवराव जाधवराव हा गृहस्थ त्याच्या भरवशाचा मॉस्टिन, अप्टन वगैरे इंग्रज वकिलाकडे बोलणें करण्याकरितां नेमलेला असून तो विश्वासू व हुशार म्हणून प्रसिद्ध होता.” पण हें विधान सर्वस्वीं चूक आहे ! ज्या आधारावर सरदेसाई लिहितात तोच आधार आमच्यापुढें आहे. कै. वाड यांनी छापलेल्या कैफियती व यादी या भागांत ५९ पानावर या जाधवराई घराण्याची कैफीयत छापलेली आहे व तेथें संपादकांनीं मुद्दाम अशी टीप दिली आहे कीं, ‘जाधवराई घराणें हें ब्राह्मण सरदाराचें घराणें असून चुकून मराठी घराण्यांत दाखल झालें आहे !!’ वास्तविक कैफियतींतील मजकुरावरूनही व त्यांतील सदाशिवराव, माधवराव, गणपतराव वगैरे नांवांवरूनही सरदेसायांच्या ही गोष्ट लक्षांत यावयास पाहिजे होती. परंतु

नानाच्या बाजूला एकच मराठा कसा तरी चुकूनमाकून राहिला होता, आणि तोही अपेक्षेप्रमाणें चांगला कर्तबगार होता अशा आनंदातिरेकांत ही चूक क्षम्यच होय!

पान १०८ पासून 'कारभाराचे व्याप' या सदरांत नाना फडणविसाला नोकरीसाठीं वगैरे अर्ज केलेल्या लोकांचीं सविस्तर पत्रें छापलीं आहेत. तीं सर्वच मामुली व सामान्य असून, तीं पानेंच्या पानें उतरून घेण्यांत सरदेसायांनी ग्रंथाचीं पानें वाढविण्याखेरीज काय साधलें कांहीं कळत नाहीं. कोणाही अधिकारावर असलेल्या मनुष्याकडे नोकरीसाठीं याचना करणारांचीं पत्रें अशीं शेंकडो येत असतात; पण ह्या पत्रांचें महत्त्व तितकेंच. सरदेसायांनीं छापलेल्या या पत्रांतून इतका गैरलागू मजकूर आहे कीं, हीं पत्रें छापून त्यांनीं विनाकारण जागा अडविली असेंच म्हणावें लागतें. उदाहरणार्थ, माधवराव वासुदेवाचें पहिलें पत्र सुमारें पानभर छापलें आहे, त्यांत काय मुद्दा आहे? आणि हें सगळें पत्र जसेंच्या तसें छापून शेवटीं 'हें पत्र माघ शु. १२ चें बदामी स्वारीच्या वेळचें सन १७७७ च्या आरंभाचें असावें' असा सरदेसाई–शिरस्त्याप्रमाणें लेखनालंकार केला आहे. किंबहुना आम्हाला तर वाटतें कीं या पत्राचा काळ आपण ठरविला, तेव्हां तें पत्र कोणत्या तरी निमित्तानें लोकांच्यापुढें गेलेलें असूं दे इतकीच दक्षता घेतलेली दिसते. एरवीं या ५०।६० ओळींच्या पत्राच्या अवतरणाचें प्रयोजन काय व त्याची तारीख ठरविण्याकरितां खर्चीं पडलेल्या श्रमाची तरी फलश्रुति काय? हे श्रम या अर्जदारांच्या पत्रांचें मनन करून त्यांतला सारांश आठदहा ओळींत सुसंगत सांगण्यांत खर्च पडते तरी बरें झालें असतें; पण एकंदर निवडलेले उतारे पाहतां व 'नोकरीसाठीं धडपडणाऱ्यांचे किंवा पगार न पावल्याचे अर्ज नानाकडे कसे येत त्याचीं उदाहरणें पाहा.' या वाक्यावरून व सरदेसायांच्या प्रकट झालेल्या मनोवृत्तीवरून नानाला दोष देण्याकरितांच ही उतारे उत-

रून घेण्याची कारकुनी त्यांनी केली असावी असा संशय वाटतो. नोकरांचे पगार वेळेवर मिळत नाहींत, दाद लागत नाहीं, वस्त्रप्रावरणाचे हाल होतात, बढती मिळत नाहीं इत्यादि अर्जदारांच्या तक्रारी सांगून असा हा नानाचा कारभार होता असें परस्पर दर्शवावयाचें इतकीच दूरदृष्टि त्यांत दिसते. पण सरदेसायांना हें कळत नाहीं कीं त्या वेळच्या कोठल्याही सरदाराच्या पदरच्या कारकुनांनीं काय, शिलेदारांनीं काय अशीच रड नेहमीं गायिलेली आहे. नाना मराठशाहीचा सर्वाधिकारी मुख्य प्रधान होता. तेव्हां नोकरांनीं गाऱ्हाणीं त्याच्याकडे गावयाचीं नाहीं तर कोणाकडे ? क्षुल्लक गोष्टींना नसतें महत्त्व दिलें, म्हणजे दुसऱ्यालाही कांहीं लिहावें लागतें.

पान १३० वर सरदेसायांनीं नाना फडणविसाबद्दलचा एक सर्वस्वीं निंदात्मक पोवाडा देऊन कळस केला आहे. सदरहू पोवाडा म्हणजे सरदेसायांच्या नानाविषयींच्या द्वेषबुद्धीचा अर्कच होय ! वास्तविक आपल्या समर्थनार्थ एका पोवाड्याचा आधार सरदेसायांनीं घेतला हेंच आधीं विचित्र आहे! कारण मागें त्यांनीं 'ऐतिहासिक पोवाड्या'संबंधीं लिहिताना इतिहासाच्या दृष्टीनें ते अविश्वसनीय असतात असें आपलें मत 'ऐतिहासिक पोवाड्यांच्या' परीक्षणांत नमूद केलेलेंच आहे. मग यांनीं येथें तो आधार कां घ्यावा ? पण निंदाप्रवण बुद्धीमुळें पक्षपाती झालेल्यांना हा विवेक कोठून राहणार ? वास्तविक नानाच्या या निंदापर पोवाड्याप्रमाणें त्याचे इतर स्तुतिपर पोवाडेहि उपलब्ध आहेत; नव्हे ते स्तुतिपर पोवाडेच आज शिल्लक राहिलेले आहेत. यावरूनच खरोखर नानाविषयींचें जनतेचें खरें मत काळाच्या मोर्तबानिशीं मान्य झालेलें आहे. तेव्हां समकालीन देवनाथाबरोबरच समकालीन अनंत फंदी, प्रभाकर, बाळा बहिरू, होनाजी वगैरे लोकांच्या स्तुतिपर पोवाड्यांचाही उल्लेख सरदेसायांनीं करावयास पाहिजे होता. शिवाय हा देवनाथ समकालीन कशावरून ? सरदेसाई म्हणतात म्हणून ? नानाच्या अप्रतिम कर्तृत्वामुळें

त्याला निस्सीम शत्रूही उत्पन्न होणें हें साहजिकच होते. त्या लोकांनीं नानासंबंधीं निंदेची चळवळ सवाई माधवरावाच्या कारकीर्दीपासूनच अव्याहत चालविली होती; तेव्हां नानाविरुद्ध शिव्यांचा पुरावा सरदेसायांना मिळणें कांहीं कठिण नव्हतें. पण स्वकीयांचें व परकीयांचे नानाविषयींचें प्रचंड अनुकूल मत व त्या मानानें अत्यंत अल्प असलेलें प्रतिकूल मत यांचें प्रमाण लक्षांत घेतां इतिहासकार म्हणविणाऱ्या सरदेसायांनीं तरी अधिक विवेक करावयास पाहिजे होता.

दुसरी एक विचित्र गोष्ट हा व गेले सवाई माधवरावाचे दोन भाग सूक्ष्मपणें वाचणारांच्या लक्षांत आली असेल. ती ही कीं सबंध ब्राह्मण जातीचाच सरदेसायांना तिरस्कार वाटूं लागला आहे ! त्यांच्या प्रस्तावनेंतील " बाजीरावी वृत्तीचा समूळ उच्छेद राष्ट्रांतून होईल तेव्हांच त्यास शिवकालीन प्रतिष्ठा प्राप्त होईल, " हें वाक्य वरून दिसावयास मोठें सोज्वळ आहे. परंतु सरदेसायांचीं इतर विधानें पाहतां त्यांत फार गूढ अर्थ आहे असें दिसून येईल. पान १२९ वर ते म्हणतात, " ब्राह्मण कारभार बिघडवतात. विस्तृत राष्ट्रीय विचार त्यांच्या मनांत उद्भवत नाहींत असा बोभाटा इतर जातींच्या मनांत दृढ झालेला अद्याप दृग्गोचर होतो. हा बोभाटा खरा कीं खोटा हें इतिहासच सांगतो आहे. पण हा समज होण्यास कांहीं अंशीं नाना फडणवीस व बाजीराव हे कारणीभूत झाले असावेत ! "

गेल्या सवाई माधवरावाच्या भागांत नाना-महादजीच्या निमित्तानें ब्राह्मण जातीवर सरदेसायांनीं कोरडे ओढले ते प्रसिद्धच आहेत. आजपर्यंत पेशवाईचा इतिहास लिहिण्यानें ब्राह्मणांच्या कर्तबगारीची जी आपण अप्रत्यक्षतः स्तुति केली त्या अक्षम्य चुकीबद्दल एकदाच सर्वप्रायश्चित्त खालील वाक्यानें त्यांनीं घेतलेलें असावें, " मला वाटतें मीसुद्धां यापूर्वीं

जीं अनुमानें वेळोवेळीं नमूद केलीं तीं आतां जास्त वाचनानें व अभ्यासानें सर्वथा बदलावीशीं वाटतात ! ! ”

—७—

पान १४५ वर आप्पा बळवन्त मेहेंदळे याच्या मृत्यूची हकीकत दिली आहे. तींत असें भासविलें आहे कीं, आप्पा बळवन्ताने सर्जेरावाच्या छळाला भिऊन विषभक्षण करून आत्महत्या केली. पण हें विधान सर्वस्वीं खोटें आहे. त्यांत ऐतिहासिक सत्य बिलकुल नाहीं. सरदेसाई म्हणतील कीं, मी तें अस्सल पत्राच्या आधारानें लिहिलें आहे; परंतु त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, आम्हीहि एका अस्सल पत्राचे आधारानेंच लिहीत आहों. वस्तुस्थिति अशी कीं, खरेशास्त्र्यांनीं अस्सल पत्रें छापलीं आहेत, त्यांपैकीं एकांत आप्पा बळवन्तानें अमृतप्राशन केल्याचें लिहिलेलें आहे. परं तें अस्सल पत्रांतील असलें, तरी तो एक बाजारगप्पेचाच प्रकार होता. आणि म्हणूनच इतर पुरावे पाहून पूर्ण विचार करून खरेशास्त्र्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत त्या गप्पेचा इनकार केलेला आहे. पान ५३१६ वर ते लिहितात, “ मार्चपासून जूनपर्यंत ही घाटग्याची हाणामारी सुरू होती, व त्या अवधींत बहुत अब्रुदार लोकांस पुणें म्हणजे यमपुरी भासत होती. आप्पा बळवंत मेहेंदळे यांच्या शरीरीं अकस्मात् कांहीं आजार उत्पन्न होऊन ते याच सुमारास वारले. सर्जेराव द्रव्य मागतो, तें आपणाजवळ देण्यास नाहीं; सबब आपली बेअब्रू व हाल होणार, या भयानें त्यांनी विषभक्षण केलें अशी अफवा उठली होती. तींत तथ्य नव्हतें. ” पण ही मखलाशी खऱ्यांची ! म्हणून रियासतका-

* केसरी, १६ सप्टेंबर १९३२

रांच्या नवीन आश्रमांतील एका स्नेही संशोधकाचा पुरावा आम्ही दाखल करतों. पुरंदरे दप्तर भाग २ या अगदीं अलीकडील म्हणजे १९२९ सालीं प्रसिद्ध झालेल्या साधनग्रंथांत लेखांक ४ यांत पत्र छापलें आहे तें सरसायांनीं पाहावें. त्यांत खालील मजकूर आहे—" शेवेशी विज्ञापना राजश्री आप्पा बळवंत हे काल भोजनोत्तर पोथी वाचावयास बसले. दोन चार उचक्या आल्यानंतर पाणी प्याले, तों भोवळ येऊं लागली म्हणोन वरते जाऊन निजले. आस्तावेस्थ हात-पाय टाकूं लागले. वायूची भावना जाली. वायूच झाला. त्यायोगेकरून देहभान नाहीं माणूस ओळखीत नाहींत. वैद्य-उपचार होतात. वैद्यांनीं वायूच ठरविला. मस्तकांत वायूच चढला म्हणतात. चार-सहा घटका रात्रपर्यंत तरी उतरला नाहीं. पुढें काय भावना होईल तें लिहीन." पत्रलेखक नानाच्या पक्षाचा नाहीं. तो खुद्द पुरंदऱ्यांचा कारकून बाळाजी माणकेश्वर आहे. तेव्हां त्याचें लिहिणें सरदेसायांनीं तरी ग्राह्य धरावयास प्रत्यवाय नाहीं !

नानाविषयीं रियासतकार क्षुद्र बुद्धि धरून बसलेले. पण इतिहासकाराच्या भूमिकेवर बसल्यावर तरी त्यांनी तुलनात्मक रीतीनें नानाची किंमत ओळखावयास पाहिजे होती. नानाच्या कैदेची कांहींएक हकीकत त्यांनीं दिली नाहीं. साधनग्रंथांतच ती नाहीं असें नाहीं. निदान तसें ते म्हणतील तर सर्व उपलब्ध कागदपत्र माझ्या नजरेखालून गेले आहेत ही प्रौढी तरी फुकट जाईल. कारण पुरंदरे दप्तर भाग २ मध्यें एका लेखांकांत नानाच्या कैदेसंबंधीं थोडा मजकूर आहे व नाना फडणवीस ही महान् व्यक्ति लक्षांत घेतां त्या माहितीचा आदर म्हणून नसला तरी कुतूहल म्हणून तरी सरदेसायांनीं जरूर संग्रह करावयास पाहिजे होता. तें वाक्य असें—" नाना किल्ल्यांत गेल्यावर (म्हणजे नगरचे बंदीखान्यांत शिंद्यांनीं पाठविल्यानंतर) सीतोदकाने स्नान करून रासवट तांदूळ दिले ते आपले हातें भात उकडून खाल्ला. याप्रमाणें पहिले दिवशीं जालें. त्यांचा आचा-

रीच गोविंदा तेथून आला तो सांगतो. मागें आचारी-पाणका नेमून देतील तरी देतील." यावरून नानासारख्या व्यक्तीला शिंद्यांनीं कैदेंत कसें वागविलें असेल तें दिसून येतें. या महत्त्वाच्या हकीकतीसंबंधीं एवढा एकच विश्वसनीय उल्लेख आहे. त्याचा शोधपूर्वक संग्रह जरूर सरदेसायांनीं करावयास पाहिजे होता. निदान पेशवे कुटुंबांतील स्त्रियांच्या किंवा खुद्द नानाच्या स्त्रियांच्या रजोदर्शनाच्या तारखा आवर्जून देण्यापेक्षां ही खचित अधिक महत्त्वाची हकीकत होती हें सरदेसाईच कबूल करतील.

'पेशवाईची इतिश्री' हें सर्व प्रकरण बहुधा उताऱ्यांनी भरून काढलेलें आहे. दुसरें, सरदेसायांची पद्धति अशी कीं, एकाच गोष्टीसंबंधीं कांहीं अवतरण घ्यावयाचें झाल्यास त्यासंबंधीं जेवढीं पत्रें सापडतील तेवढ्यांची एकापुढें एक माळ लावून द्यावयाची. मुद्द्यापुरतें अवतरण घेतलें असें बहुधा होत नाहीं. सबंधच्या सबंध पत्रें किंवा पॅरे उतरून घेण्याच्या पद्धतीमुळें वाचकाचा फार गोंधळ होतो. कारण त्या पत्रांतून एकदां सांगून टाकलेल्या हकीकतीहि पुनः पुनः येतात. अशामुळें संगति तुटते. खडकीच्या लढाईसंबंधीं सरदेसायांना वर्णन करणें झालें तर ते एकापुढें एक निरनिराळे उतारे नुसते जोडून देतात. मग त्यांत एखादें अस्सल पत्रहि असतें, बखरींतला उताराहि असतो, ऐकीव आख्यायिकाहि असते किंवा वेळेनुसार एखाद्या कादंबरींतलाहि उतारा असतो!! त्यांच्या पानिपत-प्रकरणांत 'दुर्दैवी रंगू' या कादंबरींतला एक उतारा त्यांनीं आधाराकरितां उद्धृत केलेला पुष्कळांच्या परिचयाचा असेलच!

'पेशवाईची इतिश्री' या प्रकरणांत उपलब्ध साधनांची एकत्र गोधडी शिवण्याखेरीज त्यांनी दुसरें कांहीं केलेलें नाहीं. त्यांनी दिलेली हकीकत एखाद्या विद्यार्थ्यास वाचावयास दिली व यांत आलेली हकीकत कार्यकारणभावासह फिरून समजून सांग असें म्हटलें तर तें त्याला

खात्रीने अशक्य होईल. रियासतकारांच्या हकीकतीवरून त्याला पुष्कळ ठिकाणचे तपशील एकत्र केलेले आढळतील, व वर, वर वाचणाराच तो असेल तर आधारांच्या याद्या पाहून तो दडपूनहि जाईल. परंतु वर सांगितलेली कसोटी लावण्यास त्याला सांगितलें तर आम्ही म्हणतों तसेंच घडून येईल. त्यांच्या हकीकतीने एकंदरींत गोंधळ उडून जातो. स्वतः विषय मनांत पूर्ण परिणत झालेला असला तरच तो कोणासहि सोपा करून सांगतां येणें शक्य असतें.

४८६ पानावर वसईकर मोर दीक्षित मराठ्यासंबंधीं हकीकत आहे, आणि त्यांत सरदेसायांनी असें लिहिलें आहे कीं, 'फोर्डशीं स्नेह ठेवल्यामुळें मोर दीक्षित इंग्रजांस फितूर झाला आहे अशी बातमी बाहेर पसरली होती. ती खोटी होती.' आणि पुढें लगेच ओळीनंतर लिहितात कीं, 'बाहेरील इंग्रज फौजांचा भरणा येऊन दाखल झाला नाहीं तोंच इंग्रजांस गांठावें असा बाजीरावाचा निश्चय झाला आहे ही गोष्ट दीक्षितांनी अंतस्थपणें फोर्ड यास कळविली!!'

पान ४८८ शेवटचा पॅरा सरदेसाई मोठे गौरवून लिहितात. "येणेंप्रमाणें युद्धाग्नीनें पेट घेतला. २१ वर्षें धुमसत असलेला, बाजीरावाचा वैराग्नि असा निदर्शनास आला." बाजीराव १७९७ सालीं गादीवर बसला आणि २१ वर्षांनी खडकीची लढाई झाली. हीं २१ वर्षें अहर्निश बाजीराव इंग्रजांशीं लढण्याची तयारी करीत होता असें सरदेसायांना वाटतें काय? स्वतःच लिहिलेलें मागलें विवेचन आणि बाजीरावाचें वेळोवेळीं त्यांनी केलेलें वर्णन ते विसरले कीं काय? कां आपलें उगाच येथें धीरगंभीर लिहिण्याची उर्मि आली म्हणून हें वाक्य लिहिलें? याच पॅऱ्यांत सरदेसाई लिहितात, 'एकदां युद्ध सुरू झाल्यावर उभयपक्षीं कित्येक अत्याचार घडल्याशिवाय राहिले नाहींत.' पण हकीकत देतांना मराठ्यांच्या

बाजूचेच तेवढे अत्याचार दिले आहेत. खरेंच बोलावयाचें तर इंग्रजांच्या बाजूनें अत्याचार झाले असले तरी ते आजमितीस उपलब्ध नाहींत. मग ते सरदेसायांनीं कोठून द्यावे ? पण मग 'उभय पक्षीं' या शब्दांतलें स्वारस्य काय ? पुढें एरवड्याचे लढाईची हकीकत लागते. ती अशीच गोळाबेरीज आहे. त्या हकीकतींत मोठा घोटाळा उडाला आहे. सहाव्या ओळींत "त्यास अडविण्यासाठीं" या शब्दांच्या आधीं "तो पुण्याकडे येत असतां" हे शब्द जरूर असावयास पाहिजे होते. नाहींतर नारोपंत आपटे वगैरे फौजा घेऊन स्मिथला अडविण्याकरितां कोंडापुराच्या बाजूला जाण्याऐवजीं येरवड्याकडे गेले असा वाचकाचा समज होतो.

पान ४९१ वर शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण चढल्याची हकीकत आहे. त्यांत मुद्द्याची गोष्ट म्हणजे बाळाजीपंत नातूनें शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण लाविलें ही होय. या हकीकतीबरोबरच बाळाजीपंत नातूचें पूर्वचरित्र सांगून जागा आडविली आहे. वास्तविक इतरत्र त्यांनीं बाळाजीपंताची हकीकत दिली आहे तेथें ती दिली असती तर बरें झालें असतें. परंतु सबंध लांबलचक पत्र उतरून घेण्याच्या मोहांत ती गोष्ट लक्षांत आली नाहीं. या गैरलागू असलेल्या अवान्तर हकीकतीने वाचकाचें अनुसंधान तुटतें. बाळाजीपंत नातूच्या पत्राचा मोठा थोरला उतारा घेतल्यानंतर फिरून दुसरा एक लहानसा उतारा सरदेसायांनी घेतला आहे. त्याच्या पुढील पॅऱ्यांत ४९२ पानावर राजवाडे खंड ४ पान ७८ वरील मजकुरांतील एक सबंध पानभर अवतरण घेतलें आहे. त्यातहि फिरून बाळाजीपंताने निशाण लावल्याच्या हकीकतीचें पुनरुच्चारण झालेंच आहे. एकापुढें एक नुसते उतारे संकलित करून जोडून द्यावयाचे मग त्यांत पुनरुक्ति येवो अथवा विसंगतपणा येवो अथवा गैरलागू मजकूर येवो, तें कोण पाहातो ? पण नुसते उतारे घेतांना ते धड नीट समजून अर्थहानि किंवा अर्थविपर्यास न होईल असे तरी घ्यावेत. पण रियासत-

कारांनी वेळीं तसेंहि केलेलें नाहीं. कारण याच चौथ्या खंडातला लांबलचक उतारा उतरून घेतांना फोर्ड साहेबासंबंधी जी हकीकत सरदेसायांनी उतरून घेतली आहे ती कशी विकृत झाली आहे तें पहा. उतारा घेतांना सरदेसायांनी खालील वाक्यें उतरलीं आहेत. "मागें शहरांत दरवडे वगैरे पडून पुष्कळ धामधूम चालली तेव्हां फोर्डसाहेब एल्फिन्स्टन यांजकडे जाऊन म्हणूं लागला, मला कारभार शहराचा सांगावा. एल्फिन्स्टननें उत्तर केलें, तूं निमकहराम आहेस. आमचे जातीवेगळा रहा, तरवार धरूं नको. कंपनीचे उपयोगी पडला म्हणून दरमहा ६ हजार होता तो २॥ हजार केला." या उताऱ्यांतच किती विसंगति आहे ? एल्फिन्स्टनच्या भाषणावरून फोर्ड इंग्रजांशीं निमकहराम झाल्याचें दिसतें पण नंतर कंपनीचे उपयोगी पडला असें वाक्य येतें. पण त्याच्याचपुढें उपयोगी पडला तर ६ हजारांचा २॥ हजार रुपये पगार करून ऐरिश प्रमोशन दिल्याचा उल्लेख येतो. यावरून काय बोध होतो ? याच्या उलट मुळांत काय वाक्यें आहेत तीं पाहा. "पुणेंयांत वर्तमान लोकांनी उठविलें कीं, फोर्ड साहेब मेला. कोणी म्हणत कीं, लढाई समाप्त झाल्यावर एल्फिन्स्टन साहेबाकडे आला. आणि म्हणूं लागला कीं, मला शहराचा कारभार सांगावा. तेव्हां एल्फिन्स्टन यानें उत्तर केलें कीं, तूं निमकहराम आहेस. तूं आमचे जातीवेगळा राहा आणि तरवारही धरूं नकोस. जे दिवशीं कुंपनी तलवार देईल ते दिवशीं धरावी. त्याचें पलटण आपल्याकडे लावून घेऊन त्याचा दरमहा रुपये ६ हजार होता तो बाद करून २॥ हजार देऊं लागला कीं, तूं (धन्याशीं म्हणजे पेशव्याशीं) निमकहरामी केली. परंतु कुंपनीचे उपयोगी पडलास, सबब तुला हा दरमहा देतो."

बाजीरावाचें वर्तुळाकार पलायन, कोरेगांवची लढाई वगैरे हकीकत आहे, ती बरी आहे. परंतु एक शेरा उल्लेखनीय आहे. ते लिहितात, "खडकी व येरवडा या दोन्ही लढाया बाजीरावाच्या घाबरटपणामुळें

निष्फळ ठरल्या. पहिल्यापासून निश्चय करून त्यानें चढावाचें धोरण स्वीकारावयास पाहिजे होतें. स्मिथची फौज शिरूरहून येत असतां तिच्यावर नुसता एकटा नारोपंत आपटे न पाठवितां मोठी फौज चालून गेली असती म्हणजे या लढाया पुण्याच्या बाहेर चालून राजधानीचा बचाव झाला असता. " जें झालें त्याच्या नेमकें विरुद्ध अमुक झालें असतें तर बरें झालें असतें असले फुकटचे शेरे मारण्याची सरदेसायांची पद्धत आहे. त्यांच्या रियासतींतून असले निरर्थक पोकळ शेरे किती तरी काढून दाखवितां येतील. त्यांपैकींच हा एक होय. समजा, नारोपंत आपट्याबरोबर आणखी पुष्कळशी फौज देऊन राजधानीबाहेर लढाई पाडली असती तरी इंग्रजांची छावणी जी पुण्याच्या काळजांत आगाऊच बसलेली होती, तिची वाट सरदेसायांनी काय लाविली असती? शिवाय स्मिथबरोबर येणारी फौजहि कांहीं मोठीशी नव्हती. पन्नास हजार मराठी फौज हजर असतांना इंग्रजांच्या त्या मानाने फार लहान फौजेशीं लढतांना खडकीच्या लढाईंत इंग्रजांचा पराभव मराठ्यांना करतां आला नाहीं एवढी गोष्ट मात्र इतिहासप्रसिद्ध आहे. यानंतर गोपाळ अष्टीच्या लढाईची हकीकत आहे. त्यांत पुष्कळशीं अवतरणेंच आहेत. पण त्यांतहि कांहीं मौजा आढळतात. एकदा सरदेसाई लिहितात, " बाजीराव सोलापुरास गेला. तेथें नागपूरकर आप्पासाहेबांचा सरदार गणपतराव सुभेदार त्यास येऊन मिळाला " व नंतर एक पान टाकून पुढल्या पानावर ते लिहितात कीं, " हा सुभेदार टेंभुर्णी येथें बाजीरावास येऊन मिळाला !" याच हकीकतींत त्रिंबकराव रेटरेकरासंबंधीं एक वाक्य कांहीं आगापिछा नसतां मध्येंच घुसडलें आहे. त्रिंबकराव रेटरेकराचा उल्लेख या लढाईत कोठें येत नाहीं. तरी हा रेटरेकर बाज़ीरावाबरोबर पुढें ब्रह्मावर्तास गेला यासंबंधाची आख्यायिका एका इतिहासांत छापली आहे. ती सरदेसायांनीं पाहिली आहे. तेव्हा त्याचा कोठें तरी उपयोग झालाच पाहिजे आणि त्यांच्या मनांत

भू. १७

आल्यावर मजकुरांत कोठेंही ती हकीकत कोंबावयास त्यांना अडचण नसतेच. शिवाय अप-टु-डेट माहितीच्या झोकांत त्यांनीं रेटरेकराचा छोटा वंशावेलही मुद्दाम दिला आहे.

सामान्य वाचक तर राहोच, पण इतिहाससंशोधकांनाही अजून-पर्यंत या त्रिंबकराव रेटरेकराने खडकी, अष्टी वगैरे लढायांत काय काम केलें याचा मागमूस नाहीं. तेव्हां तोही विचार करतो कीं, कांहीं-एक संबंध नसतां हे रेटरेकरासंबंधींचें एकच वाक्य आणि या मूठभर मियाची वंशवेलरूपी हातभर दाढी यांचा हेतु काय ?

पान ४९९ वर बाजीरावाच्या पळाचें सरदेसायांनीं 'उत्कृष्ट गनिमी कावा' म्हणून वर्णन केलें आहे. तो सर्वच पॅरा मोठा नमुनेदार आहे. म्हणून तो आम्ही मुद्दाम येथें उतरून घेतों. "बाजीरावाचा पळ हा गनिमी काव्याचा उत्कृष्ट मासला आहे. त्याच्यापुढें इंग्रज फौजा हतवीर्य झाल्या. पळतांना त्याच्याबरोबर कोणासही टिकाव धरवेना. असाच जर हा देशभर भटकत राहिला, तर आपला निभाव कसा लागणार याची इंग्रजांस विवंचना पडली. यशवंतराव होळकराचे जिवास जीव देणारे पाठिराखे होते तसेच बाजी-रावानें जोडले असते, तर त्यालासुद्धां अटकेपर्यंत मजल गांठणें शक्य झालें असतें. भोजन, आराम, झोंप यांची परवा न ठेवतां त्यानें व्यवस्थित पळ काढला असता, तर इतरांसहि पाणी चढून नवीन आवेश उत्पन्न झाला असता. पण आनंदीबाईची कूस इतकी भाग्यशाली नव्हती. आनंदीबाई व जिजाबाई दोघींनाहि गरभारपणीं पळ काढावा लागला. पण एकीस त्याचा फायदा झाला तो दुसरीस झाला नाहीं. तरी बाजीरावानें इंग्रजांस दमविलें हा गनिमी काव्याचाच विजय म्हटला पाहिजे." गनिमी काव्यांत बचावा-बरोबर हल्लाहि असतो, असें मराठ्यांचा इतिहास सांगतो. बाजीरावाचा नुसताच पळ होता. त्याला 'गनिमी कावा' हा शब्द आणि त्यावरील विजयाचें भाष्य व्यर्थ होय.

पान ५०२ वर सरदेसाई लिहितात, 'पांढरकवडा शिवणीच्या दक्षिणेस १२ मैल आहे.' २६४ पानावर त्यांनीं नकाशा दिला आहे.त्यांत मात्र शिवणी पांढरकवड्याच्या दक्षिणेस दाखविली आहे !

पान ४९९ वर अप्पासाहेब भोसल्याच्या 'नारो सखाराम' नामक मनुष्याचा उल्लेख आलेला आहे. पण पुढच्याच पानावर त्याचा नुसता "सखारामपंत' असा उल्लेख केलेला आहे. तेव्हां खरें नांव कोणतें ? पान ५०८ वर विंचुरकरांची हकीकत दिली आहे. ती हकीकत देत असतां, "दुसरा सरदार निळकंठराव आबा पुरंदरे हाहि त्याचा समवयस्क जोडीदार होता" हें विचूक वाक्य मध्येंच आल्यामुळें कशी गम्मत होते तें वाचकांनी स्वतःच पाहावें.

पान ४९२ वर हरेश्वरभाईचा उल्लेख करतांना कंसांत नगरशेठ होता कीं काय अशी पृच्छा केली आहे. पण इतिहाससंग्रहांतील जेवढी म्हणून माहिती घेतां येणें शक्य होतें तितकी रियासतकारांनी घेतली असतांना हीच तेवढी गोष्ट कशी चुकली ! कारण इतिहाससंग्रहाच्या एका अंकांत या हरेश्वरभाईचें चरित्रच दिलेलें आहे. त्यावरून तो नगरशेठ होता कीं कोण तें सर्व रियासतकारांना आढळून आलें असतें.

पान ५६. मागें एका लेखांकांत केसोपंत कुंट्यांसंबंधीं सरदेसायांनी दिलेली विपर्यस्त टीप व वंशावळ यासंबंधीं लिहिलेंच होतें. सुदैवानें त्याच कुंट्यांसंबंधीं पान ६४९५ वर खरे यांनी टीप दिली आहे ती आढळली. ती व सरदेसायांची टीप अशीं जोडीने देतों. खरे यांची टीप—" केशव गणेश कुंटे हे थोरल्या मल्हाररावांच्या कारकीर्दीपासून होळकरशाहींतले एक प्रमुख मुत्सद्दी होते. देवासचे कारभारी रा. ब. विष्णुपंत कुंटे व धुळ्यास डॉ. दामोदरपंत कुंटे होते ते व इंदूरचे बाळाभाऊ कुंटे हे सर्व याच केसोपंत कुंट्यांच्या वंशांतले होत. या कुंट्यांचें मूळ गांव नागांव अलिबागेजवळ आहे तें.

दुसरे एक कुंटे नाना फडणविसांचे विश्वासू कारभारी होते ते भिवंडीचे कुंटे. ते निराळे व हे निराळे." आता सरदेसायांची टीप पाहा– ' केशव गणेश कुंटे राहणार नागांव यास तुकोजी होळकरानें पुण्यास आपला बातमीदार म्हणून सन १७६८ त खासगीवाल्याजवळ ठेविलें व मुलगा विष्णु केशव कुंटे (बी. ए. रावबहादूर) देवासचा कारभारी होता. '

—८—

प्रस्तुत परीक्षणाचे गेले लेखांक वाचून वाचकांना सामान्यतःसरदेसायांच्या या इतिहासाची किंमत केवढी आहे, त्याची स्थूल कल्पना आलीच असेल. शितावरून भाताची परीक्षा करतां येते व ती बहुधा बरोबरच असते. तथापि या परीक्षणाच्या बाबतींत नुसतीं शितें चाचपूनच ती परीक्षा केलेली नसून बराचसा भात पानावर उकरून, चावून खाऊनच ती केलेली आहे. वास्तविक विषयच इतिहासाचा असल्यामुळें तपशिलांत शिरावें तितकें थोडें व विचक्षणा करावी तितकी अपुरीच अशी स्थिति आहे. तथापि तसें करावें तर स्थलाभावीं आम्हांस तें अशक्य आहे.

१९२९ सालीं रियासतीच्या मागल्या दोन भागांचें विस्तृत परीक्षण आम्हीं केले होतें. त्या वेळींही आजच्याइतक्याच निर्भीडपणानें रियासतींतले दोष आम्हीं स्पष्टपणें मांडले होते. तेव्हां आम्हीं म्हटलें होतें कीं, " सर्वसामान्य जनतेच्या हातांत इतिहासाच्या बाबतींत तरी सरदेसायांची रियासतच साधार व आजतागायत उपलब्ध हकीकत सुलभतेने देणारी आवृत्ति म्हणूनच खेळविली जाते आणि जोंपर्यंत स्वतंत्र रीतीनें दुसरी एखादी रियासत कोणी लिहावयास घेण्याचा संभव दिसत नाहीं, तोंपर्यंत ज्या त्या अभ्यासकाने स्वतःच्या विशिष्ट दृष्टीनें

* केसरी, ३० सप्टेंबर १९३२

रियासतींत आढळून येणारे दोष, शंका, चुका वगैरे उघडपणें मांडीत राहणें जरूर आहे. पुनरुक्तीची परंपरा, रचनेचा विस्कळितपणा अवतरणांची अतिव्याप्ति किंवा आगंतुकपणा हे व अशा तऱ्हेचे बरेच दोष ह्या खंडांतून घुसले आहेत असें आम्हांला वाटतें." सरदेसायांच्या परस्परविरोधी विधानांची, आपल्या 'अधिक' माहितीचा जेव्हां तेव्हां मीनाबाझार करून दाखविण्याच्या हव्यासाचीं बरींच उदाहरणें तेव्हां दर्शविलींच होतीं. प्रस्तुत खंडांत वर दर्शविलेले दोष व त्यांखेरीज अवांतरहि पुष्कळ चुका आणि विशेषतः इतिहासकार म्हणविणाऱ्याला सर्वस्वी दूषणीय असलेला पक्षपात व दुसऱ्यांच्या उताऱ्यांची गुंतावळ हे दोष आम्हांस अधिक आढळले. अर्थात् त्यांची ओळख करून देणें आम्हांस भागच होतें. सरदेसाई व खरे यांच्या इतिहासलेखन-कुशलतेंतील फरक तेव्हांहि आम्ही असाच स्पष्ट शब्दांनीं मांडलेला होता. कारण आमचा धंदा केवळ 'प्रियरंजनाचा' नव्हता. आमचे शब्द असे आहेत. "मूळ विषय आधी स्वतःच चावून खावा व पचवावा आणि नंतर तो बाल-सुलभ पद्धतीनें मांडावा, ही खरे यांची पद्धति. रेशमाचा किडा हिरव्या पानांचे ढीग आधाशासारखे फस्त करतो खरें, परंतु तो ते पूर्णपणें पचवतो आणि शेवटीं त्याच मुखाने तलम रेशमाचे अखंड सूत्र स्रवूं लागतो. कोष्टी-कोळ्याच्याहि तोंडांतून धागा निघतो आणि एका रात्रींतहि त्याचें जाळे तयार होतें. दिसावयाला त्याच्यासारखें सुंदर काय आहे? परंतु त्याची शाश्वती किती? नुसता जोराने फुंकर घातला तरीहि त्याची छत्री फाटून जावयाची! उलट रेशमाचे कोशावर तरवारीची तीक्ष्ण धारहि बोथट होऊन जाते. खरे यांची रचना त्याच प्रकारची म्हणतां येईल."

'सुसंगति हा गाढवाचा सद्गुण'

विषयाचा व्यवस्थित विकास करणारी मांडणी किंवा रचना आणि

ती मांडणी आकर्षक करणारी सुंदर भाषा या दोहोंचा लेखनशैली या शब्दांत समावेश केला तर, तशी लेखनशैली रियासतकारांना केव्हाच साधली नाहीं, असें म्हणणे भाग आहे. तदेकपरतेने झालेल्या सतत तीस वर्षांच्या परिश्रमांना, माळावर मोटा लावून मळा करण्याइतकेंच फळ आलेलें आहे! त्या बाबतींत आशा करून निराश होण्यांत तरी काय अर्थ? पण विधानांच्या, निष्कर्षांच्या किंवा सिद्धांताच्या बाबतींत तसें म्हणता येत नाहीं. परस्परविरोधी विधानांचा विपुलपणा हा सरदेसायांच्या एकंदर लेखनांतला फार मोठा दोष आहे असें आम्हांस वाटतें. १९२९ सालच्या रियासतीच्या विस्तृत परीक्षणांत व चालू परीक्षणाच्या लेखाकांत त्याचीं 'भरपूर' उदाहरणें दिलेलीं आहेतच. या बाबतींत Consistency is the virtue of an ass किंवा सुसंगति हा गाढवाचा सद्गुण, ही धोक्याची सूचना सरदेसायांनीं सतत डोळ्यांपुढें ठेवलेली असावी असें वाटतें. आणि जणुं कांहीं तो दोष टाळावा म्हणूनच आपल्या ग्रंथांत परस्परविरोधी शेऱ्यांची, विधानांची, निष्कर्षांची आणि हकीकतींची त्यांनीं खैरात केलेली असावी. यामुळें मौज मात्र अशी झाली आहे कीं, एखाद्या विधानाचा किंवा निष्कर्षाचा सुरुंग त्यांनीं ठासला कीं लगेंच त्यांनींच केलेल्या उलट विधानांचा आधार देऊन त्यांच्या सुरुंगाला खुशाल 'टाळें' पाडावें! एखाद्या विद्यार्थ्यानें कोणा ऐतिहासिक व्यक्तीला सडकून दोष देऊन प्रश्नाचें संपूर्ण मार्क मिळविले तर दुसऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला त्याच सरदेसायांच्या आधारावर त्याच व्यक्तीचें परंतु अगदीं तद्विरुद्ध वर्णन करून संपूर्ण मार्क मिळविणें पुष्कळ उदाहरणांत सहज शक्य आहे! सुधारक सुशिक्षित आणि दुर्धारक शास्त्री एकाच स्मृतिग्रंथांतून प्रमाणें काढून आपापले अगदीं परस्परविरोधी मुद्दे सिद्ध करतात. तीच स्थिति रियासतीच्या बाबतींत पुष्कळ वेळां झालेली आढळून येते; आणि म्हणून खऱ्यांच्या इतिहासाला कोठें 'श्रुतिप्रामाण्य' प्राप्त झालेलें असलें तर सरदेसायांच्या रियासतींना निराळ्या अर्थानें तरी 'स्मृतिप्रामाण्य' प्राप्त

व्हावयाला कांहीं हरकत नाहीं ! गोतास काळ होणारे विरोधी विधानांचे कुऱ्हाडीचे दांडे सरदेसायांच्या बाभुळवनांत किती तरी सांपडतात ! दारू प्यालेले यादव जसे आपापसांतच लट्ठालट्ठी करून सगळे नाश पावले, त्याप्रमाणें त्यांच्या विधानांची स्थिति आहे. मत कोणाचें कांहींही असू शकेल. त्याबद्दल वाद नाहीं. परंतु तें मत सुसंगतपणें व अविकृतपणें मांडलें गेलें तरच तें विचारणीय असतें. या पानावर अमुक मत तर त्या पानावर अगदीं उलट. आज हें, उद्यां तें, अशा रीतीनें रंग पालटणाऱ्या 'रंगामौजी' मतांना आणि सिद्धांतांना कोणी कवडीचीही किंमत देणार नाहीं. रियासतींतून हा प्रकार इतका प्रकर्षानें आढळून येतो कीं, क्षणो-क्षणीं रंग पालटणाऱ्या सरड्यालाहि आश्चर्य वाटावें. असल्या मतरूपी सर-ड्यांची धांव संकलनाच्या परड्याच्या कुंपणापलीकडे जाऊं नये, हेंहि ठीकच आहे.

ही शोचनीय स्थिति येण्याचें एक मोठें कारण आमच्या मतें हेंच कीं, सरदेसायांनी नुसते उतारे एकत्र जोडण्याची आणि सांगाडा तयार करण्याची खटपट केली. जितका वेळ खाण्यांत जावा, त्याच्या दुप्पट तरी वेळ रवंथ करण्यात जातो, म्हणूनच ते गवताचे घांस पचतात व अंगीं लागतात. तसा वेळ सरदेसायांना मिळाला नाहीं किंवा "चोखाळ साफसुफी करण्याइतका दम" त्यांना निघाला नाहीं किंवा कसेंही असो, त्यांच्या रियासतींतून हा दोष प्रारंभापासून शेवटापर्यंत फार मोठ्या प्रमाणावर शिल्लक राहिलेला आहे आणि त्यामुळेंच नवें क्षेत्र आलें कीं नवा संकल्प त्यांनी करून टाकला आहे.

सरदेसाई लिहितात "पुष्कळ लोक माझ्या रियासतीवर अवलंबून निर्धास्त राहतात. यामुळें मला आपली जबाबदारी विशेष जड वाटते." दुसरा तसा एखादा इतिहास उपलब्ध नाहीं, तेव्हां सामान्य वाचकांनीं

निर्धास्त राहावें हें ठीकच. मात्र त्यांनीं निर्धास्त राहण्याइतकी सरदेसायांची रिसायत शुद्ध, अविकृत, समतोल नाहीं अशी धास्तीच आम्हास वाटत असल्यामुळें निस्स्पृह टीकेचें काम करावें लागलें. तशी ती जबाबदारी त्यांनीं ओळखली असती, तर प्रश्नच नव्हता. या टीकेच्या सुरुवातीसच आम्ही असें म्हटलें होतें कीं, 'दोषदर्शनाचें काम निस्स्पृहपणें यथास्थित करावयाचें, तर त्यांत टीकेचा कडवटपणाही येणें अपरिहार्यच आहे.'

कंत्राटदाराची बखार

प्रस्तुत टीकेच्या प्रारंभींच आम्ही म्हटलें आहे कीं, वसई-मोहिमेनंतरचा जो भाग सरदेसायांनीं वाचकांना प्रथम एकत्र उपलब्ध करून दिला त्याबद्दल ते सर्वथैव स्तुतीस पात्र आहेत. मात्र त्याचाही अर्थ असा नव्हे कीं, तो एकत्र आणला हें काम त्यांनीं केलें म्हणून तें चांगल्या प्रतीचें झालें. तो इतिहास एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांनीं केला हें निःसंशय अभिनंदनीयच होय. पण तो प्रयत्न चांगलाच झाला असें म्हणण्याची जबाबदारी कांहीं त्यामुळें येत नाहीं. किंबहुना कष्टाबद्दल संपूर्ण श्रेय दिलें, तरी कौशल्याबद्दल येथें नापसंतीच दर्शवावी लागेल. वसई-तहानंतरच्या ऐतिहासिक तपशिलांच्या ग्रथनाबद्दल इतकेंच म्हणतां येईल कीं, अस्सल साधनें उपलब्ध नसतांना बखरींना पहिल्या प्रतींचें प्रामाण्य प्राप्त होणें रास्त आहे; आणि त्या अर्थानें तें रियासतीस प्राप्त होईलहि. यापुढील भागांत यशवंतराव होळकरासंबंधीं प्रकरण किंवा सातारकर छत्रपतीसंबंधींचें प्रकरण वगैरे कांहीं भाग अगदीं नवीन म्हणून मनोरंजक आहेत यांत शंका नाहीं. पण म्हणून त्यांची मांडणी व्यवस्थित शुद्ध झाली आहे असें नव्हे. मोठ्या व्यापाचीं माणसें आपल्या प्रत्यहीं चालणाऱ्या खंडोगणती पत्रव्यवहारांतून वेळोवेळीं निरनिराळ्या तऱ्हेचे व कमी अधिक महत्त्वाचे परंतु उपयुक्त कागदपत्र निराळे काढून तारेस

लावून ठेवतात. त्यांत हिशेबी बिलें, पावत्या, जाबजबाब, नवीन कामाचे अदमास, महत्त्वाचीं पत्रें वगैरे सर्व कागद असतात. पण तसे ते एकत्र एका तारेला जोडले, म्हणून कांहीं तो इतिहास होऊं शकत नाहीं. म्हटलें तर त्यांत इतिहासच असतो. पण ते सगळे कागदपत्र वाचून पचवून त्यांतली माहिती एकत्र लक्षांत आणून, त्यावरून कोणीं हकीकत लिहिली तर तो इतिहास. जंत्रीचा किंवा शकावलीचा उपयोग इतिहासवाचकास कमालीचा होतो हें खरें; पण जंत्री किंवा नुसती शकावलि म्हणजे इतिहास खचित नव्हे. जंत्रीप्रमाणेंच या पुस्तकाचा उपयोग इतिहास प्रेमी लोकांना हरहमेश करावाच लागेल. परंतु खरोखर तो इतिहास या उच्च अर्थानें नव्हे तर तो इतिहास समजण्याचें एक साधन म्हणून. 'इतिहास-मंदिर' सरदेसायांनीं उभारलें असें स्तुत्यर्थानें म्हणावें, त्याला कांहीं हरकत नाहीं. परंतु स्पष्ट बोलावयाचें तर रिसायती म्हणजे त्या पुढें होणाऱ्या मंदिराच्या कामाकरितां सांठवलेल्या मालाची एका कंत्राटदाराची भली मोठी वखार असेंच म्हटलें पाहिजे. ही जाणीव सरदेसायांनाहि मनांतून आहे. कारण त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "तपशील मीं एकत्र केले आहेत. पुढेंमागें एखादा गिबन निर्माण होऊन तो त्यावरून इतिहास लिहिण्याचें काम पुरें करील."

खरेशास्त्री यांनीं प्रस्तावनांच्या रूपानें १७६१ पासून १८०० पर्यंतचा सुमारें चाळीस वर्षांचा इतिहास लिहिला. तो एकत्र केला तर अदमासें दीड-दोन हजार पानें इतका मोठा होईल. खरे यांनीं आपल्या प्रस्तावना स्वतः संशोधिलेल्या साधनग्रंथांना वेळोवेळीं जोडल्यामुळें त्या साधनग्रंथां-बरोबरच आता दुर्मिळ झालेल्या आहेत. यामुळें इतिहासाभ्यासकांखेरीज सामान्य वाचकांना त्यांची माहितीच नसते; शिवाय खऱ्यांच्या प्रस्ता-वनांतील इतिहास कोणी एकत्र छापलेला नसल्यामुळें चटकन कोणासहि रियासतींतील मजकूर व खऱ्यांचा मजकूर एकत्र पडताळून पाहतां येत

नाहीं. यामुळें कोणीं तसें दाखविलें नसलें, तरी सरदेसायांनीं खऱ्याच्या प्रस्तावनांवरून पुष्कळसा मजकूर घेतला ही गोष्ट कांहीं खोटी ठरत नाहीं. सरदेसाई सगळ्यांचेच उतारे घेऊन एकत्र जोडतात. त्यांत पंक्तिप्रपंच फारसा नसतोच. पण पेशवाईच्या चाळीस वर्षांचा विस्तृत इतिहास खरे यांनीं एकत्र ऐतिहासिक लेखसंग्रहांत लिहिलेला असल्यामुळें त्यांचे सारांश किंवा उतारे सरदेसायांनीं अधिक घ्यावेत हें साहजिकच आहे. खरे यांना नुसते सारांश काढणारे म्हणून आतां कोणी कितीहि प्रतिकारबुद्धीनें तुच्छता दर्शविली, तरी त्या सारांशांचेच सारांश किंवा नकला सरदेसायांना अनेक ठिकाणीं करण्याची पाळी आली यावरून काय अनुमान सिद्ध होतें तें त्यांनींच पाहावें. 'बुंदसे गयी तो हौदसे नहीं आती' ही म्हण उलटी करून आम्ही म्हणतों कीं, खरे यांच्या चुकांचे बिंदू शोधून काढून दाखविण्याचा जरी आतां कोणी कितीहि प्रयत्न केला, तरी खऱ्यांच्या मजकुरांचे हौद भरून नेण्यांत रियासतकारांची जी अपात्रता सिद्ध झाली ती त्या थेंबांनीं कधींहि भरून निघणारी नाहीं !

* बुडत्याचा पाय खोलांत

केसरीच्या तीन अंकांतून आलेले रावसाहेब सरदेसायांचें उत्तर वाचकांनी वाचलेंच असेल. त्या उत्तरांत रावसाहेबांनी मुद्द्याचे प्रश्न टाळून अवांतर गैरलागू विधानेंच पुष्कळ केलीं आहेत. त्या सर्वांना एकत्र आणून उत्तर द्यावयाचें, तर फिरून केसरीची बरीच जागा अडवावी लागेल. म्हणून याखालीं त्यांचा मुख्य आक्षेप व तेथें लगेच त्याला आमच्या उत्तराचा छेद देऊन आम्ही मोकळे होणार आहों.

(१) **आक्षेप**—या आठ लेखांपासून मला तर काडीचा फायदा

* केसरी, ता. २२ नोव्हेंबर १९३२. रा. सा. सरदेसायांनी केसरींतील परीक्षणास तीन लेखांक लिहून उत्तर दिलें; त्याला प्रत्युत्तर 'बुडत्याचा पाय खोलांत अथवा रावसाहेबांचे लंगडे आत्मसमर्थन' या लेखमालेंत देण्यांत आलें.

झाला नाहींच, मग केसरीच्या इतर वाचकांस काय झाला असेल तो त्यांचे ते जाणोत.

उत्तर—अगदी सरदेसायांच्या शब्दांनीच पाहिलें, तरी ते परस्पर-विरोधी बोलतात. कारण त्यांच्या तिसऱ्या लेखांकांत त्यांनी विंचूरकरांच्या वयासंबंधींची व माधवराव जाधवरावासंबंधींची आपली चूक सपशेल कबूल करून आमचे आभारही मानले आहेत. तेव्हां काडीइतका नव्हे तरी दोन काड्यांइतका तरी त्यांचा फायदा झालाच आहे! पण हें सर्व त्यांच्याच काडीवजा शब्दांनीं उत्तर झालें. सरदेसाई म्हणतात कीं, माझ्या-कडे केसरीविरुद्ध अनेक लोकांचीं पत्रें आलीं. आमच्याकडेही त्याप्रमाणें तशींच अनेक पत्रें आलीं आहेत. त्यांत त्या त्या वाचकांनीं इतिहासा-भ्यासी लोकांचा फारच फायदा झाल्याचें नमूद केलें आहे. सरदेसायांना या परीक्षणाचा कांहींएक फायदा झाला नाहीं असेंच म्हणावयाचें असेल, तर पुढील आवृत्तीच्या वेळीं आम्ही दाखविलेल्या सगळ्या चुका त्यांनी तशाच खुशाल कायम ठेवाव्या ! मात्र एका अर्थानें सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणें त्यांचा कांहीं फायदा झाला नाहीं खराच ! तोटा मात्र झाला आहे ! कारण जो दुसऱ्याचा मजकूर त्यांच्या नांवावर खपला होता, तो आतां खपणार नाहीं, यामुळें त्यांचा तोटाच झाला नव्हे तर काय ?

(२) **आक्षेप**—सरदेसाई भासवितात कीं, नाना फडणवीस व परशुरामभाऊ हेच जणुं काय त्यांच्या पुस्तकाचे प्रतिपाद्य विषय असें समजून आम्ही टीकेचा मारा केला आहे.

उत्तर— सरदेसाई चूक विधान करतात. नाना फडणविसासंबंधीं जेथें त्यांनीं पुरावा नसतां दोष दिला तेथें किंवा परशुरामभाऊच्या नीच वधाबद्दल किंवा त्यानें केलेल्या छत्रपतींच्या सिंहासनाच्या अमर्यादेबद्दल सरदेसायांनीं सत्यापलाप करून अवास्तव लिहिलें तेथें तेवढ्या मुद्द्या-पुरतेंच आम्हीं लिहिलें आहे.

(३) **आक्षेप**—सरदेसाई म्हणतात, या पुस्तकांत इंग्रज–मराठ्यांचीं दोन प्रचंड युद्धें होऊन शिवाजीमहाराजांनीं निर्माण केलेली हिंदुपदपादशाही कोसळून पडली, त्याची भरपूर मीमांसा सर्व साधक-बाधक मुद्द्यांसह या पुस्तकांत प्रामुख्यानें केली आहे. नंतर आपल्या पुस्तकांत आलेल्या विषयांची जाहिरातवजा यादी देऊन ते लिहितात—" असा हा हृदयंगम व बहारीचा राष्ट्रोपजीवी (?) भाग या पुस्तकांत नवीनच रचून मांडण्यांत आला. "

उत्तर—या काळांतील इतिहास हृदयंगम, बहारीचा व ' राष्ट्रोपजीवी ' (?) आहे, हें जरी क्षणभर मान्य केलें तरी मूळ विषय हृदयंगम असणें निराळें व तो हृदयंगम करून सांगणें हें निराळें. तो हृदयंगम तऱ्हेनें सरदेसायांना मांडतां येत नाहीं, इतकेंच आम्हीं म्हटलें आहे. शिवाय तो नवीनच रचून मांडण्यांत आला, हें साफ खोटें असें आम्ही म्हणतों. कारण वसई तहापर्यंतचा जो इतिहास त्यांच्या या भागांत आलेला आहे, तो बहुतेक खऱ्यांच्या आयत्या तयार प्रस्तावनांवर पुष्कळसा हात मारून करण्यांत आलेला आहे, असें आम्ही स्पष्ट म्हटलेंच आहे. पांचपन्नास समानस्थळें खांद्याला खांदा लावून उभीं केलेलींच आहेत; व आणखीहि अशीं स्थळें उभी करूं शकूं असा आम्हास विश्वास आहे.

(४) **आक्षेप**–सरदेसाई म्हणतात कीं, आम्हीं फक्त केवळ कोना-कोपऱ्यांतले चारदोन अप्रस्तुत मुद्रणप्रमाद दाखविले.

उत्तर—चुका खोडून काढतां येत नसल्या, म्हणजे असल्याच विधानांचा आश्रय घ्यावा लागतो! मुद्रण–प्रमाद कोणता हें सरदेसायांनीं शिकवावयास नको. कारण आम्ही आपल्या तिसऱ्या लेखांकांत १६१ पानावरील त्यांची चूक देतांना चारशें-बद्दल सरदेसायांनीं चार लिहिलें आहे, त्याविषयीं लिहितांना म्हटलें आहे. ' पण या चुकीचें खापर छाप-

खान्यावर फोडण्याची सवड रियासतकारांस देऊन पुढें पाहूं.' यावरून मुद्रणदोषच असेल तर तो क्षम्य मानावा हें आम्हांसही कळतें. व तो तसा आहे तेथें आम्हीं तसें म्हटलेंहि आहे. पण गंमत अशी आहे कीं, आम्हीं दाखविलेल्या चुका सगळ्या डोळेफोड आहेत. त्यांत मुद्रण-दोषाच्या चुका वगैरे मुळींच येत नाहींत.

(५) **आक्षेप**—सरदेसाई म्हणतात कीं, केसरीच्या टीकेनें सभ्यपणाची मर्यादा सोडली व विषयाची हानि केली. केसरीचे परीक्षण गलिच्छ भाषेंत लिहिलेलें आहे.

उत्तर—या बाबतींत सरदेसायांच्यापेक्षां इतर वाचकांचें मतच आम्ही ग्राह्य मानलें पाहिजे. सभ्यपणाची मर्यादा कोठे सुटते ? व्यक्ति-विषयक गैरलागू आरोप जर कांहीं आम्ही सरदेसायांवर केले असते, तर त्यांचें म्हणणें बरोबर होतें. पण इतिहासकार या त्यांच्या भूमिके-संबंधींच केवळ आम्ही लिहिलेलें आहे; व जें कांहीं लिहिलें आहे तें सर्व प्रमाणें दाखवून लिहिलें आहे. सरदेसाई निःपक्षपाती इतिहासकार नाहींत, त्यांना लेखनशैली नाहीं, त्यांनी स्वतंत्र परिश्रम न करतां दुसऱ्याचे उतारे पुष्कळसे जोडून दिले आहेत वगैरे जे जे आरोप आम्ही केले आहेत ते अजूनही करतोंच. त्यांत सभ्यपणा सुटतो असें आम्हास वाटत नाहीं. आमच्या टीकेने विषयाची हानि झाली असें सरदेसायांखेरीज इतर कोणीहि म्हणणार नाहीं.

(६) **आक्षेप**—सरदेसाई म्हणतात, "ऐकावें जनाचें करावें मनाचें' हाच न्याय मी बहुधा पाळीत आलों आहें. वर्तमानपत्री टीकेस उत्तर देण्याचा प्रघात गौण मानला जातो."

उत्तर—सरदेसाई वरील म्हणीप्रमाणें वागते, तर तें त्यांना खरो-खरीच फायदेशीर झालें असतें; कारण आतां त्यांची झांकलेली सवा

लाखाची मूठ उघडी पडणार ! त्यांच्या कांगावखोर प्रत्युत्तरामुळें आतां आम्हालाही त्यांच्या मुठी उघड्या करून दाखवाव्या लागतील.

(७) **आक्षेप**—ते लिहितात ‘ परीक्षण पुरें झाल्याचा शिष्टाचाराचा उल्लेखहि शेवटीं आला नाहीं. ’

उत्तर—सरदेसायांनीं फारच मोठा आक्षेप आणला खरा ! आमच्या शेवटच्या लेखांकाची सुरुवातहि जो कोणीं वाचून पाहील त्याची अशी सहज खात्री होईल कीं, तो शेवटचाच लेखांक आहे. त्याच्या सुरुवातीसच आम्हीं असें म्हटलें आहे कीं, ‘ प्रस्तुत परीक्षणाचे गेले लेखांक वाचून वाचकांना सामान्यतः या इतिहासाची किंमत केवढीं आहे, याची स्थूल कल्पना आलीच असेल. ’ शिवाय त्या लेखांत सरतेशेवटीं सरदेसायांची लेखनशैली वगैरे गुणदोषासंबंधीं सर्व मजकूर आलेला आहे तो परीक्षणाचा समारोपच होय, हें कोणासहि कळेल. आता हें खरें कीं, तें परीक्षण पुरें झाल्यावर त्याच्या खालीं ‘ समाप्त ’ अशीं अक्षरें मात्र आम्हीं छापलीं नाहींत ! पण ‘ परीक्षण पुरें झालें का ’ अशी पत्रानें त्यांनीं चौकशी केल्यावर आम्हीं तें पुरें झालें असें कळविल्याचें तेच सांगतात. मग आम्ही शिष्टाचार तो कोणता मोडला ? उलट सदरहू परीक्षण म्हणजे केसरीचा ‘ अभिप्राय ’ असतांना सरदेसायांना त्यावर उलट उत्तर देण्याची मुद्दाम सवड दिली हा दुसरा अधिक स्पृहणीय शिष्टाचार आम्ही पाळला असें होत नाहीं काय ?

(८) **आक्षेप**—सरदेसाई म्हणतात कीं, माझ्या रियासतीचा निम्मा भाग सर्वथा खऱ्यांच्या पुस्तकाची नक्कल करून घेतला हें साफ खोटें आहे.

उत्तर—आम्ही आमच्या पहिल्या लेखांकात काय म्हटलें तें पहा. “सरदेसायाची रियासत म्हणून शिक्का मारलेल्या ह्या पोत्यांत कै. खरे

यांनी निवडून, पाखडून, सडून ठेवलेल्या धान्याचा गल्लाच मुख्यतः ठेंचून भरलेला आहे. त्या सहाशें पानांच्या भागांत वसईतहापर्यंतचा मजकूर सुमारें अडीचशें-तीनशें पानें इतका आहे; आणि तो बहुधा सर्व खरेशास्त्री यांच्या तयार प्रस्तावनांवरून जवळजवळ उतरून घेतला आहे." नंतर एके ठिकाणीं सरदेसायांनी खऱ्यांचें ऋण कसें कबूल करावयास पाहिजे होतें, तें दाखवितांना त्यांच्या तोंडीं आम्हीं असे शब्द घातले आहेत कीं, 'या पुस्तकांतील पहिलीं सुमारें तीनशें पानें त्यांच्या प्रस्तावनांचा क्रमवार सारांशच आहे, हें अभ्यासी वाचकांच्या सहज लक्षांत येईल.' या पहिल्याच लेखांकांतील उताऱ्यावरून 'नक्कल', 'सारांश' हे शब्द कशा अर्थानें उपयोजिलेले आहेत, तें वाचकांच्या लक्षांत येईलच. सरदेसाई भासवितात कीं, अगदीं शब्दाला शब्द अशी कॉपी मी केली असें केसरीचें म्हणणें. पण आम्ही म्हणतों तसलीं नकलेचीं उदाहरणें आम्ही पांचपन्नास तरी दिलीं आहेत. त्यासंबंधीं एक शब्दही न बोलता सरदेसाई मोघम 'मी नक्कल केली नाहीं' असें ठासून म्हणतात. याकरितां या लेखांकाच्या शेवटीं आम्ही मुद्दाम खऱ्यांच्या व सरदेसायांच्या पुस्तकांतले कांहीं उतारे एकमेकांशीं ताडून पाहण्याकरितां देणार आहोंत ते वाचकांनी पाहावे.

(९) **आक्षेप**—सरदेसाई लिहितात, "खऱ्यांचें सर्व आधान पटवर्धनी दप्तर. १८०१ पासून पुढें पटवर्धनांचें महत्त्व संपुष्टांत येताच खऱ्यांच्या कागदांचेंही महत्त्व संपतें. व त्यापुढील भागास खऱ्यांचा उपयोग होत नाहीं."

उत्तर—असें जर आहे तर मग खऱ्यांच्या तेराव्या व चौदाव्या भागांतला मजकूर सरदेसायांनी का उतरून घेतला? वसईच्या तहाच्या वेळच्या प्रकरणांत व हडपसरच्या लढाईच्या हकिकतींत खऱ्यांच्या आयत्या प्रस्तावनांवरून सरदेसायांनी कसा मजकूर घेतला आहे, तें आम्ही पूर्वी दाखविलेंच आहे.

(१०) **आक्षेप**—आपण मोठा पेंच टाकीत आहोंत, अशा झोकाने रावसाहेब म्हणतात कीं, “ खऱ्यांचे मजकुराची मी नक्कल केली असें केसरीकार एकीकडे म्हणतात व फिरून उलट तेच म्हणतात कीं, खऱ्यांच्या इतिहासास सर्वथा उलट निष्कर्ष मी काढला. ज्या प्रकरणांत मी नाना फडणविसाला शिव्या दिल्या व छत्रपतिद्वयाची निष्कारण तरफदारी केली, अशी माझी नालस्ती टीकेंत दाखविली आहे, ते सर्व भाग मीं खऱ्यांवरून उतरून घेतले असें कसें ठरेल ? ” आणि पुढें परस्परविरोधी विधानांचा आरोप आमचेवरच उलटविल्याच्या झोकांत ते लिहितात, ‘ सर्व परीक्षण लिहून पुरें झाल्यावर मग शांतचित्ताने मागचें पुढचें अनुसंधान राखून तें प्रसिद्ध झालें नाहीं; त्याचें प्रत्यंतर हें. ’

उत्तर—आमचें म्हणणें एवढेंच कीं, रावसाहेबांनी निदान उत्तर देतांना तरी आमचा पहिला लेखांक काळजीपूर्वक वाचावयास पाहिजे होता. खऱ्यांचें ऋण कसें कबूल करावें, हें दाखवितांना त्यांच्या उतरून घेतलेल्या मजकुराबद्दल आदर दाखवून सरदेसायांनी काय म्हणावयास पाहिजे होतें, तें आम्हीं दिलें आहे. तें असें कीं “ खऱ्यांच्या लक्षांत न आलेले किंवा खऱ्यांच्यानंतर मला उपलब्ध झालेले नवीन तपशील मी त्यांत ठिकठिकाणीं दाखल केलेले आहेत; त्यांचा मजकूर मी घेतला आहे. त्यांचे तर्क, निर्णय किंवा प्रमेयें स्वीकारलेलीं नाहींत. सुसंगत ऐतिहासिक मजकुराचा पाण्याचा पाट खऱ्यांचा आहे, परंतु शेवटीं निष्कर्ष किंवा प्रमेयरूपी खऱ्यांच्या गोमुखांतून तें पाणी न सोडतां तेथें मी माझें मुख त्याला जोडलेलें आहे, हा मोठा फरक आहे.” यावरून रावसाहेबांनीं खऱ्यांच्या उलट निष्कर्ष काढला किंवा कांहीं नवीन माहिती दिली म्हणून बाकीचा भाग खऱ्यांच्यावरून घेतला नाहीं, असें सिद्ध होऊं शकत नाहीं. सरदेसाई म्हणतात, ‘माझें जें मत आहे त्याच्या विरुद्ध मताचें प्रदर्शन करणारा मजकूर मी कसा लिहीन ? ’ पण बाळोजी

कुंजराच्या बाबतींत सरदेसायांची झालेली फजिती आम्ही पहिल्याच लेखां-कांत दिली आहे, ती ते विसरलेसें दिसतें. खऱ्यांचें मत एक, सरदेसायांचें भलतेंच असें असतां, खऱ्यांचा मजकूर त्यांनीं तेथें कसा उतरून घेतला आहे हें पहिल्या लेखांकाच्या शेवटावरून कळेल. मी घेतलें नाहीं, असें नुसतें म्हणून काय उपयोग ? ते जोंपर्यंत पुरावा देत नाहींत तोपर्यंत तें सर्व फुकट.

(११) **आक्षेप**—आम्ही जी खऱ्यांच्या लेखनशैलीची स्तुति केली आहे व त्यांच्या सुंदर, सुसूत्र, तपशीलवार व उत्कृष्ट हकीकतीबद्दल, कार्यकारणभावाच्या व्यवस्थित सांखळीबद्दल, वर्णनाच्या सुसंगतपणाबद्दल, ऐतिहासिक सत्याविषयीच्या कसोशीबद्दल व आत्मीयतेनें तद्रूप झाल्यामुळें निर्माण झालेल्या त्यांच्या वर्णनशैलीबद्दल जें लिहिलें आहे त्याचा, उतारा घेऊन सरदेसाई लिहितात, " या लिहिण्याचा मतलब काय याचा मला तर कांहीं बोध होत नाहीं. "

उत्तर—त्याचा मतलब आणि बोध इतकाच कीं, खऱ्या इति-हासकाराला आवश्यक असलेले बरेच गुण खऱ्यांच्या जवळ आहेत, व तितकीच आवश्यक अशी उत्कृष्ट भाषाशैलीही आहे; आणि उलट यांपैकीं सरदेसायांजवळ कांहीं देखील नाहीं ! म्हण अशी आहे कीं, 'कळतें पण वळत नाहीं.' उलट येथें सरदेसायांची स्थिति मात्र 'वळतें पण कळत नाहीं' अशी झालेली दिसते. खऱ्यांचा मजकूर चांगला म्हणूनच तो उत-रून घेण्याचें त्यांना वळतें, पण त्यांचे चांगले गुण काय, हें मात्र सांगि-तले तर ते त्यांना कळत नाहींत.

(१२) **आक्षेप**—'खऱ्यांच्या साधनांचा फिरून स्वतंत्रपणें अभ्यास करण्यांत फुकट वेळ घालविण्यासारखें आहे.' हें वाक्य खऱ्यांचें ऋण सरदेसायांनी कसें कबूल करावें तें दाखविताना आम्हीं उपयोजिलें

आहे. तेवढेंच निराळें दाखवून फिरून स्वतंत्र इतिहास सरदेसायांनी कशाला लिहिला, असें आम्हीं भासविलें, असें दाखविण्याचा सरदेसायांचा रोख.

उत्तर—पण त्या वाक्याचा हेतु इतकाच कीं, आपण एवींतेवीं खऱ्याचा मजकूर घेतला आहेत खरा. मग त्याचें समर्थन तरी असें करा, हें दर्शविण्याकरितांच तें वाक्य त्यांच्या तोंडीं घातलें आहे.

(१३) **आक्षेप**—" आत्मीयतेनें तद्रूप झालेला इसम इतिहासकाराच्या निःपक्षपाती कसोटीस किती उतरेल, हें चिन्त्यच आहे, " असें म्हणून सरदेसाई म्हणतात कीं, " खरे निःपक्षपाती इतिहासकार नाहींत."

उत्तर—पण खऱ्यांचेंच उदाहरण दाखवून आम्ही म्हणतों कीं, या आत्मीयतेनें पेशवाईशीं ' तद्रूप झालेल्या ' खऱ्यांनींच ' मराठे व इंग्रज ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत इतके दोष व ते इतक्या निर्भीडपणें मांडले आहेत कीं, त्याबद्दल कौतुक वाटतें. आत्मीयतेनें तद्रूप झालेल्या इतिहासकारानें दाखविलेले दोषच विचारणीय असतात. लोकांचे उतारे नुसते जोडण्यांत कोणी तद्रूप होऊंच शकणार नाहीं.

(१४) **आक्षेप**—तात्यासाहेब केळकरांनीं खऱ्यांच्या लेखसंग्रहाची गणना मराठींतील दहा उत्कृष्ट पुस्तकांत केली आहे. म्हणून माझ्यावर हें कुभांड रचण्यांत आलें आहे.

उत्तर—सरदेसायांचें हें विधान अगदींच अवास्तव व गैरलागू आहे. केळकरांचें मत गेल्या ऑगस्टांत एका मुलाखतींत प्रसिद्ध झालें. आमची खऱ्यांची व सरदेसायांची तुलना १९३० सालीं प्रसिद्ध झाली आहे. शिवाय केळकरांसारखे आमचें मत आहे असें जरी म्हटलें तरी आम्हीं तें प्रमाणें देऊन मांडलें आहे. नुसतेंच, 'मला अन्याय झाला' असा पोकळ कांगावा करण्यांत अर्थ काय ?

(१५) **आक्षेप**—" भाषासौंदर्य आणि शब्दार्थालंकार यासंबंधाने इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, सुंदर भाषा व सुंदर इतिहास या दोन गोष्टी भिन्न आहेत. दोहोंचा मिलाफ झाला तर चांगला; पण भाषेसाठी इतिहासाची हानि करणें हा त्या शास्त्राचा अपमान करणें होय. सुंदर इतिहास पुष्कळदा खडतरच असतो. " नंतर आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ राजवाड्यांच्या प्रस्तावनांचा उल्लेख करून " राजवाड्यांस चांगली सुबोध भाषा लिहितां आली नसती असें नाहीं. पण शास्त्राचा विचार करतांना कानांस गोड कडू काय लागेल, याचें अवधान ठेवूं लागल्यास इतिहासाची हानि झाल्याशिवाय राहत नाहीं " असें सरदेसाई म्हणतात.

उत्तर— सरदेसायांनी मुद्दाम गोंधळ केला आहे. त्यांना लेखनशैली नाहीं म्हणून केवळ त्यांचा इतिहास टाकाऊ, असें आम्हीं म्हटलेलें नाहीं. त्यांचा इतिहास प्रमादांनी कसा फुललेला आहे, याचीं उदाहरणें आम्हीं आमच्या परीक्षणांत वेळोवेळीं निराळीं दिलेलीं आहेत. भाषाशैलीशीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं. त्यांचा इतिहास, भाषाशैलीचा प्रश्न वगळूनसुद्धा, जर शुद्ध, समतोल, अविकृत असता, तरीहि त्यांची आम्ही स्तुतीच केली असती. आमचा म्हणण्याचा अर्थ इतकाच कीं, इतिहासलेखकास आवश्यक असणारे गुण—कांहीं महत्त्वाचे गुण—त्यांच्या ठिकाणीं आम्हांस दिसले नाहींत.शिवाय तदभावीं निदान भाषाशैली तरी चांगली असावी, तर तीहि आम्हांस दिसली नाहीं. सरदेसाईच कबूल करतात कीं, सुंदर इतिहासाला सुंदर भाषेची जोड मिळेल तर फार चांगलें. परंतु तेवढ्याकरिता इतिहासाची हानि होऊं देऊं नये. वास्तविक यांतच आपल्याला लेखनशैली नाहीं, अशी सरदेसायांनींच कबुली दिलेली आहे, हें एकपरी बरें झालें ! आम्हांस आश्चर्य वाटतें तें मात्र त्यांनीं केलेल्या राजवाड्यांविषयींच्या विधानासंबंधी. लेखनशैलीच्या बाबतींत राजवाड्यांना आपल्या पंक्तींत ओढण्याची किंवा आपण राजवाड्यांच्या पंक्तींत बस-

ण्याची जी चलाखी सरदेसाई करूं पाहतात, ती आम्हांस खरोखरच हास्यास्पद वाटते. राजवाड्यांना लेखनशैली नाहीं असें म्हणणें म्हणजे सरदेसायांना लेखनशैली आहे म्हणण्याइतकेंच हास्यास्पद होईल! राजवाड्यांची लेखनपद्धति अत्यंत तेजस्वी, वक्तृत्वपूर्ण आणि एक तऱ्हेनें अननुकरणीय आहे. त्यांच्याशीं सोयरीक करूं पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सरदेसाई मेकॉलेचीं व इतर उदाहरणें देऊन म्हणतात कीं, त्यांचे इतिहास भाषेच्या दृष्टीनें अप्रतिम आहेत; पण इतिहासाच्या दृष्टीनें अगदी त्याज्य आहेत. आम्हीं तरी कोठें नाहीं म्हणतों? परंतु त्याच्याचबरोबर उत्कृष्ट ऐतिहासिक सत्य व उत्कृष्ट भाषाशैली यांचा संगम असलेले गिबनसारखे इतिहासकारही प्रसिद्धच आहेत. कै. वा. खरे यांच्याजवळ हे दोनही गुण होते असें आमचें म्हणणें आहे. उलट सरदेसायांजवळ हे दोनही गुण फारच अल्पप्रमाणांत आहेत, असें आमचें प्रामाणिक मत आहे.

(१६) **आक्षेप**—" खऱ्यांच्या प्रस्तावनाच जेथें मूळ पत्रांतील नकलांनी भरलेल्या आहेत, तेथें मीं घेतलेले उतारे मूळ पत्रांचे आहेत कीं प्रस्तावनांचे आहेत, हें ठरविणें शक्य नाहीं. बहुधा प्रस्तावनांतील उतारे मीं आपल्या विवेचनांत घेतलेच नाहींत."

उत्तर—सरदेसायांच्या धाष्टर्याची कमाल आहे! आपण लिहिलेल्या पुस्तकांतले उतारे खऱ्यांच्या प्रस्तावनेंतील कीं मूळ पत्रांतील, हें सरदेसायांना स्मरत नाहीं काय? ठीक आहे. त्यांना आम्ही लवकरच कधीं न विसरण्यासारखी आठवण करून देऊं. सांगून-सवरून, आधार लिहून किंवा अवतरणें देऊन जेथें सरदेसायांनी खऱ्यांचा मजकूर घेतला त्याबद्दल कोण तक्रार करतो? पण कांहीं थांग न लागूं देतां सरदेसायांनी खऱ्यांच्या प्रस्तावनांवर जो हात मारला आहे, त्याबद्दलच आमची तक्रार आहे.

(१७) **आक्षेप**—सरदेसाई भासवतात कीं, खऱ्यांच्या इतिहासाला आम्ही The last word on the subject असें म्हटलें. 'अंधश्रद्धेचा तो काळ आता पार निघून गेला आहे. खऱ्यांचीं मतें जशींच्या तशीं गिळणारे वाचक किंवा अभ्यासक आता फार थोडे उरले आहेत.'

उत्तर—सरदेसाई भलताच आरोप करतात. खऱ्यांचा इतिहास हा 'शेवटचा शब्द' अशी जर आमची समजूत असती तर परीक्षणाच्या पहिल्याच लेखांकांत आपट्यांच्या श्रीरंगपट्टण-मोहिमेची आम्ही स्तुति केलीच नसती, किंवा खऱ्यांच्या खंडांतून न आलेले उत्तर-हिंद प्रकरणासंबंधींचे कांहीं भाग सरदेसायांनी नवीन लिहिले त्याबद्दलहि त्यांचें अभिनंदन केलें नसतें. किंबहुना आमच्या लेखांकांत आम्ही असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, "साधनें तींच असतां स्वतंत्रपणें प्रत्येकाने आपापल्या बुद्धीप्रमाणें इतिहास लिहिणें हेंच श्रेयस्कर; कारण त्यामुळें निरनिराळ्या विवेचनपद्धति व निरनिराळ्या मांडणी निर्माण होऊन त्या त्या विषयाचें निरनिराळ्या बाजूंनी यथार्थ ज्ञान होण्यास मदत होते."

—२—

(१८) **आक्षेप**—" १९१४ पूर्वीं जें जें म्हणून साहित्य उपलब्ध असेल तें सर्व लक्षांत घेणें खऱ्यांचें कर्तव्य होतें. राजवाड्यांचा ७ वा व १० वा खंड, जिवबादादाचें चरित्र, नागपूरकर भोंसले यांची बखर व पत्रें, काव्येतिहाससंग्रहांतील बखरी व पत्रें, तह, करारमदार, वाडांच्या रोजनिशा वगैरे; भारतवर्ष शकावली, कोल्हापूरच्या इतिहासांत छापलेले अस्सल कागद इत्यादि नाना प्रकारचें पूर्वीं प्रसिद्ध झालेलें साहित्य

* केसरी, २५ नोव्हेंबर, १९३२

खऱ्यांनीं पाहिलेंसुद्धां नाहीं. वेलस्लीच्या पत्रव्यवहाराचे भाग, टोन्‌चीं किंवा ब्राउटनचीं पत्रें, फॉरेस्टचे लेख वगैरे इंग्रजींतील साहित्य त्यांनीं पाहिलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. (खऱ्यांना इंग्रजींच येत नसावे असा रावसाहेबांचा ग्रह असल्यामुळें ?) अर्थात् असलें बहुमोल साहित्य विचारांत न घेतां खऱ्यांनीं जे लेख लिहिले ते कितीहि सुंदर किंवा मनोरंजक असले तरी त्यास खरा इतिहास म्हणणें हा वस्तुस्थितीचा अक्षम्य विपर्यास होय. "

उत्तर—आपल्या अप टु डेट ज्ञानाचा आणि बहुश्रुतपणाचा पोकळ दिमाख सरदेसाई दाखवितात, असें जें आम्हीं पूर्वी परीक्षणांत म्हटलें आहे तेंच फिरून एकदा म्हणतों. शिवाय त्यांच्या वरील आक्षेपांची विशेष चीड येण्याचें कारण हें कीं, त्यांत सत्याचा लवलेशहि नाहीं. खऱ्यांचे ग्रंथ अगदीं वरवर चाळले तरीहि काय दिसतें तें पहा —

(१) " हैदराचें विशेष पारिपत्य गोपाळरावाला या मोहिमेंत करतां आलें नाहीं. कर्नल वुइल्क याच्या लिहिण्यांत या मोहिमेंत हैदराचीच सरशी झाली असा अभिप्राय आहे. हैदराने तुमचें स्वरूप नेलें असें नानासाहेब पेशव्यानें गोपाळरावास खिजविल्याचा उल्लेख पत्रांत आहे, तो कर्नल वुइल्क यांच्या लिहिण्यास बळकटी आणतो. " (खरे प्रस्तावनाखंड पा. ५७).

(२) " हैदरावर दुसरी स्वारीः—खंडणीसंबंधानें निरनिराळ्या ठिकाणीं उल्लेख आढळतात त्यांत तफावत दृष्टीस पडते ती अशी. गोपाळरावाच्या पत्रांत हैदरखान याची खंडणी सरकाराचे ३१ व मोंगलाचें १४ एकूण ४५ लाख घेतले असें लिहिलें आहे. त्यानंतर सात दिवसांनीं खुद्द पेशव्यांनीं रामशास्त्र्यांस पत्र लिहिलें आहे त्यांत हैदरखानाचा तह ३२ लक्षांवर झाला असें लिहिलें आहे. कर्नल वुइल्क व लुई राइस यांच्या

लिहिण्यांत ही रकम ३५ लक्ष होती असें आहे. ग्रँट डफ ही रकम ३० लक्ष असल्याचें लिहितो. खंडणीची रकम सबंध फिटेपर्यंत मराठ्यांनी कोलार परगणा आपल्या ताब्यांत ठेवला होता, हें लिहिणें लुई राइस याचें आहे." (खरे प्रस्तावनाखंड पा. १३४).

(३) निजगलच्या वेढ्यासंबंधांत कर्नल वुइल्क यानें कशी चूक केली आहे व ग्रँट डफने त्याची साथ कशी केली आहे, हें दाखवितांना खरे लिहितातः—" या कर्नाटकाच्या मोहिमांसंबंधीं डफसाहेबानें स्वतंत्र शोध असा बिलकूल केलेला दिसत नाहीं. जेथें तेथें वुइल्कचें तुणतुणें वाजविलें म्हणजे आपलें काम संपलें असेंच या डफसाहेबास वाटत होतें." (खरे प्रस्तावनाखंड पान २०१).

या वुईल्कच्या ग्रंथाचे पडताळे आणखी किती तरी ठिकाणीं दिलेले सांपडतात.

(४) थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीतील 'हिंदुस्थान प्रांताची दुसरी स्वारी' हें प्रकरण लिहितांना खरे लिहितात—

" या स्वारीची समग्र, सुसंगत हकीकत देतां यावी म्हणून वायव्य प्रांताचें सरकारी गॅझेटियर पाहून त्यांतीलहि माहिती मधून मधून घेतली आहे." (खरे प्रस्तावनाखंड पान २३३)

(५) वडगांवावर इंग्रजांचा पराभव झाला. त्या वेळची हकीकत देतांना खरे लिहितातः—" मराठ्यांनीं तोफा व गरनाळा पाडाव केल्याचें इंग्रज इतिहासकार लिहीत नाहींत." (नानाचें चरित्र पा. ९३)

(६) नानांचें चरित्र पान १३० वरून लॉर्ड कॉर्नवालिसचा पत्रव्यवहार खऱ्यांनीं वाचला होता किंवा नाहीं हें सरदेसायांनीं नीट डोळे उघडून पाहावें.

(७) " या कार्याचा उपक्रम कसकसा झाला हा तपशील कर्नल पाल्मर यानें आपल्या वरिष्ठास केलेल्या रिपोर्टांत सांपडावयाचा; पण ते रिपोर्ट उपलब्ध नाहींत. तथापि 'Wellington's Despatches' या पुस्तकात जागोजाग आलेल्या उल्लेखांवरून तर्कानें हा तपशील जुळवितां येतो. तो असा " (खरे पान ६७६०)*

(८) सालबाईच्या तहप्रकरणीं लिहितांना Selections from State Papers, Bombay, page 462 या ठिकाणचा उल्लेख करून मद्रासकर इंग्रजांनीं नानास तह करण्याविषयीं जें पत्र लिहिलें तें दिलें आहे. (नानाचें चरित्र पान १०६)

(९) Selections from State Papers, Bombay, यांतले आधार अनेक ठिकाणीं दिलेले आहेत. उदाहरणार्थ, नानांचें चरित्र पा. ११३ वर वरील पुस्तकांतील २५१, २५३, २५४, २५७ वगैरे आधार व त्यांतील विधानें दिलीं आहेत तीं पाहावीं. तसेंच खरे, ऐ. लें. सं. ६७५९ वर त्याच पुस्तकाचा आधार दिला आहे तो पाहावा. त्याचप्रमाणें नाना फडणविसाचें चरित्र पहिली आवृत्ति यांत वरील 'फॉरेस्ट' च्या Selections मधील दाखले पा. २५, ४२, ५२, ५८, ५९, ७९, १६८ वगैरे ठिकाणीं दिले आहेत, ते पाहावे.

(१०) नानांचें चरित्र पान ९६, ११५, १४८ वर वाडांच्या पेशवे रोजनिशीचा पडताळा दिला आहे, तो सरदेसायांनी पाहावा.

(११) नागपूरकर भोसल्यांच्या बखरींतले उतारे व आधार

* यावरून खऱ्यांनीं काय इंग्रजी वाचलें होतें, तें कळतेंच; परंतु त्यांनीं बुद्धिसामर्थ्यानें आपल्या तर्काच्या जोरावर जो सर्व तपशील जुळविला त्याची जवळ जवळ नक्कल सरदेसायांनीं आपल्या पुस्तकांत केली, असें आम्हीं आमच्या तिसऱ्या लेखांकांत दाखविलेंच आहे.

नानांचें चरित्र पान ३१, ६४, ६६, ७०, ९९, १०८, १३६, १३९ व १४१ या ठिकाणीं दिले आहेत ते पाहावे.

(१२) ऐति. ले. सं. भाग १२ पान ६५९७, "धोंडोपंत गोखल्यास वाघाच्या हातून मृत्यु आला, तो त्यांच्या बेइमानपणामुळें आला हें वेल्स्लीसाहेबांचें लिहिणें आम्हांला खरें वाटत नाहीं. ते लिहितात कीं, (पुढें वेल्स्लीच्या पत्रांतील मजकूर दिला आहे.)

(१३) "बाजीरावांनी वेल्स्लीसाहेबास या मसलतीच्या पेचांत अडकवून हुबळीस चरफडत बसविलें त्यासंबंधाने त्या साहेबबहादुरांच्या मनांत घोळणारे कल्पनेचे तरंग, भावी युद्धाकरितां योजिलेल्या तरतुदी, त्यांच्या अडचणी व चिंता, शिंदे यांशीं लढण्याकरितां त्यांच्या अंगांत संचारलेला उद्दाम युद्धोत्साह वगैरेंचें वर्णन Wellington's despatches या पुस्तकांत आलें आहे तें फार मनोरंजक आहे. परंतु विस्तारभयास्तव तें आम्ही येथें देत नाहीं." (खरे पान ६७६५)

(१४) बाँबे गॅझेटियर्स व्हॉल्यूम्स्‌मधील व 'नॅरेटिव्ह ऑफ धी बॉम्बे इनाम-कमिशन' यांचे आधार नानांचे चरित्रांत सांपडतील.

(१५) सरदेसाई म्हणतात खऱ्यांनीं भारतवर्ष, इतिहाससंग्रह, राजवाड्यांचे खंड व मोडकांचा कोल्हापूरचा इतिहास हे पाहिलेसुद्धां नाहींत. करतां त्यांनीं नुसती एकवार खरेकृत 'इचलकरंजीचा इतिहास' या पुस्तकाची प्रस्तावना पाहावी. तेथें खरे लिहितात, "हा ग्रंथ तयार करण्याचे कामीं इचलकरंजीचें जुनें दप्तर, ऐति. ले. सं., काव्येतिहाससंग्रह, इतिहास-संग्रह, भारतवर्ष, राजवाड्यांनीं प्रसिद्ध केलेले खंड, मोडकांचा इतिहास, डफ, फॉरेस्ट, ग्रँहॅम व वेस्ट यांचे ग्रंथ व सरकारी गॅझेटियर यांतल्या माहितीचा उपयोग करून घेतला आहे." यांत भारतवर्षाचा उल्लेख आहे. तेव्हां भारतवर्षांतच छापलेली शकावली खऱ्यांनीं पाहिलीच

होती यांत काय संशय ? पण तसें कशाला ? ऐ. ले. सं. पान ४६६४ वर भारतवर्ष शकावलीचा मुद्दाम उल्लेख करून खऱ्यांनीं तेथें जो ऊहापोह केलेला आहे तो सरदेसायांनीं काळजीपूर्वक पाहावा.

(१६) ' ऑपरेशन्स् ऑफ धि डिटॅच्मेंट अंडर कॅप्टन लिटिल ' बाय थॉमस मूर या ग्रंथांतील माहितीचा आधार खरे पान ४३८३ वर आला आहे तो पाहावा.

(१७) " बाजीरावसाहेबांस पेशवाईचीं वस्त्रें मार्ग. शु. ५ रविवार ता. ४ डिसेंबर १७९६ रोजीं झालीं. ' इतिहास ऐतिहासिक ' या मासिकाचा अंक ८ पृ. १६ मध्यें मार्ग. शु॥ ६ सोमवार छ ४ जमादिलाखरीं वस्त्रें झाल्याचें लिहिलें आहे, तें चुकलें आहे. ४ जमादिलाखरी तिथी पंचमी आहे, षष्ठी नाहीं. डफ्, फॉरेस्ट यांच्या बुकांत ४ डिसेंबर हीच तारीख दिली आहे. " [खरे ७०७१ टीप.]

टीपः— वरील टीपेंत खऱ्यांची तौलनिक बारकाव्याची अभ्यासी दृष्टि दिसते. उलट खऱ्यांनी जी चूक प्रमाणांसह दर्शविली व नाकारली तीच चूक सरदेसायांनी आपल्या या खंडांत पान ४६ वर केली आहे ! ते लिहितात, " दुसरे दिवशीं मार्ग. शु॥ ६ सोमवार ता. ५ । १२ । १७९६ रोजीं तेरा घटका रात्रीस छावणीच्या तळावर वस्त्रें स्वीकारून बाजीराव रघुनाथ पंतप्रधान झाले." सरदेसायांची ही एक नवीच चूक या निमित्ताने सहज आढळून आली ती मुद्दाम नमूद केली आहे ! चिकित्सक कोण तें त्यावरून दिसून येईलच. आम्हीं दाखवीत असलेली नवी चूक ' कोनाकोपऱ्यांतली ' आहे खरीच. कारण वरील तिथिनिर्णय खऱ्यांनी पादटीपेंत केला आहे; त्याला आमचा नाइलाज आहे ! पण म्हणून सरदेसायांची ही चूक ' कोनाकोपऱ्यांतली ' असली तरी तो ' मुद्रणप्रमाद ' नाहीं. एवढें तरी समाधान आहे ! !

सारांश, सरदेसायांनीं जीं जीं ग्रंथकारांचीं नांवें मुद्दाम शोधून काढलीं ते ते सर्व खऱ्यांनीं आगाऊच वाचलेले आहेत, हें वरील यादीवरून दिसून येईलच. इतके आधार दृष्टीसमोर असतांना सरदेसाई धडधडीत खोटें बोलतात, असें कोणीं म्हटल्यास तें चूक ठरेल काय? त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे तेच 'वस्तुस्थितीचा अक्षम्य विपर्यास करतात.' ते म्हणतात, 'मराठी उपलब्ध झालेलीं साधनें ज्यानें पाहिलीं नाहींत तो इंग्रजी काय पाहणार?' आम्ही म्हणतों, "इंग्रजी साधनेंसुद्धां ज्यांनीं अभ्यासिलीं, त्यांनीं मराठी साधनें पाहिलींच असतील यांत काय संशय? " आणि तीं तशीं दोनहीं पाहिलेलीं आहेत, हें वरील यादीवरून दिसेलच. मात्र या सरदेसायांच्या लिहिण्यांत आम्हांस एक मोठी गंमत आढळली! ते म्हणतात, "ब्राउटनचीं पत्रें कोठें खऱ्यांनीं वाचलीं आहेत?" सरदेसाई भानावर नाहींत. ब्राउटनचीं पत्रें १८०९-१० सालच्या हकीकतींचीं आहेत. आणि बिचारे खरे १८०३ पर्यंत इतिहास लिहून आणीत असतांच परलोकवासी झाले. तेव्हां त्यांनीं ब्राउटनच्या पत्रांचें अवलोकन केलें नाहीं हें म्हणणें शुद्ध हास्यास्पदच नव्हे तर उपहासास्पदहि नाहीं काय? नुसती आधारांची यादी फुगवून आपल्या सर्वज्ञतेचा पोकळ आभास उत्पन्न करणें निराळें, व ते आधार वाचून पचविणें निराळें.

—२—

गेल्या लेखांकांत खऱ्यांनी कोणत्या इंग्रजी व मराठी ग्रंथांचे आधार दिलेले आहेत ते आम्ही सविस्तर दाखविले. त्यांत चुकून जिवबादादाच्या चरित्रासंबंधी खुलासा करण्याचा राहिला. कदाचित् तेवढ्याचाच फायदा रावसाहेब घेऊं पाहतील; पण तेवढेंहि निमित्त आम्हांस त्यांना

* केसरी, २ डिसेंबर १९३२

उरूं द्यावयाचें नाहीं. शिवाय रावसाहेबांचे प्रमाणेंच त्यांच्या प्रिय 'प्रिय-रंजनानें'हि या जिवबादादाच्या चरित्रावरच मुद्दाम जोर दिलेला होता; त्यासंबंधी आम्ही असें सांगतों कीं, खऱ्यांनीं तें पुस्तक नुसतें वाचलेंच नव्हतें तर इतकें काळजीपूर्वक वाचलें होतें कीं, ऐतिहासिक दृष्टीनें आढळणाऱ्या त्यांतल्या ५१ ठळक चुकांची एक याद त्यांनी स्वहस्तें तयार करून ठेवलेली आहे. आतां उलट रावसाहेबांना मात्र आमचें आव्हान असें कीं, आपण तर तें पुस्तक अभ्यासून अभ्यासून त्याचें पीठ पाडलें आहे! तर त्या ५१ चुका कोणत्या त्या कृपा:करून जाहीर कराव्या. वास्तविक आपलें वाचन खऱ्यांच्या पेक्षा फारच बारकाव्याचें असल्यामुळें ५१ च काय पण १५१ चुकाहि आपण काढून दाखवूं शकाल. पण तितक्यांची अपेक्षा नाहीं. या ५१ दाखविल्यात तरी पुरे ! पण हें लिहिणें सर्व व्यर्थ होय; कारण त्या ५१ चुकांपैकींच कांहीं चुका सरदेसायांनी डोळे मिटून आपल्या ग्रंथांत लिहून घेतल्या आहेत ! !

सरदेसाई जर त्या चुका दाखवूं शकले नाहींत तर आणि जर ते आपण केलेल्या निष्कारण खोट्या आरोपांचे शब्द सपशेल परत घ्यावयास तयार असतील तर खऱ्यांची स्वहस्तें तयार केलेली चुकांची याद आम्ही प्रसिद्ध करण्याची खटपट करूं असें त्यांस आश्वासन देतों.

(१९) **आक्षेप**—" पटवर्धनी दप्तराबाहेर निराळा प्रकार असूं शकेल अशी शंकासुद्धां खऱ्यांचे मनास आली नाहीं. इतिहासकाराची भूमिका न्यायाधीशासारखी असली पाहिजे. एक बाजू पुढें आल्यावर त्याला उलट बाजू असूं शकेल, उलट बाजू पुढें नसेल तर आपण आपला निकाल तितक्यापुरता अपूर्ण मानला पाहिजे याबद्दल न्यायाधिशास व इतिहासकारास सदैव साशंक व जागृत असावें लागतें."

उत्तर— सरदेसायांनी केवळ नमुन्याकरितां ऐ. ले. सं. प्रस्तावना

पान ५८६६ वरील खऱ्यांचें पुढील विधान वाचावें. " असले अत्याचार परशुरामभाऊच्या लष्कराने केल्याचीं पत्रें या पुस्तकांत सांपडत नाहींत. एवढ्यावरून या दोषापासून तें लष्कर अलिप्त होतें, असें मात्र कोणीं समजूं नये! भाऊंच्या लष्कराने परमुलुखांत लूट केली तिचा तपशील त्या त्या मुलखांत कोठें कागदपत्र असतील तर त्यांतून सांपडेल. पटवर्धनांच्या दप्तरांत तो कोठून मिळणार ? "

(२०) **आक्षेप**—सरदेसाई लिहितात, " खुद्द माझ्या व खऱ्यांच्या अनेकवार बैठकी होऊन मनमुराद विवेचनें झालीं आहेत; म्हणून त्यांचे गुण ओळखण्यास मला केसरीच्या मध्यस्थीची जरुरी नाहीं. अर्थात् दुसऱ्याचे सारांश कांहीं एक परिश्रम न करतां आपले म्हणून दडपून दिल्यानें खऱ्यांविषयीं आदरबुद्धि दृढ होते तितकी सरदेसायांविषयीं ढासळूं लागते, या केसरीच्या म्हणण्यांत कांहीं हंशील नाहीं. प्रश्न आदरबुद्धीचा नसून खऱ्या राष्ट्रेतिहासाचा आहे. "

उत्तर—या वरील चार वाक्यांतील कार्यकारणभाव आम्हांस तर कांहीं उकलत नाहीं ! आपण ' राष्ट्रेतिहास ' लिहिला म्हणून कांहीं एक परिश्रम न करता खऱ्यांचे उतारे दडपून दिले तरी चालतील असें सरदेसायांना म्हणावयाचें आहे कीं काय ? शिवाय 'राष्ट्रेतिहास' हें काय स्तोम आहे ? रावसाहेबांनीं लिहिलेला तेवढाच ' राष्ट्रेतिहास आणि खरे वगैरे इतरांनीं लिहिलेले काय राष्ट्रेतिहास नव्हेत ?

(२१) **आक्षेप**—नानाफडणविसांस देव मानून खऱ्यांप्रमाणें त्यांचें स्तुतिस्तोम मी माजवलें नाहीं ही गोष्ट खरी.

उत्तर—खऱ्यांनीं यथार्थ तेवढीच स्तुति केली आहे. नानांचे दोषहि प्रांजळपणें मांडलेले आहेत. उलट महादजी वगैरेंच्या बाबतींत सरदेसायांनीं महादजीला सद्गुणांचा पुतळा ठरविला आहे.

अगदीं नमुन्याकरितां खऱ्यांचा हा उतारा वाचा. " घाशीराम कोतवाल व सचिव प्रकरणांतला बाजी मोरेश्वर हे घोर कर्म करणारे मनुष्य असून ते नानाच्या विश्वासास कसे पात्र झाले होते हें समजत नाहीं. दिल्ली–अटकेस चाललेल्या मोठमोठ्या कारस्थानांतल्या गोष्टीचें ज्यांनीं सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करावें व तिकडची हमेशा तपशीलवार बातमी राखावी त्याच नाना फडणविसांस सचिवांच्या हद्दींत किंवा खुद्द पुण्यांतसुद्धां काय अनर्थ चालले आहेत याची दादसुद्धां असूं नये हें फारच आश्चर्यकारक आहे ! दिव्याखालीं अंधेर या म्हणीला इतकें ठळक उदाहरण दुसरें कोठेंहि मिळणार नाहीं. " (खरे ४६०४). नानाला देव मानणारा असें लिहील काय ? उलट महादजीच्या तीन रक्षा सुप्रसिद्ध असतांना व इतरांची सरदेसायांना पेशवे दप्तरांत चांगली माहिती झाली असतांनाहि पहिल्या नंबरचे निःपक्षपाती इतिहासकार सरदेसाई काय म्हणतात पाहा. " महादजीच्या अंगीं कोणताहि दुराचार असल्याचा उल्लेख नाहीं. एवढेंच नव्हे तर उगाच खोटा प्रवादसुद्धां कोठें ऐकण्यांत नाहीं. धन, सत्ता, लौकिक व ऐश्वर्य यांच्या परमावधीस पोचूनहि अंतर्बाह्य वर्तनानें तो सर्वथा निर्मळ राहिला ही केवढी कमाई ? " यावरून इतिहासकार कोण व भाट कोण त्याचा सहज निकाल होईल.

(२२) **आक्षेप**— " सर्व तपशील संक्षेपाने एकत्र आणणें हेंच आपलें ऐतिहासिक अध्ययनाचें पहिलें कर्तव्य आहे. "

उत्तर—येथें आमचें व सरदेसायांचें एकमत आहे. आणि म्हणूनच त्यांच्या रियासतीला मंदिराची उपमा न देतां तें मंदिर बांधणाऱ्या कंत्राटदाराच्या मालाची भली मोठी वखार असें आम्हीं पूर्वी म्हटलें आहे !

(२३) **आक्षेप**—" टीकेंत दाखविलेलीं सर्व स्थळें ताडून पाहिलीं;

पण एकदोन क्षुल्लक अपवाद खेरीज करून मी निक्षून सांगतों कीं, असंबद्ध रचना, गैरलागू माहिती, बारीकसारीक तपशील उगाच घुसडून देणें वगैरे सर्व आरोप पोकळ आहेत."

उत्तर—नुसतें निक्षून सांगतों असें म्हणण्याला विचारतो कोण? आम्हीं उदाहरणें प्रमाणांसह दिलीं आहेत. सरदेसाई जेव्हां आपल्या रियासतींतील मजकुराची आणेवारी तयस्थ पंचाकडून करून घेऊं म्हणतात त्या वेळीं त्याची शहानिशा त्यांनी करून घ्यावी.

(**२४**) **आक्षेप**—"खऱ्यांच्या प्रस्तावनांत स्थळ, काल, व्यक्ति व प्रसंग इत्यादींची निश्चिती कसोशीने करून निरनिराळ्या ऐतिहासिक प्रसंगांची व घडामोडींची संगति व परंपरा जुळविलेली नाहीं."

उत्तर— सरदेसाई रागाच्या भरांत भलतेंच लिहितात!! खऱ्यांची संपादनपद्धति, बारकावा व शुद्धतेविषयीं दक्षता हीं केवळ कित्त्यादाखल आहेत असें आम्हीं म्हणतों. खऱ्यांच्या ६००० पानांच्या चवदा भागांतून चवदापंधरा चुका दाखवितां आल्या तर येतील. उलट सरदेसायांच्या आठ पानांतल्या आठ चुका वाघाच्या बंडाच्या प्रकरणांत आम्हीं दाखविल्याच आहेत!!

(**२५**) **आक्षेप**— "वाघाच्या प्रकरणानें खऱ्यांच्या खंडांत ४२६ पानें व्यापलीं असून माझें एकंदर विवेचन ८ पानांचें आहे. या आठ पानांपैकीं फार तर ४ पानें खऱ्यांचा सारांश म्हणतां येईल. कारण इतर इंग्रजी वगैरे आधार व माझें विवेचन यांत ४ पानें गुंतलीं आहेत. तेव्हां सवाचारशें पानांचा गोषवारा जर ४ पानांत आणला तर तें एक कसबच गणतां येईल."

उत्तर—पहिलें एक कसब असें कीं, 'सत्यापलाप' करणें. कसें

तें पाहा. आमच्या तिसऱ्या लेखांत आम्हीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, " खरे यांच्या बाराव्या खंडांत ' वाघाच्या बंडाचा शेवट ' नामक प्रकरणांत सुमारें ४० पानें या मनोवेधक वृत्तांतानें व्यापलीं आहेत; त्या ४० पानांचा कुरतडलेला सारांश म्हणजे हें सरदेसायांचें प्रकरण. " सरदेसाई असें भासवितात कीं, ४२६ पानें नुसता पत्रव्यवहार असून त्याचा त्यांनीं सारांश काढला. अगदीं खोटी गोष्ट. त्या ४२६ पानांतील खऱ्यांनीं जो ४० पानें इतिहास प्रस्तावनेंत लिहिला त्याचा सारांश सरदेसायांनीं आठ किंवा ते म्हणतात त्याप्रमाणें चार पानांत आणला ! आमची तक्रार आहे ती त्याबद्दलच आहे. नुसत्या त्या कागदपत्रांवरून जर सरदेसायांनी स्वतःचीं चार पानें लिहिलीं असतीं तर त्यांची आम्ही स्तुतिच केली असती. नुसती नक्कल करून घेतांना आठ पानांत जे आठ चुका करतात त्यांच्या कसबाची काय प्रशंसा करावी ? मात्र एवढें बरें झालें कीं, सरदेसाई तो खऱ्याच्या प्रस्तावनेंतील मजकुराचा सारांश आहे असें न कळत कबूल करून गेले. न कळत म्हणण्याचें कारण पुढें त्यांनी असें सांवरून घेतलें आहे, ' पण तो तसा नुसता खऱ्यांचा गोषवाराहि नाहीं, सगळे आधार एकत्र घेऊन त्यावरून मीं तें प्रकरण लिहून काढलें. ' पण धुळीवर कितीहि सारवण घातलें तरी तें टिकत नसतें.

(२६) **आक्षेप**— ' विंचुरकरांचें वय, माधवराव जाधवाचें ब्राह्मणत्व अशा कित्येक दुरुस्त्यांबद्दल मी केसरीचा आभारी आहें. बाळोजी कुंजर, चिमाजीचे लग्नाची मिति, नारो हरी करंदीकराचे लेखाचा खरेपणा, सातारा येथील तक्ताची अमर्यादा, इत्यादि बाबतींत मीं चूक केलेली नाहीं. '

उत्तर—आम्ही आमच्या परीक्षणांत पांचपन्नासच्या वर सरदेसायांच्या ढोबळ चुका प्रमाणासहित दाखविलेल्या आहेत. उत्तर देतांना

नुसतें 'मला कबूल नाहीं' असल्या पोकळ प्रतिष्ठेवर कोण जातो? आम्ही दाखविलेल्या चुका नाहीं म्हणण्याची सोय नाहीं. आणि उत्तर दिल्याशिवाय तर गत्यंतर नाहीं. तेव्हां वाटेल तें गैरलागू, अप्रस्तुत, असंबद्ध लिहून सरदेसायांनी समाधान मानलें आहे.

(२७) **आक्षेप**—"सरदेसाईही जातील पण त्यांचे श्रम राहतील."

उत्तर—आमच्या परीक्षणाच्या शेवटच्या लेखांकांत आम्हीं काय म्हटलें आहे तें पहा. 'कष्टाबद्दल संपूर्ण श्रेय दिलें, तरी कौशल्याबद्दल येथें नापसंतीच दर्शवावी लागते.' यावरून व १९२९ सालच्या परीक्षणांतील व प्रस्तुत परीक्षणाच्या लेखमालेंतील पहिल्या पॅऱ्यावरून सरदेसायांच्या उद्योगप्रियतेबद्दल आम्ही गुणच घेतलेले आहेत. 'माझे सिद्धांत आता कायमचे ठाणें देऊन बसले आहेत; तशा तोडीची दुसरी इमारत कोणी बांधीपर्यंत संतापाने बोटें मोडून ते भंग पावणार नाहींत' असें सरदेसाई म्हणतात. पण आपल्या दगडाविटाच्या कंत्राटी ढिगाऱ्याकडे पाहून त्यांतच जर त्या कंत्राटदाराला मयसभेची इमारत उठलेली दिसत असेल तर त्याचें कल्पनासुख कोणीं काय म्हणून हिरावून घ्यावें? पण खरोखर आम्ही ती इमारत भंग करावयास बसलों नाहीं तर दुरुस्त करावयास बसलों आहों; हें कशावरून तर आमच्या पहिल्या लेखांकांतील सुरुवातीचीं वाक्यें पाहा. "कसेंही असो, या भागानंतर आपल्या सर्व रियासती पुनः लिहून काढून शिवाय त्यांत नवीन साधनसामुग्रीची भर घालावयास सरदेसाई लागणार आहेत, असें त्यांच्या प्रस्तावनेवरून दिसतें. तेव्हा अशा वेळीं दोषदर्शनाचें काम निःस्पृहपणें व यथास्थित झालें तर लौकरच या त्यांच्या सुधारून वाढविलेल्या शुद्ध रियासतींना पुष्कळच उपयोग होईल अशी आमची कल्पना आहे. पण तसें करीत असतांना त्यांत टीकेचा कडवटपणाहि केव्हा प्रकट होणें अपरिहार्य आहे. अशा वेळीं 'महत्त्व

व्यक्तीचें नाहीं; कार्याचें आहे ' या सरदेसायांच्या वाक्याचाच हवाला देण्याखेरीज आम्ही दुसरें काय करणार ? "

(२८) आक्षेप—सरदेसाई लिहितात कीं, आम्ही त्यांच्या शालोपयोगी भारतवर्षावर अत्यंत असंबद्ध, अवास्तव व सौजन्य सोडून टीका केली.

उत्तर—मनुष्य त्राग्याच्या सपाट्यांत सांपडला म्हणजे नसतील त्या गोष्टीहि आपणावर ओढून घेण्याची व कांगावा करण्याची रीतच आहे. कारण त्यांच्या भारतवर्षावर टीका केल्याचा एक शब्दहि आमच्या परीक्षणाच्या लेखांकांत कोणाहि वाचकाने दाखवून द्यावा. आम्ही उल्लेख केला तो सरदेसायांच्या खेरीज इतर कोणाचे जे शालोपयोगी इतिहास शाळाखात्यांतून चालू आहेत, त्यांसंबंधीं. सरदेसायांचा शालोपयोगी इतिहास असेल तर तो त्यांच्याच रियासतीचा सारांश असणार, हें काय कोणास कळत नाहीं ? जे दुसऱ्याच्या पुस्तकाचे सारांश आपले म्हणून आपल्या- नांवावर दडपतात, त्यांनी स्वतःच्याच नांवावर मोडत असलेल्या रियासतीचा सारांश आपल्या शालोपयोगी इतिहासांत काढावा, यांत काय आश्चर्य ? आम्ही खरोखर काय म्हटलें आहे ते शब्दच देतो. ते असे. " अलीकडे शाळाखात्यांतून लावलेले मराठी इतिहास हे सरदेसायांच्या रियासतींचे सारांश असतात असा एक प्रवाद आहे. तो खराहि असेल. कारण शालोपयोगी इतिहास लिहिणाऱ्या सामान्य शिक्षकांचा इतिहासाचा अभ्यास तो कितीसा असणार ? आर्थिक मदतीचें एक साधन म्हणून इतिहासकार बनलेल्यांनीं स्टँडर्ड म्हणून बोलबाला होत असलेल्या सरदेसायांच्या रियासतीचा अपहार केला तर आश्चर्य नाहीं. "

(२९) आक्षेप—" केसरी म्हणतो, मी सहा महिन्यांत सहाशें

पानें वायूगर्तीने इतिहास लिहिला. पण मी सांगतों कीं, सन १९२९ ते ३२ हीं तब्बल तीन वर्षें खपून मीं हा इतिहास लिहिला आहे."

उत्तर—रावसाहेबांचा खुलासा आम्ही बिनतक्रार मान्य करतों व आपले शब्द परत घेतों. सहा महिन्यांत सहाशे पानें या म्हणण्यांत नक्की काळाची मोजदाद करण्याचा आमचा हेतु नसून इतक्या थोड्या वेळांत एवढा मोठा इतिहास लिहून झाला याचें कारण अर्थात् दुसऱ्या आयत्या तयार इतिहासाचें साहाय्य रावसाहेबांना फार झालें, म्हणूनच त्यांना तो पुरा करतां आला असा आमच्या म्हणण्याचा रोख. पण या खुलाशाने रावसाहेबांनी काय साधलें ? इतका प्रमादपूर्ण इतिहास सहा महिन्यांच्या अवधींत लिहिला असें म्हटलें तर तें एक वेळ क्षम्य तरी झालें असतें. कारण त्यांत घाईची सबब तरी सांगतां आली असती; पण आता तब्बल तीन वर्षें सतत खपूनहि हा इतिहास इतका प्रमादपूर्ण राहिलेला आहे, हें विशेषच डोळ्यांत भरत नाहीं काय ? आम्हाला शब्दांत पकडण्याच्या उद्योगांत रावसाहेबांनी हलवून खुंटा मात्र बळकट केला!

—४—

[आम्ही आश्वासन दिल्याप्रमाणें सरदेसाईकृत नकलांचे हे नमुने यापूर्वींच द्यावयाचे. परंतु इतर जरुरीच्या मजकुरामुळें ते हा वेळपर्यंत मागें ठेवावे लागले. पुढील उतारे हे केवळ नमुन्यादाखल समजावेत. सरदेसायांच्या मजकुराला अवतरणचिन्हें नाहींत किंवा खालीं खऱ्यांचा उल्लेखहि नाहीं हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.]

(खरे, पा. ७४६०)

पेशव्यांचा हा विचार कोणासच पसंत नव्हता. विशेषतः चिमाजी आप्पांनी या गोष्टीचा विशेष निषेध केला. त्यांनीं पेशव्यांजवळ हट्ट

* केसरी, २३ डिसेंबर १९३२

धरला कीं, आम्ही इंग्रजांच्या किंवा अमृतरावांच्या कैदेंत पडावें असा समय प्राप्त झाला आहे. अशा स्थितींत अमृतरावांची कैद काय वाईट ? इंग्रजांच्या कैदेचा स्वीकार केला, तर त्यायोगें आमचें स्वातंत्र्य व अब्रू हीं दोनहि जातील. उलटपक्षीं अमृतराव व होळकर हीं आपलींच माणसें आहेत. त्यांच्या कैदेंत राहिलों, तर त्यायोगें स्वातंत्र्य जाईल; परंतु आमची अब्रू तरी आम्हाजवळ शिल्लक राहील. आपल्या धाकट्या भावाचा हा सल्ला श्रीमंतांस क्षणभर मानवला.

(सरदेसाई, पा. २१४)

बाजीरावानें महाडाहून इंग्रजांकडे जाण्याची निकड चालविली ती कोणासच पसंत पडली नाहीं. चिमाजी आप्पानें तर या गोष्टीचा साफ निषेध केला. त्यानें हट्टच धरला कीं, आम्हीं एक तर इंग्रजांच्या नाहीं तर अमृतरावाच्या कैदेंत पडावें असा समय प्राप्त झाला आहे. त्यास अमृतरावाची कैद काय वाईट ? इंग्रजांच्या कैदेनें स्वातंत्र्य व अब्रू दोनहि जातील. उलटपक्षीं अमृतराव व होळकर आपलेच आहेत. त्यांच्या कैदेंत गेल्यानें स्वातंत्र्य जाईल, पण अब्रू तरी बचावेल. हा सल्ला बाजीरावास बहुतेक पसंत पडला होता.

(खरे, पान ५५५९)

शिंद्यांचें लष्कर सोडून सप्टेंबर महिन्यांत नाना फडणवीस आपल्या पेठेंत वानवळ्यांच्या वाड्यात येऊन राहिले होते. नोव्हेंबरच्या चौदाव्या तारखेस अवशीच्या अकरा घटका रात्रीस बरोबर फक्त एक शिपाई घेऊन बाजीरावसाहेब अकस्मात् वानवळ्यांच्या वाड्यात गुप्तपणें नानांच्या भेटीस गेले, आणि त्यांचे घट्ट पाय धरून व डोळ्यांत आसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. बाळाजी विश्वनाथ भटाच्या वंशजानें आपली पायधरणी करून पेशवाई राज्य बुडतें तें कसेंहि

करून रक्षावें अशी परोपरीनें विनवणी करावी, यापेक्षां बाळाजी महादेव भानूच्या वंशजास अधिक दुर्धर संकट कोणतें वाटणार ? श्रीमंतांच्या मागील वर्तनाचे गुणदोष न पाहतां नानांनीं निमूटपणें त्याचें म्हणणें मान्य केलें. मात्र त्यांत थोडा पर्याय ठरविला. तो एवढाच कीं, नानांच्या वतीनें नारोपंत चक्रदेव यांनीं श्रीमंतांजवळ राहून राज्यकारभाराचीं कामें संभाळावीं आणि त्यांत नेहमीं नानांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें वागत असावें. पुढें कांहीं दिवसांनीं फडणिशीची तेरीखसुद्धां आमच्या वतीनें तुम्हीच घालत जा असें नानांनीं चक्रदेवांस सांगितलें.

(सरदेसाई, पान १४७)

शिंद्यांचे लष्करांतून निघाल्यावर नाना आपल्या पेठेंत वानवळे यांचे वाड्यांत कांहीं दिवस येऊन राहिला असतां ता. १४ । ११ । १७९८ रोजीं अवशीच्या ११ घटका रात्रीस एक भिवजी कोलते मात्र खिदमतगार बरोबर घेऊन बाजीराव अकस्मात् नानांचे भेटीस गेला, आणि त्याचे घट्ट पाय धरून व डोळ्यांत आसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यानें नानांची प्रार्थना केली ... भट पेशव्यांचे वंशजानें भानूंच्या वंशजास केलेली ही असामान्य विनवणी नाकबूल करणें नानाच्या जिवावर आलें. त्यानें निमूटपणें कारभार करण्याचें मान्य केलें. फरक इतकाच सांगितला कीं, श्रीमंतांजवळ नारोपंत चक्रदेव येऊन सर्व कारभार संपवतील. मी घरीं बसूनच हरएक प्रकरणाची व्यवस्था नारोपंतास सांगत जाईन.

(खरे, पान ६६४०)

परशुराम प्रतिनिधींच्या वयास चोविसावें वर्ष सुरू होतें. त्यांचा स्वभाव लहानपणापासून आडदांड व स्वच्छंदी असे. त्यांची कुसंगत सुटावी व त्यास धाक राहावा म्हणून नानांनीं मागेच त्यास कऱ्हाडाहून आणून पुण्यांत आपल्या देखरेखीखालीं ठेविलें होतें व सरकाराच्या

परवानगीखेरीज शहर सोडून जाऊं नये अशी त्यांस मनाई केली होती. अजून ते तसेंच लव्याजम्यानिशीं नजरकैद असल्यादाखल पुण्यांत होते. अलीकडे पेशव्यांशीं व मुख्यत्वें त्यांच्या प्रीतींतले बाळोजी कुंजर व आबा काळे यांशीं पंताचा बेबनाव वाढल्यामुळें आपणावर निष्कर्ष होऊं लागल्यास झुंज द्यावयाला खबरदार असावें म्हणून त्यांनीं चार-पांचशें आरब पदरीं बाळगले होते.

(सरदेसाई, पान १८८)

परशुरामपंताचा स्वभाव आडदांड व स्वच्छंदी होता. त्याची कुसंगत सुटून वळण लागावें म्हणून नानानें त्यास पुण्यास आणून आपल्या देखरेखीखालीं ठेविलें, आणि परवानगीशिवाय पुणें सोडून जाऊं नये अशी त्यास ताकीद केली. बाजीराव पेशवाईवर आल्यावर प्रतिनिधीची हीच व्यवस्था पुढें चालू राहिली. प्रतिनिधी लवाजम्यानिशीं नजरकैदेदाखल पुण्यास राहत होता. उत्तरोत्तर त्याचा पेशव्यांशीं व बाळोजी कुंजर, आबा काळे वगैरे कारभाऱ्यांशीं बेबनाव होऊं लागला. नानाच्या चाकरींतले अरब मोकळे झाले. त्यांतले पांचशें स्वार प्रतिनिधीनें आपल्या नोकरीस ठेविले.

(खरे, पान ४९०० ते ४९०२)

या वेळीं श्रीमंतांबरोबर पांडुरंगराव बारामतीकर, गोविंदराव व बाजीराव बर्वे, आपाजीपंत सहस्रबुद्धे, बाळाजीपंत पटवर्धन, मानाजी फांकडे, हिरोजीराव पाटणकर, मालोजी घोरपडे व रघुनाथराव पटवर्धन, कुरुंदवाडकर, इतकी मंडळी शिंद्यांच्या लष्करांत गेली होती. निघतांना श्रीमंतांनीं परशुरामभाऊंसहि बरोबर येण्याकरितां बोलाविलें. परंतु त्यांनीं उत्तर केलें कीं, आज मला प्रदोष आहे. आतां सायंकाळ झाला. स्नान, पूजा व भोजन आटोपून मी मागून येतों. आपण पुढें चालावें. बाजीरावसाहेब शिंद्यांच्या लष्क-

रांत पोंचतांच शिंद्यांनीं सलामीकरितां तोफ.ची सरबत्ती केली. नंतर चार घटका उभय पक्षीं प्रेमाच्या व ख्यालीखुशालीच्या गोष्टी होऊन मुख्य कामास म्हणजे मागच्या यादींतील कलमांच्या फडशासंबंधानें बोलण्यास सुरुवात झाली. बाजीरावसाहेब फार बोलके होते. शिंद्यांकडील बाळोबा वगैरे मंडळीहि बोलण्याच्या खूप रंगांत आली होती. बोलणीं होतां होतां प्रहर रात्र होऊन गेली. आतां श्रीमंतानीं परत जाण्यास निघावें इतक्यांत एक घोडेस्वार दौडत दौडत डेऱ्याच्या दारापर्यंत आला, व घात झाला, घात झाला असें ओरडूं लागला. 'अरे काय झालें, काय झालें,' असें सर्व मंडळी आश्चर्यचकित होऊन विचारतात तों त्यानें उत्तर दिलें कीं, 'परशुरामभाऊ चिमाजी आप्पास घेऊन पळून गेले.' ही बातमी ऐकतांच श्रीमंतांकडील व शिंद्यांकडील मंडळीहि विस्मयानें व भीतीनें स्तब्ध झाली ! बाजीरावसाहेबांची कंबरच खचली. त्यांनीं दौलतराव शिंद्यास मोठ्या आर्जवानें सांगितलें कीं, आतांच्या आतां फौज पाठवून परशुरामभाऊंचा पाठलाग करावा व त्यांस धरून आणावें. त्यावर शिंद्यांनीं उत्तर दिलें कीं, 'ही काळोखी रात्र. त्यांतून भाऊ कोणत्या रस्त्याने कोठें गेले हें कोणासहि माहीत नाहीं. आता फौज पाठवून कांहीं उपयोग नाहीं. आपण गोटास चलावें, उद्यां सकाळीं हेंच काम प्रथम करूं.' श्रीमंत म्हणाले कीं, 'मला परत जाण्याची छाती होत नाहीं. भाऊनें मलाहि कांहीं दगाफटका करण्याची तजवीज कशावरून केली नसेल ! मी येथेंच राहतों.' शिंदे म्हणाले कीं, हा गोट काय आणि तो गोट काय, कोठेंहि राहिलां तरी आपण मालकच आहां. खुशाल राहावें. मग श्रीमंत तेथेंच राहिले. त्यासाठीं चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त शिंद्यांनी स्वतःच्या नजरेखालीं काळजीपूर्वक करविला. उजाडल्यावर श्रीमंतांनी परत जाण्याची गोष्ट काढताच शिंद्यांनीं सांगितलें कीं, 'आतां माझ्या गोटाबाहेर आपणास पाऊलसुद्धां टाकण्याची सोय नाहीं ! गोटा-

बाहेर जाल तर तत्काळ दगा होईल. याकरितां मी आपणास जाऊं देणार नाहीं.' इतकें झाल्यावर आपण कैदेंत सापडलों हें श्रीमंतांस उमजलें ! त्याबरोबर गेलेल्या मंडळींपैकीं फांकडे व पाटणकर व बाळाजीपंत पटवर्धन या तीन असामींत मात्र शिंद्यांनीं श्रीमंतांजवळ ठेविलें व बाकीच्या मंडळींस परत लावून दिलें.

(सरदेसाई, पान २७)

बरोबर त्याची कित्येक मंडळी होती. निघतांना श्रीमंतांनीं भाऊस बरोबर बोलाविलें. परंतु त्यांनीं उत्तर केलें, मला आज प्रदोष आहे. आतां सायंकाळ झाला. स्नान, पूजा व भोजन आटोपून मी मागून येतों. आपण पुढें चलावें. शिंद्यांचे लष्करांत बाजीराव पोचतांच शिंद्यांनीं तोफांची सरबत्ती करून बाजीरावाचा सत्कार केला आणि समारंभानें बाजीरावास डेऱ्यास नेलें. थोडा वेळ सामान्य बोलणीं झाल्यावर यादीं-तील कलमांची गोष्ट निघाली. बाजीराव फार बोलका होता. शिंद्याकडील बाळोबा वगैरे मंडळीहि बोलण्याच्या रंगांत आली. बोलणीं होतां होतां प्रहर रात्र झाली, आणि आतां बाजीराव परत जाणार तों एक घोडेस्वार दौडत दौडत डेऱ्याच्या दारापर्यंत आला, व घात झाला, घात झाला असें ओरडूं लागला. 'अरे, काय झालें ?' असें सर्व मंडळी आश्चर्य-चकित होऊन विचारतात तों त्यानें उत्तर दिलें कीं, 'परशुरामभाऊ चिमाजी आप्पास घेऊन पळून गेले' ही बातमी ऐकतांच श्रीमंतांकडील व शिंद्यांकडील मंडळीहि विस्मयानें व भीतीनें स्तब्ध झाली. बाजीराव तर दिङ्मूढच झाला. त्यानें शिंद्यांचीं आर्जवें चालविलीं कीं, आताच फौज पाठवून परशुरामभाऊचा पाठलाग करा व त्यास धरून आणा. शिंद्यांनी उत्तर दिलें, 'या वेळीं काळोखी रात्र. भाऊ कोणत्या रस्त्यानें गेले हें कसें कळणार ? आता फौज पाठवून कांहीं

उपयोग नाहीं. आपण गोटास चलावें. सकाळीं हेंच काम प्रथम करूं.' बाजीराव म्हणाला, " मला परत जाण्याची छाती होत नाहीं. भाऊनें मलासुद्धां दगा करण्याची तजवीज कशावरून केली नसेल ? ' तेव्हां शिंदे म्हणाले, ' हा गोट काय आणि तो गोट काय ?.कोठेंहि आपण मालकच आहां, खुशाल राहावें.' तेव्हां श्रीमंत शिंद्याच्या गोटांत राहिले. त्यासाठीं चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त शिंद्यांनी स्वतःच्या नजरेखाली करविला. उजाडल्यावर श्रीमंतांनी परत जाण्याची गोष्ट काढतांच शिंद्यानीं श्रीमंतांस सांगितलें, ' आता आपणास माझ्या गोटाबाहेर पाऊलसुद्धां टाकण्याची सोय नाहीं. तात्काळ दगा होईल. मीच जाऊं देणार नाहीं.' त्यावरून बाजीरावाची खात्री झाली कीं, आपण कैदेंत सापडलों. मानाजी फाकडे, हिरोजी पाटणकर व बाळाजीपंत पटवर्धन या तिघांस बाजीरावानें आपल्या जवळ ठेवून घेऊन बाकीच्यांस परत लावून दिलें.

(खरे, पान ४९०४ ते ४९०५)

नानांच्या विद्यमानें वस्त्रें आणावयाचीं नाहींत, या कामाशीं त्यांचा कांहींएक संबंध असून उपयोगी नाहीं. इतकेंच नव्हे, तर याउप्पर त्यांनीं साताऱ्यास महाराजांजवळ राहतांहि उपयोगी नाहीं; याप्रमाणें बाळोबातात्यांनी आग्रह धरिला व या सर्व गोष्टी परशुरामभाऊंनी कबूल केल्या. परंतु नानासंबंधाच्या इतर बाबतींत त्यांचें व बाळोबांचें ऐकमत्य होईना. जेव्हां जेव्हां भाऊंनी नानांबद्दल गोष्ट काढावी तेव्हां तेव्हां ' तेवढी एक गोष्ट बोलूं नका. बाकी तुम्ही सांगाल तें ऐकेन ' असें बाळोबांनी उत्तर करावें ! भाऊंचें म्हणणें कीं, ' नानांस तुम्ही राज्यकारभारांत घेत नाहीं तर घेऊं नका, परंतु फडाणिशीचा दरक त्यांचा त्यांच्याकडे चालला पाहिजे, त्यांच्या अब्रूस अथवा पैक्यास तुम्ही धोका आणतां कामा नये. मनास येईल त्या ठिकाणीं ते स्नानसंध्या करून राहतील. जेथें राहतील तेथें त्यांस

निर्वेधपणें राहूं द्यावें.' याप्रमाणें प्रत्यहीं रदबदली करतां करतां शेवटीं एकदांचे बाळोबातात्या प्रसन्न झाले. आणि बोलले कीं, भाऊसाहेब, तुमच्या मोहबतीखातर नानांच्या अब्रूस किंवा पैक्यास काडीमात्र धक्का न लावण्याचें मी वचन देतों. पण याबद्दल माझ्या शर्ती आहेत त्या नानानीं पाळल्या पाहिजेत. त्या ते न पाळतील तर त्यांचा निग्रह करणें प्राप्त आहे. माझ्या शर्ती अशा आहेत कीं, नानांनी साताऱ्यास फौज जमविली आहे ती दूर करावी. टोंकें, मेणवली, तासगाव, मिरज या चार स्थळांतून वाटेल तेथें स्नानसंध्या करून त्यांनीं स्वस्थ राहावें. याउप्पर राज्यकारभारांत त्यांनीं काडीमात्र ढवळाढवळ करूं नये; व मुख्य गोष्ट परकी राजेरजवाड्यांशीं व राज्यांतल्या भोंसले, गायकवाड वगैरे सरदारांशीं पत्रव्यवहार व राजकारणाचा शिलशिला त्यांनीं ठेवूं नये. गड, कोटकिल्ले व सरंजामाचा मुलूख त्यांच्या ताब्यांत आहे त्याच्या सोडचिठ्या त्यांनी सरकाराच्या हवालीं कराव्यात. बाळोबातात्यांच्या या शर्ती परशुरामभाऊंनी मान्य केल्या व त्याप्रमाणें नाना न वागतील तर आपण त्यांची तरफदारी करणार नाहीं व त्यांचें पारिपत्य करण्याचें काम तुम्हांप्रमाणेंच मनापासून करूं असें त्यांनी कबूल केलें.

(सरदेसाई, पान २४)

वस्त्रें नानाच्यामार्फत आणूं नयेत इतकेंच नव्हे, तर नानानें साताऱ्यास महाराजांजवळ राहूंसुद्धा नये, एवढ्या गोष्टी भाऊनें कबूल केल्या; परंतु पुढें जेव्हां बाळोबानें सुचविलें कीं, नानास पकडावें किंवा त्यांची जिंदगी हस्तगत करावी; तेव्हां भाऊनें त्या गोष्टी साफ नाकारल्या. त्यानें बाळोबास निक्षून कळविलें कीं, 'नाना तुम्हास राज्यकारभारांत नको असतील तर त्यांस घेऊं नका. पण त्यांचा फडणिसीचा दरक त्यांच्याकडे चालला पाहिजे. त्यांच्या अब्रूस किंवा पैक्यास तुम्ही धोका आणतां कामा

नये. कारभार सोडून स्नानसंध्या करून मर्जीस येईल तेथें त्यांस राहूं द्यावें. या गोष्टी बाळोबानें कबूल केल्या; पण त्यांत खालील अटी घातल्या–

१ नानानें साताऱ्यास फौज जमविली आहे, ती दूर करावी. २ मेणवली, मिरज, तासगांव किंवा टोकें यांपैकीं वाटेल तेथें त्यानें स्वस्थ राहावें. ३ राज्यकारभारांत ढवळाढवळ करूं नये किंवा बाहेर कोणाशीं पत्रव्यवहार, राजकारण व फंदफितुरी करूं नये. ४ गडकोट व सरंजामाचा मुलूख ताब्यात आहे तो नानानें सोडून द्यावा. मात्र या अटी त्यानें कबूल न केल्यास पारिपत्य करण्यासाठीं बाळोबाचें साहाय्य करणें भाऊनें कबूल केलें.

* आंबेडकर, महार व मडकीं

या विधानांना आधार दाखवा

रा. रा. केसरीकर्ते यांस—

सा. न. वि. वि. पुढील चार ओळींस आपल्या पत्रात जागा द्यावी—जातपाततोडक मंडळातर्फे लाहोर येथें भरणाऱ्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान डॉ. आंबेडकरांना द्यावयाचें ठरलें होतें. पण पुढें स्वागत-कमिटीचा व डॉ. आंबेडकरांचा, भाषणांतलि कांहीं मुद्द्यांबाबत मतभेद होऊन अखेर स्वा. मंडळानें अधिवेशनच तहकूब केल्याचें जाहीर केलें. तो प्रकार आतां सर्वांस ठाऊकच आहे. त्यानंतर अलीकडे डॉ. आंबेड-करांनी आपलें अध्यक्षीय भाषण स्वतःच स्वखर्चानें छापून काढलें आहे.

* केसरी, ता. ५ जून १९३६.

प्रस्तुत भाषण म्हणजे तो एक विद्वत्तापूर्ण प्रबंधच आहे, असें कोणीही म्हणेल. मतभेदाचे अनेक प्रश्न त्यांत उपस्थित होण्यासारखे असले, तरी त्यात दिसून येणारा व्यासंग व विद्वत्ता कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. पण हें पत्र लिहिण्याचा उद्देश फक्त एका शंकेचा खुलासा डॉ. आंबेडकरांना विचारावा इतकाच आहे. पान ३ वर पेशवाईपासून अगदी ता. १ एप्रिल १९३६ पर्यंत म्हणजे आजतागायत अस्पृश्यांचा किती निर्दयतेनें छळ चालला होता व आहे याचीं निरनिराळीं उदाहरणें डॉक्टरसाहेबांनी दिलीं आहेत. त्यांत ते लिहितात.—

'पेशव्यांच्या अमलांत मराठी मुलखांत अस्पृश्यांवर असें बंधन होतें कीं, त्यांनी एखादा स्पृश्य हिंदु सार्वजनिक रस्त्यावरून येत असेल, तर त्या रस्त्यावर जाऊं नये; कारण त्याच्या सावलीने त्या स्पृष्ट हिंदुला विटाळ व्हावयाचा. प्रत्येक अस्पृश्यानें आपल्या गळ्यांत अथवा मनगटावर काळा गंडा आपल्या अस्पृश्यतेची निशाणी दर्शविण्याकरितां घातलाच पाहिजे अशी सक्ति होती. पेशव्यांच्या राजधानीत म्हणजे पुण्यात तर असा कडक कायदा होता कीं, प्रत्येक अस्पृश्यानें आपल्या पाठीमागें कमरेस एक झाडू अडकवून फिरावें. तो अशाकरतां कीं, अस्पृश्याच्या चालण्यानें भूमीचा जो भाग विटाळला जाईल तो लगेच मागच्या झाडूने झाडून शुद्ध व्हावा; तसेंच प्रत्येक अस्पृश्यानें आपल्या गळयांत एक एक मडकें बांधून फिरावें. अस्पृश्यानें त्या मडक्यांतच थुंकलें पाहिजे. एरवीं त्याच्या थुंकीनें कदाचित् त्या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या स्पृश्य हिंदूस न कळत विटाळ व्हावयाचा."

अस्पृश्यांची अत्यंत दीन स्थिति वर्णन करण्याच्या भरांत व ब्राह्मण जातीला प्रहार करण्याच्या आवेशांत डॉक्टरसाहेबांनीं हें जें चित्र रंगविलें आहे तें उत्कट असलें तरी सर्वस्वी असत्य आहे एवढीच माझी तक्रार

आहे. मडकें गळ्यांत बांधण्याच्या साऱ्या गोष्टी केवळ दंतकथात्मक भाकड-कथा असून त्याला समकालीन अस्सल इतिहास साधनांत कोठेंहि आधार उपलब्ध नाहीं. हलीं वाडकृत पेशवा डायरीचे बारा भाग, पेशवे दप्तराचे पंचेचाळीस भाग, व इतर अस्सल साधनांचे पांच पन्नास खंड उपलब्ध आहेत. त्यांत अस्पृश्य जातीचे शेंकडों उल्लेख सांपडतात पण एकाही ठिकाणीं अस्पृश्यानें गळ्यांत मडकें बांधल्याचा किंवा कमरेस केरसुणी लटकावल्याचा उल्लेख सांपडत नाहीं. डॉ. अंबेडकरांसारखा विद्वानाला भाकडकथा व समकालीन अस्सल कागद पत्रें यांतला फरक कळत असतां त्यांनीं असा विपर्यास कां करावा? तें वर्णन करतात त्याप्रमाणें पांच दहा उदाहरणें तरी त्यांनी काढून दाखवावीं अशी विनंति आहे. नुकतेंच श्री. यशवंत नारायण टिपणीस यांनी 'दख्खनचा दिवा' नांवाचें एक नाटक लिहिले आहे. त्यांत तर शिदनाक महार नांवाच्या पात्राला प्रत्यक्ष गळ्यांत मडकें बांधूनच रंगभूमीवर आणलें आहे! त्यांनाही तीच विनंति आहे कीं, त्यांनीही आपले आधार जरूर प्रसिद्ध करावे, स्पृश्य जातींच्या किंवा ब्राह्मणांच्या जुलुमाचे चित्र रंगवितांना तें अतिरंजित न करण्याची खबरदारी त्यांनी घेणें जरूर आहे.

ता. ५ जून १९३६ यशवंत नरसिंह केळकर

आंबेडकरांचें उत्तर

रा. रा. केसरीकर्ते यांस—

वि. वि. आपल्या तारीख ५ जून १९३६ च्या अंकांत श्री. यशवंत नरसिंह केळकर यांचें एक पत्र छापण्यांत आलें आहे. त्यांत पेशवाईच्या अमलांत अस्पृश्यांच्या गळ्यांत थुंकण्याकरितां मडकीं बांधलीं जात असत वगैरे जीं विधानें मी माझ्या जातपाततोडक मंडळाच्या परिषदेकरिता तयार केलेल्या भाषणामध्यें केलेलीं आहेत, त्यांना आधार

दाखवा असा प्रश्न त्यांनीं मला केला आहे. वृत्तपत्रांतील टीकेला उत्तर देण्याचा माझा शिरस्ता नाहीं व त्याप्रमाणें या पत्रालाही उत्तर देण्याची माझी इच्छा नव्हती. परंतु परवां पुण्याला माटे मास्तरांनीं जीं माझ्या भाषणावर तीन व्याख्यानें दिलीं त्यांत ह्या पत्राचा उल्लेख करून त्याला मी उत्तर देऊं शकलों नाहीं असें साश्चर्य विधान केलेलें माझ्या पाहण्यांत आलें आहे. आधार नाहीं म्हणून उत्तर नाहीं असा कदाचित् माटे मास्तरां-प्रमाणें इतर लोकांचाहि गैरसमज होण्याचा संभव आहे, म्हणून उत्तर देणें आवश्यक आहे असा कांहीं मित्रांचा आग्रह असल्यामुळें मी रा. केळकर यांच्या पत्राला उत्तर देत आहे.

पेशवाईच्या काळांत हातांत काळा दोरा, गळ्यांत मडकें व कंब-रेला कुंचा वागविण्याची अस्पृश्य लोकांवर सक्ती केली जात असें ही कथा अस्पृश्य लोकांमध्यें कितीतरी दिवसांपासून प्रसृत झालेली आहे. यत्र धूमस्तत्र वन्हिः या न्यायानें पाहतां ही जी दंतकथा सर्व अस्पृश्य लोकांत पसरलेली आहे व जिचा अनुवाद अस्पृश्यांतील वयोवृद्ध लोकांनीं केलेला मी स्वतः ऐकला आहे त्या दंतकथेला सत्याचा आधार कांहींच नसेल असें मला तरी निदान म्हणतां येत नाहीं. दंतकथा ही इतिहासाच्या अनेक साधनांपैकीं एक साधन आहे असें सर्व इतिहासतज्ज्ञ मान्य करतात ही गोष्ट रा. केळकर यांना नाकबूल करतां यावयाची नाहीं. सर्वच गोष्टीला इतिहासाचा पुरावा देणें शक्य होणार नाहीं. निदान हिंदुस्थानांत तरी तें अशक्य आहे. हिंदुस्थानांतील लोकांना घडलेल्या गोष्टींची नोंद करून ठेवण्याची सवय नाहीं आणि म्हणून बऱ्याचशा गोष्टी घडल्या असल्या तरी त्यांना लेखी पुरावा देता येत नाहीं; शिवाय हल्लीचे जे इति-हाससंशोधक आहेत ते सर्वच सदसद्विवेकबुद्धीला जागून खरा इतिहास बाहेर पाडतील अशी फारशी आशा मला तरी वाटत नाहीं. आपल्या जातीचा इतिहास उज्वल राहावा या हेतूनें पुष्कळ इतिहास-संशोधकांनीं

हिंदु समाजांतील अंतर्व्यवस्थेवर प्रकाश पाडणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या कागदपत्रांची जाळपोळ केल्याचें मी ऐकलें आहे.

तसेंच कांहींजण आपल्याजवळ असलेले कागदपत्र प्रसिद्ध करण्यास तयार नसल्याचेंहि मी ऐकलें आहे. पुण्यांत पेशवाईत कांहीं सोनार लोकांनीं आपण दैवज्ञ ब्राह्मण आहोंत असा आग्रह धरून आपलीं धर्मकृत्यें वेदोक्त रीतीनें केलीं. ही गोष्ट पेशव्यांना कळल्यानंतर त्यांनीं ज्या दैवज्ञ ब्राह्मणांनीं वेदोक्त रीतीनें धर्मकृत्यें केलीं त्यांच्या जिभा कापण्याचा हुकूम केला व ही सजा अमलांत आणण्याचा अधिकार कऱ्हाड येथील ब्राह्मणांवर सोपविला. या हुकुमान्वयें कऱ्हाड येथील ब्राह्मणांनी त्या दैवज्ञ ब्राह्मणांच्या जिभा कापल्या व त्याप्रमाणें पेशव्यांना कळविलें. या प्रकरणाचे कागदपत्र एका ब्राह्मणाजवळ असल्याचें व आपण वाचल्याचें मला माझ्या मित्राकडून कळलें आहे. परंतु ज्याच्याजवळ ते कागद आहेत तो गृहस्थ ते प्रसिद्ध करण्यास तयार नाहीं. अशा परिस्थितींत प्रत्यक्ष कागदपत्राचा पुरावा कोणास कसा देतां येईल ? व मला जर माझ्या विधानांना प्रत्यक्ष कागदपत्राचा पुरावा देतां आला नाहीं तर त्यांत नवल काय ? तथापि माझ्या विधानाच्या समर्थनार्थ मला जरी प्रत्यक्ष पुरावा देतां आला नाहीं तरी एका मोठ्या सन्माननीय विद्वान व्यक्तीचा हवाला देतां येण्यासारखा आहे. रा. यशवंत नरसिंह केळकर यांनीं "मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार" या कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांनीं लिहिलेल्या पुस्तकाच्या पान १८० वर नजर फेकली तर मी केलेलीं विधानें कांहीं तरी भरमसाट लिहिण्याच्या हेतूनें केलेलीं नसून त्यांना कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांचा आधार आहे असें दिसून येईल.

राजगृह मुंबई
६ जुलै ३६.

आपला
भिमराव रा. आंबेडकर

डॉ. अंबेडकरांना प्रत्युत्तर

रा. रा. केसरीकर्ते यांसः—

वि. वि. गेल्या १० तारखेच्या केसरीच्या अंकांत डॉ. अंबेडकरांनी माझ्या पृच्छेला उत्तर दिलें व खुलासा केला याबद्दल प्रथमतः सर्व जिज्ञासूंतर्फे त्यांचे आभार मानणें युक्त आहे. सदर खुलाशांत 'पेशव्यांच्या वेळीं अस्पृश्यांच्या गळ्यांत थुंकण्याकरितां मडकीं बांधण्यांत येत असत' या आरोपाला किंवा विधानाला समकालीन ऐतिहासिक लेखांचा पुरावा मजजवळ नाहीं असें त्यांनी स्वच्छच कबूल केलें आहे ही महत्त्वाची व मुद्द्याची गोष्ट होय. मी विचारलेल्या मर्यादित प्रश्नाचें उत्तर येथेंच वास्तविक संपतें. पण डॉ. आंबेडकरांनी तसें न करतां स्वतः उल्लेखिलेल्या म्हणजे गळ्यांत गाडगीं अडकविण्याच्या दंतकथेचें समर्थन केलें असून, दंतकथांना इतिहासाच्या अव्वल साधनांत नेऊन बसविण्याचा प्रयत्न केला आहे. सत्य सिद्ध करणाऱ्या अस्सल ऐतिहासिक पुराव्याच्या नांवाने त्यांच्याजवळ पूज्य असल्यामुळें ही असली वकिली करण्याचा त्यांच्यावर प्रसंग येऊन ठेपला आहे हें उघड आहे. इतिहासाच्या अनेक साधनांपैकीं दंतकथा हें एक साधन आहे असें ते म्हणतात व तें खरेंहि आहे; पण साधनांत त्याची प्रतवारी काय लागेल हें समकालीन लेखांच्या मुकाबल्यानेंच ठरवावें लागतें. ज्या काळाच्या किंवा प्रसंगाच्या इतिहासासंबंधीं समकालीन किंवा उत्तरकालीन विश्वसनीय कागदपत्रें उपलब्ध होऊं शकत नाहींत तेथें दंतकथांना अव्वल दर्जाचें साधन मानणें ग्राह्य ठरेल. पण तशी स्थिति पेशवे कालासंबंधीं राहिली आहे काय? उलट राजकीय व सामाजिक हरएक बाबीसंबंधाने लक्षावधि कागद उपलब्ध झाले आहेत व रोज नवे नवे होत आहेत. अशा स्थितींत प्रचलित दंतकथा उपलब्ध कागदपत्रांच्या प्रत्यंतराने सत्य म्हणून सिद्ध केल्या तरच त्या ग्राह्य मानणें योग्य होईल.

'यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हिः' हा न्याय लावून दंतकथांवर विश्वास टाकणें धोक्याचें आहे. मृगजळांत दिसणाऱ्या जळाइतकेंच तें फसवें आहे. कारण त्यांत पराचा कावळा झालेला असतो, वडाची साल पिंपळाला डकविलेली असते, विकृति असते, अतिशयोक्ति असते, सर्व कांहीं असतें. यामुळें मुळांतल्या वास्तविक गोष्टीचें पूर्ण रूपांतर झालेलें असतें. अशा अनेक दंतकथा संशोधकांनी पुढें आणलेल्या कागदपत्रांच्या पुराव्यानें आज भाकडकथा ठरल्या आहेत. उदाहरणेंच द्यावयाचीं तर किती तरी देता येतील.

आपल्या उत्तराच्या शेवटीं डॉक्टरसाहेबांनी एका ब्राह्मणाच्याच विधानाचा हवाला देऊन परस्पर कांट्यानें कांटा काढण्याची चतुराई केली आहे. "माझ्या विधानाच्या समर्थनार्थ प्रत्यक्ष पुरावा देतां आला नाहीं तरी एका मोठ्या सन्माननीय विद्वान व्यक्तीचा हवाला मला देतां येण्यासारखा आहे. श्री. केळकर यांनी 'मराठ्यांच्या संबंधीं चार उद्गार' या के. राजाराम रामकृष्ण भागवत यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या १८० पानावर नजर फेकली तर मला भागवतांचा आधार आहे असें दिसून येईल" असें आंबेडकर म्हणतात. आम्ही तें पुस्तक पाहिलेलें आहे. त्यांत सदर पानावर प्रस्तुत आख्यायिकेसंबंधीं एकच वाक्य सांपडतें. तें असें:—'ब्राह्मणांचें जातीभेदासंबंधी स्तोम वाढलें खरोखर पेशवाईपासून. रस्त्यावर थुंकलें असतां रस्ता बाटेल म्हणून मडकें बांधून अतिशूद्रांनीं शहरांत हिंडावें हा हुकूम पहिल्याने फिरवला पेशव्यांनीं." श्री भागवतांचें हें विधान निराधार व अगदीं बेजबाबदार आहे असें म्हणतां येतें. त्याला त्यांनीं आधार दिलेला नाहीं हें तर झालेंच, पण दुसरेंहि गमक आहे. त्यांचें पुस्तक १८८७ सालीं प्रसिद्ध झालें. त्यानंतर आज १९३६ सालापर्यंत अर्ध्या शतकाइतका काळ लोटला. या काळांत लक्षावधि ऐतिहासिक साधनें उपलब्ध झालीं. पण अद्यापहि भागवतांच्या भरमसाट

विधानाला प्रत्यंतर मिळालेलें नाहीं. म्हणून भागवतांचा आधार सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. निराधार आरोप किंवा विधान भागवतांसारखा एखादा ब्राह्मण विद्वान करो, नाहीं तर डॉ. अंबेडकर करोत, त्याची किंमत तितकीच मानली पाहिजे.

डॉ. अंबेडकरांनीं बिचाऱ्या इतिहाससंशोधकांवर नाहीं नाहीं ते कुत्सित आरोप केले आहेत. या लोकांचें संशोधन आपमतलबीपणाचें असतें, ते आपल्या जातीला विरुद्ध जाणारा पुरावा आढळल्यास तो जाळून टाकण्यासहि मागेंपुढें पाहात नाहींत असें डॉ. अंबेडकर म्हणतात! दुर्दैवानें आज तरी इतिहाससंशोधकांत बिचाऱ्या ब्राह्मणांचाच बहुतांशीं भरणा असल्यामुळें वरील आरोप करतांना डॉक्टर साहेबांच्या डोळ्यांपुढें ब्राह्मण जातच असावी असा संशय येतो. पण या बाबतींत मी पेशवेदप्तराकडे बोट दाखवूं इच्छितों. महाराष्ट्रांतल्या सगळ्या घरांतलें मिळून दप्तर एके जागीं केलें तरी तें पेशवे दप्तराच्या पासंगास पुरणार नाहीं. येवढें मोठें दप्तर तेथें सरकारच्या ताब्यांत आहे. सुमारें पांच कोटी कागद तेथें आहेत. पेशवे सरकारचें खास दप्तर व खेरीज इंग्रज सरकारनें लोकांच्या घरोघर जप्त्या पाठवून आणलेलीं दप्तरें त्यांत समाविष्ट आहेत. फक्त ब्राह्मणांचीच दप्तरें तेथें नेऊन ठेवलेलीं नाहींत. त्या दप्तरांच्या संशोधनाचें काम निरनिराळ्या वेळीं ब्राह्मण–ब्राह्मणेतर, सत्यशोधक (कोल्हापूरच्या डोंगऱ्यांसारखे) वगैरे अनेकांनीं केलेलें आहे. त्यानंतर गेल्या पांचसहा वर्षांखालीं सरकारने रियासतकार सरदेसायांच्या देखरेखीखालीं एक संशोधन मंडळ नेमून त्याकरवीं त्या दप्तराचें तीन वर्षें संशोधन करवून ४५ खंड छापून प्रसिद्ध केले. त्या मंडळांत १ कऱ्हाडा, २ देशस्थ, २ कोकणस्थ, १ प्रभु, व २ मराठे अशा जातींच्या लोकांची बुद्धया निवड करण्यांत आली होती. पण त्या लोकांनाहि डॉ. आंबेडकरांना अनुकूल असणारा पुरावा सापडल्याचें माहीत नाहीं. पेशवेदप्तर सरकारने अभ्यासकांस खुलें

केलेलें आहे. पहिले बाजीराव दारू पीत होते हा पुरावा ज्या दप्तरांत सरदेसायांनीं शोधून काढला तेथें महारांच्या गळ्यांत गाडगीं अडकवण्याच्या दंतकथेला पुरावा असलाच तर तो आंबेडकरांनाहि मिळण्यासारखा आहे. पण तो मिळाला नाहीं तोंपर्यंत डॉ. आंबेडकरानीं वरील भाकडकथेला सत्येतिहासाच्या सदरांत बसविणें बरोबर होणार नाहीं इतकेंच.

१४ जुलै १९३६ } यशवंत नरसिंह केळकर

* इतिहास कीं पुराण ?

सी आय्. डी. तले गुप्त पोलीस आणि इतिहाससंशोधक सारखेच. कारण, लोकांच्या दृष्टीआडच या दोघांची करामत चाललेली असावयाची. फरक इतकाच कीं, वर्तमान लोकांच्या पाठीमागें गुप्त पोलिस लागलेले असतात; तर उलट गत पुरुषांच्याच मागें मात्र इतिहाससंशोधक लागतात. प्रत्येक सुप्रसिद्ध वा अप्रसिद्धहि पुरुषाच्या बारीकसारीक गोष्टींचें टिपण किंवा नोंद खुद्द त्या मनुष्याजवळहि सांपडणार नाहीं इतकी गुप्त पोलिसांच्या दप्तरीं नमूद असते म्हणतात. त्याप्रमाणें प्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्तीसंबंधानें मिळेल तो माहितीचा लहानमोठा कण इतिहाससंशोधक सांठवून ठेवतात. एखाद्या मोठ्या गुन्ह्याचें किंवा

---

* साप्ताहिक त्रिकाळ, १४ मे १९३४.

चळवळ्याचें किंवा पुराव्याचें पोलीस खात्यांत संशोधन सुरू झालें म्हणजे केव्हां केव्हां त्यांच्या त्यांच्यांतहि चुरस व मत्सर उत्पन्न होतो. संस्थानी सी. आय्. डी. आणि खालसांतली सी. आय्. डी. यांच्या जशा लाथाळ्या केव्हा चव्हाट्यांवर येतात त्याप्रमाणें इतिहासाच्या क्षेत्रांतहि संस्थानी संशोधक व खालसांतले संशोधक यांच्याहि हाणामाऱ्या पहावयास सांपडतात. आणि अशा वेळीं सत्यापेक्षां अनुकूल पुराव्याचें संशोधन करण्यांतच अहमहमिका सुरू होते. मग खरा पुरावाहि खोटा ठरविण्याचा अथवा बनावट पुरावाहि खरा भासविण्याचा अभिनिवेश उत्पन्न होऊन सत्याचे फारच हाल होतात. एखादा पाजी दुष्ट पोलीस अधिकारी कोणा लोकप्रिय पुढाऱ्याला किंवा व्यक्तीला गोत्यांत आणण्याकरितां किंवा त्याचीं किंमत कमी करण्याकरितां त्याचीं खरीं वा खोटीं खासगी पापें बाहेर आणूं लागतो; त्याप्रमाणेंच मग एखादा संशोधकहि क्वचित् जात्यभिमानानें, क्वचित् स्वप्रवृत्तीनें म्हणा, शत्रुपक्षांतील जुन्या प्रसिद्ध किंवा विवाद्य पुरुषासंबंधीं घाण उपसूं लागतो. मग त्याला पहिल्या बाजीरावासंबंधीं तो दारू पीत होता आणि मांस खात होता, असें एखादें पत्र सांपडलें म्हणजे इतर सर्व पत्रें मागें टाकून तेवढेंच पत्र छापण्याकरितां तो धडपडतो. किंवा नाना फडणविसाची कोणी रक्षा असावी असा भ्रम एखाद्या कागदावरून उत्पन्न होण्यासारखा असला तर तेवढाच कागद तो लोकापुढें निवडून मांडतो. कारण जनतेच्या कोर्टांत पुरावा शाबित करून त्या ऐतिहासिक पुरुषाला त्याला शिक्षा द्यावयाची असते. पण असले कांहीं अपवाद सोडले तर मात्र इतिहाससंशोधकांचें गुप्त पोलिसखातें खरोखरीच निरुपद्रवी असतें. कारण वर्तमानकाळाशीं त्याचा कधींच संबंध येत नाहीं ! सरकारी गुप्त पोलिसांचा ससेमिरा सुरू झाला म्हणजे लोक घाबरून जातात, कावरेबावरे होतात व प्लेगच्या उपद्रवाप्रमाणें स्थानत्यागहि करतात. उलट या इति-

हाससंशोधक पोलिसांचा फेरा सुरू झाला तर 'हे कोणी निरुपद्रवी डोकें फिरलेले वेडे दिसतात' इतकेंच त्यांना त्यांचें महत्त्व वाटतें; आणि क्वचित् करमणूकहि होते.

* * *

पण वर सांगितलेल्या या दोन मंडळांत दोन मोठे फरक आहेत. पहिल्यांतील पोलिसांना पैशाची उणीव कधीच भासत नाहीं. डायरी भरली कीं, त्यापायीं म्हणावा तितका पैसा मंजूर होतो म्हणतात. उलट, इतिहाससंशोधक पोलिस मात्र अगदींच भुकेबंगाल असतात; किंबहुना अक्षरशः घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजीत असतात. तसेंच, सामान्यतः पोलिसखातें देशाभिमान्यांचें नसतें असें समजलें जातें, तर उलट इतिहाससंशोधक मात्र एकजात देशभक्त असतात.

तें असो; या दोन्ही खात्यांच्या प्रत्यक्ष गुणावगुणांत किंवा चांगुलपणांत कितीही अंतर असो; एवढी गोष्ट मात्र खरी कीं, त्यांत शिरण्याला किंवा शिरून नांव कमावण्याला फाजील चौकसपणा हा पहिला आणि मुख्य गुण अंगीं असला पाहिजे. असल्या चौकसपणालाच कोणी कोणी 'चांभारचौकशा' म्हणतात. पण तोच त्या खात्यांतील मुख्य गुण आहे खास.

* * *

कृष्णाजीपंत म्हसवडकर हे प्रथम एका खेड्यांत शाळामास्तर होते. खेड्यांतला शाळामास्तर म्हणजे चालताबोलता ज्ञानकोशच होय. शिवाय कृष्णाजीपंत अतीच चौकस असल्यामुळें त्या कोशांत नेहमीं भरच पडत असे. भोंवतालच्या पांचदहा खेड्यांतील त्यांना बसल्याबसल्या माहिती झाली होती. एकदां एक जाडा संशोधक त्यांच्या गांवीं मुक्कामास गेला. त्यावेळीं त्या गांवच्या देशमुख घराण्याची बरीच ऐकीव माहिती कृष्णाजीपंतांनीं त्याला दिली आणि तेथपासूनच त्यांना संशोधनाची गोडी लागली

प्रथम त्या गोडीनें चटक लागली आणि मग तिचें व्यसनांतच रूपांतर झालें! प्रथम त्यांनीं कांहीं बखरी वाचल्या; मग लिखितें चाळलीं; मग आसपासच्या एकदोन कुळकर्ण्यांच्या येथचे कागदही पाहिले; मग टिपणेंहि लिहूं लागले व शेवटीं तर एका जुन्या सरदार घराण्याच्या रद्दींत लोळून घोत्रेधुरंधरे का कोणच्याशा दोन घराण्यांच्या भांडणाचे शेंदोनशें कागद छापून शिक्क्याचे 'संशोधक' नांवहि त्यांनी मिळविलें. तेथपासून मग त्यांनीं शोधावर शोधच लावले. त्या शोधापैकीं एक तर इतका क्रांतिकारक ठरला कीं, त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतही क्रांति घडून आली.

त्यांच्या त्या अपूर्व शोधाचें महत्त्व कळण्याकरितां थोडीशी पूर्व-पीठिकाहि समजून घेतली पाहिजे.

* * *

एकदां श्रीमंत औन्धकर अजिंठ्यास जात असतां सुप्रसिद्ध पैठण-क्षेत्रीं मुक्काम करते झाले. श्रीमंत स्वतः फारच चौकस आहेत, किंबहुना अष्टपैलू आहेत. अगदीं परस्परविरोधी गुणांचा संगम त्यांच्या ठिकाणीं झालेला पाहून मोठें कौतुक वाटतें. ते स्वतः संस्थानिक आहेत; पण प्रजा-हितदक्ष आहेत असें सांगितलें तर कां आश्चर्य वाटणार नाहीं? ते स्वतः म्हातारे आहेत पण तरुणापेक्षांहि अधिक व्यायामप्रेमी आहेत, असें कळलें तर कोणास कौतुक वाटणार नाहीं? त्याचप्रमाणें सौंदर्यशोधक नामांकित चित्रकार म्हणून ते जसे ख्याति पावले आहेत तसेंच ते रुक्ष इतिहास संशोधकहि आहेत, असें कोणास सांगितलें तर खरें वाटणार नाहीं. खरें वाटो वा न वाटो, गोष्ट अगदीं खरी आहे, कारण एका चित्रकार संमेलनाचे व एका इतिहास–संशोधक–मंडळाच्या संमेलनाचे ते अध्यक्षच होते मुळीं.

वरील पैठणक्षेत्रांत, उपस्थित झाल्यानंतर, त्यांच्या दोन वृत्ति अगदीं उचंबळूं लागल्या. त्यांची चितार्‍याची वृत्ति रसिक दृष्टीनें सुंदर

दृश्यें शोधूं लागली. पण त्या उजाड गांवकुसाच्या शिल्पाखेरीज आणि हिरव्यागार निवडुंगाच्या बगीच्या खेरीज कोठेंच कांहीं दिसेना. तेव्हा त्यांची इतिहास–संशोधकाची दृष्टि चळवळ करूं लागली. आणि तें अगदीं साहजिक होतें. कारण, जाग्यावर कांहींच शिल्लक नसेल तेथेंच इतिहास-संशोधनाला खरा वाव असतो! व तेथेंच त्यांची करामत दृष्टीस पडते. श्रीमंतांनीं तेथल्या आपल्या लहानशा मुक्कामांतहि तीव्र शोधकबुद्धीनें एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्याला चालना दिली. एखाद्या पर्वतप्राय गजराजानें आपल्या शुंडादंडानें एखादी अगदीं सूक्ष्म सुईसुद्धां लीलेनें उचलून घ्यावी, म्हणजे जसे आपण चकित होतों तशीच कांहींशी स्थिति त्यांच्या शोधानें लोकांची झाली.

पहावयास गेलें तर मुद्दा किती सूक्ष्म. पैठणांतल्या एका रेड्या-संबंधीं! श्रीमंतांनीं तो मुद्दा आपल्या अजिंठा नामक एका पुस्तकांत खालील शब्दांनीं प्रकट केला. "आपल्या प्राचीन प्रसिद्ध स्थळांविषयीं आमच्या लोकांची अनास्था अत्यंत गर्हणीय आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं पैठणास ब्रह्मवृन्दांची खात्री करण्याकरितां रेड्याच्या तोंडांतून वेदवाणी काढल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे. प्रत्यक्ष 'पैठणी भट्टीं केला वाद। बोलविला वेद रेड्यामुखें।' हा श्रीज्ञानदेवाचा अभंग प्रसिद्ध आहे. पण, हा जो रेडा बोलविला तो पैठणास कोणत्या ठिकाणीं, कोणत्या पेठेंत बोलविला या बाबतीबद्दल माहिती विचारतां कोणासही सांगतां आली नाहीं, याचें आम्हांला आश्चर्य वाटतें!" अरेरे! कोण ही आमची अनास्था! वरील कळकळीचे हृदयस्पर्शी उद्गार काढतांना श्रीमंतांच्या डोळ्यांपुढें खालींवर माना करून, घसा खरडून वेदांतल्या ऋचांचा घोष करीत असलेली त्या इतिहासप्रसिद्ध रेड्याची धीरगंभीर मूर्ति मूर्तिमंत उभी असल्यास नवल नाहीं. कारण, उज्ज्वल प्रतिभेचा तो साहजिकच परिणाम आहे. जेधे शकावली सांपडल्याबरोबर त्यांतल्या एका नोंदीनें शिवजन्मातिथीवर जसा एकदम नवा प्रकाश पडून

उलथापालथ होऊन गेली त्याप्रमाणें तो वेदशास्त्रसंपन्न रेडा कोणत्या पेठेंतला, निदान कोणत्या गवळ्याचा होता एवढें जरी श्रीमंतांना कोणी सांगणारा भेटता तरी इतिहासांत केवढी क्रांति झाली असती! ही मूल-ग्राही मुद्द्याची सूचक गोष्ट लक्षांत घेऊनच श्रीमंतांनीं त्या रेड्याचा कसून शोध केला असावा. कारण सुताला सूत जुळवूनच इतिहासाचें भूत तयार करावें लागतें, ही संशोधकांच्या अनुभवाची गोष्ट आहे. सुदैवानें त्या रेड्याच्या पेठेचा कदाचित मागमूस लागता तर कोणी सांगावें, तो रेडा गवळ्याचा होता का कोणा भिस्त्याचा होता का नुसताच देवाला वाहिलेला होता; त्याच्या नाकांत वेसण घातली होती का नाहीं, आणि घातली असल्यास वेदघोष करतांना त्याला कांहीं अडचण येत होती कीं काय वगैरे कितीतरी गहन मुद्द्यांवर प्रकाश पडला असता व रेडे कधींच निपुत्रिक मरत नसल्यामुळें किंबहुना बहुपुत्रकत्वाचा त्यांना वरच असल्यामुळें कदाचित् त्या रेड्याचा औरस वंशजहि सांपडून त्या इतिहासप्रसिद्ध रेड्याचा विस्तृत व विश्वसनीय वंशवेलहि तयार करतां आला असता!

पण, हें विषयांतर करण्याचें कारण म्हणजे सवड साधून श्रीमंतांची स्तुति करणें हें नसून मास्तरांच्या पराक्रमाची भूमिका समजून देणें हें आहे. कारण, त्या श्रीमंतांच्या मुद्द्यावरच कडी करून त्यांनीं इतिहास-सृष्टींत एक चमत्कार करून दाखविला. श्रीमंतांनीं त्या रेड्याच्या पेठेची चौकशी करून नुसती चालना दिली; परंतु, मास्तरांनीं सर्व माहिती एकत्र करून व नवीन अस्सल कागदपत्र शोधून त्या रेड्याचें छोटेसें चरित्रच उपलब्ध करून दिलें. हा महत्वाचा शोध इतिहासमंडळाच्या एका सभेंत प्रथम त्यांनीं वाचला. त्यांतील अपूर्व माहिती अशी—

" सदरहू रेड्याचा अव्वल पूर्वज म्हणजे प्रत्यक्ष यमधर्माचाच रेडा होय. स्वतःच्या मृत्युसमयीं यमपाश टाळण्यासाठी शिवाच्या पिंडीला

विळखा घालून मार्कंडेय वेदघोष करीत होता तो ऐकण्याची संधि याला प्राप्त झाली होती. तसेंच सावित्री–सत्यवान प्रकरणींहि तो एक साक्षीदारच होता. उत्तम सहवासामुळें अर्थातच तो मोठा सुसंस्कृत असला पाहिजे. ' शुद्ध बीजापोटीं। फळें रसाळ गोमटीं ' हा प्रत्यय येथें येतो. कारण त्याच रेड्याचा वंशज म्हणजे हा ज्ञानदेवाचा वेद बोलणारा रेडा होय !

बहुत दिवस स्वामिसेवा एकनिष्ठपणें केल्यामुळें यमानें कृपाळू होऊन त्याला फुकट वाटेल तेथें चरण्याची वृत्ति किंवा वतन करून दिलें व चाकरीची माफी केली. तेथपासून हें घराणें उजगारीस येऊन विस्तार पावलें. पण काळाचा तडाखा किती विलक्षण असतो हें आपणा इतिहासज्ञांस इतरांपेक्षां जास्त परिचयाचें आहे. कालांतरानें सत्ययुग संपून जिकडेतिकडे कल्याण झालें. (कल्याण म्हणजे कलीचा अंमल जसें, तुर्काण, फिरंगाण इत्यादि.) त्या राजवटींत या वंशास किंवा घराण्यास फारच जुलूम सहन करावा लागला. त्यांच्या मुसक्या बांधण्यांत येऊन त्यांना जबरदस्तीनें वेसणी घालण्यांत आल्या व त्यांना गलामाप्रमाणें वेठबिगारीला किंवा वेठविरळ्याला धरण्यांत येऊं लागलें.

पुढें अनेक पिढ्या लोटल्यानंतर एका पिढींत हा वेद बोलणारा रेडा जन्मला. त्याचा जन्मकाळ उपलब्ध नाहीं, हें इतिहासाचें केवळ दुर्दैव होय ! पण इतिहाससंशोधकांना नेहमीं मृत्युतिथीच जन्मतिथीपेक्षां अधिक सापडत असल्यामुळें दुःखांत तेवढेंच सुख मानावें लागतें. जन्माअगोदर कोणी पराक्रमी होणार कीं नाहीं हें कळणें शक्य नसतें; यामुळेंच पुढें पराक्रमी ठरलेल्या विभूतींचे जन्मशक किंवा तिथि बहुधा सापडत नाहींत. असो.

सदरहू रेड्याची मृत्युतिथि फाल्गुन शु॥ १५ मंदवार अशी आहे. नवीनच उपलब्ध झालेल्या एका अस्सल जुन्या लेखांत हा कालाचा उल्लेख

सापडला. त्यांत सालाचा स्पष्ट उल्लेख नाहीं हें खरें. परंतु मजकुरावरून आपण काळाच्या जवळ जाऊं शकतों. त्या महत्त्वाच्या अस्सल पत्रांतील अस्सल बमोजीब मजकूर असा—

" ग्यानबासी वैदासी कथळा पडिलाः भाडों लागलेः कोणेक दिनीं डुग धरौनु रेडा वळौनु जब केलाः जत्रा केलीः ऐशियास ग्यानबा क्रोधें भरौनु दिवाणीं बैसलाः दिवाणीं पुसितां रेडा कोण्हाचा म्हणौनुः तंव ग्यानबाचा रेडा वैद बोलिला (पुढें सुमारें १० ओळी गळल्या असाव्यात, प्रत्येक ओळींत पांच पांच भोकें पडलेलीं आहेत.) वर्तलें फाल्गून शु॥ १५ मंदवार तदिनीं ० ० ० "

सदरहू कागद फाटकाच अगदी जीर्ण त्रुटित सांपडला; परंतु तो खुद्द पैठणास व तोही एका पिढीजात गवळ्याच्या दप्तरांत सापडल्यामुळें, कागदाच्या विश्वसनीयतेसंबंधीं संशय घेण्याचें कारणच नाहीं. 'ग्यानबाचा रेडा वैद बोलिला ' असे स्पष्ट शब्दच त्यांत आहेत. ज्ञानदेवाचा काळ इतिहास-संशोधकांनीं निश्चित केला आहे, त्याअर्थी रेड्याचाहि काळ निश्चितच आहे. त्या वेळची शकसनाची मोडकांसारखी जंत्री केलेली नसल्यामुळें नक्की साल व तारीख सापडणार नाहीं. तरी ज्ञानदेवाच्या वयावरून हिशेब करतां पांचसहा वर्षांच्या फरकानें त्या रेड्याचा काळ निश्चित करतां येतो, असें माझ्या अल्पमतीस वाटतें.

बहुत दिवस केलेले परिश्रम सफळ झाले याबद्दल आनंद व थोडा गर्वहि वाटला, तर त्याबद्दल सहव्यवसायी संशोधक असूयाप्रेरित होणार नाहींत अशी आशा आहे. वेद बोलणाऱ्या रेड्याची मृत्युतिथि नक्की कळली त्याचप्रमाणें त्या रेड्याचा जत्रेंत वध झाल्यामुळें त्याला मृत्यु आला हीहि गोष्ट नवीनच कळत आहे. असो.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या रेड्याच्या पाठीमागें बरेच दिवस लागल्यामुळें

तत्सम इतर विषयांच्या चिंतनालाहि चालना मिळाली. एक तार वाजूं लागली म्हणजे दुसरी तारही आपोआप बोलूं लागते, असें म्हणतात; त्याप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांच्या रेड्याच्या आवाजाबरोबर दुसऱ्याही एका पशूचे स्वर मला ऐकूं येऊं लागले. त्या रेड्याच्या 'रेका' बरोबरच दुसऱ्या दोन पशूंच्या 'भोका' हि माझ्या कानांत घुमावयास लागल्या; पण असली अलंकारिक भाषा आपणा इतिहाससंशोधकांस काय उपयोगी? सरळ शब्दांत सांगावयाचें म्हणजे मी आतां शिवाजीमहाराजांबरोबर सती गेलेला कुत्रा व तसेंच स्वतःच्या डोईचें पागोटें काढून शाहूमहाराजांनीं तें ज्याच्या डोक्यावर चढवून आपण स्वतः जन्मभर बोडकेच राहिले तो इतिहासप्रसिद्ध कुत्रा, त्या दोघांचे जन्मशक शोधण्याच्या प्रयत्नास लागणार आहे.

पशूंच्या कुंडल्या कोणी तयार करीत नाहीं, त्यामुळें तें काम किती कठिण जाईल, याची थोडीशी कल्पना आपणास येईलच. याखेरीज आणखीही एका गोष्टीचा शोध लावण्याची खटपट मी करणार आहे. ऐतिहासिक लेखसंग्रहांत १७९८ सालाचें एक विश्वसनीय बातमीपत्र छापलें आहे, त्यांतील मजकूर असा—

"पै॥ छ १२ रज्जब तिस्सा तिसैन. मार्गशीर्ष. अपत्यें कृष्णानें करद्वय जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. श्रीक्षेत्र पंढरपुरीं कौतुकार्थ आश्चर्याची गोष्ट झाली आहे ते सर्वत्र लोकांनीं आपले दृष्टीनें पाहून आले. क्षेत्री वडरांचीं घरें आहेत त्यांनीं डुकरें बाळगिली आहेत. त्यांतून एक धाकटें दोन तीन महिन्यांचें डुकराचे पिल्लू मार्गशीर्ष शुद्ध ३ सोमवारीं आपले कळपांतून निघोन चंद्रभागेंत येऊन स्नान करून, पुण्डलिकाच्या देवळाभोंवत्या प्रदक्षणा करावयास लागलें. तों क्षेत्रस्थ लोकांनीं पाहून त्यास धुडावून लावून दिल्हे त्यास धुडावल्यानें तें डुकर जाईना. बळेंच

घरोन डुकरांच्या कळपांत लावून दिल्याही तेथें जाईना. तेथून पळोन येऊन मागती देवळाभोंवत्या प्रदक्षिणा करूं लागलें. अन्न, दूध, घेऊन लोकांनीं पुढें ठेविल्यासही खाईना. प्रदक्षिणाच करावयाचा छंद. असे चार रोज प्रदक्षिणा केली. पांचवे रोजीं डुक्कर मृत्यु पावले. उपरान्त पुंडलिकाच्या पुढेंच वाळवंटींत क्षेत्रस्थ लोकांनीं समारंभ करून पुरून टाकिलें. वडिलास वर्तमान कळावें यास्तव लिहिले आहे. स्त्रीजात, डुकरी होती; ती अहल्याबाई असा दृष्टांत झाला म्हणतात. श्रुत होय हे विज्ञापना "

या पत्राच्या विश्वसनीयतेबद्दल व समकालीनत्वाबद्दल शंकाच नको. त्या बाबत ऐ. ले. संग्रहकार लिहितात "ही गोष्ट पराकाष्ठेचें आश्चर्य वाटण्याजोगीच आहे. ती पंढरपूर येथें घडली असून तिचा वृत्तांत मंगळवेढ्याचे मामलेदार कृष्णराव मेघश्याम पटवर्धन यांनीं मिरजेस लिहून पाठविली आहे. श्रीमंत औंधकरांप्रमाणेंच त्या डुकराचा शोध व त्याला पुरलें त्या पेठेचा शोध करण्याचा कसून प्रयत्न करीन एवढेंच आश्वासन आज देणें शक्य आहे. इत्यलम् "

या निबंधाचें वाचन संपतांच एखादी फर्मास चीज म्हटल्यानंतर गवयावर ज्याप्रमाणें 'खाशी' 'वाहवा'चा वर्षाव होतो त्याप्रमाणें आपणावरहि श्रोते अभिनन्दनाचा वर्षाव करतील असें मास्तरांना वाटणें साहजिकच होतें. पण ते खालीं बसतांच तेथले ते आठदहा सभासद तोंडांतल्या तोंडांत स्मित करून एकमेकांकडे पाहून कांहीं खुणा करीत आहेत, असें त्यांना दिसलें. शेवटीं एक सभासद म्हणाला, 'आपण इतिहासमंदिरांत बसलों आहों त्याअर्थीं चिकित्सकपणा स्वीकारूनच कोणत्याहि गोष्टीकडे पाहिलें पाहिजे. या निबंधाबद्दल मी असें सुचवितों कीं, एक दुरुस्ती मास्तर प्रथम स्वीकारावयास तयार असतील तरच त्यांचा हा निबंध दप्तरीं दाखल करावा. रेडे या आडनांवाचा एक नामांकित ठोंब्या

पैठणास होता. त्यालासुद्धां ज्ञानेश्वरानें पद्दीचा वैदिक बनविला असा या चमत्काराचा अर्थ लाविला पाहिजे. हें मास्तरांना कबूल असेल तरच पुढें या टिपणावर चर्चा करावी, अशी माझी सूचना आहे."

जेथून फुलांचा वर्षाव होईल अशी कल्पना तेथूनच दगड येऊं लागलेलें पाहून मास्तर स्तंभितच झाले! पण लगेच दुसऱ्याक्षणीं 'डुक्कर खळीस येतो' त्याप्रमाणें मास्तर उसळले. "फार शहाणे अहांत आपण! अहो खराखुरा रेडा बोलला असतांना त्याला तुम्ही आज मनुष्य बनवूं पाहतां, त्या अर्थी उद्यां, तुम्ही आज बोलत आहांत त्याचा अर्थ 'गाढव बोलला; मनुष्य बोलला नाहीं' असा केला तर चालेल काय ? इतिहासशास्त्राचा मला धाक घालूं पाहतां ? पण मलाही इतिहास कळतो. इतिहास म्हणजे असें असें घडलें. आणि काय घडलें तेंच तर मी पुराव्यानिशीं पुढें मांडलें आहे."

यावर दुसरा एक सभासद हंसून म्हणाला "बरोबर आहे मास्तर. तो रेडा 'रेडे' आडनांवाचा मनुष्य ठरला तर तुमच्या शोधाची किंमतच संपावयाची! कारण मनुष्याला बोलाविणें यांत चमत्कार तो काय राहिला ?"

यावर तिसरा एक सभासद म्हणाला 'पण मास्तर, रेड्याची ही दंतकथा आहे. आख्यायिकासुद्धां नाहीं!'

मास्तर फिरून उसळून म्हणाले, "हाच तो गैरसमज! दंतकथा ह्या कधींसुद्धां खोट्या नसतात; मी उदाहरणेंच देतों. बोटें घाला. हीच आख्यायिका घ्या कीं नाना फडणिसानें आकसानें स्वतः आपल्या डोळ्यां-देखत सखारामबापूचें घरदार व त्याच्या दप्तरांतला एकूणएक कागद जाळून टाकला. एवढा पेशव्यांचा दिवाण, साडेतीन शहाण्यांतला एक सबंध शहाणा, त्याचीं दहापंधराहि पत्रें पेशवे दप्तराचा समुद्र उपसूनहि फारशीं मिळालीं नाहींत हाच त्या दंतकथेचा पुरावा नव्हे काय ? म्हणजे दंतकथा सत्य म्हणून सिद्ध झालीच कीं नाहीं ?"

" भले भले! दंतकथा अस्सल कागदाच्या प्रत्यंतर पुराव्यानें खऱ्या कराव्या लागतात. तुमची ही दंतकथा कागदाच्या अभावानेंच किंबहुना अक्षरशः तुमच्या 'दंतकथे 'नेंच सिद्ध झाली! तेव्हां ती फारच सत्य, दुसरें काय?"

" अहो, सत्य म्हणजे काय? दुसरा पुरावा देतों. नाना फडण-विसाचा द्वेष इतका जळजळीत कीं जेथें त्यानें ते कागद जाळले ती जागासुद्धां सतत जळत राहावी अशी त्याची इच्छा! म्हणून तिमय्या नांवाच्या एका आचाऱ्याला त्यानें ती इनाम दिली अन् चमत्कार असा कीं अजूनहि त्या जागेवर राख सांपडते!"

" बरोबर आहे! चूल असेल तिथें राख सांपडलीच पाहिजे; पण मास्तर, ती राख हा कशाचा पुरावा? त्या भट्टीचा किंवा चुलीचा! नानानें जाळलेल्या पत्रांचा कांही नव्हे!"

त्यावर चवथा एक सभासद म्हणाला,

" पण, काय हो मास्तर, तुमच्या दंतकथांनीं कितीहि ओरड केली कीं, बापू त्यावेळचा अद्वितीय म्हणून; तरी लोकांचीं त्याला आलेलीं नसतील तर नसोत, पण त्यानें लोकांना लिहिलेलीं शेंकड्यावारी पत्रें त्या त्या लोकांच्या दप्तरांत सांपडावीं कीं नाहीं? याचा अर्थ तो तितकासा मोठा नसावा किंवा समकालीन पत्रांनींच ठरविल्याप्रमाणें एक नंबरचा 'कौटिल्य' असल्यामुळें त्याचा सर्वच व्यवहार निरोपाशिरोपी चालत असावा. कारण, सगळेच फितूर त्याचे खिशांत! असला अर्थ कोणी कां काढणार नाहीं?"

"मास्तर, बापूची तुम्हीं सांगितलेली ही दंतकथा खरी मानाव-याची तर त्याच्या संबंधींच्या इतरहि दंतकथा खऱ्या मानाव्या लागतील! त्याची नजर म्हणे दुष्ट आणि वाईट होती. त्यानें पाहिल्यामुळें पुष्कळ

झाडें जळून गेलीं, तुळया कोसळल्या असें सांगतात; तेंहि खरें मानावें लागेल. कारण त्यालाहि कागदपत्राचा पुरावा सांपडणें शक्य नाहीं. मी सांगतों तुम्हांला दुसरी एक बापूची आख्यायिका. तो इतका कुटिल, कारस्थानी आणि संशयी होता कीं, तो त्याचा स्वभाव त्याच्या अगदीं साध्या आचारविचारांतहि उमटल्याशिवाय राहत नसे. त्याचा एक ठराविक न्हावी होता व तो ठराविक दिवशीं त्याची श्मश्रू करावयास येत असे. पण त्या न्हाव्याला जेव्हां जेव्हां बापूकडून बोलावणें जाई, तेव्हां तो चोपदार आपला न्हाव्याला बजवावयाचा कीं, लहान मुलाचें डोकें करावयाचें आहे !"

इतकें तो सभासद बोलतांच तेथें मोठा हंशा पिकला. मास्तर आधींच कुंठित झाल्यामुळें फार गरम झाले होते, आणि त्यांत हा उपहास सुरू होतांच थोड्याच वेळांत तेथें हमरी तुमरी सुरू झाली, इतकी कीं आरतीच्या वेळीं जसा एखादा देवळाचा गाभारा सुन्न होऊन जातो, तसा तो मोठा थोरला दिवाणखाना; पण नुसता घुमून गेला. प्रथम बोलाचाली, नंतर बाचाबाची नंतर भांडाभांडी आणि शेवटीं तर नुसती आरडाओरडच ऐकूं येत होती. मास्तर रागारागानें ओरडून म्हणत होते कीं, तुम्हांला दुसऱ्यालां पुढें येऊं द्यावयाचें नाहीं, म्हणून तुम्हीं ही टवाळी चालविली आहे. तुम्हीं सगळे आपमतलबी आहां. तें कांहीं नाहीं. माझा हा निबंध फिरून मी पुढल्या सभेंत जशाच्या तसा वाचतों. तुमच्या चांडाळचौकडीखेरीज शेंकडों लोकांसमक्षच त्याची चर्चा होऊं दे. आणि मग मी तुमचा तमाशा पाहीन !" तेव्हां ते सभासदहि तसेंच ओरडून म्हणाले. " ठीक ठीक ! पाहूं या किती लोक तुमचा अपूर्व शोध ऐकायला येतात ते ।" अशा रीतीनें भांडततंडत ती सभा आपोआपच विसर्जन पावली ! मास्तरांच्या सुदैवानें कीं दुर्दैवानें असो, ही बाचाबाची चालली असतांना एका वर्तमानपत्राचे एक गुणी बाळ म्ह. बातमीदार मात्र तेथें अगदीं

गुदगुल्या झाल्यासारखें आनंदित होऊन टिपणें घेत बसलें होते. रागारागानें एखादा चांगलासा अपशब्द मास्तर बोलले कीं, 'वर्म' साधल्यासारखी तो मान हालवी. व घाईघाईनें तेवढा शब्द टिपून घेई! मास्तर मंडळाबाहेर पडतांच त्यानें त्यांना गांठलें; त्यांचे हात धरून म्हणाला, "बरी तुम्ही हजेरी घेतलीत या शिष्टांची! तुमच्या निबंधाचा मी इत्थंभूत रिपोर्ट घेतला आहेच, पण पुढच्या अंकांत आधीं फक्त अत्तांच्या वादविवादाचाच तेवढा मजकूर घालणार आहें."

काय असेल तें असो. कोणती कल्पना मास्तरांच्या मनांत आली ती नकळे. पण मास्तर त्याच्या खांद्यावर हात टाकून अगदीं जिव्हाळ्यानें म्हणाले, "तसें तर कराच, पण त्याखेरीज कृपा करून अशी कांहींतरी व्यवस्था करा कीं, पुढच्या सभेस अगदीं सपाटून गर्दी उडाली पाहिजे. कांहींतरी चुणचुणीत, चुरचुरीत लिहा. तें तुम्हांला सांगावयाला नकोच! लोक तर जमूं देत; मग या धेंडांची कशी धूळधाण उडवून देतों, ती पहा!" यावर 'तें काम माझें!' असें म्हणून तो रिपोर्टर निघून गेला. दुसरें दिवशीं मास्तरहि आपल्या गांवीं निघून गेले.

* * *

पुढें सभेच्या दिवशीं मास्तर पुण्यांत आले ते मोठ्या उभारींतच आले. आजचा दिवस त्यांच्या आयुष्यांत मोठा क्रांतिकारक होता यांत शंका नाहीं. सभा जिंकावयाच्या अगोदर ती जिंकल्याचीं सुखस्वप्नें त्यांस पडत होतीं. जागे असूनहि ते स्वप्नांतच वावरत होते! मंडळाच्या नेहमींच्या क्षयी पाक्षिक सभा आणि आज भरणारी टोलेजंग सभा या दोहोंचीं चित्रें आलटून पालटून त्यांच्या दृष्टीपुढें नाचत राहून त्यांना गोड गुदगुल्या होत होत्या. 'कोण त्या आमच्या रुक्ष पाक्षिक सभा! त्या सभा म्हणजे ऐतिहासिक पुरुषांचें तर्पण करणारीं श्राद्धपक्षेंच होत! त्या मोठ्या थोरल्या उदास आणि अंधेऱ्या दिवाणखान्यांत सुत-

क्यासारखा गंभीर चेहरा करून ते आम्ही पांचसहा सभासद वाटोळें कोंडाळें घालून बसतो. आतां आम्ही त्याचा 'क्षण'च घेतलेला असतो म्हणून तेथें जातों इतकेंच. आमची तीं श्राद्धें चाललेलीं असतां तेथें औषधालाही श्रोता मिळावयाची मारामार. तसे श्रोतेहि असतात, पण ते म्हटले म्हणजे मंदिराच्या भिंतीतर, कपाटावर, फळ्यावर टांगलेलें ऐतिहासिक मृतात्मे होत! त्या सगळ्या ऐतिहासिक पुरुषांच्या जीर्ण तसबिरींची ती गर्दी पाहून खरोखरच असें वाटतें कीं, आमच्या मार्फत पिंड मिळविण्याच्या आशेनें ऐतिहासिक पुरुषांचे हे सर्व अतृप्त आत्मे कावरेबावरे होऊन जमा झाले आहेत. एवढा मोठा दिवाणखाना; पण नेंहमीं कसा एखाद्या मोठ्याथोरल्या लेण्याप्रमाणें उदास व निर्मनुष्य असतो. आणि त्या कुंद जागेंत पाकोळ्याप्रमाणें किंवा वाघळांप्रमाणें आम्हांपैकीं एखादा संशोधक एखाद्या जीर्ण पत्राचें पंख फडफडतांना दिसला तर दिसावयाचा! पांच–पन्नास खुर्च्याही प्रेक्षकांकरितां मांडलेल्या असतात म्हणा; पण त्यांतल्या साडेतीन तरी भरतात कीं नाहीं, कोणास ठाऊक! जणू कांहीं, एकेका संशोधकाला दहा दहा मोकळ्या खुर्च्यांची मनसबदारीच दिली आहे! बाकी, मृतात्मे जेथें वावरणार त्या जागीं आमच्यासारख्या अघोरी लोकांखेरीज कोण जाणार? कोणीकडे ठराविक ठशाच्या त्या ओसाड सभा आणि कोणीकडे आजची अपूर्व सभा! आणि आज तेथें अशी खेंच होऊन जाईल कीं कोणाला इकडची मान सुद्धां इकडे करतां येणार नाहीं! जशा कांहीं आगकाड्याच्या पेटींत काड्याच भरल्या आहे! सगळे एकजात जाडे संशोधक तेथें जमतील. आणि जमले नाहींत तर त्यांना संशोधक तरी कोण म्हणेल? आज त्या प्रत्येकाची अगदीं परस्पर सोळा आणें फजिती होणार यांत शंका नाहीं! काय म्हणे तो अमुक, कुठलें एक भजनी भारूडाचें बाड जुन्या रद्दींत विकत घेतलें असेल, त्यांतल्या दोन दोन ओंव्या किंबहुना दोन

दोन चरण दर पाक्षिक सभेंत वाचून हजेरी कायम ठेवतो. तो तिसरा बिचारा फार कष्ट करतो. तो मनांत चरफडेल कीं, मी इतका उदंड हिंडतों धुंडतों कागदपत्रांकरितां; पण असा महत्त्वाचा कागद माझ्या दृष्टींतून सुटलाच कसा ? त्यासारखाच चवथा तो नेहमीं भोरच्या राम-नवमींतल्या उत्सवाच्या उष्ट्या पत्रावळींच्या लिलांवाचे जमाखर्ची कागद नाहींतर जेधे न् खोपडे देशमूख यांच्या माऱ्याची कर्मकथा रडत असा-यचा ! त्या सगळ्यांच्या तोंडाला आज काळोखी फांसतों ! तिला आज लौकरच जागें करावयास बजाविलें पाहिजे. उचका असल्यामुळें झोंप यायची नाहीं खरी; पण ती बोलूनचालून माझी झोंप माझ्यासारखीच आळशी ! येतांयेतां यायची नाहीं; आणि आल्यावर लौकर जायची नाहीं ! ! आणि सभेला जायला उशीर झाला म्हणजे ' मास्तर पळाला !' म्हणून उगाचच त्यांच्या जिभा चालायच्या ! "

* * *

अशा तंद्रींत गुंगत असतां त्यांना खरोखरीच झोंप लागली; व एक स्वप्नहि पडलें. स्वप्न अर्थात् सभेसंबंधींच होतें. त्यांना दिसलें कीं, आपण आपला निबंध वाचून सर्व शंकेखोरांची धूळधाण उडवून दिली आहे. प्रेक्षक अभिनंदनपर टाळ्यांचा कडकडाट करीत असून त्या विजयानंदानें एकदां डावीकडे व एकदा उजवीकडे मान वळवून पाहून आपण खालीं बसत आहोंत; इतक्यांत महाराष्ट्राचे एक 'गिबन' हळूच मागून येऊन आपल्या कानाशीं कुजबुजून म्हणत आहेत कीं, ' तुमचा शोध केवळ अपूर्व आहे. माझा इति-हासाचा नवा भाग छापत आहे. त्यांत हें तुमच्या निबंधांतलें अस्सल पत्र मी छापतों. म्हणजे तुमची तावडतोब प्रसिद्धि होईल. मंडळाच्या नादीं लागाल तर तुमच्या जन्मांतरींहि तो कागद छापलेला पहावयास मिळावयाचा नाहीं ! हें 'इतिहास—मंडळ' पडलें ! तेव्हां त्याचा कारभारहि 'ऐतिहासिक' झाल्या-खेरीज त्रैमासिकांत कोठून प्रसिद्ध होणार ?" हें बोलत असतांच गिबनसाहेबांनीं

चलाखीनें तो कागद आपल्या हातांतून घेऊन ते त्याची भरभर नकलहि करावयास बसले आहेत. इतक्यांत चिटणीस धांवत येऊन तो कागद हिसकवून घेत आहेत; व तुमचे इतिहास सजवायला मंडळाचे कागद नाहींत ! मंडळानें छापल्यावर वाटेल तर घ्या ! आधीं मंडळ; मग तुमच्यासारखी मंडळी ! ! असें दरडावून म्हणत आहेत. त्यामुळें दोघांची त्या कागदाबद्दल झोंबाझोंबी सुरू होऊन 'भाऊबंदकी' नाटकांतल्या ताइताशीं झोंबी खेळणाऱ्या दुर्गाम्हाळसाप्रमाणें तो कागद ते दोघे दोहीकडे ओढीत आहेत; आणि आपण मात्र तुळ्या पवाराप्रमाणें कासावीस होऊन "पुराव्याचा कागद ! माझें अस्सल ! फाटेल ! माझा जीव कासावीस होतो !" असें म्हणत असतां तोंडास फेंस येऊन दाणकन् बेशुद्ध होऊन पडत आहोंत.

* * *

त्या स्वप्नांतल्या भीतीनेंच मास्तर गुदमरून जागे झाले. उठल्याबरोबर त्यांनीं आधीं उशाशीं घेतलेलें आपलें बोचकें ऊर्फ दप्तर काबऱ्याबावऱ्या मुद्रेनें शोधून पाहिलें. आणि त्यांत आपला कागद सुखरूप स्वास्तिक्षेम आहे असें त्यांना दिसलें तेव्हां त्यांच्या जिवांत जीव आला. पण घड्याळांत पाहतात तों सभेची वेळ होऊन अर्धा तास लोटलेला म्हणून घाईघाईनें बोचकें खाकोटीस मारून ते मंडळाकडे धावले.

मंडळाजवळ येतात तों आंतून गांधिलमाशा उठलेल्या मोहळाप्रमाणें गोंगाट येऊं लागला. शक्य तितका बावळटपणाचा आव आणून आधीं पाठीमागच्या खुर्चीवर जाऊन बसावें असा विचार करीत आणि आपल्या उपरण्याखालीं कागदाचें बोचकें लपवीत ते दिवाणखान्यांत शिरले. तों काय! सारा दिवाणखाना बायकांनीं नुसता फुलून गेला आहे !! पण आपला शोधच तितका महत्त्वाचा असल्यामुळें बायकांनाही यावेंसें वाटले तर आश्चर्य नाहीं. आजपर्यंत आपण

सुशिक्षित स्त्रियांची टवाळीच करीत आलों. पण आज त्यांनीं इतक्या मोठ्या जमावानें या सभेस हजर राहून आपल्या शोधाचें कौतुक करावें हें पाहून ते मनांत शरमलेहि. पण हा प्रकार क्षणमात्रच झाला. दुसऱ्या क्षणीं त्यांनीं फिरून मान वर करून पाहिली तों काय ? कोणीहि 'सभेच्या' बायका नाहींत सगळ्या 'पुराणाच्या' आणि 'कथेच्या' ! ! मास्तर अगदीं चकितच होऊन गेले. त्यांना वाटलें कीं, आपण भ्रमांत चुकून इतिहास-मंदिरांत शिरण्याऐवजीं शेजारच्या ' उपाशी विठोबा 'च्या मंदिरांत तर शिरलों नाहीं ? ' त्यांनीं स्वतःला चिमटे घेऊन पाहिलें. डोळे चोळून पाहिले. तरी तोच देखावा ! म्हणून चौकशी करण्यासाठीं ते आजूबाजूस वळणार तों तेथें समीपच चौघडी पांघरलेली व नाकाला चाळशी लावलेली एक थेरडी चिमटीला राख लावीत 'टेम्पल-इन्डस्ट्रीं'त म्हणजे वातीकरितां सूत काढण्यांत गढली होती. ती आपल्या शेजारणीला एकदम म्हणाली, " आलें हो बाई ! आवरा आतां. "

" हेच कां ते म्हस्वडकरबुवा. अगदींच गबाळे दिसतात. अगदीं गाडगेबुवा किंवा गोधडेबुवाच. "

" अहो ते राष्ट्रीय कथेकरी आहेत ना ! "

इतक्यांत तिसरी एक बाई विचारते, " पण काय हो भिमाबाई; त्यांचा तो कोठें रेडा दिसत नाहीं तो ? म्हटलं ज्ञानेश्वराचा रेडा, धर्माचा, खाईल कांहींतरी. म्हणून ही मापटंभर बाजरीहि आणली होती निराळी बरोबर. "

त्यावर पहिली बाई म्हणाली, " राहूं दे. कांहीं हरकत नाहीं. मेला रेडा नाहीं तर कथेकरी तरी खाईल, फुकट नाहीं जात. "

हे शब्द कानांवर पडतांच मात्र मास्तरांचा धीर सुटला त्यांनीं त्या बाईस विचारलें, " काय हो बाई, आज येथें आहे तरी काय ? "

" इश्श ! म्हणजे तुम्ही नव्हेच का ते म्हसवडकरबुवा कथेकरी ? " असें म्हणून आपल्या मुठीचें प्रश्नचिन्ह आपल्या बोळक्याला जोडून ती क्षणभर स्थिर झाली आणि मग एकदम त्या सगळ्या थेरड्या एकमेकीला हातानें हलवीत खो खो हसूं लागल्या.

" आज त्या ज्ञानेश्वरांच्या रेड्याची कथा आहे ना? आम्हांला काय ठाऊक ? पुरुष वर्तमालपत्र वाचतात. ते बोलतात त्यावरून तरी आह्मांला कळलं. आम्हीं थोडींच 'वर्तमालपत्रं' वाचतों ? मग तुह्मीं नव्हेच ना ते कथेकरी ? तरी मी ह्मणतेंच आहे ठमाबाईना मघांपासून कीं असा कसा असेल कथेकरी बुचका ! नाहीं डोक्याला पागोटं; नाहीं धड अंगांत आंगरखा कीं नाहीं करवतीकाठीं उपरणं ! "

" छे ! छे ! छे ! छे ! छे ! छे ! मी नव्हे हो तो कथेकरी ! गैरसमज करून घेऊं नका. मी आपला सहज आंत शिरलों इथें, फार गर्दी पाहिली म्हणून."

असें ह्मणत मास्तर तडक तेथून बाहेर पडले व एखादा नवशिक्या दारुड्या गुत्त्यांतून बाहेर पडतांना ओळख पटूं नये ह्मणून उपरणें तोंडावर गुंडाळून घेतो, त्याचप्रमाणें त्यांनीं केलें; व ते भ्रमिष्ट स्थितींतच घरीं पोंचले.

घरीं पोंचतांच त्यांच्या बायकोनें त्यांना एक पत्र आणून दिलें तें असें—

" सा. न. वि. वि. पूर्वीं आपलें समक्ष ठरल्याप्रमाणें तुमच्या व्याख्यानाची 'स्पेशल अनाउन्स्मेन्ट' मुद्दाम आंतल्या महत्त्वाच्या मजकुरांतच चौकट घालून ठळकपणें लोकांच्या लक्षांत यावी म्हणून दिली आहे. त्यांतील मजकुरालाहि मुद्दाम आकर्षक व नवीन स्वरूप दिलें आहे, तें सोबतच्या अंकावरून आपल्या ध्यानीं येईल.

—आपला बातमीदार "

वर्तमानपत्रांत मजकूर होता तो असा—

6333

चमत्कार

अपूर्व लाभ ! संधी दवडूं नका !!

... तिथी. इतिहास–मंडळांत सुप्रसिद्ध म्हसवडकर यांचें ज्ञानेश्वराचें संकीर्तन ! आख्यान ऊर्फ विषय

ज्ञानेश्वराचा वेद बोलणारा रेडा

बुवांची वाणी रसाळ असून विवेचन हृदयाला भिडणारें असतें. ही संधि आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं दवडूं नये. ती दवडणें म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानदेवाच्या रेड्याच्या दर्शनालाच मुकणें आहे.'

पत्र वाचून पाहातांच एखाद्या जालीम मात्रेच्या वळशाप्रमाणें मास्तर शुद्धीवर आले व म्हणाले, 'अरेरे कोण मी गाढव, या पाजी पत्रांच्या नादीं लागलों." पण येवढ्यानेंच त्यांचें दुर्दैव संपत नव्हते. त्यांच्या बायकोनें दुसरा एक लखोटा त्यांच्या हातीं आणून दिला. त्यांत फिरून तेच हाडवैरी प्रतिस्पर्धी संशोधक दत्त म्हणून उभे. पत्र असें:—

"सा. न. वि. वि. पुढील मजकुराची एक प्रत रीतसर मंडळाकडे पाठविलीच आहे. आपल्या माहितीकरितां ही दुसरी प्रत आपणाकडे पाठवीत आहों.

म्हसवडकरांना सांपडलेला कागद नुसतां एकदा वाचला तरी त्यावरून त्यांनीं काढलें तसें अनुमान निघणें शक्यच नाहीं. ते म्हणतात त्याप्रमाणें तो कागद खुद्द पैठणास आणि पिढीजात गवळ्याच्या घरांतहि सांपडला असेल. पण त्या रद्दी चिठोऱ्यांतील मजकुराचा अर्थ अगदींच निराळा होतो. तो असा.—

ज्ञानोबा नांवाचा एक मनुष्य व एक वैदू यांचें एक दिवस भांडण झालें ह्मणून अदावत धरून त्या वैदानें ज्ञानोबाचा रेडा रानांत मारला तेव्हां रागावून ज्ञानोबा सरकारांत ह्मणजे दिवाणांत फिर्याद करण्याकरितां गेला. तेथें वैदाची जबानी घेत असतां पंचांनीं विचारलें कीं, रेडा कोणाचा? तेव्हां 'वेद बोलला', ह्मणजे वैदू ह्मणाला, रेडा ज्ञानोबाचा. असा सरळ व क्षुल्लक अर्थ असतांना इतिहाससंशोधनाच्या वेडानें त्यावर एवढें तर्कट रचलें जावें व त्या रेड्याच्या पुण्यतिथीचा शोध लावण्याचा आचरटपणा व्हावा हें आश्चर्य होय. हा शोध हरदासाला शोभण्यासारखा आहे; इतिहाससंशो-धकाला नाहीं. शिवाय पुण्यतिथीचा शोधहि फुकट. कारण आज पूर्वापार कोणच्याशा एका ठराविक दिवशीं जुन्नराजवळ आरें किंवा आरळें या नांवाच्या गांवीं त्या रेड्याच्या पुण्यतिथीचा उत्सव दरसाल होत असतो, असें समजतें. म्हणून आजच्या सभेस खालीं सह्या करणारे आम्हीं कोणीहि हजर रहाणार नाहीं. एक अविवेकी झाला म्हणून इतिहास-मंडळांतले इतर सर्व सभासद कांहीं तसे नाहींत.

—आपले सभासद

* * *

पत्र वाचून होतांच मास्तरांनीं आपल्या कपाळास हात लावला आणि ते उद्‌गारले, 'इतिहास आणि पुराण यांत इतका फरक असतो काय? पुनः त्या मंडळाच्या वाटेसही मी जाणार नाहीं. ठरले! आजपासून मी ऐतिहासिक कथेकऱ्याचाच पेशा स्वीकारीन! या म्हणावं लेको कथेंत! आणि बोला मध्ये म्हणजे मग तिथें सांगतो.'

समाप्त

याच ग्रंथकर्त्याचीं इतर पुस्तकें

(१) गीतद्विदल (काव्यसंग्रह) किं. ८ आणे

(२) गीतगुंफा (काव्यसंग्रह) किं. १२ आणे

(३) विनोदलहरी (विनोदी लेख–संग्रह)
प्र. हनुमान प्रेस, पुणें शहर. किं. १। रु.

(४) ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्य-मय इतिहास पृष्ठसंख्या ६०० किं. ३ रु.

(५) वसईची मोहीम पृ. सं. ४०० डेमी किं. ३॥ रु.

आगामी प्रकाशन

जंजिरेकर शिद्दयांवरील मोहीम (१७३३–३६)
येत्या मेपर्यंत तयार होईल. पृ. संख्या सुमारें ३५०.